# शासकीय मराठी



# COMMUNICATIVE MARATHI FOR GOVERNMENT OFFICIALS

## लघु-अभ्यासक्रम / SHORT COURSE


**KALIKA MEHTA**
**GAURI BRAHME**
**SUHAS LIMAYE**



UNIVERSITY OF MUMBAI

RAJYA MARATHI VIKAS SANSTHA

कलिका मेहता / KALIKA MEHTA
गौरी ब्रह्मे / GAURI BRAHME
सुहास लिमये / SUHAS LIMAYE

# शासकीय मराठी
# COMMUNICATIVE MARATHI FOR GOVERNMENT OFFICIALS

लघु-अभ्यासक्रम / SHORT COURSE

**संपादक / EDITORS**
मेहेर भूत / MEHER BHOOT
विभा सुराणा / VIBHA SURANA
संजय पाटील / SANJAY PATIL
सोनाली गुजर / SONALEE GUJAR

**संकल्पना आणि निर्मिती / CONCEPT & PRODUCTION**
जर्मन विभाग, मुंबई विद्यापीठ
Department of German, University of Mumbai

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
**RAJYA MARATHI VIKAS SANSTHA, MUMBAI**

मुंबई विद्यापीठ
**UNIVERSITY OF MUMBAI**

**ISBN: 978-93-5407-520-9**

**FIRST EDITION, 2021**
**पहिली आवृत्ती, २०२१**


- **प्रकल्प समन्वयक / PROJECT CO-ORDINATOR**
  विभा सुराणा / VIBHA SURANA

- **लेखक / AUTHORS**
  कलिका मेहता / KALIKA MEHTA
  गौरी ब्रह्मे / GAURI BRAHME
  सुहास लिमये / SUHAS LIMAYE

- **संपादक / EDITORS**
  मेहेर भूत / MEHER BHOOT
  विभा सुराणा / VIBHA SURANA
  संजय पाटील / SANJAY PATIL
  सोनाली गुजर / SONALEE GUJAR

- **संपादकीय मंडळ / EDITORIAL TEAM**
  माधुरी पुरंदरे / MADHURI PURANDARE
  ज्योत्स्ना भिडे / JYOTSNA BHIDE

- **कला, मांडणी, चित्रे / छायाचित्रे / अक्षर जुळणी**
  **LAYOUT DESIGN / PHOTOS / TYPESETTING**
  नागेश सिरसाल / NAGESH SIRSAL
  देवेंद्र कलप / DEVENDRA KALAP
  सुभाष गोपाळे / SUBHASH GOPALE



- **प्रकाशन / PUBLICATION**
  मुंबई विद्यापीठ / UNIVERSITY OF MUMBAI
  राज्य मराठी विकास संस्था, मुंबई / RAJYA MARATHI VIKAS SANSTHA, MUMBAI



- **ई-पत्ता / E-MAIL**
  rmvs_marathi@yahoo.com
  deptofgerman@mu.ac.in



- **संकेतस्थळ / WEBSITE ADDRESS**
  www.mu.ac.in
  rmvs.marathi.gov.in

**TEXTBOOK WITH EXERCISES AND LINK FOR AUDIO & AUDIO-VISUAL LEARNING MATERIAL**
https://mu.ac.in/officialmarathi
**₹ 500**

# प्रस्तावना | Preface

*Communicative Marathi for Government Officials or Shasakiya Marathi* is a Marathi text cum workbook specially designed for government officials working in the various ministerial departments in the state of Maharashtra. This book addresses a target group of non-native officers, who need to implement the language for the routine administration and to help them communicate with the native speakers. The aim of this book is to acquaint the officers with a working knowledge of official Marathi. The pre-requisite for this level is the basic knowledge of Marathi language.

This book has been prepared using an integrated communicative approach and is intended for those who know and have accomplished the first two levels of Marathi. It thus dedicates itself to serve the sole purpose of teaching communicative Marathi to the non-native officials, with an emphasis on spoken Marathi.

The book consists of ten chapters, followed by 13 comprehensive grammar lessons as revision of basic Marathi. Each chapter deals not only with day to day situations faced by the officials, but also contains different text types which are required for communication and correspondence. The chapters also include communicative texts in authentic situations, pattern drills, grammar exercises, visuals, audio visual components and an overview of the vocabulary along with the meanings in English below the end of each unit. The list of vocabulary is specific to the context and highlights the usage. A final test has been included at the end to evaluate the language skills of the learners. Special efforts have been undertaken to integrate the communicative approach of learning so that the learners will be able to communicate in Marathi.

Though the book is meant for classroom teaching of approximately 60 teaching hours, self-learners too can make use of the book and the audio link with the help of the translation in English. Keeping in mind the aim of the target learners, the focus is on enhancing the speaking, listening and understanding skills of the learners.

*Communicative Marathi for Government Officials* has been designed after an extensive research carried out to meet the needs of the government officials. The content and preparation of material of the book is created solely for teaching communicative Marathi.

This book has been prepared under the aegis of the innovative Marathi Language Teaching (MLT) project at the Department of German, University of Mumbai. Besides designing and preparing learning material for short courses for specific target groups like rickshaw- and taxi-drivers, nurses, government officials and bank employees, this project has also developed structured courses for six levels of Marathi language proficiency for non-native speakers. The content for these levels is published as *My Marathi*, Levels 1 to 6 and include a set of textbook, workbook, glossary, dvd and online links.

For all the official text types used as learning material in this book, we would like to acknowledge the website www.directorate.marathi.gov.in of the Maharashtra government. Although the format of the text types remains official, the orthography has been rectified wherever required.

We are grateful to the authorities of the University of Mumbai led by the Vice Chancellor Suhas Pednekar and the Pro-Vice Chancellor Ravindra Kulkarni for facilitating the smooth running of this project.

We appreciate and thank all those who have contributed in the making of this book.

Editors

Department of German
University of Mumbai
2021

# आभार | Acknowledgement

Aditi Satam

Amit Varandekar

Ashish Sawant

Girissha Tilak

Kruttika Bhosale

Madhura Gawande

Neha Thombare

Pradnya Dalvi

Priyanka Katkar

Rajesh Wadekar

Rohit Chaubey

Sachin Suresh

Shweta Redekar

Suvarna Deshpande

Varsha Mane

Rahul Brahme

# अनुक्रमणिका


| पाठ | विषय | पत्रप्रकार / विभाग | व्याकरण | संवादकौशल्य | शब्दसंपदा | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बदली झाली हो! | अधिसूचना<br>सामान्य प्रशासन विभाग<br>अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | काळ : भविष्यकाळ (उजळणी)<br>वाक्यरचना :<br>धातू + ण्या + स / धातू + आयला.. लाव<br>धातू + ऊन (संयुक्त क्रियापदे) धातू + ऊ -इच्छि + णारा<br>औपचारिक मराठी दैनंदिन व्यवहाराच्या भाषेत लिहिता येणे | स्वतःची माहिती<br>बदलीसंबंधी संवाद | शासकीय विभागांची नावे<br>साधित शब्द<br>नागरी सेवकांच्या कर्तव्याशी संबंधित शब्द<br>बदलीशी संबंधित शब्द | १२ |
| २ | कोणी रजा देता का रजा? | शासन निर्णय<br>कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्य व्यवसाय विभाग<br>महसूल व वन विभाग | काळ :<br>सामान्य / चालू वर्तमानकाळ<br>वाक्यरचना :<br>धातू + ण्यात ये<br>धातू + आवा<br>असल्याने / नसल्याने<br>असल्यामुळे / नसल्यामुळे<br>धातू + णे या क्रियापदाच्या रूपाचा, यादी, सूचना इ.साठी वापर. | रजेबद्दल चर्चा करता येणे.<br>वरिष्ठ अधिकाऱ्याशी रजेबद्दल संवाद साधता येणे | रजेच्या वेगवेगळ्या प्रकारांची मराठी नावे<br>साधित शब्द > मूळ शब्द<br>स्थलांतर आणि शेतकऱ्यांच्या समस्यांसंबंधीचे शब्द | ३१ |

| पाठ | विषय | पत्रप्रकार / विभाग | व्याकरण | संवादकौशल्य | शब्दसंपदा | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | पुन्हा लेटमार्क! | परिपत्रक<br>सामान्य प्रशासन विभाग | बदलणारी विशेषणे (उजळणी),<br>स्थानदर्शक विशेषणे<br>वाहनांची नावे + ने<br>वाक्यरचना : कर्ता + ने / नी... धातू + आवा,<br>वाक्यात<br>यांचा - यांची, यांना - यांनी - यांचा या सर्वनामांचा वापर<br>'योग्य' नंतर वाक्यात 'तो' या सर्वनामाच्या रूपांचा वापर | ऑफिसला उशीर झाल्याबद्दल वरिष्ठ अधिकाऱ्याशी बोलणे<br>उशीर होण्याचे समर्थन करणे<br>ऑफिसला येण्याजाण्याच्या साधनांबद्दल चर्चा करणे | मराठी भाषेच्या वापरासंबंधीचे शब्द<br>थोर व्यक्तींची जयंती / पुण्यतिथी इ. साजरे करण्यासंबंधीचे शब्द<br>वेळेची परिमाणे<br>वाहनांची नावे<br>विरुद्धार्थी शब्द<br>वाक्प्रयोगांचे अचूक अर्थ | ५३ |
| ४ | आज दांडी! | आदेश<br>पर्यटन व सांस्कृतिक विभाग<br>शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | वाक्यरचना :<br>धातू + आवा (विध्यर्थ - नकारार्थी)<br>धातू + ल्या --नंतर -बरोबर / -पासून / -मुळे / -वर / -शिवाय<br>धातू + ण्या ---- साठी /<br>-करिता / -बाबत /<br>-ऐवजी / -संबंधी /<br>-ळे / -पूर्वी | सुट्टी / दांडी / रजेबद्दल सहकाऱ्यांशी आणि वरिष्ठ अधिकाऱ्याशी बोलणे<br>आवडत्या ऋतूबद्दल बोलणे | 'उप' आणि 'सर्व' जोडून तयार होणारे साधित शब्द<br>ऋतू आणि हवामान यांच्याशी संबंधित शब्द, पदोन्नती, पदस्थापना, इ. कार्यालयीन घटनांशी संबंधित शब्द<br>वाक्प्रयोगांच्या अर्थच्छटा समजणे | ७३ |

| पाठ | विषय | पत्रप्रकार / विभाग | व्याकरण | संवादकौशल्य | शब्दसंपदा | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | एक दिवस कर्मचाऱ्याचा! | प्रसिद्धिपत्रक<br>बृहनमुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम | काळ: पूर्ण वर्तमानकाळ वाक्यरचना :<br>धातू + णार आहे<br>वाक्यात 'हा' या सर्वनामाच्या रूपांचा वापर<br>वाक्यात<br>वेळ सांगण्यासाठी 'वाज' धातूच्या रूपांचा वापर<br>बदलणारी विशेषणे: धातू + 'णारा'<br>शब्दयोगी पदे: मधून, मागून इ. | वेळेच्या नियोजनासंबंधी बोलणे नोकरीचे आणि स्वतःचे वेळापत्रक सांगणे | व्यवसायवाचक नामे,<br>घड्याळाशी संबंधित अंक आणि अपूर्णांक<br>वीज पुरवठा आणि परिवहन व्यवस्था यांच्याशी संबंधित शब्द | ९२ |
| ६ | आज डब्यात काय? | जाहिरात<br>वन विभाग<br>माहिती व जनसंपर्क महा-संचालनालय विभाग<br>सार्वजनिक व बांधकाम विभाग | वाक्यरचना : कर्ता + कडून... धातूची भूतकाळाची रूपे + जा ची रूपे<br>धातू + आयला + मिळ<br>धातू + ल्या + स / जर...तर<br>वाक्यांमध्ये जो...तो ची रूपे | जेवणाच्या सुट्टीत डब्याबद्दल बोलणे<br>मराठी सणांबद्दल आणि खाद्यपदार्थां बद्दल बोलणे<br>आपापल्या सणांबद्दल आणि खाद्यपदार्थां बद्दल बोलणे | साधित शब्द:<br>ई प्रत्ययान्त स्थानदर्शक शब्द<br>नाम + क्रियापद<br>सामासिक शब्द<br>समानार्थी शब्द<br>म्हणींसारखी वाक्ये<br>वन आणि शेतीशी संबंधित शब्द<br>एखाद्या पदासाठी दिल्या जाणाऱ्या जाहिरातीसाठी आवश्यक शब्द | ११२ |

| पाठ | विषय | पत्रप्रकार / विभाग | व्याकरण | संवादकौशल्य | शब्दसंपदा | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | शांतता... काम चालू आहे! | अर्धशासकीय पत्र, स्मरणपत्र, सामान्य पत्रव्यवहार<br>ग्रामविकास विभाग<br>शिक्षण संचालनालय | वाक्यरचना :<br>जर काम झाले असते तर... या प्रकारच्या वाक्यरचना<br>धातू + ता ये<br>धातू + ऊ शक<br>पदबंध:<br>धातू + ता<br>उशिरात उशिरा...<br>लवकरात लवकर<br>शक्य तितक्या लवकर | कामाच्या ताणाबद्दल चर्चा,<br>ताण हलका करायचे उपाय | साधित शब्द : उपसर्ग 'स', आणि 'आलय', 'गृह' जोडून तयार होणारे शब्द<br>विरुद्धार्थी शब्द<br>अवयव, अवयवांशी संबंधित वाक्प्रचार | १३४ |
| ८ | बॉस येतो तेव्हा... | ज्ञापन आणि निविदा सूचना<br>सामान्य प्रशासन विभाग<br>दूध योजना बांधकाम विभाग | वाक्यरचना :<br>धातू + आयचा / आवयाचा<br>धातू + आवा लाग<br>धातू + ल्या + च्या<br>धातू + ण्या + चा<br>न + धातू + ता<br>नाम + ने (with या अर्थाने)<br>धातू + णारा या विशेषणाच्या सामान्य रूपाचा वापर | कार्यालयातील बैठकीच्या तयारी संबंधी चर्चा,<br>आपापल्या वरिष्ठ अधिकाऱ्याबद्दल चर्चा | साधित शब्द: दार, बंद, प्राप्त, करण इ.प्रत्यय जोडून तयार होणारे शब्द<br>धातू (material) वाचक विशेषणे | १५६ |

| पाठ | विषय | पत्रप्रकार / विभाग | व्याकरण | संवादकौशल्य | शब्दसंपदा | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | अभिनंदन! अभिनंदन!! | प्रकटन, पृष्ठांकन, प्रमाणपत्र<br>माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ<br>पुणे महा-नगरपालिका<br>सामान्य प्रशासन विभाग<br>अन्न, नागरीपुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | वाक्यरचना :<br>धातू + णे आवश्यक अस<br>धातू + ल्या + चे<br>दिवसांत - दिवसांनी कालवाचक शब्दांमधील फरक<br>बदलणारे विशेषण<br>धातू + लेला<br>नाम + शब्दयोगी पदे -निहाय, -मार्फत, -नुसार (अनुसार) इ. | बढती आणि दौऱ्याबद्दल चर्चा<br>बढतीशी संबंधित शब्द | साधित शब्द : ईय, ईन, इक इ. प्रत्यय लागून तयार होणारे शब्द<br>समानार्थी शब्द<br>सामान्यरूप न करता वापरले जाणारे प्रशासनिक भाषेतील शब्द | १७५ |
| १० | आता फक्त आराम! | कार्यालयीन टिप्पणी अर्ज<br>महसूल विभाग<br>बृहन्मुंबई महानगरपालिका<br>शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | वाक्यरचना : म्हणून या अव्ययाचे वेगवेगळे अर्थ आणि त्यांचा वापर<br>शासकीय पत्रव्यवहारातल्या काही वाक्प्रचारांचा वाक्यात वापर | निवृत्ती, पेन्शन आणि स्वेच्छानिवृत्ती बद्दल बोलणे | नोकरीतील विशिष्ट कालावधी नियमित करताना वापरले जाणारे आणि विभागीय चौकशी व त्यासंबंधीचे शब्द<br>नोकरीतील वेगवेगळ्या पदांसाठी केलेल्या अर्जामधील शब्द शासकीय वाक्प्रयोगांच्या अर्थच्छटा<br>शासकीय पत्रव्यवहारात वापरल्या जाणाऱ्या शब्दांचे मराठी अर्थ आणि त्यांचे इंग्रजी प्रतिशब्द | १९९ |

| पाठ | विषय | पत्रप्रकार / विभाग | व्याकरण | संवादकौशल्य | शब्दसंपदा | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|---|
| | परीक्षा | | | | | २१९ |
| | उत्तरे | | | | | २२७ |
| | व्याकरण उजळणी | | | | | २३८ |

# १ बदली झाली हो!

## (अधिसूचना)







बदली

चला, शिकू या :

- अधिसूचना वाचणे आणि समजणे
- स्वतःबद्दल सांगता येणे
- बदलीबद्दल बोलता येणे
- साधा भविष्यकाळ ओळखता आणि वापरता येणे (उजळणी)
- साधित शब्द – एका शब्दापासून दुसरा शब्द तयार करता येणे
- संयुक्त क्रियापदे व त्यांचा अर्थ ओळखता येणे
- धातू + ण्या + स / धातू + आयला लाव या रचनेचा वापर करता येणे
- धातू + ऊ - इच्छि + णारा ची रूपे तयार करता येणे
- औपचारिक - अनौपचारिक मराठीतला फरक लक्षात घेणे

१ वाचू या. (Read.)



नमस्कार.
मी गुरमीत सिंग.
मी सरकारी कर्मचारी आहे.
महसूल विभागात काम करतो.

नमस्कार.
मी इला नारायणन.
मी सरकारी कर्मचारी आहे.
मी वन विभागात काम करते.



२ वर्गात स्वतःची ओळख करून देऊ या. आपण कोणत्या विभागात काम करतो ते सांगू या. (Introduce yourself to the class. Explain in which department you work.)

३ वाचू या. मंत्रालयीन विभाग / Departments in Government Office

| | |
|---|---|
| Agriculture, Animal Husbandry, Dairy Development and Fisheries Department | कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग |
| Co-operation and Textiles Department | सहकार व वस्त्रोद्योग विभाग |
| Education and Employment Department | शिक्षण व सेवायोजन विभाग |
| Environment Department | पर्यावरण विभाग |
| Finance Department | वित्त विभाग |
| Food and Civil Supplies Department | अन्न व नागरी पुरवठा विभाग |
| General Administration Department | सामान्य प्रशासन विभाग |
| Home Department | गृह विभाग |

| | |
|---|---|
| Housing and Special Assistance Department | गृहनिर्माण व विशेष साहाय्य विभाग |
| Industries, Energy and Labour Department | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग |
| Irrigation Department | पाटबंधारे विभाग |
| Law and Judiciary Department | विधि व न्याय विभाग |
| Medical Education and Drugs Department | वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्य विभाग |
| Parliamentary Affairs Department | संसदीय कार्य विभाग |
| Planning Department | नियोजन विभाग |
| Public Health Department | सार्वजनिक आरोग्य विभाग |
| Public Works Department | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| Revenue and Forest Department | महसूल व वन विभाग |
| Rural Development Department | ग्रामविकास विभाग |
| Social Welfare, Cultural affairs, Sports and Tourism Department | समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग |
| Tribal Development Department | आदिवासी विकास विभाग |
| Urban Development Department | नगर विकास विभाग |

## ४ संवाद वाचू या. (Read the conversation.)

अनिल : कसं चाललंय काम? तुझा प्रकल्प सुरू आहे नं?

समीर : आता सध्या बंद आहे. नवीन मंत्रिमंडळ आलं की सुरू होईल. मग निधी (fund) मिळेल.

अनिल : प्रकल्प बंद होणार नाही नं?




समीर : नाही, नाही. बंद केला तर आतापर्यंत केलेला खर्च वाया जाईल. त्यामुळे तो नक्की पूर्ण होईल.

अनिल : तूच प्रकल्पप्रमुख (project head) असशील ना?

समीर : मला माहीत नाही. कदाचित ते माझी नेमणूक दुसऱ्या प्रकल्पावर करतील.

## ५ तक्ता वाचू या. (भविष्यकाळ) (Simple Future Tense)

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी करेन / करीन | आम्ही करू |
| तू करशील | तुम्ही कराल |
| तो<br>ती } करेल / करील<br>ते | ते<br>त्या } करतील<br>ती |

## ६ तक्ता वाचू या. (भविष्यकाळ नकारार्थी) (Simple Future Negative Tense)

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी करणार नाही | आम्ही करणार नाही |
| तू करणार नाहीस | तुम्ही करणार नाही |
| तो<br>ती } करणार नाही<br>ते | ते<br>त्या } करणार नाहीत<br>ती |

## ७ अधोरेखित शब्दांच्या जागी कंसात दिलेले शब्द वापरून, वाक्यात आवश्यक ते बदल करून वाक्ये पुन्हा लिहू या. (Rewrite the sentences using words given in the bracket and in place of underlined words. Make changes wherever necessary.)

उदा॰ <u>मी</u> प्रशिक्षणवर्गात प्रवेश घेईन. (आम्ही) आम्ही प्रशिक्षण वर्गात प्रवेश घेऊ.

क. ती मराठी बातम्या <u>ऐकेल</u>. (वाच)

ख. <u>आम्ही</u> लोकांशी मराठीत बोलू नं? (तुम्ही)

ग. तुमची <u>बदली</u> नागपूरला होईल. (बदल्या)

घ. <u>तुम्ही</u> माझ्याऐवजी दौऱ्यावर जाल का? (तो)

च. आभाराचं भाषण <u>ते</u> करणार नाहीत. (तू)

छ. आम्ही कामाच्या वेळी मोबाईल वापरणार नाही. (त्या)

## ८ संवाद वाचू आणि ऐकू या. शिक्षकाने आधी संवाद ऐकवावा. मग विद्यार्थ्यांना वाचायला द्यावा. (Read and listen to the conversation. The teacher should first make the students hear the conversation and then let them read it.)

शेटे : काय, कामतसाहेब, आज चेहरा असा उदास का? आणि हे हातात कसलं पत्र आहे?
कामत : अहो शेटे, हे माझ्या बदलीचं पत्र आहे.
शेटे : ओहो! अधिसूचना आहे नं? मग उघडून वाचा की.
कामत : नको हो, मला भीती वाटतेय. बदली करून कुठेतरी लांब पाठवतील असं वाटतंय.
शेटे : पत्र उघडून बघा. कदाचित आवडतं ठिकाण असेल.
कामत : हो, हो! बघतो, बघतो.
शेटे : वाचा नं लवकर. कुठलं गाव?
कामत : अहो, सोलापूर. माझं जन्मगाव. खूप आनंदाची बातमी आहे ही.
शेटे : फारच छान. अभिनंदन. आता पार्टी पाहिजे बरं का!
कामत : नक्की.



## ९ पुढील वाक्ये चूक की बरोबर सांगू या. (State whether the following statements are true or false.)

क. अधिसूचनेचा विषय शेट्यांची बदली हा आहे.
ख. कामतांनी बदलीच्या ठिकाणाचा केलेला अंदाज चुकीचा निघतो.
ग. शेटे पत्र उघडून वाचतात.
घ. शेटे कामतांकडे पार्टी मागतात.

## १० विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर पुढे दिलेल्या पर्यायांमधून निवडू या. (Choose the correct option.)

क. कामतांचं जन्मगाव कोणतं आहे?
१. कोल्हापूर २. सोलापूर

ख. कामतांना कशाची भीती वाटते आहे?
१. बदली दूरच्या गावात होईल याची.
२. नोकरीवरून काढून टाकतील याची.

ग. बदली झाली हे शासन कसे कळवते?
१. परिपत्रक पाठवून २. अधिसूचना पाठवून

घ. पत्र वाचून कामत खूष होतात कारण
१. बदली रद्द होते. २. बदली त्यांच्या जन्मगावी होते.

बदली करण्याजोगा – transferable
बदलीचा आदेश – transfer order
बदलीचा आदेश मिळालेली व्यक्ती – the person under orders of transfer
बदलीनिमित्त प्रवास – journey on transfer
बदली भत्ता – transfer allowance

## ११ बदलीची कल्पना तुम्हाला कशी वाटते? खालील मुद्द्यांच्या आधारे वर्गात चर्चा करू या. (What is your opinion about transfer? Discuss with the help of given points.)

|  |  |
|---|---|
| मला एकाच ठिकाणी राहायला आवडेल. | मला दुसऱ्या ठिकाणाचा त्रास होईल.<br>दुसऱ्या वातावरणात मला करमणार नाही. |
| मला वेगवेगळी शहरं / गावं बघायला आवडतील. | बदली? नको रे बाबा, ते सतत वेगळं ठिकाण! |
| बदली म्हणजे बढती! | बदली म्हणजे कटकट! |

## १२ पुढे दिलेल्या मुद्द्यांच्याच्या आधारे तुम्ही बदलीचे वैयक्तिक अनुभव सांगा. (Discuss your personal experiences with the help of following points.)

जेवण : चांगले / वाईट.
पोशाख : वेगळा.
भाषा : वेगळी असते / शिकावी लागते.
चालीरीती : सण / समारंभ.
लोक : सुस्वभावी / चांगले / वाईट.

## १३ ही अधिसूचना वाचू या. (Read the notification.)

**महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार-अ, गुरुवार ते बुधवार, नोव्हेंबर ५-११, २०१५ / कार्तिक १४-२०, शके १९३७**

**सामान्य प्रशासन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक २३ ऑक्टोबर, २०१५.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक वशिअ. १११४/प्र.क्र.६०/११. – भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकानुसार प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढीलप्रमाणे नियम करीत आहेत :-

१. या नियमांना, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, २०१५ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ (यात यापुढे मुख्य नियम असा उल्लेख करण्यात येईल) यांच्या नियम ३ उप-नियम (१) च्या खंड तीन नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील, जसे :-

(चार) संविधानाचे सर्वश्रेष्ठत्व आणि लोकशाहीची मूल्ये यांच्याप्रती वचनबद्ध असेल;
(पाच) भारताचे सार्वभौमत्व आणि एकात्मता, राज्याची सुरक्षितता, सार्वत्रिक सुव्यवस्था, सभ्यता आणि नैतिक मूल्ये यांचे रक्षण करील आणि त्यांचे प्रचालन करील;
(सहा) उच्च नैतिक मानके आणि सचोटी बाळगावी;
(सात) राजकीय दृष्ट्या तटस्थता ठेवावी;
(आठ) कर्तव्य पार पाडीत असताना गुणवत्ता, औचित्य आणि निःपक्षपातीपणा या तत्त्वांचे अनुसरण करील;
(नऊ) उत्तरदायित्व आणि पारदर्शकता ठेवील;
(दहा) लोकांप्रती, विशेषतः दुर्बल घटकांप्रती प्रतिसादी असेल;
(अकरा) लोकांप्रती सौजन्य आणि सद्वर्तन ठेवील;
(बारा) केवळ, सार्वजनिक हिताचे निर्णय घेईल आणि सार्वजनिक साधनसंपत्तीचा कार्यक्षमतेने,

परिणामकारक रीतीने आणि काटकसरीने वापर करील किंवा वापरण्यास लावेल.

(तेरा) नागरी सेवक म्हणून आपल्या पदाचा गैरवापर करणार नाही आणि आपल्याला, आपल्या कुटुंबाला किंवा आपल्या मित्रांना आर्थिक वा भौतिक लाभ मिळवून देतील, असे निर्णय घेणार नाही;
(चौदा) फक्त गुणवत्तेनुसार निवड करील, निर्णय घेईल आणि शिफारस करील;
(पंधरा) औचित्यपूर्वक आणि निःपक्षपातीपणे कार्य करील आणि कोणाशीही विशेषतः समाजातील गरीब आणि वंचित घटकांशी भेदभाव करणार नाही;
(सोळा) जे कोणत्याही कायद्याच्या, नियमांच्या, विनियमांच्या आणि प्रस्थापित प्रथेच्या विरुद्ध आहे किंवा असू शकते असे कोणतेही कृत्य करण्यापासून दूर राहील;
(सतरा) त्याचे कर्तव्य पार पाडताना शिस्त राखील आणि त्याला यथोचितरीत्या कळविण्यात आलेल्या कायदेशीर आदेशांचे पालन करण्यास जबाबदार असेल.

सही/-
सचिव
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

**शब्दार्थ :**

| नाम | नाम | क्रियापदे | इतर शब्द |
|---|---|---|---|
| ती अधिसूचना, त्या – notification, -s | ती एकात्मता, – integrity | प्रदान करणे to confer | नुसार according to |
| ते परंतुक, – proviso | ती सभ्यता, – decency | वापर करणे to use | याद्वारे through this |
| तो / ती राज्यपाल, ते / त्या – governor, -s | ती सेवा, – service, -s | सुधारणा करणे to amend | आणखी more |

| | | | |
|---|---|---|---|
| ती सुधारणा, त्या –<br>improvement, -s | तो नियम, ते –<br>rule, -s | नियम करणे<br>to make rule | यांच्याप्रती<br>towards them |
| तो खंड, ते –<br>clause, -s | ते सर्वश्रेष्ठत्व, –<br>supremacy | उल्लेख करणे<br>to refer | सार्वत्रिक<br>universal |
| ते मूल्य, ती मूल्ये<br>value, -s | ते सार्वभौमत्व, –<br>sovereignty | समाविष्ट करणे<br>to include | नैतिक<br>moral |
| ती सुरक्षितता, –<br>safety | ती सुव्यवस्था, –<br>order | वचनबध्द असणे<br>to be committed | उच्च<br>higher |
| ते रक्षण, –<br>protection | ते प्रचालन, –<br>promotion | रक्षण करणे<br>to protect | राजकीय दृष्ट्या<br>from political point of view |
| ती सचोटी, –<br>honesty | ती तटस्थता, –<br>neutrality | प्रचालन करणे<br>to promote | विशेषतः<br>especially |
| ती गुणवत्ता, –<br>merit, -s | ते औचित्य, –<br>ती औचित्ये<br>fairness | बाळगणे<br>to have | केवळ<br>only |
| ते तत्त्व, ती तत्त्वे / त्त्वं<br>principle, -s | ते अनुसरण, –<br>following | तटस्थता ठेवणे<br>to be neutral | नागरी<br>civil |
| ती पारदर्शकता, –<br>transparency | ते लोक, –<br>people | कर्तव्य पार पाडणे<br>to perform duty | म्हणून<br>as a |
| ते सौजन्य, –<br>courtesy | ते सद्वर्तन, –<br>good conduct | अनुसरण करणे<br>to follow | आर्थिक<br>financial |
| तो निर्णय, ते –<br>decision, -s | ती साधनसंपत्ती, –<br>resource, -s | प्रतिसादी असणे<br>to be responsive | भौतिक<br>material |
| ती काटकसर, –<br>economy | तो सेवक, ते –<br>servant, -s | निर्णय घेणे<br>to take decision | फक्त<br>only |
| तो गैरवापर, –<br>misuse, -s | ते कुटुंब,<br>ती कुटुंबे / बं<br>family, -ies | वापरण्यास लावणे<br>to make someone use something | वंचित<br>underprivileged |
| ते संविधान,<br>ती संविधाने / नं<br>constitution, -s | तो अनुच्छेद, ते –<br>article, -s | गैरवापर करणे<br>to misuse | यथोचितरीत्या<br>properly |

| | | | |
|---|---|---|---|
| ती शक्ती, त्या –<br>power, -s | तो वापर, ते –<br>use, -s | लाभ मिळवून देणे<br>to be of benefit for someone | कायदेशीर<br>legal |
| ते मानक,<br>ती मानके / कं -<br>standard, -s | ती वर्तणूक,<br>त्या वर्तणुकी<br>behaviour | निवड करणे<br>to select | जबाबदार<br>responsible |
| ते कर्तव्य, ती कर्तव्ये / व्यं<br>duty, -ies | तो उपनियम, ते –<br>sub rule, -s | शिफारस करणे<br>to recommend | |
| तो निःपक्षपातीपणा<br>impartiality | ती लोकशाही, –<br>त्या लोकशाह्या<br>democracy, -ies | कार्य करणे<br>to work | |
| ते उत्तरदायित्व, –<br>accountability | तो घटक, ते –<br>component, -s | भेदभाव करणे<br>to differentiate | |
| ती शिफारस, त्या<br>शिफारशी<br>recommendation, -s | ते हित, –<br>welfare | विरुध्द असणे<br>to be in opposition | |
| तो कायदा, ते कायदे<br>law, -s | ती कार्यक्षमता, –<br>efficiency | दूर राहणे<br>to be away from | |
| ते कृत्य, ती कृत्ये / त्यं<br>act, -s | ते पद, ती पदे / दं<br>post, -s | शिस्त राखणे<br>to have discipline | |
| तो भेदभाव<br>discrimination | तो मित्र, ते –<br>friend, -s | पालन करणे<br>to obey | |
| तो लाभ, ते –<br>benefit, -s | ती निवड, त्या<br>निवडी<br>selection, -s | | |
| ते कार्य, ती कार्ये / यं<br>activity, -ies | ती प्रथा, त्या –<br>practice, -s | | |
| तो विनियम, ते –<br>regulation, -s | तो आदेश, ते –<br>order, -s | | |
| ती शिस्त, –<br>discipline | | | |

## १४ रिकाम्या जागेत 'त्या, तू, तुम्ही, आम्ही, मी, तो' यांपैकी योग्य सर्वनामे भरू या. (Fill in the correct personal pronoun.)

उदा॰ तो फक्त गुणवत्तेनुसार निवड करील, शिफारस करील.

क. ------------- कर्तव्य पार पाडताना शिस्त राखू.

ख. ------------- कोणाशीही भेदभाव करणार नाहीस.

ग. ------------- भारताची एकात्मता, सुरक्षितता आणि नैतिक मूल्ये यांचे रक्षण करीन.

घ. ------------- सार्वजनिक साधनसंपत्ती काटकसरीने वापराल.

च. ------------- आपल्या पदाचा गैरवापर करणार नाहीत.

## १५ बरोबर उत्तरापुढे (✓) ही खूण करू या. (Tick ✓ the correct answer.)

क. या अधिसूचनेतले वर्तणुकीचे नियम (rules of conduct) कोणासाठी आहेत?
१. राजपत्रित अधिकारी        २. नागरी सेवक
३. मंत्री        ४. सचिव

ख. तो दुर्बल घटकांप्रति प्रतिसादी (responsive to the weaker sections) असेल म्हणजे -
१. तो दुर्बल घटकांच्या हाकेला उत्तर देईल.
२. तो दुर्बल घटकांना हाक मारेल.
३. तो दुर्बल घटकांचे प्रश्न शासनापर्यंत पोचवेल.
४. तो दुर्बल घटकांकडे दुर्लक्ष करेल.

ग. नि:पक्षपातिपणा (impartiality) म्हणजे -
१. पक्ष (party) बदलणे.
२. दुसऱ्या पक्षाबद्दल वाईट बोलणे.
३. फक्त गुणवत्ता (merit) पाहून निवड करणे.
४. नातेवाइकांना वेगवेगळ्या पदांवर नेमणे.

as suggested - सूचित केल्याप्रमाणे
as required - अपेक्षित असल्याप्रमाणे
as proposed - प्रस्तावित केल्याप्रमाणे
as revised - सुधारल्याप्रमाणे
as directed - आदेशानुसार

घ. तो लोकशाहीच्या मूल्यांप्रति वचनबध्द असेल (he will be committed to the values of democracy) म्हणजे -
१. तो शासनाला वचन देईल.
२. तो सरकारी कागदपत्रांवर सही करेल.
३. तो लोकशाहीच्या मूल्यांप्रमाणे वागेल.
४. तो दिलेली वचने मोडणार नाही.

च. त्याने कुटुंबाला किंवा मित्रांना आर्थिक व भौतिक लाभ (financial and material benefit) मिळवून दिला याचा अर्थ -
१. कुटुंबाची, मित्रांची काळजी घेतली.
२. आपल्या अधिकाराचा गैरवापर (misuse) केला.
३. नागरी सेवकाचे कर्तव्य (duty) पार पाडले.
४. समाजसेवकाचे काम केले.

**१६ खाली या अधिसूचनेत आलेले काही शब्द आहेत. त्या शब्दांपासून दुसरे शब्द तयार करून ब गटातल्या रिकाम्या जागी भरू या. (Read the words from the notification and fill in the blanks with the words derived from them in the column b.)**

| अ | ब | क |
|---|---|---|
| उदा॰ शरीर | शारीरिक | physical |
| क. विज्ञान | | scientific |
| ख. नीती | | ethical |
| ग. सर्वजन | | public |
| घ. अर्थ | | financial |
| च. समाज | | social |

**१७ अ गटात काही शब्द दिले आहेत. ब गटात त्यापासून तयार झालेले शब्द दिले आहेत. आपण त्यांच्या जोड्या जुळवू या. (Match the following.)**

| अ गट | ब गट |
|---|---|
| क. सर्वत्र | १. कायदेशीर |
| ख. शासक | २. नागरी |
| ग. कायदा | ३. सार्वत्रिक |
| घ. नि:पक्षपातीपणा | ४. शासकीय |
| च. नगर | ५. नि:पक्षपाती |

**१८ उतारा वाचू या. (Read the passage.)**

आपण सर्व सरकारमान्य कागदपत्रे सांभाळून ठेवली पाहिजेत कारण खाते उघडताना बँक आधारकार्ड **दाखवायला लावते.** आधारकार्ड काढण्यापूर्वी सरकार राहत्या घराचा पुरावा सादर **करायला लावतं.** त्यासाठी वीजबिल, टेलिफोनबिल **द्यायला लावतं.** विमानप्रवास किंवा रेल्वेप्रवास करताना सुरक्षा अधिकारी आधारकार्ड, पॅनकार्ड किंवा पारपत्र (passport) **दाखवायला लावतात.** सरकारी अधिकाऱ्याला परदेशात जाण्यापूर्वी मंत्रालय ना हरकत प्रमाणपत्र (no objection certificate) **घ्यायला लावतं.**

**धातू + आयला + लाव (वेगवेगळ्या काळातील रूपे)**

| | |
|---|---|
| वाच + आयला = वाचायला | कर + आयला = करायला |
| खा + आयला = खायला | जा + आयला = जायला |
| दे + आयला = द्यायला | लिही + आयला = लिहायला |
| घे + आयला = घ्यायला | पी + आयला = प्यायला |

## १९ पुढील वाक्यांमध्ये रिकाम्या जागेत कंसातल्या धातूची रूपे भरू या. (Fill in the correct forms of root given in the brackets.)

उदा. साहेब रात्री ९ वाजेपर्यंत ऑफिसात (बस) -------- लावतात.
साहेब रात्री ९ वाजेपर्यंत ऑफिसात <u>बसायला</u> लावतात.

क. डॉक्टर ऑपरेशनपूर्वी सर्व तपासण्या (कर) -------- लावतात.

ख. न्यायालयात वकील तुमच्या दोघांचेही वयाचे दाखले (दे) -------- लावतील.

ग. गॅस एजन्सी गॅस देण्याआधी राहत्या घराचा पुरावा (दाखव) -------- लावते.

घ. वॉचमन सोसायटीत शिरण्यापूर्वी सर्वांना वहीत नाव, गाडी नं व फोन नं. (लिही) -------- लावतो.

च. सुरक्षासैनिक तपासणी करताना घड्याळ, स्वेटर, मोजे इ. (काढ) -------- लावतात.

## २० वाचू या. (Read.)

**धातू + ण्या + स / धातू + आयला + लाव**

या वाक्यरचनेचा अर्थ एखादी गोष्ट करायची सक्ती करणे असा होतो. (used for compulsion) तसेच ही वाक्यरचना बहुतेक वेळा लेखनभाषेत वापरतात.

उदा. नागरी सेवक सार्वजनिक साधन संपत्ती काटकसरीने वापरण्यास / वापरायला लावेल.
आईने सचिनला सगळा मटार सोलण्यास / सोलायला लावला.

## २१ जोड्या जुळवू या. (Match the following.)

| | |
|---|---|
| क. शिक्षकांनी मधूला एक वाक्य पन्नास वेळा | १. प्यायला लावते. |
| ख. आई आजोबांना रात्री झोपताना दूध | २. सोडायला लावतील. |
| ग. रोहनने आईला दुसरी भाजी | ३. घ्यायला लाव. |
| घ. डॉक्टर तुम्हाला सिगारेट | ४. लिहायला लावलं. |
| च. तू बाबांना विश्रांती | ५. करायला लावली. |

**२२ संवाद वाचू या. संवादातल्या प्रत्येक वाक्यातली 'ऊन' जोडलेली धातूंची रूपे अधोरेखित करू या. (उदा॰ वाचून) (Read the conversation and underline the verbs with 'ऊन'.)**



डिसूझा : सर, जरा हे पत्र वाचून बघता का, म्हणजे टाईप करतो.
साहेब : हो, हो. पण आधी शिंदेसाहेबांशी उद्याच्या बैठकीबद्दल बोलून घेतो.
डिसूझा : हो, सर.
(साहेब शिंदेसाहेबांशी फोनवर बोलतात. नंतर पत्र वाचतात.)
साहेब : (पत्र वाचून) डिसूझा, पत्र बरोबर आहे. आता हे टाईप करून घ्या आणि पन्नास कॉपीज काढून घ्या.
डिसूझा : हो, सर.
साहेब : सगळ्या अधिकाऱ्यांना पत्रं ताबडतोब पाठवून द्या.
डिसूझा : हो, आणि आजच सगळ्यांना फोनही करून टाकतो.
साहेब : हो, हो.

वाच + ऊन = वाचून
बोल + ऊन = बोलून
पाठव + ऊन = पाठवून

**२३ कंसातील धातूंना 'ऊन' प्रत्यय लावू या. (Rewrite the verbs in the brackets with ऊन)**

उदा॰ (कर) बघणे - करून बघणे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| क. | (खा) बघणे | ख. | (दाखव) टाकणे | ग. | (रड) दाखवणे |
| घ. | (ये) जाणे | च. | (चाख) पाहणे | छ. | (दे) टाकणे |

**२४ अधोरेखित केलेल्या क्रियापदांमधून सूचित होणारा अर्थ चूक की बरोबर हे सांगू या. (State whether given meanings of the underlined constructions are correct.)**

उदा॰ पत्र वाचून बघा = पत्र आधी वाचा नंतर पत्राकडे बघा. - चूक
क. बोलून घेतो = बोलण्याची क्रिया पूर्ण करतो.
ख. टाईप करून घ्या = दुसऱ्याकडून टाईप करायचं काम पूर्ण करा.
ग. कॉपीज काढून घ्या = कॉपीज काढा नंतर हातात घ्या.
घ. पत्रं पाठवून दया = पत्रं पाठवा नंतर पत्र द्यायला जा.
च. फोन करून टाकतो = फोन करायचं काम पूर्ण करतो.

**२५ वरील अधिसूचनेत आलेली अशा प्रकारची धातूंची रूपे अधोरेखित करू या. उदा. 'वापर करून'. (Underline similar kind of verbal forms in the above notification.)**

## २६ वाचू या. (Read.)

वर अधोरेखित केलेली संयुक्त क्रियापदे (compound verbs) आहेत. इथे दोन क्रियापदांचे वेगळे अर्थ नाहीत. 'ऊन' प्रत्यय असलेले क्रियापद हे मुख्य क्रियापद आहे. त्या क्रियापदाने दाखवलेली क्रिया पूर्ण झाली आहे, हे त्या बरोबरच्या दुसऱ्या क्रियापदावरून म्हणजेच साहाय्यक क्रियापदावरून समजते. इथे 'काढ, जा, दे' ही साहाय्यक क्रियापदे आहेत.
संयुक्त क्रियापदांमध्ये मुख्य क्रियापदाबरोबर 'घे, ठेव, बघ, टाक' इ. क्रियापदेही येतात.

उदा॰ खाऊन बघ, घाबरून जा, देऊन टाक.

## २७ सराव. (Drill.)

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| आईने केलेला चिवडा मुलांनी (खा) टाकला. | आईने केलेला चिवडा मुलांनी खाऊन टाकला. |
| त्यांनी आपली संपत्ती संस्थेला (दे) टाकली. | त्यांनी आपली संपत्ती संस्थेला देऊन टाकली. |
| त्याने सगळी कामं एका तासात (कर) टाकली. | त्याने सगळी कामं एका तासात करून टाकली. |
| अजयने आईकडून निबंध (लिही) घेतला. | अजयने आईकडून निबंध लिहून घेतला. |
| सुमतीने गावात मोठं घर (बांध) घेतलं. | सुमतीने गावात मोठं घर बांधून घेतलं. |
| वसंतरावांनी नोकराकडून गाडी (धू) घेतली. | वसंतरावांनी नोकराकडून गाडी धुऊन घेतली. |

## २८ रिकाम्या जागेत योग्य संयुक्त क्रियापद भरू या. (Fill in the blanks with appropriate compound verbs.)

(करून ठेवली, वाचून पाहिला, संपून गेले, देऊन टाकली, भरून काढलं)

उदा॰ पुस्तकात दिल्याप्रमाणे तिने पुरणपोळ्या करून बघितल्या.

क. सगळे पदार्थ दोन दिवसात ---------------- ----------------.

ख. विनीतने पुस्तकं ग्रंथालयाला ---------------- ----------------.

ग. अमितने संध्याकाळी घालायच्या कपड्यांना इस्त्री ---------------- ----------------.

घ. त्यांनी दोन महिन्यातच सगळं नुकसान ---------------- ----------------.

च. तू लिहिलेला लेख मी ---------------- ----------------.

## २९ वर दिलेली अधिसूचना तुम्ही वाचली आहे. या अधिसूचनेमध्ये नागरी सेवकाची कर्तव्ये दिली आहेत. त्यातील कोणतीही आवडलेली पाच कर्तव्ये वर्गात सोप्या भाषेत सांगू या. (Tell any 5 duties of your choice.)

उदा॰ संविधानाचे सर्वश्रेष्ठत्व आणि लोकशाहीची मूल्ये यांच्याप्रती वचनबद्ध असेल;
मी संविधान सर्वश्रेष्ठ मानेन आणि लोकशाहीची मूल्ये पाळेन.

## ३० आता ही अधिसूचना वाचू या. (Read.)

**अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.

**(महाराष्ट्र शासन)**
दूरध्वनी क्रमांक : ०२२-२२०२३१८३, २२७९३२१४, २२०४५२५५, २२७९३३११
फॅक्स : ०२२-२२०२५४४९, २२८४५११६
ई-मेल : mangalnitnaware@nic.in

**NCDEX** दूरध्वनी क्रमांक**:** ०२२-६६४७३१५३, ६६४७३१५४
ई-मेल : askus@ncdexspot.com

क्रमांक : साखर-२०१४/प्र.क्र..७७/ना.पु.१९ दिनांक : २० जून, २०१४.

**अधिसूचना**

विषय :- सन २०१४-१५ वर्षाकरिता सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत ई-लिलाव पद्धतीने एस-३० स्फटिकासारख्या पांढऱ्या शुभ्र (crystal clear) साखरेचा पुरवठा करण्यासाठी पुरवठादारांचा गट तयार करणे.

**NCDEX Spot Exchange Ltd.** या कंपनीमार्फत ई-लिलाव पद्धतीने एस-३० दर्जाच्या स्फटिकासारख्या पांढऱ्या शुभ्र (crystal clear) साखरेचा पुरवठा करण्यासाठी पुरवठादारांची नोंदणी करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

२. यासाठीचे नमुना अर्ज आणि अटी-शर्ती इत्यादी माहिती (http://mahafood.gov.in या संकेतस्थळावर) उपलब्ध असून नोंदणी करू इच्छिणाऱ्या पुरवठादारांनी या संकेतस्थळाला भेट द्यावी.

३. ई-लिलावामध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या पुरवठादारांनी त्यांचे भरलेले अर्ज सहपत्रासह दिनांक १२ जुलै, २०१४ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२ **किंवा** ग्राहक सेवा विभाग,

एनसीडीएक्स स्पॉट एक्सचेंज लि., युनिट ९ ते १३, पहिला मजला, कैलाश कमर्शियल कॉम्प्लेक्स, एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई-४०००७८ या ठिकाणी जमा करावेत.

४. एस-३० दर्जाच्या स्फटिकासारख्या पांढऱ्या शुभ्र साखरेच्या पुरवठ्यासाठी यापुढील ई-लिलावासाठी अर्जदारांची **NCDEX Spot Exchange Ltd.** यांचेकडे करावयाची नावनोंदणी पुढील सूचना मिळेपर्यंत खुली राहील.

सही/-
सचिव
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

शब्दार्थ :

| नाम | नाम | क्रियापदे | इतर शब्द |
|---|---|---|---|
| ती साखर, –<br>sugar | ती कंपनी,<br>त्या कंपन्या<br>company, -ies | तयार करणे<br>to prepare | करिता<br>for |
| ते वर्ष, ती वर्षे / र्षं<br>year, -s | तो दर्जा<br>grade | पुरवठा करणे<br>to supply | पांढरीशुभ्र<br>snow-white |
| ते वितरण, –<br>distribution | ती नोंदणी,<br>त्या नोंदण्या<br>registration | नोंदणी करणे<br>to register | सारखा<br>like |
| ती व्यवस्था, –<br>system | तो अर्ज, ते –<br>application, -s | मागवणे<br>to invite | सायंकाळी<br>in the evening |
| तो लिलाव, ते –<br>auction, -s | तो नमुना, ते नमुने<br>sample, -s | उपलब्ध असणे<br>to be available | ठिकाणी<br>at the place |
| ती पद्धत,<br>त्या पद्धती<br>method, -s | ती अट, त्या अटी<br>condition, -s | इच्छिणे<br>to desire | मिळेपर्यंत<br>till one gets |
| तो स्फटिक, ते –<br>crystal clear<br>clarity | ती शर्त, त्या शर्ती<br>condition, -s | भेट देणे<br>to visit | |
| तो पुरवठा, –<br>supply | ती माहिती, –<br>information | भाग घेणे<br>to take part | |
| तो / ती पुरवठादार,<br>ते / त्या –<br>supplier, -s | ते संकेतस्थळ,<br>ती संकेतस्थळे / ळं<br>website, -s | जमा करणे<br>to credit | |
| तो गट, ते –<br>group, -s | ते सहपत्र,<br>ती सहपत्रे / त्रं<br>enclosure, -s | खुली राहणे<br>to remain open | |
| तो / ती अर्जदार,<br>ते / त्या-<br>applicant, -s | तो विभाग, ते –<br>department, -s | | |
| ती सूचना, त्या –<br>instruction, -s | तो मजला, ते मजले<br>floor, -s | | |

## ३१ उत्तरांचा योग्य पर्याय निवडू या. (Choose the correct option.)

क. पुरवठादार कशाचा पुरवठा करणार आहेत?
खडीसाखर, साखर, पिठीसाखर, मीठ

ख. साखर कशी असली पाहिजे?
दाणेदार, बारीक, ब्राऊन, पांढरीशुभ्र

ग. पुरवठादारांना अर्ज कुठून मिळतील?
कार्यालयातून, संकेतस्थळावरून, मंत्रालयातून, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षक विभागातून.

घ. अर्जदार नावनोंदणी कधीपर्यंत करू शकतील?
१२ जुलैपर्यंत, १२ महिन्यात कधीही, १२ जूनपर्यंत, त्या दिवशी १२ वाजेपर्यंत

च. अर्जदारांनी नावे कोणाकडे नोंदवायची आहेत?
ऑनलाईन, सचिवांकडे, NCDEX Spot Exchange Ltd.कडे, दुकानदारांकडे

## ३२ खाली दिल्याप्रमाणे प्रत्यय लावून शब्द तयार करू या. (Make words using the suffix ‘दार’.)

उदा. पुरवठा करणारा – पुरवठा + दार = पुरवठादार

क. अर्ज करणारा --------------------.

ख. राखण करणारा --------------------.

ग. स्वतःचं दुकान असणारा --------------------.

घ. कंत्राट घेणारा --------------------.

च. स्वतःचा कारखाना असणारा --------------------.

छ. स्वतःची जमीन असणारा --------------------.

## ३३ अधिसूचनेतील हे वाक्य पाहू या. (Read the sentence from the notification.)

**नोंदणी करू इच्छिणाऱ्या (those who wish)** पुरवठादारांनी या संकेतस्थळाला भेट द्यावी ...

नोंदणी (कर + ऊ) इच्छिणारे म्हणजे नोंदणी करायची इच्छा असणारे.

नोंदणी करू इच्छिणारे म्हणजे नोंदणी करायची इच्छा असणारे.

### ३४ धातू + ऊ - इच्छि + णारा ची रूपे. तक्ता वाचू या. (Read the table.)

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| पु. | धातू + ऊ इच्छिणारा | धातू + ऊ इच्छिणारे |
| स्त्री. | धातू + ऊ इच्छिणारी | धातू + ऊ इच्छिणाऱ्या |
| नपु. | धातू + ऊ इच्छिणारे / रं | धातू + ऊ इच्छिणारी |

**सामान्य रूप : इच्छिणाऱ्या**

### ३५ कंसातल्या धातूचे योग्य रूप रिकाम्या जागेत भरू या. (Fill in the correct form of the root given in the bracket.)

उदा. स्पर्धेत भाग (घे) ------------- इच्छिणारी मुले मुख्याध्यापकांना भेटली.
स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणारी मुले मुख्याध्यापकांना भेटली.

क. पूरग्रस्तांना मदत (कर) ------------- इच्छिणारे लोक धान्य आणि कपडे गोळा करताहेत.

ख. मतदारयादीत नाव (नोंदव) ------------- इच्छिणाऱ्या लोकांनी जिल्हाधिकारी कार्यालयात जावे.

ग. आजच्या कार्यक्रमात तोही दोन शब्द (बोल) ------------- इच्छितो.

घ. निवडणुकीला उभे (राह) ------------- इच्छिणाऱ्या सर्वांना तिकीट कसे मिळेल?

च. कार्यक्रमात गाणं (म्हण) ------------- इच्छिणाऱ्या महिला पुढे बसल्या होत्या.

### ३६ सराव. अधोरेखित शब्दाऐवजी खाली दिलेले शब्द वापरून पुढील वाक्यांश लिहा. (Substitute the underlined word with the given words.)

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| नवी भाषा शिकू इच्छिणारा <u>विद्यार्थी</u> | नवी भाषा शिकू इच्छिणारा विद्यार्थी |
| मुले | नवी... |
| स्त्रिया | |
| लोक | |
| अधिकारी | |
| गायिका | |
| मुलगी | |

**३७ वरील दोन्ही अधिसूचनांमध्ये आलेल्या मराठीच्या औपचारिक आणि अनौपचारिक रूपांच्या जोड्या जुळवू या. (Match the formal and informal forms in Marathi in this notification.)**

| | |
|---|---|
| क. विरोध असल्यास | १. किंवा |
| ख. वापरण्यास लावेल | २. अपराधाला |
| ग. कळविण्यात | ३. उघडकीला आल्यामुळे |
| घ. वा | ४. करत आहेत / करताहेत. |
| च. अपराधास | ५. वापरायला लावेल. |
| छ. उघडकीस येण्याने | ६. कळवण्यात |
| ज. करीत आहेत | ७. विरोध असला तर |

महाराष्ट्रात सर्व शासकीय पत्रव्यवहारात मराठी भाषेचे औपचारिक / लेखनभाषेतले रूप वापरतात. पण बोलताना कोणीही औपचारिक भाषा वापरत नाही.

**३८ चित्र आणि वाक्प्रचार पाहू या व वर्गात चर्चा करू या. (See the picture and discuss the phrases given below.)**

१ कामाची ओझी वाहणे

२ कामाचे डोंगर उपसणे

३ हमाली काम



# कोणी रजा देता का, रजा? २
## (शासन निर्णय)




**चला, शिकू या ...**

- शासन निर्णय वाचणे व समजणे
- रजेच्या प्रकारांची मराठी नावे माहीत असणे व रजेबद्दल चर्चा करता येणे
- धातू + ण्या + त ये ही रचना साध्या वर्तमानकाळात वापरता येणे
- धातू + ण्या + त ये ही रचना चालू वर्तमानकाळात वापरता येणे
- असल्याने / नसल्याने - असल्यामुळे / नसल्यामुळे वापरता येणे
- धातू + आवा ही रचना वापरता येणे
- सूचना, उपाययोजना, कामांची यादी इ.साठी धातू + णे हे क्रियापदाचे रूप वापरता येणे
- साधित शब्दांमधील मूळ शब्द ओळखता येणे

**१** चित्र पाहून वर्गात चर्चा करू या. चित्रामधून तुम्हाला काय काय समजले? **(What do you understand from the picture? Discuss in the class.)**




**२** रजेच्या कोणत्या प्रकारांची मराठी नावे तुम्हाला माहीत आहेत? माहीत असलेल्या नावांसमोर ✓ अशी खूण करू या. **(What kinds of leaves do you know? Tick mark in front of those which you already know.)**

- ☐ अर्जित रजा
- ☐ अर्धपगारी रजा
- ☐ नैमित्तिक / किरकोळ रजा
- ☐ परिवर्तित रजा
- ☐ वैद्यकीय रजा
- ☐ असाधारण रजा
- ☐ प्रसूती रजा
- ☐ अध्ययन रजा

जमा असलेली रजा - leave at credit
रजा शिल्लक नाही - leave not due
देय आणि अनुज्ञेय रजा - leave due and admissible
पगारी रजा - leave with pay
बिनपगारी रजा - leave without pay

**३** रजेच्या वेगवेगळ्या प्रकारांची मराठी नावे आणि इंग्रजी नावे यांच्या जोड्या जुळवू या. **(Match the pairs.)**

| | |
|---|---|
| क. अर्जित रजा | १. medical leave |
| ख. नैमित्तिक रजा | २. earned leave |
| ग. परिवर्तित रजा | ३. commuted leave |
| घ. वैद्यकीय रजा | ४. casual leave |
| च. असाधारण रजा | ५. half-pay leave |
| छ. प्रसूती रजा | ६. study leave |
| ज. अर्धपगारी रजा | ७. maternity leave |
| झ. अध्ययन रजा | ८. special leave |

**४ तुम्ही आतापर्यंत कोणत्या प्रकारच्या रजा घेतल्या आहेत? पुढील प्रश्नांच्या आधारे एकमेकांशी चर्चा करू या. (What leaves have you taken till now? Discuss with the help of the points below.)**

क. कोणती रजा घेतली?
ख. रजेचे कारण?
ग. रजेचा अवधी (duration)?
घ. अर्ज किती दिवस आधी केला?
च. वरिष्ठ अधिकाऱ्यांची प्रतिक्रिया? (senior officer's reaction)
छ. रजा मिळाली का?

**५ पुढे दिलेले चित्र पाहून प्रश्नांच्या आधारे वर्गात चर्चा करू या. (See the given picture and discuss about it with the help of following questions.)**

- चित्रातल्या टेबलावर कोणकोणत्या वस्तू आहेत?
- चित्रातील व्यक्ती कशासंबंधी बोलत आहेत?
- चित्रातल्या व्यक्तींपैकी बॉस कोण आहे? कशावरून?
- हे संभाषण कुठे घडत आहे?




**६ संवाद ऐकू या आणि खालील प्रश्नांची कोणती उत्तरे अचूक आहेत ते सांगू या. (Listen to the conversation and tick the correct options of the answers.)**

**क. मिसेस दवे यांचे बॉस कोण आहेत?**
१. मि. पटेल ☐ २. मि. पाटील ☐

**ख. मिसेस दव्यांना कोणत्या कारणासाठी रजा हवी आहे?**
१. मुलीच्या लग्नासाठी. (for daughter's marriage) ☐
२. मुलीच्या साखरपुड्यासाठी. (for daughter's engagement) ☐

**ग. मिसेस दवे किती दिवस रजा घेणार आहेत?**
१. एक महिना. ☐ २. १५ दिवस. ☐

**घ. मिसेस दवे कोणत्या महिन्यात रजेसाठी अर्ज करताहेत?**
१. नोव्हेंबर. ☐ २. डिसेंबर. ☐

**च. रजेच्या काळात त्यांचं ऑफिसचं काम कोण करणार आहे?**
१. मिसेस वर्मा. ☐ २. मिसेस शर्मा. ☐

**छ. मिसेस दव्यांना रजा मिळते का?**
१. हो. ☐ २. नाही. ☐

७ **दोन दोन विद्यार्थ्यांचे गट करून कर्मचारी आणि वरिष्ठ अधिकारी यांचा पुढील रजांसाठी संवाद तयार करू या. १) अध्ययन रजेसाठी, २) प्रसूती रजेसाठी ३) वैद्यकीय रजेसाठी (Make groups of two learners each and discuss study leave, maternity leave and medical leave.)**

८ **हा शासन निर्णय वाचू या. (Read.)**

पशुवैद्यकीय दवाखाना, श्रेणी -१, मौ. सोमठाणा,
ता. चिखलदरा, जि. अमरावती, या संस्थेचे
मौ. बदनापूर, ता. चिखलदरा, जि. अमरावती
येथे स्थलांतरण करणेबाबत

**महाराष्ट्र शासन**
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१९/प्र.क्र.५१/पदुम-४
मादामा कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई – ४०० ०३२
दिनांक – १९ जून, २०१९

वाचा : १. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे शासन पूरक पत्र क्र.जिवायो २०१०/प्र.क्र.२९१/पदुम-४ दि. ०१.०७.२०११.
२. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयीन पत्र क्र. व्हीएचडी/४४/४२९३-९६/पसं-१२, पुणे, दि. १०.०४.२०१९.
३. पत्र क्र. व्हीएचडी/४४/५७२६-२९/२०१५-१९ पसं-१२, पुणे, दि. ११.०६.२०१९.

**प्रस्तावना -**

सोमठाणा हे गाव अतिदुर्गम भागात असून अतिसंरक्षित व्याघ्र प्रकल्पात येत असल्यामुळे सदर गावाचे पुनर्वसन मौ. बदनापूर येथे करण्यात आलेले आहे. या गावामध्ये आदिवासी समाजाची मोठ्या प्रमाणात वस्ती असून, त्यांच्याकडील दुभत्या जनावरांची संख्या देखील मोठ्या प्रमाणात आहे. पशुपालकांच्या उत्पन्नात वाढ करण्याकरिता तसेच, त्यांच्या पशुधनास उत्तम पशुवैद्यकीय सेवा मिळवण्याकरिता पशुवैद्यकीय दवाखाना, श्रेणी-१ मौ. सोमठाणा, ता. चिखलदरा, जि. अमरावती या संस्थेचे मौ.बदनापूर, ता.चिखलदरा, जि.अमरावती येथे स्थलांतरण करणेबाबत तेथील ग्रामस्थांनी मागणी केलेली आहे.

जिल्हा परिषद, अमरावती सर्वसाधारण सभा दि. ०६.१०.२०१८ मधील विषय क्र. १५ अन्वये मौ. सोमठाणा, ता. चिखलदरा, जि. अमरावती या संस्थेचे मौ. बदनापूर, ता. चिखलदरा, जि. अमरावती येथे स्थलांतरण करण्याबाबतचा विषय चर्चिला जाऊन, पशुवैद्यकीय दवाखाना, श्रेणी – १ मौ. सोमठाणा, ता. चिखलदरा, जि. अमरावती या संस्थेचे मौ. बदनापूर, ता.चिखलदरा, जि. अमरावती येथे कायमस्वरूपी स्थलांतरण करण्यास जिल्हा परिषद, अमरावती सर्वसाधारण सभेने सर्वानुमते मंजुरी प्रदान केलेली आहे.

त्या अनुषंगाने पशुवैद्यकीय दवाखाना, श्रेणी – १ मौ. सोमठाणा, ता. चिखलदरा, जि.

अमरावती या संस्थेचे स्थलांतरण मौ. बदनापूर, ता. चिखलदरा, जि. अमरावती येथे करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय -**

पशुवैद्यकीय दवाखाना, श्रेणी-१ मौ.सोमठाणा, ता.चिखलदरा, जि.अमरावती या संस्थेचे स्थलांतरण मौ.बदनापूर, ता.चिखलदरा, जि.अमरावती येथे करण्यास याद्वारे, शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी पशुवैद्यकीय दवाखाना, श्रेणी-१ मौ. सोमठाणा, ता. चिखलदरा, जि. अमरावती या संस्थेचे मौ. बदनापूर, ता. चिखलदरा, जि. अमरावती येथे मंजूर अधिकारी, कर्मचारी वर्गासह तात्काळ स्थलांतरण करून या ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखाना कार्यान्वित करावयाचा आहे. जेणेकरून, या पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रातील शेतकरी - पशुपालक यांचेकडील पशुधनास पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध होतील.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१९०६२०११३००५६८०१ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(विजय चौधरी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-
१. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती
३. प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, अमरावती विभाग, अमरावती
४. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, अमरावती
५. निवड नस्ती पदुम – ४.

**शब्दार्थ :**

| नामे | नामे | क्रियापदे | इतर शब्द |
|---|---|---|---|
| तो शासन निर्णय, ते – government resolution, -s | ते गाव, ती गावे / वं – village, -s | वाढ करणे to increase | अति much |
| तो भाग, ते – area, -s | तो व्याघ्र, ते – tiger, -s | सेवा मिळणे to get service | संरक्षित protected |
| तो प्रकल्प, ते – project, -s | ते पुनर्वसन, ती पुनर्वसने rehabilitation | स्थलांतरण करणे to migrate | सदर this |

| | | | |
|---|---|---|---|
| तो समाज, ते –<br>society, -ies | ती वस्ती, त्या वस्त्या<br>colony, -ies | मागणी करणे<br>to demand | मौ (मौजे)<br>Mouje<br>at or in the village of, prefix to the name of a village mentioned |
| ते जनावर,<br>ती जनावरे / रं<br>animal, -s | ती संख्या, त्या –<br>number, -s | चर्चिणे<br>to discuss | दुभता<br>milk producing |
| तो पशुपालक, ते –<br>stockman, stockmen | ते उत्पन्न,<br>ती उत्पन्ने / न्नं<br>income | निर्गमित करणे<br>to issue | पशुवैद्यकीय<br>veterinary |
| ती वाढ, –<br>growth | ते पशुधन, –<br>animal stock | उपलब्ध होणे<br>to be available | बाबत<br>about |
| ते स्थलांतरण, – ती स्थलांतरणे<br>migration, -s | तो दवाखाना, ते दवाखाने<br>dispensary, -ies | कार्यान्वित करणे<br>to implement | सर्वानुमते<br>unanimously |
| ती मागणी, त्या मागण्या<br>demand, -s | तो ग्रामस्थ, ते –<br>villager, -s | पुनर्वसन करणे<br>to rehabilitate | सह<br>with |
| ती सभा, त्या –<br>meeting, -s | ती जिल्हापरिषद,<br>त्या जिल्हापरिषदा<br>district council, -s | | जेणेकरून<br>so that |
| ती मंजुरी, मंजुऱ्या<br>sanction, -s | तो विषय, ते –<br>subject, -s | | अतिदुर्गम<br>inaccessible |
| तो वर्ग, ते –<br>class, -es | ती मान्यता<br>approval | | |
| तो शेतकरी, ते –<br>farmer, -s | ते कार्यक्षेत्र,<br>ती कार्यक्षेत्रे / त्रं<br>operational area, -s | | |

## ९ आशयाधारित प्रश्न. रिकाम्या जागा भरू या. (Fill in the blanks.)

क. हा शासन निर्णय ------------------------- नावाने काढला आहे. (उपसचिवांच्या deputy secretary / राज्यपालांच्या governor)

ख. हा शासन निर्णय ------------------------ विभागाने काढला आहे. (कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसायविकास व मत्स्यव्यवसाय / वन)

ग. हा शासन निर्णय ------------------------- सालचा आहे. (१९२० / २०१९)

घ. ह्या निर्णयाचा विषय दवाखान्याचे ------------------- हा आहे. (पुनर्वसन rehabilitation / स्थलांतरण shifting, move)

च. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या --------------------------- पाहायला मिळतो. (संकेतस्थळावर website, राजपत्रात gazette)

## १० खालील प्रश्नांची उत्तरे शासन निर्णयात अधोरेखित करू या. (Underline the answers in the above government resolution.)

क. सोमठाणा गाव आता कुठे आहे?

ख. मौ॰ हे कशाचे संक्षिप्त रूप (short form) आहे?

ग. स्थलांतरासाठी कोणाची मंजुरी घेतली आहे?

घ. नवीन गावात दवाखाना सुरू करायची जबाबदारी कोणावर आहे?

च. या दवाखान्यामुळे कोणाला फायदा होणार आहे?

छ. बदनापूर गावात दवाखान्याची गरज का आहे?

## ११ अधोरेखित केलेल्या शब्दसमूहासाठी पुढे दिलेल्या पर्यायांमधले कोणते शब्द आले आहेत ते निवडू या. (Find correct word for group of words.)

**(ग्रामस्थ, पशुपालक, पशुधन, मंजुरी, दुभत्या, स्थलांतरण, दुर्गम, कायम स्वरूपी, सर्वानुमते)**

उदा॰ सोमाठाणा हे गाव <u>जायला अत्यंत कठीण (दुर्गम)</u> अशा भागात आहे.

क. आदिवासींकडे <u>दूध देणाऱ्या जनावरांची</u> संख्या जास्त आहे.

ख. दवाखाना <u>एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलवायचा</u> आहे.

ग. दवाखाना दुसऱ्या गावात गेल्यामुळे <u>गवळ्यांच्या</u> उत्पन्नात वाढ होईल.

घ. दवाखान्याचे स्थलांतरण <u>कायमचे</u> करायचे आहे.

च. <u>गावात राहणाऱ्या लोकांनी</u> दवाखान्याचे ठिकाण बदलायची मागणी केली होती.

छ. त्यामुळे गावातल्या <u>गाई म्हशी इ. गुरांना</u> वैद्यकीय सेवा मिळेल.

झ. दवाखान्याचे ठिकाण बदलायचा निर्णय <u>सर्वांचे मत विचारून</u> घेतला आहे.

ट. या निर्णयाला जिल्हा परिषदेने <u>मान्यता</u> प्रदान केली आहे.

### १२ खाली दिलेल्या शब्दांमधला मूळ शब्द सांगू या. (Write the base word.)

| | |
|---|---|
| उदा० वैद्यकीय | वैद्यक |
| क. मान्यता | ---------------------- |
| ख. मागणी | ---------------------- |
| ग. ग्रामस्थ | ---------------------- |
| घ. स्थलांतरण | ---------------------- |
| च. संरक्षित | ---------------------- |

### १३ ठळक बातम्या वाचू या. (Read the headlines.)

मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडून विद्यार्थ्यांच्या निबंधस्पर्धा घेण्यात येतात.

दरवर्षी पंतप्रधानांकडून 'परीक्षा पे चर्चा' या कार्यक्रमात विद्यार्थी व शिक्षकांशी संवाद साधण्यात येतो.

पंतप्रधानांना प्रश्न विचारण्याची संधी विद्यार्थ्यांना देण्यात येते.

अस्वच्छ पान टपऱ्या, बेकायदा स्टॉल उचलण्यात येत आहेत..

त्यातील साहित्य महापालिकेच्या गोदामात ठेवण्यात येत आहे.

### १४ वर दिलेल्या बातम्यांमधील ह्या दोन बातम्या पाहू या आणि त्यांतील 'ठेवण्यात येत आहे' आणि 'घेण्यात येतात' ही दोन क्रियापदांची रूपे लक्षात घेऊन पुढील तक्ता वाचू या. (Read these two news items and note these two forms of verbs 'ठेवण्यात येत आहे' and 'घेण्यात येतात' and read the following table.)

त्यातील साहित्य महापालिकेच्या गोदामात **ठेवण्यात येत आहे.**
The material in those (stalls) is being kept in Mahapalika godown.

**मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडून विद्यार्थ्यांच्या निबंधस्पर्धा घेण्यात येतात.**
Essay competitions are conducted by Human Resource Development Ministry.

### १५ तक्ता वाचू या. (Read the table.) साधा वर्तमानकाळ (Simple Present Tense)

| | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| पु. | महापालिकेकडून रस्ता साफ करण्यात येतो. | महापालिकेकडून रस्ते साफ करण्यात येतात. |
| स्त्री. | महापालिकेकडून अस्वच्छ टपरी उचलण्यात येते. | महापालिकेकडून अस्वच्छ टपऱ्या उचलण्यात येतात. |
| नपुं. | केंद्र सरकारकडून गरिबांना घर देण्यात येते. | केंद्र सरकारकडून गरिबांना घरं देण्यात येतात. |

### १६ तक्ता वाचू या. (Read the table.) अपूर्ण वर्तमानकाळ (Present Continuous Tense)

| | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| पु. | महापालिकेकडून रस्ता साफ करण्यात येत आहे. | महापालिकेकडून रस्ते साफ करण्यात येत आहेत. |
| स्त्री. | महापालिकेकडून अस्वच्छ टपरी उचलण्यात येत आहे. | महापालिकेकडून अस्वच्छ टपऱ्या उचलण्यात येत आहेत. |
| नपु. | केंद्र सरकारकडून गरिबांना घर देण्यात येत आहे. | केंद्र सरकारकडून गरिबांना घरे देण्यात येत आहेत. |

### १७ सराव. (Practice.)

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| सरकारकडून गरिबांना घरे देण्यात येतात. | सरकारकडून गरिबांना घरे देण्यात येतात. |
| सरकारकडून गरिबांना शिष्यवृत्ती देण्यात येते. | सरकारकडून गरिबांना शिष्यवृत्ती देण्यात येते. |
| सरकारकडून गरिबांना गॅस देण्यात येतो. | सरकारकडून गरिबांना गॅस देण्यात येतो. |
| सरकारकडून गरिबांना शिक्षण देण्यात येते. | सरकारकडून गरिबांना शिक्षण देण्यात येते. |
| सरकारकडून गरिबांना नोकऱ्या देण्यात येतात. | सरकारकडून गरिबांना नोकऱ्या देण्यात येतात. |

## १८ सराव. पुढे दिलेल्या वाक्यांमध्ये धातू + ण्या + त ये ही वाक्यरचना वापरू या. (Use the construction धातू + ण्या + त ये in the following sentences.)

उदा॰ केंद्र सरकार दुष्काळग्रस्त राज्यांना मदत करते.
केंद्र सरकारकडून दुष्काळग्रस्त राज्यांना मदत करण्यात येते.

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| डॉक्टर सरकारी दवाखान्यात मोफत तपासण्या करतात. | डॉक्टरांकडून सरकारी दवाखान्यात मोफत तपासण्या करण्यात येतात. |
| संस्था हिंदीत लिहिणाऱ्या लेखकाला पुरस्कार देते. | संस्थेकडून हिंदीत लिहिणाऱ्या लेखकाला पुरस्कार देण्यात येतो. |
| महानगरपालिका रस्त्यावरचे खड्डे बुजवते. | महानगरपालिकेकडून रस्त्यावरचे खड्डे बुजवण्यात येतात. |
| उमेदवार मतदारसंघात दौरा काढतात. | उमेदवारांकडून मतदारसंघात दौरा काढण्यात येतो. |
| राज्यशासन जिल्हाधिकाऱ्यांना बदलीचे पत्र पाठवते. | राज्यशासनाकडून जिल्हाधिकाऱ्यांना बदलीचे पत्र पाठवण्यात येते. |

धातू + ण्या + त ये हा कर्मणी प्रयोग (Passive voice) आहे.

## १९ जोड्या जुळवू या. (Match the columns.)

| | |
|---|---|
| क. बँकेकडून | १. लेखकांचा सत्कार करण्यात येतो. |
| ख. शिक्षण विभागाकडून | २. मुलांना बक्षिसे वाटण्यात येतात. |
| ग. साहित्य अकादमीकडून | ३. पूरग्रस्तांसाठी मदत गोळा करण्यात येते. |
| घ. मुख्याध्यापकांकडून | ४. शेतकऱ्यांना कर्ज देण्यात येते. |
| च. विद्यार्थ्यांकडून | ५. परीक्षेसंबंधी परिपत्रके काढण्यात येतात. |

## २० खालील वाक्ये धातू + ण्या त ये ही रचना वापरून लिहू या. (Write the sentences given below using the construction धातू + ण्या + त ये.)

उदा॰ पोलीस साखळीचोरांविरुद्ध कारवाई करत आहेत.
पोलिसांकडून साखळीचोरांविरुद्ध कारवाई करण्यात येत आहे.

क. रेल्वे काही मार्गांवर खासगी एक्स्प्रेस चालवत आहे.
ख. विरोधी पक्ष उमेदवारांची नावे जाहीर करत आहे.
ग. पालकमंत्री मेट्रोच्या कामावर लक्ष ठेवत आहेत.
घ. प्रशासन टोलनाके बंद करायचा निर्णय घेत आहे.
च. आरटीओ ऑफिस जुन्या गाड्यांच्या मालकांना नोटीस पाठवत आहे.

## २१ हा शासन निर्णय वाचू या आणि प्रश्नांची उत्तरे देऊ या.

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांना मदत करण्याबाबत ...

**महाराष्ट्र शासन**

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः- एससीवाय-२०१९-प्र.क्र.३४ म-७

मंत्रालय, मुंबई - ४०००३२

दिनांक - १८ जून, २०१९

**प्रस्तावना**

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने काही स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने नागपूर व औरंगाबाद येथे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील महिलांची सुरक्षितता या विषयावर दोन दिवसीय चर्चासत्र आयोजित करून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पत्नींशी संवाद साधला व शेतीचा सातबारा स्वतःच्या नावावर नसल्याने उद्भवणाऱ्या अडचणी, संपत्तीत वाटा मिळविताना कुटुंबातील अन्य नातेवाईकांकडून होणारा विरोध, मुलांचे शिक्षण, लग्न, आजारपण इत्यादींकरिता होणारी आर्थिक ओढाताण, स्वतःचा आणि कुटुंबाचा उदरनिर्वाहाचा प्रश्न, मुलीचा संसार तुटलाच तर, तिच्या पालनपोषणाचा प्रश्न, कर्ज परतफेडीचे संकट, समाजाचा नकारात्मक दृष्टिकोन, सरकार पातळीवर मदत मिळविताना होणारा त्रास ह्या त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. सदर महिलांना ज्या आव्हानांना सामोरे जावे लागते त्या समस्यांचा शासन पातळीवर गांभीर्याने विचार करून तसेच चर्चेदरम्यान करण्यात आलेल्या अभ्यासातून तसेच महिलांशी साधलेल्या संवादातून त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी राज्य महिला आयोगाने काही शिफारशी केल्या आहेत. सदर शिफारशींची अंमलबजावणी केल्यास आत्महत्याग्रस्त कुटुंबातील विधवांच्या समस्यांचे निराकरण होऊन त्यांना न्याय मिळवून देता येणे शक्य आहे.

उपर्युक्त वस्तुस्थितीचा विचार करून राज्य महिला आयोगाने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाच्या विविध विभागांकडून कार्यवाही करण्यासाठी मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**

महिला व बाल विकास विभागाच्या अखत्यारीतील महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी विविध विभागांनी करण्यासाठी पुढीलप्रमाणे शासनाची मंजुरी देण्यात आली आहे.

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांना मदत करण्याच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांच्या संदर्भात सक्षम प्राधिकाऱ्याकडून मान्यता, त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी, त्यावरील संनियंत्रण, आवश्यक वित्तीय तरतूद, निधी उपलब्धता याबाबतची सर्व प्रशासकीय कार्यवाही संबंधित विभागांनी स्वतंत्रपणे करावी. संबंधित विविध विभागांनी राबवावयाच्या उपाययोजना खालीलप्रमाणेः-

### महसूल व वन विभाग

- शेतीचा सातबारा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवेच्या नावावर करणे.
- राजस्व अभियानांतर्गत चावडी वाचन कार्यक्रम तसेच विशेष वारसाहक्क नोंदणी शिबिर घेऊन या विधवा महिलांना जमिनीचा हक्क मिळवून देणे.
- शेतजमीन नावावर होत नसल्याने विधवा महिलांना प्रधानमंत्री आवास योजनेत घर मिळणे अवघड होत असल्याने शेतजमीन अशा महिलांच्या त्वरित नावावर करून देणे.

### महिला व बाल विकास विभाग

- संपत्तीत वाटा मिळविताना आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पत्नीस प्राधान्य देणे.
- मुलींचे लग्न जुळल्यास आर्थिक साहाय्य व सामूहिक विवाह पद्धत अवलंबणे.
- सरकारी पातळीवर मदत मिळविताना होणारा त्रास वाचविण्यासाठी आत्महत्याग्रस्त कुटुंबाला प्राधान्याने मदत करणे.
- महिलांच्या अधिकारांबाबत संबंधित विभागातील अधिकाऱ्यांना प्रशिक्षण द्यावे. त्यांना आत्महत्याग्रस्त शेतकरी विधवांच्या महिलांचे प्रश्न संवेदनशीलतेने हाताळणेबाबत अधिकाऱ्यांचे प्रबोधन करावे.
- जिल्हा पातळीवर या विधवा महिलांसाठी विशेष साहाय्य कक्ष स्थापन करून त्यामार्फत सरकारी योजनांची माहिती, कायदेशीर मार्गदर्शन आणि तिच्या अडचणींचा निपटारा करण्याबाबत विचार करावा.

### शालेय शिक्षण विभाग

- आत्महत्याग्रस्त कुटुंबातील मुलांचे शिक्षण, त्यांच्या फी संबंधी अडचणी सोडविण्यासाठी विशेष धोरणाची आखणी व अंमलबजावणी करण्यात यावी.

### सार्वजनिक आरोग्य विभाग

- आजारपण इत्यादींकरिता होणारी आर्थिक ओढाताण दूर करण्यासाठी उपाययोजना.
- आरोग्याच्या सोयी उपलब्ध व्हाव्यात यासाठी हेल्थ कार्ड द्यावे.

### रोजगार व स्वयंरोजगार विभाग / महिला व बाल विकास विभाग

- आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या मुलीचा संसार तुटलाच तर, तिच्या पालनपोषणाचा प्रश्न महिला बचत गट, रोजगार व स्वयंरोजगार वा अन्य शासकीय योजनेच्या आधारे सोडविण्यास साहाय्य करणे.

### कृषी विभाग

- काही राज्यांच्या धर्तीवर “किसान मित्र हेल्पलाईन” सुरू करता येणे शक्य आहे का? याचा अभ्यास करून आत्महत्याग्रस्त कुटुंबाचा प्राधान्याने विचार व्हावा.

### ग्राम विकास विभाग

- घरकुल योजनांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील विधवांना प्राधान्यक्रम द्यावा.

**रोजगार हमी योजना विभाग**

- आत्महत्याग्रस्त जिल्ह्यात मनरेगा योजना प्राधान्याने राबवावी.
- आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाचा रोहयोच्या कामामध्ये प्राधान्याने विचार करावा.

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**

- अन्नसुरक्षा योजनेचा लाभ प्राधान्याने मिळावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६१८१५०३३३२११९ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

Vijay Marotrao Nandekar
(वि. मा. नांदेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
१. मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
३. मा. अपर मुख्य सचिव, (वित्त), मंत्रालय, मुंबई,
४. मा. अपर मुख्य सचिव, (सामान्य प्रशासन), मंत्रालय, मुंबई,
५. निवडनस्ती म-७ कार्यासन, मंत्रालय, मुंबई.

**शब्दार्थ :**

| नामे | नामे | क्रियापदे | इतर शब्द |
|---|---|---|---|
| ते सहकार्य, – cooperation | ती आत्महत्या, त्या – suicide, -s | आयोजित करणे to arrange | स्वयंसेवी volunteering |
| ते कुटुंब, ती कुटुंबे / बं family, -ies | ती महिला, त्या – woman, women | संवाद साधणे to have a dialogue | आत्महत्याग्रस्त sufferer due to suicide |
| तो लाभ, ते – benefit, -s | ते चर्चासत्र, ती चर्चासत्रे / त्रं seminar, -s | नावावर असणे to have on own name | दिवसीय of the day |
| ती अडचण, त्या अडचणी difficulty, -ies | ती संपत्ती, – wealth | वाटा मिळवणे to get share | सातबारा saatbara |

| | | | |
|---|---|---|---|
| तो वाटा, ते वाटे<br>share, -s | तो नातेवाईक, ते –<br>relative, -s | विरोध होणे<br>to be opposed | अन्य<br>other |
| तो विरोध, ते –<br>opposition | ते शिक्षण, –<br>ती शिक्षणे / णं<br>education | ओढाताण होणे<br>to be twisted | उपरोक्त<br>above said |
| ते लग्न, ती लग्ने / नं<br>marriage, -s | ते आजारपण,<br>ती आजारपणे / णं<br>illness, -es | संसार तुटणे<br>to break the married life | नकारात्मक<br>negative |
| ती ओढाताण,<br>twist, -s | तो उदरनिर्वाह, –<br>livelihood | परतफेड करणे<br>to repay | गांभीर्याने<br>seriously |
| तो प्रश्न, ते –<br>problem, -s | तो संसार, ते –<br>domestic life | मदत मिळवणे<br>to get help | दरम्यान<br>during |
| ते पालनपोषण, –<br>sustenance | ते कर्ज, ती कर्जे / र्जं<br>loan, -s | समजून घेणे<br>to understand | स्वतंत्रपणे<br>independently |
| ती परतफेड, –<br>repayment | ते संकट,<br>ती संकटे / टं<br>calamity, -ies | सामोरे जाणे<br>to face | विविध<br>various |
| तो दृष्टिकोन, ते –<br>approach, -es | ती पातळी,<br>त्या पातळ्या<br>level, -s | विचार करणे<br>to think | सक्षम<br>efficient |
| ती मदत, –<br>help | तो त्रास, –<br>suffering | अभ्यास करणे<br>to study | प्रत्यक्ष<br>actual |
| ते आव्हान, ती आव्हाने / नं<br>challenge, -s | ती समस्या, त्या –<br>problem, -s | निराकरण करणे<br>to abrogate / to refute | आवश्यक<br>necessary |
| तो विचार, ते –<br>thought, -s | ती चर्चा, त्या –<br>discussion, -s | अंमलबजावणी करणे to implement | वित्तीय<br>financial |
| तो अभ्यास, –<br>study | तो संवाद, ते –<br>dialogue, -s | कार्यवाही करणे<br>to take action | मार्फत<br>through |
| तो आयोग, ते –<br>commission, -s | ती शिफारस, त्या शिफारशी<br>recommendation, -s | मान्यता देणे<br>to approve | अवघड<br>difficult |

| | | | |
|---|---|---|---|
| ती अंमलबजावणी, –<br>implementation | ती विधवा, त्या –<br>widow, -s | मंजुरी देणे<br>to sanction | त्वरित<br>immediately |
| ते निराकरण, –<br>refutation | तो न्याय, –<br>justice | नावावर करणे<br>to transfer | सामूहिक<br>collective |
| ती वस्तुस्थिती, –<br>reality | ती कार्यवाही, –<br>action | | मनरेगा<br>Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Act |
| ती बाब, त्या बाबी<br>matter, -s | तो विकास, –<br>development | | रोहयो (रोजगार हमी योजना) |
| ती उपाययोजना, त्या –<br>measure, -s | तो प्राधिकारी, ते –<br>authority, -ies | | |
| ते संनियंत्रण, –<br>monitoring | ते अभियान, ती अभियाने / नं<br>mission | | |
| ती चावडी, त्या चावड्या<br>village police station | ते वाचन,<br>reading | | |
| तो कार्यक्रम, ते –<br>programme, -s | तो हक्क, ते –<br>right, -s | | |
| ती जमीन, त्या जमिनी<br>land, -s | ते शिबिर,<br>ती शिबिरे / रं<br>camp, -s | | |
| तो विवाह, ते<br>marriage, -s | ते प्राधान्य, ती प्राधान्ये, न्यं<br>priority, -ies | | |
| तो अधिकार, ते –<br>right, -s | तो रोजगार, ते –<br>employment | | |
| ती संवेदनशीलता, –<br>sensitivity | ते प्रशिक्षण,<br>ती प्रशिक्षणे / णं<br>training, -s | | |

| | | | |
|---|---|---|---|
| तो कक्ष, ते –<br>compartment, -s | ते प्रबोधन,<br>orientation | | |
| तो निपटारा, –<br>clearance, -s | ते मार्गदर्शन, –<br>guidance | | |
| ते धोरण,<br>ती धोरणे / णं<br>policy, -ies | ती फी, त्या फिया, –<br>fee, -s | | |
| तो सोय, त्या सोयी<br>facility, -ies | ती आखणी,<br>त्या आखण्या<br>planning | | |
| ती बचत, त्या बचती<br>saving, -s | ते हेल्थकार्ड,<br>ती हेल्थकार्डे / डं<br>health card, -s | | |
| ते घरकुल,<br>ती घरकुले / लं<br>house, -s | तो प्राधान्यक्रम, ते –<br>preference, -s | | |

## २२ पुढे दिलेले शब्द आणि त्यांचे अर्थ यांच्या जोड्या जुळवू या. (Match the following.)

| | |
|---|---|
| क. उद्‌भवणे (to occur) | १. सामना करणे |
| ख. संवाद साधणे (to communicate) | २. हिस्सा |
| ग. वस्तुस्थिती (actual situation) | ३. पोट भरणे |
| घ. वाटा (share) | ४. निर्माण होणे |
| च. निराकरण करणे (to solve) | ५. अधिकारातील |
| छ. सामोरे जाणे (to face) | ६. बोलणे |
| ज. अखत्यारीतील (within power) | ७. खरी परिस्थिती |
| झ. उदरनिर्वाह (livelihood) | ८. दूर करणे |

## २३ खालील प्रश्नांच्या उत्तरांचे योग्य पर्याय निवडू या. (Choose the correct options of answers for the following questions.)

Breach of discipline – शिस्तभंग
Breach of rules – नियमभंग
Breach of law – कायदेभंग

क. ह्या शासन निर्णयावर कोणाची सही आहे?
१. महसूल व वनविभागाचे मुख्यमंत्री.
२. कार्यासन अधिकारी.

ख. नागपूर व औरंगाबाद येथे झालेल्या चर्चासत्राचा विषय काय होता?
१. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील महिलांची सुरक्षितता.
२. शेतकरी कुटुंबातील महिलांची आत्महत्या.

ग. शेतकऱ्यांच्या विधवा म्हणजे...
१. शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यामुळे विधवा झालेल्या त्यांच्या बायका.
२. शेतकऱ्यांच्या म्हाताऱ्या आया.

घ. शेतकऱ्यांच्या विधवांचे प्रश्न सोडवण्यासाठी कोणाकडून शिफारशी (recommmendations) आल्या?
१. राज्य महिला आयोग.
२. स्वयंसेवी संस्था. (NGO)

च. शेतजमीन नावावर झाली तर शेतकऱ्याच्या विधवा पत्नीला कशी मदत होईल?
१. कुटुंबाच्या संपत्तीतला वाटा मिळेल.
२. प्रधानमंत्री आवासयोजनेत घर मिळेल.

छ. अधिकाऱ्यांना प्रशिक्षणात काय माहिती मिळणार आहे?
१. महिलांच्या अधिकारांविषयी.
२. शेतकऱ्यांच्या मुलींचे लग्न जुळवण्याविषयी.

ज. शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी कोण मदत करणार आहे?
१. शालेय शिक्षण विभाग.
२. महिला व बालविकास विभाग.

झ. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या मुलींसाठी महिला व बालविकास विभाग काय करू शकतो?
१. मुलींची लग्ने जुळवून देणे.
२. लग्नासाठी आर्थिक मदत.

ट. त्यांच्या कुटुंबाला हेल्थ कार्ड दिल्यामुळे काय मदत होईल?
१. त्यांना औषधासाठी दर महिन्याला पैसे मिळतील.
२. आरोग्याच्या सोयी उपलब्ध होतील.

ठ. त्यांच्या कुटुंबातल्या सदस्यांना काम कसे मिळेल?
१. हेल्पलाईनद्वारा.
२. मनरेगाद्वारा.

## २४ वाचू या. (Read.)



ऑफिसात बॉस असल्याने मला
फार फरक पडत नाही....
आणि नसल्यानेही....
फार फरक पडत नाही!! ☺☺

## २५ पाहू या. (See the following.)

शेतीचा सातबारा स्वतःच्या नावावर नसल्याने अडचणी येतात.
शेतीचा सातबारा स्वतःच्या नावावर नसल्यामुळे अडचणी येतात.
नस + ल्या + ने = नस + ल्या + मुळे

## २६ सराव. खाली दिलेल्या वाक्यांमध्ये 'नसल्याने' ऐवजी 'नसल्यामुळे' म्हणू या. (Drill. Use 'नसल्यामुळे' in place of 'नसल्याने' in the following sentences.

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| मंदाकडे पैसे नसल्याने तिने कंपनीकडून कर्ज घेतले. | मंदाकडे पैसे नसल्यामुळे तिने कंपनीकडून कर्ज घेतले. |
| घराजवळ पोस्टऑफिस नसल्याने ती जीपीओत जाते. | घराजवळ पोस्टऑफिस नसल्यामुळे ती जीपीओत जाते. |
| गावात शाळेसाठी इमारत नसल्याने शाळा देवळात भरते. | गावात शाळेसाठी इमारत नसल्यामुळे शाळा देवळात भरते. |
| त्याच्याजवळ ओळखपत्र नसल्याने त्याला विमानतळावर प्रवेश मिळाला नाही. | त्याच्याजवळ ओळखपत्र नसल्यामुळे त्याला विमानतळावर प्रवेश मिळाला नाही. |
| दिवसभर वीज नसल्याने काल इंटरनेट चालू नव्हते. | दिवसभर वीज नसल्यामुळे काल इंटरनेट चालू नव्हते. |
| आज पाऊस नसल्याने ती बाजारात गेली. | आज पाऊस नसल्यामुळे ती बाजारात गेली. |

याप्रमाणे अस + ल्या + ने = अस + ल्या + मुळे

२७ **सराव. खालील वाक्यांमध्ये 'असल्याने' ऐवजी 'असल्यामुळे' वापरून वाक्ये पुन्हा म्हणू या. (Drill. Use 'असल्यामुळे' in place of 'असल्याने' in the following sentences.**

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| हे गाव दुर्गम भागात असल्याने त्याचे पुनर्वसन केले. | उदा. हे गाव दुर्गम भागात असल्यामुळे त्याचे पुनर्वसन केले. |
| वाहतूकदारांचा संप असल्याने भाज्या महाग झाल्या आहेत. | वाहतूकदारांचा संप असल्यामुळे भाज्या महाग झाल्या आहेत. |
| ग्रंथालय जवळ असल्याने वामनराव रोज पुस्तके बदलून आणतात. | ग्रंथालय जवळ असल्यामुळे वामनराव रोज पुस्तके बदलून आणतात. |
| या वर्षीचा उन्हाळा कडक असल्याने दिवसभर एसी चालूच असतो. | या वर्षीचा उन्हाळा कडक असल्यामुळे दिवसभर एसी चालूच असतो. |
| मालतीबाई रागीट असल्याने मुले त्यांना घाबरतात. | मालतीबाई रागीट असल्यामुळे मुले त्यांना घाबरतात. |
| ऑफिस ठाण्याला असल्याने तिला पोचायला दीड तास लागतो. | ऑफिस ठाण्याला असल्यामुळे तिला पोचायला दीड तास लागतो. |

याच नियमाप्रमाणे : धातू + ल्या + ने / मुळे असे रूप तयार होते.
पड + ल्या + ने = पड + ल्या + मुळे
पण
दे ~ दि + ल्या + ने = दिल्याने / दिल्यामुळे
कर ~ के + ल्या + ने / मुळे = केल्याने / केल्यामुळे

२८ **खालील वाक्यांमध्ये 'ने' ऐवजी 'मुळे' आणि 'मुळे' ऐवजी 'ने' वापरून वाक्ये पुन्हा लिहू या. (Rewrite the sentences using 'मुळे' in place of 'ने' and 'ने' in place of 'मुळे'.)**

उदा॰ कोल्हापूर**मध्ये** भरपूर पाऊस पडल्याने पंचगंगे**ला** पूर आला.
उत्तर : कोल्हापूर**मध्ये** भरपूर पाऊस पडल्या**मुळे** पंचगंगेला पूर आला.
उदा॰ प्रशिक्षण वर्गात नाव नोंदवल्या**मुळे** मला व्याकरण चांगलं समजलं.
उत्तर : प्रशिक्षण वर्गात नाव नोंदवल्या**ने** मला व्याकरण चांगलं समजलं.

क. लवकर उठल्या**मुळे** तिला वर्गात झोप येत होती.
ख. बदलीचा आदेश आल्या**मुळे** रोहन नाराज होता.
ग. रजा मंजूर झाल्या**ने** उषा खूष दिसत होती.
घ. थंडीत आईस्क्रीम खाल्ल्या**ने** प्रियाताईंना खोकला झाला.
च. दिवसभर एका जागेवर बसल्या**मुळे** त्याची पाठ दुखत होती.

## २९ खाली दिलेली वाक्ये उदाहरणातील वाक्याप्रमाणे आपल्या कल्पनेनुसार पूर्ण करून लिहू या. (Complete the following sentences as per your imagination. Refer the example given.)

उदा. मित्राकडे गाडी असल्यामुळे मी त्याच्याबरोबर येऊ शकतो.

क. पाऊस पडल्याने ----------------------

ख. बॉस चांगला असल्यामुळे ----------------

ग. ऑफिसमध्ये टीव्ही नसल्याने ----------------

घ. बदलीचे ठिकाण चांगले नसल्यामुळे ----------------

च. ऑफिसमध्ये ग्रंथालय असल्याने ----------------

## ३० तक्ता वाचू या.

| | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| पु. | आदेश वाचावा. | आदेश वाचावेत. |
| स्त्री. | जाहिरात वाचावी. | जाहिराती वाचाव्यात. |
| नपु. | परिपत्रक वाचावे. | परिपत्रके वाचावीत. |

धातू + आवा ही विध्यर्थी रचना कर्तव्य, सूचना किंवा एखादी गोष्ट करण्याची आवश्यकता सांगण्यासाठी वापरतात.

## ३१ सराव करू या. अधोरेखित शब्दाऐवजी खालील शब्द वापरू या.

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| आदेश काढावा. | आदेश काढावा. |
| शासन निर्णय | |
| परिपत्रक | |
| अधिसूचना | |
| वृत्तपत्रे | |
| फोटो | |
| शाळा | |

### ३२ कंसात दिलेल्या 'कर + आवा' च्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागेत भरू या. (Fill in the blanks with the correct option of 'कर + आवा'. Options are given in the bracket.)

**(करावी, करावा, कराव्यात, करावे)**

उदा. विधवा महिलांसाठी विशेष साहाय्य कक्ष स्थापन करावा.

क. त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी विशेष धोरणाची आखणी ----------------------.

ख. त्यांच्या समस्या सोडवायचा प्रयत्न ----------------------.

ग. समस्या सोडवण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना ----------------------.

घ. त्यांच्या प्रश्नांचा गंभीरपणे विचार ----------------------.

च. त्यासाठी त्यांना कायद्याचे मार्गदर्शन ----------------------.

### ३३ अ आणि ब गटातल्या शब्दांच्या जोड्या जुळवू या.

| अ | ब |
|---|---|
| क. महिलांना आरोग्याच्या सोयीसाठी हेल्थकार्डे | द्यावी. |
| ख. अधिकाऱ्यांना प्रशिक्षण | द्यावे. |
| ग. उपाययोजना करण्यासाठी मान्यता | द्यावा. |
| घ. निधीसाठी मंजुरी | द्यावीत. |
| च. महिलांच्या प्रश्नांना प्राधान्य | |
| छ. महिलांना मदतनिधी | |
| ज. महिलांचे प्रश्न सोडवून त्यांना न्याय | |

### ३४ वर दिलेल्या शासन निर्णयातील ही वाक्ये वाचू या.

शेतीचा सातबारा शेतकऱ्यांच्या विधवेच्या नावावर करणे.
या विधवा महिलांना जमिनीचा हक्क मिळवून देणे.

या वाक्यांमध्ये क्रियापदाचे मूळ रूप सूचना देण्यासाठी, उपाययोजना सांगण्यासाठी, कामांची यादी करण्यासाठी / सांगण्यासाठी किंवा एखाद्या पदार्थाची कृती सांगण्यासाठी वापरतात.

### ३५ सराव करू या.

आपण कार्यालयातून थोड्या वेळासाठी बाहेर जातो आहोत अशी कल्पना करू या आणि हाताखालच्या कर्मचाऱ्यासाठी काही कामे लिहून ठेवू या.



**३६ याप्रमाणे शासकीय कर्मचाऱ्यांनी कार्यालयात वागणुकीबाबत पाळायचे काही नियम लिहू या.**

उदा॰ ऑफिसात वेळेवर येणे, कचरापेटीत कचरा टाकणे, ...

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

**३७ चित्र आणि वाक्प्रचार पाहू या व त्यावर वर्गात चर्चा करू या.**



सांगकाम्या हो नाम्या

कामाचा रगाडा उपसणे

कामापुरता मामा

# पुन्हा एकदा लेटमार्क! ३
## (परिपत्रक)




**चला, शिकू या ...**

- परिपत्रक वाचणे व समजणे
- बदलणाऱ्या विशेषणांची उजळणी करणे
- लेटमार्कसंबंधी चर्चा करणे
- कर्ता + ने / नी ... धातू + आवा ही विध्यर्थी रचना वापरता येणे
- ‘समोरचा’सारखी बदलणारी इतर स्थानदर्शक विशेषणे वापरता येणे
- वाहनाचा प्रकार, वाहनाचे नाव + ने...जातो / जाते वापरता येणे
- यांना / यांनी / यांचा ही रूपे वापरता येणे
- ‘योग्य’ नंतर ‘तो’ चा वापर करता येणे

## १ वाचू या. (Read.)

सेकंद कसा?
सेकंद छोटा!
मिनिट कसं?
मिनिट मोठं!

मिनिट कसं?
मिनिट छोटं!
तास कसा?
तास मोठा!

तास कसा?
तास छोटा!
दिवस कसा?
दिवस मोठा!

दिवस कसा?
दिवस छोटा!
आठवडा कसा?
आठवडा मोठा!

आठवडा कसा?
आठवडा छोटा!
महिना कसा?
महिना मोठा!

महिना कसा?
महिना छोटा!
वर्ष कसं?
वर्ष मोठं!

वर्ष कसं?
वर्ष छोटं!
आयुष्य कसं?
खूपच छोटं!

**२ वर्गात जोडीदाराला हे प्रश्न विचारू या. घड्याळ लावून खेळू या. (Set the time and ask the following questions to your partner.)**

क. साठ सेकंद म्हणजे किती मिनिटं?

ख. आठ आठवडे म्हणजे किती महिने?

ग. एक आठवडा म्हणजे किती दिवस?

घ. दोनशे चाळीस मिनिटं म्हणजे किती तास?

च. चोवीस महिने म्हणजे किती वर्षं?

**३ तक्ता वाचू या. (Read the table.)**

| ए.व. | अ.व. |
|---|---|
| हा पंखा कसा आहे? | हे पंखे कसे आहेत? |
| हा पंखा मोठा आहे. | हे पंखे मोठे आहेत. |
| ही खुर्ची कशी आहे? | ह्या खुर्च्या कशा आहेत? |
| ही खुर्ची मोठी आहे. | ह्या खुर्च्या मोठ्या आहेत. |
| हे टेबल कसं / कसे आहे? | ही टेबले / टेबलं कशी आहेत? |
| हे टेबल मोठं आहे. | ही टेबले / टेबलं मोठी आहेत. |

**४ सराव करू या. खालील संवादात 'रुमाल' ऐवजी दिलेले शब्द वापरून पाच संवाद तयार करू या. (Drills.)**

**(कपडे, पर्स, पाकीट, पुस्तकं, पेन)**

शिक्षक : हा रुमाल कसा आहे? हा रुमाल नवा आहे.

सर्वजण : हा रुमाल नवा आहे.

शिक्षक : हा रुमाल कसा आहे?

विद्यार्थिनी १ : हा रुमाल नवा आणि मोठा आहे.

सर्वजण : हा रुमाल नवा आणि मोठा आहे.

शिक्षक : हा रुमाल कसा आहे?

विद्यार्थिनी २ : हा रुमाल नवा, मोठा आणि निळा आहे.

**५ सराव करू या. खालील संवादात 'सोफा' या शब्दाऐवजी खालील शब्द वापरून संवाद तयार करू या. (Drills.)**

**(खुर्च्या, टेबल, छत्री, कपाटं)**

शिक्षक : हे सोफे कसे आहेत? हे सोफे जुने आहेत.

सर्वजण : हे सोफे जुने आहेत.

शिक्षक : हे सोफे कसे आहेत?

विद्यार्थी १ : हे सोफे जुने आणि हलके आहेत.

सर्वजण : हे सोफे जुने आणि हलके आहेत.

शिक्षक : हे सोफे कसे आहेत?

विद्यार्थी २ : हे सोफे जुने, हलके आणि स्वस्त आहेत.

सर्वजण : हे सोफे जुने, हलके आणि स्वस्त आहेत.

**६ जोड्या जुळवून वाक्ये तयार करू या. (Match the pairs and make sentences.)**

| | | |
|---|---|---|
| हा<br>ही<br>हे<br>ह्या | घड्याळ<br>पेन्सिली<br>फोटो<br>कपाटं / कपाटे<br>डायरी<br>पडदे<br>कॅलेंडर<br>फोन<br>पुस्तक | चांगला आहे.<br>चांगली आहे.<br>चांगले आहेत.<br>चांगली आहेत.<br>चांगल्या आहेत.<br>चांगलं आहे. |

**७ वर दिलेल्या वाक्यांमध्ये प्रत्येक शब्दाबरोबर 'चांगला' ऐवजी लहान आणि नवा ही विशेषणे वापरून वाक्ये पुन्हा तयार करू या. उदा. हे घड्याळ लहान आहे./ हे घड्याळ नवं आहे. (Use new adjectives like लहान and नवा instead of चांगला and recompose the sentences.)**

## ८ खालील प्रश्नांच्या आधारे वर्गात चर्चा करू या आणि संवाद ऐकू या. (Discuss about the picture in class and listen to the conversation.)



१. चित्रातल्या दोन व्यक्ती कोण आहेत?

२. हा प्रसंग कुठे घडतो आहे?

३. चित्रातली व्यक्ती घड्याळाकडे बोट का दाखवते आहे?

## ९ योग्य पर्याय निवडू या. (Choose the correct option.)

क. पाटलांना आज एक तास / दोन तास उशीर झाला आहे.

ख. पाटलांना रोज उशीर होतो / होत नाही.

ग. पाटलांना अर्धा तास उशीर झाला कारण डबा उशिरा मिळाला / गजर वाजला नाही.

घ. कुलकर्णी मॅडमचे अर्ध्या तासाचे / पंधरा मिनिटांचे काम पाटील करणार आहेत.

च. साहेबांनी पाटलांना एक तास / दोन तास जास्त काम करायला सांगितले.

## १० चर्चा करू या. खालील विधानांपैकी तुम्हाला कोणते विधान लागू होते? का? (Which of the following statements is applicable to you? Let us discuss.)



- आज परत लेटमार्क! कितीही प्रयत्न करा, उशीर होतोच!
- काहीही झालं तरी आज लेटमार्क लागायला नको!
- या संपूर्ण महिन्यात एकदाही लेटमार्क लागलेला नाही!
- मी कधीच उशिरा येत नाही!
- मी वेळेच्या दहा मिनिटं आधीच येतो / येते!

## ११ वर दिलेल्या उद्गारांचा अर्थ लक्षात घेऊन जोडीदाराबरोबर लेटमार्कसंबंधी संभाषण करू या. (Discuss late mark using above statements.)

## १२ हे परिपत्रक वाचू या. (Read the circular.)

मराठीचा वापर राज्यकारभारात करण्यास प्रोत्साहन

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

परिपत्रक क्र. ओ॰ एफ॰ एल॰ – १०६३ – एम.

सचिवालय, मुंबई ३२, बी॰ आर॰ दिनांक २० नोव्हेंबर १९६३ / २९ कार्तिक १८८५

### परिपत्रक

मराठी ही लवकरच महाराष्ट्राची राजभाषा म्हणून घोषित करण्यासाठी, विधानमंडळाकडे विधेयक मांडण्याच्या दृष्टीने, शासनाने या पूर्वीच पाऊल उचलले आहे. या परिवर्तनाला उपकारक असे वातावरण निर्माण करण्यासाठी, करावयाचे प्रारंभिक कार्य, भाषा संचालनालयाने हाती घेतलेच आहे. शासन व्यवहार संपूर्णपणे मराठीत चालविण्याची पहिली पायरी म्हणून, सरकारी कार्यालयातून प्रशासनाच्या कामांसाठी सर्व थरांवर मराठी भाषेच्या वापरास प्रोत्साहन देण्याचे शासनाने ठरवले आहे. हेतू हा की, शासन व्यवहारातील मराठीकरण सुरळीतपणे घडून यावे. सर्व सरकारी कर्मचाऱ्यांनी मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान संपादन करावे आणि त्या भाषेचा आपल्या कामकाजात शक्य तितक्या जास्तीत जास्त प्रमाणात उपयोग करावा, अशी शासनाची अपेक्षा आहे.

प्रारंभ म्हणून, पुढील काही विषयांबाबत मराठी भाषेचा जास्तीत जास्त उपयोग करण्यात यावा :-

१. राज्यातील दौऱ्यांच्या वेळी, वरिष्ठांपासून ते कनिष्ठांपर्यंत सर्व कर्मचाऱ्यांच्या दौऱ्यांचे कार्यक्रम मराठीतून दिले जावेत. यात मंत्र्यांच्या दौऱ्यांचाही समावेश होतो.

२. राज्य शासनाच्या निरनिराळ्या विभागाखालील सर्व प्रशिक्षण शाळांतून / केंद्रांतून प्रशिक्षण देताना मराठीचा शक्यतो वापर करावा.

३. सरकारी कर्मचाऱ्यांनी रजेचा अर्ज, अभिवेदन वगैरे सर्व प्रकारचे अर्ज मराठी भाषेतून सादर करावेत.

४. सर्व अधिकाऱ्यांनी आपापली प्रतिवेदने मराठीतून सादर करावीत. असे एखादे प्रतिवेदन तांत्रिक स्वरूपाचे असेल, किंवा संबंधित विषयाची योग्य व निश्चित परिभाषा मराठीत नसेल, तर ते मराठीत नसले तरी चालेल.

५. ठरीव स्वरूपाच्या प्रकरणातील टिप्पण्या आणि मसुदे मराठीतून लिहिण्याचा उपक्रम सुरू करावा, आणि इतर प्रकरणातही शक्य तितक्या जास्त प्रमाणावर मराठीचा वापर करण्याचा प्रयत्न करावा.

६. ग्रामीण विभागातील रहिवासी आणि संस्था यांच्याशी ज्या विभागांचा निकट संपर्क येतो त्या सर्व विभागांनी, विशेषतः शिक्षण, समाज कल्याण, प्रसिद्धी, महसूल वगैरे विभागांनी, शक्य तितक्या जास्तीत जास्त प्रमाणात मराठीचा वापर करावा.

७. सरकारी कर्मचाऱ्यांना मराठी भाषेत प्रावीण्य संपादन करणे सुलभ व्हावे आणि त्यांना त्या भाषेचा रोजच्या कार्यालयीन व्यवहारात उपयोग करण्याचा सराव व्हावा या हेतूने प्रत्येक सरकारी कार्यालयात एक मराठी ग्रंथालय सुरू करावे. या बाबतीत आवश्यक वाटल्यास मराठी ग्रंथ संग्रहालयासारख्या संस्थांचे साहाय्य आणि सहकार्य घ्यावे.

८. सुरुवातीला सोपी मराठी भाषा वापरावी. जर एखाद्या इंग्रजी संज्ञेचा किंवा शब्दाचा मराठी

प्रतिशब्द माहीत नसेल तर तीच इंग्रजी संज्ञा किंवा शब्द देवनागरी लिपीमध्ये लिहिण्यास हरकत नाही. अर्थ अधिक सुस्पष्ट करण्याची आवश्यकता भासल्यास मराठी पर्यायांपुढे कंसात इंग्रजी संज्ञा किंवा शब्द रोमन लिपीत लिहिला तरी चालेल.

९. मराठी टंकलेखकांची संख्या आज कमी आहे, तसेच मराठी टंकलेखनयंत्रेसुद्धा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. परंतु त्यासाठी अडून न राहता आवश्यक असेल तेव्हा पत्रे हाताने लिहून काढावीत. परिपत्रकांच्या बाबतीत देखील स्टेन्सिल कागदावर हाताने मजकूर लिहावा.

१०. पत्रांवरील पत्ते देवनागरी लिपीत लिहावेत, परंतु निरनिराळ्या कर्मचाऱ्यांच्या इंग्रजी पदनामाचे मराठी पर्याय डाक विभागाला परिचित नसल्यामुळे, इंग्रजी पदनाम देवनागरी लिपीत लिहावे आणि त्याच्याच खाली कंसात त्याचा मराठी पर्याय लिहावा. इंग्रजी पदनामांचे मराठी पर्याय सर्व संबंधितांच्या अंगवळणी पडेपर्यंत ही पद्धत अवलंबावी.

११. ज्या कर्मचाऱ्यांना मराठी भाषा पुरेशी अवगत नाही. त्यांनी सध्या इंग्रजी भाषेचा वापर चालू ठेवण्यास हरकत नाही, परंतु त्यांनी संभाषण, वाचन आणि लेखन यांच्याद्वारे मराठी भाषा शिकण्याचा मनःपूर्वक प्रयत्न करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सही)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.

**शब्दार्थ :**

| नाम | नाम | क्रियापदे | इतर शब्द |
|---|---|---|---|
| तो राज्यकारभार, – administration | ते साहाय्य, – assistance | घोषित करणे to declare | उपकारक beneficial |
| ते प्रोत्साहन, – encouragement | ती संज्ञा, त्या – noun, -s | विधेयक मांडणे to move a bill | प्रारंभिक initial |
| ते परिपत्रक, ती परिपत्रके / कं circular, -s | तो शब्द, ते – word, -s | पाऊल उचलणे to take a step | संपूर्णपणे fully |
| ते सचिवालय, ती सचिवालये / यं secretariat, -s | तो प्रतिशब्द, ते – equivalent expression, -s | निर्माण करणे to create | पुरेसे sufficient |
| ती राजभाषा, त्या – official language, -s | ती लिपी, त्या लिप्या script, -s | हाती घेणे to take up | मराठीकरण transformation into marathi |
| ते विधानमंडळ, ती विधानमंडळे / ळं legislature, -s | तो अर्थ, ते – meaning, -s | प्रोत्साहन देणे to encourage | सुरळीतपणे smoothly |

| | | | |
|---|---|---|---|
| ते विधेयक,<br>ती विधेयके / कं<br>bill, -s | ती आवश्यकता, त्या<br>necessity, -ies | ठरवणे<br>to decide | कनिष्ठ<br>junior |
| ते पाऊल,<br>ती पावले / लं<br>footstep, -s | तो पर्याय, ते –<br>alternative, -s | घडून येणे<br>to happen | वरिष्ठ<br>senior |
| ते परिवर्तन,<br>ती परिवर्तने / नं<br>change, -s | तो टंकलेखक, ते<br>typist, -s | संपादन करणे<br>to edit / acquire | सोपी<br>easy |
| ते वातावरण<br>atmosphere | ती संख्या, त्या –<br>figure, -s | उपयोग करणे<br>to use | शक्यतो<br>as far as possible |
| तो व्यवहार, ते –<br>work /<br>correspondence,<br>-s / -s | ते टंकलेखनयंत्र,<br>ती टंकलेखनयंत्रे / त्रं<br>typewriter, -s | अपेक्षा असणे<br>to expect | तांत्रिक<br>technical |
| ते भाषासंचालनालय,<br>ती भाषासंचालनालये<br>/ यं<br>language<br>directorate, -s | तो पत्ता, ते पत्ते<br>address, -s | देणे<br>to give | संबंधित<br>concerned |
| तो थर, ते –<br>stratum | ते पदनाम,<br>ती पदनामे / मं | समावेश होणे<br>to be included | निश्चित<br>fixed |
| ती पायरी,<br>त्या पायऱ्या<br>step, -s | ते संभाषण,<br>ती संभाषणे / णं<br>conversation, -s | प्रशिक्षण देणे<br>to give training | निकट<br>closed |
| तो / ती कर्मचारी,<br>ते / त्या –<br>employee, -s | ते लेखन, –<br>writing, -s | सादर करणे<br>to submit /<br>present | अधिक<br>more / additonal |
| ते ज्ञान, –<br>knowledge | तो प्रयत्न, ते –<br>effort, -s | लिहिणे<br>to write | सुस्पष्ट<br>clear |
| ते कामकाज, –<br>work | तो जिल्हा, ते –<br>जिल्हे<br>district, s | सुरू करणे<br>to start | हाताने<br>by hand |

| | | | |
|---|---|---|---|
| ती अपेक्षा, त्या –<br>expectation, -s | | प्रयत्न करणे<br>to try | स्टेन्सिल<br>stencil |
| तो प्रारंभ, ते –<br>beginning, -s | | संपर्क येणे<br>to come into contact | परिचित<br>known |
| तो उपयोग, ते –<br>use, -s | | सुलभ होणे<br>to be easier | मनःपूर्वक<br>heartily |
| तो दौरा, ते दौरे<br>tour, -s | | सराव होणे<br>to get practised | |
| तो समावेश, –<br>inclusion, -s | | आवश्यक वाटणे / आवश्यकता भासणे<br>to be needed | |
| तो सराव, ते –<br>practice, -s | | घेणे<br>to take | |
| ते ग्रंथालय,<br>ती ग्रंथालये / यं<br>library, -ies | | हरकत असणे / नसणे<br>to have / have no objection | |
| ते अभिवेदन,<br>ती अभिवेदने / नं<br>representation, -s | | उपलब्ध असणे / नसणे<br>to be / not to be available | |
| ते प्रतिवेदन,<br>ती प्रतिवेदने / नं<br>report, -s | | अडून राहणे<br>to be held up | |
| ती परिभाषा, त्या –<br>terminology | | परिचित असणे / नसणे<br>to be known / not known | |
| तो ठराव, ते –<br>resolution, -s | | अंगवळणी पडणे<br>to fall in a habit | |

| | | | |
|---|---|---|---|
| ती टिप्पणी,<br>त्या टिप्पण्या<br>noting, -s | | पद्धत / पद्धती<br>अवलंबणे<br>to follow a method | |
| तो मसुदा, ते मसुदे<br>content, s | | अवगत असणे /<br>नसणे<br>to know | |
| तो / ती रहिवासी,<br>ते / त्या –<br>resident, -s | | चालू ठेवणे<br>to continue | |
| ते प्रावीण्य, –<br>expertise | | शिकणे<br>to learn | |

**१३ खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य शब्द रिकाम्या जागेत भरू या. (Fill in the blankswith the options given in the brackets.)**

**(अधिकाऱ्यांनी, शिक्षणमंडळाने, बँकेने, कारखानदारांनी, महानगरपालिकेने)**

उदा॰ <u>शाळेने</u> विद्यार्थ्यांना थोडा गृहपाठ द्यावा.

क. --------------------- उरलेले पैसे विद्यार्थ्यांना परत करावेत.

ख. --------------------- रस्त्याच्या दोन्ही बाजूंना झाडे लावावीत.

ग. अमराठी --------------------- वृत्तपत्रातल्या बातम्या रोज वाचाव्यात.

घ. --------------------- कामगारांना दिवाळीपूर्वी बोनस द्यावा.

च. --------------------- जुन्या नोटा परत घ्याव्यात.

**१४ रिकाम्या जागेत ने किंवा नी पैकी योग्य प्रत्यय भरू या. (Fill ने or नी in the given blanks.)**

उदा॰ शासनाने मराठीच्या वापराबाबत परिपत्रक काढावे.

क. विद्यार्थ्यां ---- अभ्यासक्रम निवडताना स्वतःची आवड लक्षात घ्यावी.

ख. दुकानदारां ---- दुकानांवर मराठी पाट्या लावाव्यात.

ग. जनते --- योग्य उमेदवाराला मते द्यावीत.

घ. पाठ्यपुस्तक मंडळा --- अनुभवी शिक्षकांशी चर्चा करावी.

च. महाराष्ट्रात कर्मचाऱ्यां--- मराठीत सही करावी.

धातू + आवा ही विध्यर्थी रचना वापरताना एकवचनातल्या कर्त्याला 'ने' प्रत्यय आणि अनेकवचनातल्या कर्त्याला 'नी' हा प्रत्यय लागतो.

**१५ आशयाधारित प्रश्न. वर दिलेले परिपत्रक वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे योग्य पर्यायांमधून निवडू या. योग्य पर्यायावर ✓ ही खूण करू या. (Read the circular given above and choose the correct option from the given answers.)**

पदधारण करणे – hold an office
पदाधिकारी – office bearer
पदनाम – designation
पदावनती – demotion
पदभार – charge of the office

क. हे परिपत्रक कोणत्या विभागाने काढले आहे?
☐ १. शिक्षण विभागाने.
☐ २. सामान्य प्रशासन विभागाने.

ख. परिपत्रकावर कोणाची सही आहे?
☐ १. मुख्य सचिवांची.
☐ २. राज्यपालांची.

ग. हे परिपत्रक कशासाठी काढले आहे?
☐ १. सरकारी कामकाजात सर्व ठिकाणी मराठी वापरण्यासाठी.
☐ २. इतर भाषा कमी महत्त्वाच्या आहेत हे सांगण्यासाठी.

घ. या परिपत्रकातल्या सूचना कोणासाठी आहेत?
☐ १. सरकारी कर्मचाऱ्यांसाठी.
☐ २. सर्वसामान्य जनतेसाठी.

च. सरकारी कार्यालयात मराठी ग्रंथालय सुरू केल्यामुळे काय होईल?
☐ १. सरकारी कर्मचाऱ्यांना मराठी पुस्तके वाचायला मिळतील.
☐ २. सरकारी कर्मचाऱ्यांना चांगलं मराठी यायला लागेल.

छ. इंग्रजी पदनामांच्या खाली त्यांचे मराठी पर्याय कशासाठी लिहायला सांगितले आहेत?
☐ १. लोकांना इंग्रजी पदनामे समजण्यासाठी.
☐ २. डाक विभागाला मराठी पदनामे कळण्यासाठी.

ज. पत्रव्यवहारात इंग्रजी शब्द देवनागरी लिपीत केव्हा लिहिला तर चालेल?
☐ १. मराठी मातृभाषा नसेल तर.
☐ २. मराठी प्रतिशब्द माहीत नसेल तर.

**१६ तक्ता वाचू या. (Read the table.)**

**स्थानदर्शक विशेषणे Adjectives of location**

| क्रियाविशेषण | English meaning | लेखनभाषा | बोलीभाषा | सामान्य रूप |
|---|---|---|---|---|
| समोर | opposite | समोरील | समोरचा | समोरच्या |
| वर | on | वरील | वरचा | वरच्या |
| बाहेर | out | बाहेरील | बाहेरचा | बाहेरच्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मागे | behind | मागील | मागचा | मागच्या |
| पुढे | next | पुढील | पुढचा | पुढच्या |
| खाली | under | खालील | खालचा | खालच्या |
| कडे | towards | कडील | कडचा | कडच्या |
| आत | in | आतील | आतला | आतल्या |

## १७ सराव. (Repeat the sentences.)

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| आज समोरचे विद्यालय बंद आहे. | आज समोरचे विद्यालय बंद आहे. |
| दुकान | |
| पोस्ट ऑफीस | |
| व्यायामशाळा | |
| बाजार | |
| सरकारी कार्यालय | |
| छापखाना | |
| कारखाने | |
| हॉटेल | |

## १८ जोड्या जुळवू या. (Match the following.)

| अ | ब |
|---|---|
| क. संकेतस्थळावरची | १. माणसे (people) |
| ख. शाळेपुढचे | २. पाट्या (signboards) |
| ग. कार्यालयातले | ३. जिमखाना (gymkhana) |
| घ. दुकानांवरच्या | ४. पटांगण (playground) |
| च. गावातली | ५. माहिती (information) |
| छ. घरामागचा | ६. कर्मचारी (employee) |

**१९ रिकाम्या जागी लेखनभाषेतील स्थानदर्शक विशेषणांचे बोलीभाषेतील योग्य रूप भरू या. (Compare the informal and formal forms.)**

उदा。 स्टेशनसमोरील मैदानावर रोज एक मोर्चा असतो. स्टेशनसमोरचे मैदान खूप मोठे आहे.

क. हाताखालील कर्मचारी अधिकाऱ्यांसाठी दिवसभर काम करतात. ------------ कर्मचारी गरज पडल्यास कार्यालयात जास्त वेळ थांबतात.

ख. डॉक्टरांवरील श्रद्धेचा औषधापेक्षा जास्त उपयोग होतो. -------------- श्रद्धा रोग्यांना बरे करते.

ग. परदेशातील लोक आपले पाहुणे असतात. -------------- लोक भारतात प्रेक्षणीय स्थळं पाहायला येतात.

घ. माझ्याकडील पुस्तके मी तुम्हाला वाचायला देईन. ----------- पुस्तकं तुम्हाला आता दुकानात मिळणार नाहीत.

च. तरुण पिढी देशापुढील समस्यांचा गंभीरपणे विचार करते. ती ----------- सर्व समस्या नक्की सोडवेल.

**२० विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या जुळवू या. (Match the opposite pairs.)**

| अ | ब |
|---|---|
| क. जास्तीत जास्त | १. दुर्लभ (inaccessible) |
| ख. वरिष्ठ | २. अपुरी (insufficient) |
| ग. पुरेशी | ३. कमीत कमी (minimum) |
| घ. सुलभ | ४. अवघड (difficult) |
| च. सोपा | ५. कनिष्ठ (junior) |

**२१ वरच्या ब गटातील शब्द योग्य जागी भरू या. (Fill in the correct words from ब.)**

उदा。 मराठीच्या सरावासाठी तुम्ही वृत्तपत्रातली <u>कमीत कमी</u> एक बातमी रोज वाचा.

क. आपल्यापेक्षा --------- कर्मचाऱ्यांशी नेहमी प्रेमाने वागा.

ख. अमराठी भाषकांना मराठी भाषा खूप --------- वाटते.

ग. त्याला --------- माहिती देऊ नकोस.

घ. जनतेचा विचार करणारा प्रशासक --------- असतो.

**२२** **ह्या वाक्प्रयोगांचा अर्थ दिलेल्या पर्यायांमधून निवडू या. (Choose the correct option.)**

| | | | |
|---|---|---|---|
| क. घोषित करणे | १. घोषणा करणे | २. जाहीर करणे | ३. जयघोष करणे |
| ख. हाती घेणे | १. स्पर्श करणे | २. काम करायचे ठरवणे | ३. हातात हात घेणे |
| ग. अंगवळणी पडणे | १. अंगावर जबाबदारी पडणे | २. अंग वाकडे होणे | ३. सवयीचे होणे |

**२३** **ऐकू या आणि वर्तुळात योग्य क्रमांक भरू या. (Listen and fill in the correct number in the circle.)**













**२४ वर दिलेल्या चित्रांमधील वाहनांची नावे लिहू या. (Write the mode of transport given in the pictures above.)**

१. ____________________ २. ____________________

३. ____________________ ४. ____________________

५. ____________________ ६. ____________________

**२५ तुम्ही रोज ऑफिसला कसे येता? (How do you come to the office?)**



- लोकल ट्रेनने
- टॅक्सीने
- रिक्षाने
- सायकलीने
- बसने
- गाडीने
- स्कूटरने
- पायी

मी ऑफिसला रिक्षाने (वाहनाचे नाव + ने) येतो.
मी दिल्लीला विमानाने (वाहनाचे नाव + ने) जाणार आहे.
पाय + ई = पायी (on foot)

**२६ संवाद पुन्हा एकदा ऐकू या व चूक की बरोबर ते लिहू या. (Listen to the conversation and write true or false.)**

क. सायकलीमुळे प्रदूषण वाढते.

ख. टॅक्सी आपल्या सेवेसाठी हजर असते.

ग. बसचं तिकीट खूप महाग असतं.

## २७ आता हे परिपत्रक वाचू या.

राष्ट्रपुरुष / थोर व्यक्ती यांची जयंती व
राष्ट्रीय दिनाचे कार्यक्रम साजरे करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासकीय परिपत्रक, जपूति २२१८ / प्र. क्र. १९५ / २९
मंत्रालय, मादाम कामा मार्ग
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई – ४०००३२
दिनांक – २१ जून, २०१९

<u>पहा</u> – शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. जपूति २२१८ / प्र. क्र. १९५ / २९, दिनांक २६-१२-२०१८

**परिपत्रक**

दरवर्षी या विभागाकडून राष्ट्रपुरुष / थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिनांचे कार्यक्रम साजरे करण्याबाबतचे परिपत्रक निर्गमित करण्यात येते. त्यानुसार सन २०१९ मध्ये राष्ट्रपुरुष / थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिनांचे कार्यक्रम दिनांक २६-१२-२०१८ च्या शासन परिपत्रकानुसार मंत्रालयात व सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयांत साजरे करण्यात येतात.

२. या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते, की मंत्रालय तसेच शासकीय / निमशासकीय कार्यालयात साजरे करण्यात येणाऱ्या राष्ट्रपुरुष / थोर व्यक्ती यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास, प्रतिमेस अर्पण केलेले पुष्पहार, फुले सुकल्यानंतर लगेच काढण्यात यावेत व त्याची योग्य ती विल्हेवाट लावण्यात यावी.

३. विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या विभागातील / जिल्ह्यातील शासकीय / निमशासकीय कार्यालयांत सदर कार्यक्रम आयोजित करण्याबाबत आवश्यक त्या सूचना निर्गमित करून त्यांच्या अंमलबजावणीबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९६२११३०२२७४५०७ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ल. ना. सदाफुले)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव स्वीय साहाय्यक, मंत्रालय, मुंबई
४. मा. मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई

शब्दार्थ :

| नामे | क्रियापदे | इतर शब्द |
|---|---|---|
| तो पुरुष, ते –<br>man, men | साजरे करणे<br>to celebrate | दरवर्षी<br>every year |
| ती व्यक्ती, त्या –<br>person, -s | कळवणे<br>to inform | त्यानुसार<br>according to that |
| ती जयंती, त्या जयंत्या<br>anniversary, -ies | अर्पण करणे<br>to offer | अनुषंगाने<br>incidental to |
| तो दिन, ते –<br>day, -s | सुकणे<br>to dry | |
| ते मंत्रालय, ती मंत्रालये / यं<br>mantralaya, -s | विल्हेवाट लावणे<br>to dispose | |
| तो पुतळा, ते पुतळे<br>statue, -s | | |
| ती प्रतिमा, त्या –<br>image / photo, -s / -s | | |
| तो पुष्पहार, ते –<br>flower garland, -s | | |
| ती विल्हेवाट, –<br>disposal | | |
| तो / ती आयुक्त,<br>ते / त्या आयुक्त<br>commissioner, -s | | |
| तो / ती जिल्हाधिकारी,<br>ते / त्या –<br>collector, -s | | |
| तो जिल्हा, ते जिल्हे<br>district, -s | | |
| ती अंमलबजावणी, –<br>implementation, -s | | |



## २८ वाचू या. (Read.)

आपण डॉ. राधाकृष्णनांचा जन्मदिवस शिक्षकदिन म्हणून साजरा करतो.
आपण डॉ. राधाकृष्णन यांचा जन्मदिवस शिक्षकदिन म्हणून साजरा करतो.

## २९ खाली दिलेली वाक्ये वर दिलेल्या उदाहरणाप्रमाणे लिहू या. (Rewrite the sentences using the form above.)

क. सरदार वल्लभभाई पटेलांचा पुतळा गुजरातमध्ये आहे.

ख. लोकमान्य टिळकांनी शेवटपर्यंत देशहिताचा विचार केला.

ग. मनोहर पर्रीकर, सुषमा स्वराज आणि अरुण जेटलींच्या निधनाने देशाचे खूप नुकसान झाले.

घ. अमिताभ बच्चन आणि जया बच्चनांना अनेक पुरस्कार मिळाले.

च. कलाकर ग्रेस, शांताबाई आणि आरती प्रभूंच्या कविता वाचणार आहेत.

## ३० खालील वाक्ये उदाहरणाप्रमाणे बदलू या. (Change the sentences given below according to the example.)

उदा. रवींद्रनाथ टागोर यांनी तुकारामांची संपूर्ण गाथा वाचली होती.
रवींद्रनाथ टागोरांनी तुकारामांची संपूर्ण गाथा वाचली होती.

क. महाराष्ट्र फाऊंडेशन वसंत आबाजी डहाके यांना पुरस्कार देणार आहे.

ख. पुणे विद्यापीठाला सावित्रीबाई फुले यांचे नाव दिले गेले.

ग. लता मंगेशकर आणि आशा भोसले यांनी सर्व भारतीय भाषांमध्ये गाणी गायली आहेत.

घ. १२ जानेवारीला स्वामी विवेकानंद यांची जयंती असते.

च. जे.आर.डी टाटा, नारायण मूर्ती आणि अझीम प्रेमजी यांना आंतरराष्ट्रीय उद्योगविश्वात मानाचे स्थान आहे.

## ३१ आशयाधारित प्रश्न. अ गटातले प्रश्न आणि ब गटातली उत्तरे यांच्या जोड्या जुळवू या. (Match the following.)

| अ | ब |
|---|---|
| क. हे परिपत्रक कोणाच्या आदेशावरून काढले आहे? | १. जिल्हाधिकारी |
| ख. हे परिपत्रक कोणासाठी आहे? | २. डिजिटल |
| ग. परिपत्रकाचा विषय काय आहे? | ३. २०१८ |

| | |
|---|---|
| घ. सूचना पाठवण्याची आणि अंमलबजावणीची जबाबदारी कोणाची आहे? | ४. २०१९ |
| च. आदेशावर कशा प्रकारची स्वाक्षरी आहे? | ५. राज्यपाल |
| छ. हे परिपत्रक किती सालचे आहे? | ६. शासकीय कार्यालये |
| ज. जयंत्या आणि राष्ट्रीय दिन साजरे करण्याचे परिपत्रक किती साली काढले होते? | ७. अर्पण केलेले पुष्पहार काढणे आणि त्यांची व्यवस्था लावणे. |

## ३२ रिकाम्या जागेत 'कर' या धातूचे योग्य रूप भरू या. (Fill in the appropriate forms of the root 'कर'.)

**(करण्यात, करून, करावी, केल्यानंतर, करण्याबाबत)**

उदा॰ हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

क. शासन दरवर्षी २ ऑक्टोबरला स्वच्छता दिन साजरा --------- परिपत्रक काढते.

ख. वक्ते पुतळ्याला फुलांचा हार अर्पण --------- दोन शब्द बोलले.

ग. राज्यपालांच्या डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित --------- आदेश काढण्यात येतात.

घ. सर्व शाळांमध्ये मराठी भाषेची सक्ती ---------.

च. ढोलताशे वाजवून मुख्यमंत्र्यांचे स्वागत --------- आले.

## ३३ परिपत्रकातले हे वाक्य वाचू या. (Read the following sentences in the circular.)

फुले सुकल्यानंतर त्यांची योग्य ती विल्हेवाट लावण्यात यावी.
योग्य ती विल्हेवाट = जी योग्य असेल / वाटेल ती

**तक्ता वाचू या. (Read the table.)**

| जो | | तो | |
|---|---|---|---|
| एकवचन | अनेकवचन | एकवचन | अनेकवचन |
| जो | जे | तो | ते |
| जी | ज्या | ती | त्या |
| जे | जी | ते | ती |

सामान्यरूप – ज्या सामान्यरूप – त्या

**३४ खाली दिलेल्या वाक्यांमध्ये रिकाम्या जागेत 'तो' चे योग्य रूप भरू या. (Fill the correct form of तो in the blanks.)**

उदा. पुढे दिलेल्या पर्यायांमधून योग्य तो पर्याय निवडू या.

क. कार्यक्रम साजरा करण्याबाबत तुम्ही योग्य --- सूचना द्याव्यात.

ख. आदेशाच्या अंमलबजावणीबाबत योग्य --- कार्यवाही करावी.

ग. पंतप्रधान देशाच्या सुरक्षिततेसंबंधी योग्य --- निर्णय घेतील.

घ. शिक्षणमंत्री या बाबतीत योग्य --- मार्गदर्शन करतील.

च. हे पत्र कार्यवाहीसाठी योग्य --- विभागात पाठवावे.

**३५ खाली दिलेल्या अर्थाचे जे शब्द या परिपत्रकात वापरले आहेत ते अधोरेखित करू या आणि लिहू या. (Underline the words in the circular with the same meaning in the circular and write them down.)**

उदा. सही - स्वाक्षरी

क. फुलांचा हार - ------

ख. पाठवणे - ------

ग. फोटो - ------

घ. निधन पावलेल्या थोर व्यक्तीचा जन्मदिवस - ------

च. मोठ्या व्यक्ती - ------

**३६ चित्र व वाक्प्रचार पाहू या व वर्गात चर्चा करू या. (See the pictures and discuss the idioms given in the class.)**



हरकाम्या

कामाचा ढीग उपसणे

कामात व्यग्र असणे

# आज दांडी! ४
## (आदेश)




**चला, शिकू या ...**

- आदेश वाचणे व समजणे
- ऋतूंबद्दल आणि सुट्ट्यांबद्दल चर्चा करणे
- 'उप' हा उपसर्ग + नाम वापरता येणे
- सर्व + विशेषण वापरता येणे
- धातू + ल्या -नंतर / -मुळे / -पासून / -वर / -शिवाय वापरता येणे
- धातू + ण्या -बाबत / -साठी / -पूर्वी / -शिवाय वापरता येणे
- धातू + आवा (नकारार्थी विध्यर्थी रचना) वापरता येणे
- वाक्यप्रयोगाचे आणि शब्दांचे अचूक अर्थ समजून घेणे

## १ वाचू या व प्रत्येक वाक्याशी जुळेल असे योग्य चित्र ओळखू या.

| | |
|---|---|
| **क.** छे! काय प्रचंड उकाडा आहे. अगदी हैराण झालो आहे. आज ऑफिसमध्ये रजा टाकू का? |  |
| **ख.** सकाळपासून मस्त पाऊस पडतोय. आज ऑफिसला दांडी मारू का? |  |
| **ग.** किती थंडी आहे आज! हात पाय अगदी गारठून गेले आहेत. ऑफिसमध्ये येत नाही असं सांगून आज घरीच बसावं! |  |

रजा टाकणे – to take leave
दांडी मारणे – to remain absent from the office

## २ खालील स्मायली तुम्हाला तुमच्या आठवड्याची आठवण करून देतात का? चित्र पाहून वर्गात चर्चा करू या.

**ओळखा पाहू आम्ही सात कोण?**



काम
काम
काम
दांडी?
काम
सुट्टी
सुट्टी!!

## ३ तुम्ही ऑफिसला दांडी कधी मारता? बॉसला कोणती कारणं देता?

मुलाची परीक्षा / घरात लग्न / आजार / पर्यटन / अभ्यास / घराची दुरुस्ती / सुतारकाम / रंगकाम...

## ४ सुट्टीसाठी दिली गेलेली काही विनोदी कारणं वाचू या. तुम्ही कधी सुट्टीसाठी एखादं विनोदी कारण दिलं आहे काय?

प्रिय बॉस,
मला माझ्या बायकोसहित गावाकडची जमीन विकायची असल्याने चार दिवसांची सुट्टी हवी आहे!!

प्रिय बॉस,
मला ताप आला असल्याने, कृपया, एक दिवसाची सुट्टी जाहीर करा!!

### थोडं हसू या!

**बॉस** : पुनर्जन्मावर तुमचा विश्वास आहे का?

**कर्मचारी** : अजिबात नाही.

**बॉस** : अहो नाही कसं? काल तुमच्या काकांच्या अंत्ययात्रेला जातो असं सांगून तुम्ही रजा टाकून गेलात आणि ते तर तुम्हाला शोधत इकडे आले होते!!

## ५ ऐकू आणि वाचू या आणि खाली दिलेले शब्द योग्य ठिकाणी भरू या.

उकाडा दुष्काळ गुलाबी मुसळधार कडक किमान



क. आज भयंकर ऊन आहे! काहीही काम करावंसं वाटत नाहीये. महाराष्ट्रात मार्च, एप्रिल, आणि मे ह्या तीन महिन्यांत अगदी (क) ------------ ऊन असतं. (ख)------------ वाढला की त्रास होतो. विदर्भात तर कमाल तापमान कधीकधी ४८° असतं. कधी एकदा पाऊस येतो असं वाटतं!

ख. आज सकाळपासून (ग)------------- पाऊस पडतोय. थांबायचं नाव नाही! या वर्षी जून महिन्याच्या शेवटी जो पाऊस सुरू झालाय तो अगदी ऑगस्ट संपत आला तरी चालू आहे. पण बरं आहे. त्यामुळे (घ)-------------पडणार नाही. धरणं भरतील. सगळ्यांना भरपूर पाणी मिळेल.



ग. अहाहा! काय मस्त (च)------------- थंडी पडली आहे! काय असेल आजचं (छ)------------- तापमान? १८°!! टपरीवर गरमागरम चहा मिळाला तर काय मजा येईल.



## ६ वरील उताऱ्यातील माहितीच्या आधारे तक्ता भरू या.

| ऋतू | कोणते महिने? | ऋतूंशी संबंधित शब्द |
| --- | --- | --- |
| क. | | घामाच्या धारा... |
| ख. | | रिमझिम... |
| ग. | | गारठा... |

## ७ झाडाचे चित्र पाहून कोणता ऋतू असेल ते लिहू या.



क ------------------



ख ------------------



ग ------------------

## ८ वेधशाळेचा अंदाज वाचू या.

धारवाड | ४८°



मुंबई | ३५°



पुणे | २०°



चेन्नई | २२°



शिमला | ४°



कानपूर | २८°



आज प्रचंड उकडतंय. (It is very hot today.) / बर्फ पडतंय. (It is snowing) / घामाच्या धारा वाहतायत. (I am sweating.) / सोसाट्याचा वारा सुटलाय. (It is very windy) / खूप गार आहे. (It is very cold.) / पाऊस कोसळतोय. (It is raining heavily.) / ढग गडगडतायत. (It is thundering.) / विजा कडाडतायत. (It is lightning.) / गारा पडतायत. (Hailstorm) / ढगाळ वातावरण आहे. (It is cloudy.)

## ९ वरील वाक्यांची मदत घेऊन वर्गात चर्चा करू या.

आज कोणत्या शहराचे तापमान किती आहे? आज कोणत्या शहरात हवा कशी आहे?
तुमच्या वर्गमित्राशी किंवा वर्गमैत्रिणीशी संवाद साधा.
तुम्हाला कोणत्या शहरात राहायला आवडेल?

## १० तुम्हाला कोणता ऋतू आवडतो? तुमच्या आवडत्या ऋतूमध्ये तुम्ही काय करता?

उदा॰ मला हिवाळा अतिशय आवडतो, कारण ...

## ११ पाहू या.

| संपादक | प्राचार्य |
|---|---|
| उप + संपादक = उपसंपादक (sub-editor) | उप + प्राचार्य = उपप्राचार्य (vice-principal) |

**उपसंपादक :** संपादकांच्या खालोखालच्या पदावर असतात.
**उपप्राचार्य :** प्राचार्यांच्या खालोखालच्या पदावर असतात.
उप = sub/vice

## १२ जोड्या जुळवू या.

| | |
|---|---|
| क. उपशीर्षक | १. satellite |
| ख. उपनियम | २. suburb |
| ग. उपनगर | ३. subrule |
| घ. उपविभाग | ४. subdivision |
| च. उपसमिती | ५. subhead |
| छ. उपशीर्ष | ६. subtitle |
| ज. उपपद | ७. bay |
| झ. उपसागर | ८. tributary |
| ट. उपनदी | ९. subcommittee |
| ठ. उपग्रह | १०. article |

## १३ खाली दिलेल्या शब्दांपैकी योग्य शब्द योग्य जागी भरू या.

**(उपसमिती, उपनगरे, उपनदी, उपनियम, उपविभाग, उपग्रह)**

उदा。 राज्यघटनेतील उपपद ३७० मुळे काश्मीर भारतातले एक राज्य झाले.

क. अंतराळात फिरणारे ----------- कधीकधी रात्री दुर्बिणीतून दिसतात.

ख. यमुना ही गंगेची ----------- आहे.

ग. शासनाने समितीच्या मदतीसाठी एक ----------- तयार केली.

घ. महाराष्ट्राचे मुख्य विभाग सहा आहेत. पण ----------- बरेच आहेत.

च. मुंबईची ----------- आता खूपच विकसित झाली आहेत.

छ. राज्यघटनेत प्रत्येक नियमाला ----------- असतातच.

## १४ वाचू या. दिलेल्या शब्दांमध्ये 'सर्व' बरोबर कोणते शब्द आहेत हे ओळखू या.

सर्व + उच्च = सर्वोच्च

क. सर्वोत्तम - सर्व + -----------

ख. सर्वोत्कृष्ट - सर्व + -----------

ग. सर्वश्रेष्ठ - सर्व + -----------

घ. सर्वसंमत - सर्व + -----------

च. सर्वमान्य - सर्व + -----------

## १५ 'सर्व' जोडून तयार झालेल्या शब्दांबरोबर नेहमी येणाऱ्या शब्दांच्या जोड्या जुळवू या.

| अ | ब |
|---|---|
| क. सर्वोच्च (supreme) | १. विधेयक |
| ख. सर्वोत्कृष्ट (perfect) | २. कायदा |
| ग. सर्वश्रेष्ठ (best) | ३. न्यायालय |
| घ. सर्वसंमत (unanimous) | ४. प्रस्ताव |
| च. सर्वमान्य (admittedly) | ५. नाटक |
| छ. सर्वसमावेशक (all inclusive) | ६. दान |

## १६ आदेश वाचू या.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिनस्त
दर्शनिका विभागात सहसंपादक, गट – अ या
पदावर पदोन्नती देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
शासन आदेश क्रमांकः दर्शनि – २०१७ / प्र. क्र. ४५ / सांका. - २.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२
दिनांकः – ०१ नोव्हेंबर, २०१८

आदेश

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील दर्शनिका विभागात सहसंपादक, गट – अ या रिक्त पदावर पदोन्नती देण्यासाठीचा प्रस्ताव विभागीय पदोन्नती समितीसमोर सादर करण्यात आला होता.

२. त्या अनुषंगाने विभागीय पदोन्नती समितीने दि. १५-९-२०१८ रोजी झालेल्या बैठकीत केलेल्या शिफारशीनुसार श्रीमती अबक (प्रवर्ग खुला) उपसंपादक, दर्शनिका विभाग यांना सहसंपादक, (गट-अ), दर्शनिका विभाग या पदावर रु. १५,६०० – ३९,१०० ग्रेड पे रु. ६,६०० या वेतनश्रेणीत खालील अटींच्या अधीन राहून तदर्थ स्वरूपात पदोन्नती देऊन पदस्थापना देण्यात येत आहे.

(आ) सदर पदोन्नती मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे प्रलंबित असलेल्या क्र. SLP (C) २८३०६-२०१७ महाराष्ट्र राज्य विरुद्ध श्री. क्ष व इतर या प्रकरणांमध्ये होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

(ब) सदर तदर्थ पदोन्नती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेने नियमित केल्यानंतर तसेच निवडसूचीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता प्राप्त झाल्यानंतरच या पदावर सेवाज्येष्ठता व अन्य सेवाविषयक लाभ मिळण्यास श्रीमती अबक पात्र ठरतील.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत-स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८११०११४५७५०१९२३ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Anees Iqbal Ismail Shaikh
Date: 2018.11.01 15:05:06 + 05'30'
(अनिस शेख)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
श्रीमती अबक, सहसंपादक, दर्शनिका विभाग, मुंबई.

प्रत,
१. अपर मुख्य सचिव, (सेवा) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा॰ मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा॰ मंत्री, (सांस्कृतिक कार्य) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. निवड नस्ती – सां.का. २.

**शब्दार्थ :**

| नामे | नामे | क्रियापदे | इतर शब्द |
|---|---|---|---|
| ते पर्यटन, – tourism | ती सेवाज्येष्ठता seniority | पदस्थापना देणे to give posting | विभागीय departmental |
| ते नियंत्रण, ते नियंत्रणे control | ते संकेतस्थळ, ती संकेतस्थळे / ळं website, -s | पदोन्नती देणे to promote | सांस्कृतिक cultural |
| ती दर्शनिका, त्या – gazetteer, -s | तो संकेतांक, त्या code number, -s | शिफारस करणे to recommend | प्रशासकीय administrative |
| ती स्वाक्षरी, त्या स्वाक्षऱ्या signature, -s | ती निवडसूची, त्या – list of selection, -s | अधीन राहणे subject to | रिक्त vacant |
| तो / ती सहसंपादक, ते / त्या – co-editor, -s | तो / ती उपसचिव, ते / त्या – deputy secretary, -ies | प्रलंबित असणे to be pending | खुला open |

| | | | |
|---|---|---|---|
| ते न्यायालय,<br>ती न्यायालये / यं<br>court, -s | ती वेतनश्रेणी, त्या –<br>grade, -s | नियमित करणे<br>to regularize | तदर्थ<br>ad hoc |
| ती पदोन्नती, त्या –<br>promotion, -s | ती समिती,<br>त्या समित्या<br>committee, -s | मान्यता प्राप्त होणे<br>to be approved | प्रलंबित<br>pending |
| तो प्रस्ताव, ते –<br>proposal, -s | ती बैठक<br>meeting | लाभ मिळणे<br>to get benefit | अंतिम<br>final |
| ती पदस्थापना, –<br>posting, -s | तो / ती उपसंपादक,<br>ते / त्या उपसंपादक<br>sub-editor, -s | पात्र ठरणे<br>to be eligible | सदर<br>this |
| ते प्रकरण, ती प्रकरणे / णं<br>matter, case, -s / -s | ती अट, त्या अटी<br>condition, -s | | डिजिटल<br>digital |

## १७ वर दिलेल्या आदेशातले हे वाक्य वाचू या.

सदर तदर्थ पदोन्नती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेने नियमित **केल्यानंतर** सेवाविषयक लाभ मिळण्यास श्रीमती अबक पात्र ठरतील.

म्हणजेच,

आधी महाराष्ट्र लोकसेवा आयोग मान्यता देऊन श्रीमती अबक यांची पदोन्नती नियमित **करेल त्यानंतर** लाभ मिळण्यास त्या पात्र ठरतील.

## १८ धातू + ल्या नंतर....

| | | |
|---|---|---|
| उठ | उठ + ल्या नंतर | उठल्यानंतर |
| बस | बस + ल्या नंतर | बसल्यानंतर |
| बोल | बोल + ल्या नंतर | बोलल्यानंतर |
| हो | झा + ल्या नंतर | झाल्यानंतर |
| कर | के + ल्या नंतर | केल्यानंतर |
| दे | दि + ल्या नंतर | दिल्यानंतर |
| घे | घेत + ल्या नंतर | घेतल्यानंतर |
| ये | आ + ल्या नंतर | आल्यानंतर |
| जा | गे + ल्या नंतर | गेल्यानंतर |

## १९ खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय योग्य जागी भरू या.

**(लागल्यानंतर, दिल्यानंतर, केल्यानंतर, आल्यानंतर, ऐकल्यानंतर)**

उदा० काम पूर्ण (झाल्यानंतर) पैसे मिळतील.

क. सर्वांना फोन ------------- श्री० मोकाशी घरी गेले.

ख. केंद्र सरकारचे मत ------------- सर्वोच्च न्यायालय निर्णय देईल.

ग. परीक्षेचे निकाल ------------- प्रवेशप्रक्रिया सुरू होईल.

घ. पैसे ------------- पावती घ्यायला विसरू नका.

च. नवीन सरकार ------------- नक्की बदल होतील.

'नंतर' प्रमाणेच धातू + ल्या -पासून / -बरोबर / -शिवाय / -मुळे / -वर / -बद्दल ही अव्यये जोडूनही क्रियापदाची रूपे तयार होतात. उदा० केल्यापासून... केल्यामुळे...

## २० रिकाम्या जागेत योग्य अव्यये भरू या.

**(-पासून (from), -वर (after), -बद्दल (for, because), -बरोबर (immediately after), -मुळे (because of), -शिवाय (without))**

उदा० पुरस्कार मिळाल्याबद्दल आम्ही सरांचे अभिनंदन केले.

क. आठवडाभर सतत पाऊस पडल्या -------- सगळीकडे हिरवंगार दिसत होतं.

ख. नवी गाडी घ्यायचं ठरल्या -------- सुभाषने OLX वर जाहिरात दिली.

ग. पावसाळ्यात पाणी उकळल्या ------- पिऊ नका.

घ. आयुर्वेदिक औषध सुरू केल्या -------- तिची तब्येत सुधारली आहे.

च. विराट कोहली दिसल्या ------- लोक टाळ्या वाजवायला लागले.

## २१ आशयाधारित प्रश्न. खाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे चूक की बरोबर ते सांगू या.

| | | |
|---|---|---|
| क. | हा आदेश कोणत्या विभागाने काढला आहे? | उत्तर : सामान्य प्रशासन विभाग. |
| ख. | ह्या आदेशानुसार कोणाला पदोन्नती मिळाली आहे? | उत्तर : श्रीमती अबक यांना. |
| ग. | त्यांच्या पदामध्ये कोणता बदल झाला आहे? | उत्तर : त्या उपसंपादक होत्या आता सहसंपादक झाल्या आहेत. |
| घ. | त्या कोणत्या विभागात काम करतात? | उत्तर : सांस्कृतिक विभागात. |
| च. | त्यांच्या पदोन्नतीसाठी कोणाची मान्यता पाहिजे? | उत्तर : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची. |
| छ. | श्री० क्ष कोणाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात गेले आहेत? | उत्तर : केंद्र सरकारविरुद्ध. |

## २२ आता हा आदेश वाचू या.

महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा) गट- अ मधील
अधिकाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यांमध्ये अंशतः बदल
करण्याबाबत – शिक्षणाधिकारी व तत्सम

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन आदेश क्रः बदली ३११८ - प्र. क्र. ८८ – प्रशा - २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२
दिनांक : १० ऑगस्ट, २०१८

वाचा : १. शा.शि.व.क्री.वि., शासन निर्णय क्र. ईएसटी-३९१७/प्र.क्र.४६/प्रशा-२, दि. १७-०३-२०१७
२. शा.शि.व.क्री.वि., शासन निर्णय क्र. ईएसटी-३११८/प्र.क्र.८८/प्रशा-२, दि. १८-०५-२०१८

शासन आदेश-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम,२००५ मधील तरतुदीनुसार दिनांक ३१ मे, २०१८ रोजी तीन वर्षांचा कालावधी पूर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश दिनांक १८-०५-२०१८ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. त्यामध्ये काही अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेत अंशतः बदल करण्याचा शासन स्तरावर निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधीर नियम ४ (४) दोन व नियम ४ (५) मधील तरतुदीस अनुसरून सक्षम प्राधिकाऱ्यांनी व लगतपूर्व वरिष्ठ प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या पूर्व मान्यतेनुसार खालील तत्त्यात, नमूद अधिकाऱ्यांची पदस्थापना त्यांच्या नावासमोर स्तंभ क्रमांक – ४ मध्ये दर्शविलेल्या पदावर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव व पदनाम | दिनांक १८-०५-२०१८ अन्वये करण्यात आलेली पदस्थापना | सुधारित पदस्थापना | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्रीमती अबक (यादव), शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि॰प॰ ठाणे | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि॰ प॰ पालघर | संचालक, जवाहर बालभवन, मुंबई | रिक्त पदावर |

२. सदर अधिकाऱ्यांनी त्यांच्या नवीन पदाचा पदभार त्वरित स्वीकारावा तसेच त्यांनी अनधिकृत रजेवर जाऊ नये. त्यांचे लक्ष सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक-सीडीआर १०८२/२५६७/२८/ अकरा, दिनांक ३० ऑगस्ट, १९९२ च्या परिपत्रकाकडे वेधण्यात येत आहे. त्यात दिलेल्या सूचना लक्षात घेऊन बदली रद्द करण्यासाठी कुठल्याही स्वरूपाची आवेदने सादर केल्यास, ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

३. आयुक्त (शिक्षण) पुणे यांनी या आदेशाप्रमाणे सदर अधिकाऱ्यांना त्यांच्या सध्याच्या पदभारातून तात्काळ कार्यमुक्त करण्याबाबत संबंधित नियंत्रण अधिकाऱ्यांना तातडीने कळवावे व बदली झालेले अधिकारी विहित कालावधीत दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होतील, याची खातरजमा करावी व याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१८०८१३१६२४४१०३२१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रवीन्द्र प्रह्लाद आटे
(र. प्र. आटे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
१. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, पालघर
३. सर्व शिक्षण संचालक

प्रत माहितीसाठी,
१. मा॰ मंत्री, शालेय शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी.
२. अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय साहाय्यक.
३. निवडनस्ती.

**शब्दार्थ :**

| नामे | नामे | क्रियापदे | इतर शब्द |
|---|---|---|---|
| ती बदली,<br>त्या बदल्या<br>transfer, -s | ती खातरजमा<br>assurance, -s | कर्तव्य पार पाडणे<br>to perform duty | सर्वसाधारण<br>general |
| तो बदल, ते –<br>change, -s | तो अहवाल, ते –<br>report, -s | विलंब होणे<br>to be delayed | अंशतः<br>partly |
| ते विनियमन, -<br>ती विनियमने / नं<br>regulation, -s | तो विलंब, –<br>delay | अनुसरणे<br>to follow | सक्षम<br>competent |
| तो प्रतिबंध, ते –<br>prevention, -s | तो अधिनियम, ते –<br>act, -s | दर्शवणे<br>to show | लगतपूर्व<br>last preceding |
| तो कालावधी, –<br>duration | ती तरतूद, त्या<br>तरतुदी<br>provision, -s | पदभार स्वीकारणे<br>to accept charge | पूर्व<br>prior |

| | | | |
|---|---|---|---|
| तो शिस्तभंग, – breach of discipline | ते लक्ष, – attention | रजेवर जाणे to take leave | नमूद mentioned |
| तो प्राधिकारी, ते – authority, -ies | ती रजा, त्या – leave, -s | लक्षात घेणे to take notice | त्वरित early |
| तो स्तंभ, ते – column, -s | ते स्वरूप, ती स्वरूपे / पं nature, | लक्ष वेधणे to draw attention | अनधिकृत unofficial |
| तो पदभार, ते – charge, -s | ते आवेदन, ती आवेदने application, -s | कार्यमुक्त करणे to relieve | संबंधित concerned |
| | | रुजू होणे to join | सध्याचा present |
| | | खातरजमा करणे to make sure, to assure | तत्काळ immediately |
| | | | कार्यमुक्त relieved |
| | | | तातडीने urgently |
| | | | विहित prescribed |

## २३ वर दिलेल्या आदेशातली ही वाक्ये पाहू या.

- बदली रद्द <u>करण्यासाठी</u> कुठल्याही स्वरूपाची आवेदने सादर केल्यास ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील.
- आयुक्त (शिक्षण) यांनी सदर अधिकाऱ्यांना त्यांच्या सध्याच्या पदभारातून कार्यमुक्त <u>करण्याबाबत</u> संबंधित अधिकाऱ्यांना कळवावे.

कर + ण्या साठी (for) कर + ण्या बाबत (about)

धातू + ण्या शब्दयोगी पद

धातू + ण्या -साठी / -बाबत याप्रमाणे करिता (for) / -संबंधी (about) / -ऐवजी (instead) / -मुळे (because) / -पूर्वी, -आधी (before) / -शिवाय (without) ही शब्दयोगी पदे जोडूनही क्रियापदाची रूपे तयार होतात. उदा॰ करण्यासंबंधी... करण्यापूर्वी...

**२४ 'अ' आणि 'क' या गटांमध्ये एका वाक्याचे दोन भाग आहेत. ब गटातले क्रियापदाचे योग्य रूप जोडून वाक्ये तयार करू या.**

| उदा. | अ | ब | क |
|---|---|---|---|
| | नोकरी | करण्याऐवजी | तिने व्यवसाय करायचे ठरवले. |
| | नोकरी करण्याऐवजी तिने व्यवसाय करायचे ठरवले. | | |

| अ | ब | क |
|---|---|---|
| क. देशपांडे बदली | संपण्यापूर्वी | साहेबांशी बोलणार आहेत. |
| ख. लाडक्या अभिनेत्याला | ओढण्यामुळे | लोकांनी गर्दी केली होती. |
| ग. पारपत्राची मुदत | पाहण्यासाठी | वाढवून घेतली पाहिजे. |
| घ. शिक्षण | करण्याबाबत | त्याच्याकडे दुसरा उपाय नव्हता. |
| च. सिगारेट | सोडण्याशिवाय | कॅन्सर होऊ शकतो. |

**२५ ह्या काही शब्दांच्या जोड्या आहेत. त्यांच्या अर्थातला फरक समजून घेऊन रिकाम्या जागा भरू या.**

क. नियम – अधिनियम (rule – act)
वाहनचालकांनी ----------- पाळले नाहीत तर त्यांना मोठा दंड होणार आहे. ----------- २०१० मधील तरतुदीप्रमाणे त्यांना बढती मिळाली.

ख. बदल – बदली (changes – transfer)
निवृत्तीच्या वर्षी त्यांची ----------- दिल्लीला झाली. आता कर्मचाऱ्यांच्या वृत्तीतच ----------- झाला आहे.

ग. पूर्वी – पूर्व (earlier – prior)
----------- प्रत्येक कार्यालयात टाईपरायटर असायचे. गावातला दवाखाना हलवण्याच्या निर्णयाला समितीची ----------- मान्यता मिळाली होती.

घ. पदस्थापना – पदोन्नती (posting – promotion)
या ठिकाणी रोहितची ----------- होईल असे वाटले नव्हते. आता त्याच्या नोकरीची फक्त तीन वर्षं राहिली. आता तरी त्याला ----------- मिळाली पाहिजे.

च. आवेदन – निवेदन (application – statement)
भटक्या कुत्र्यांबाबत उपाययोजना करावी ह्या मागणीसाठी रहिवाशांनी ----------- दिले. पुढच्या महिन्यात रजेसाठी कोणीही ----------- देऊ नये.

छ. सदर – सादर (this – submit)
----------- बैठकीचा अहवाल कार्यवाहांनी दोन दिवसात ----------- करावा.

## २६ आशयाधारित प्रश्न. योग्य पर्यायावर ✓ अशी खूण करू या.

क. शासनाने कोणता आदेश दिला आहे?
१. शासनाने काही अधिकाऱ्यांच्या बदल्या रद्द करण्याचा आदेश दिला आहे.
२. शासनाने काही अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याचा आदेश दिला आहे.
३. शासनाने काही अधिकाऱ्यांच्या बदल्यांमध्ये अंशतः बदल करण्याचा आदेश दिला आहे.

ख. बदली झालेल्या अधिकाऱ्यांच्या नोकरीला किती वर्षे पूर्ण झाली आहेत?
१. बदली झालेल्या अधिकाऱ्यांच्या नोकरीला तीन वर्षे पूर्ण झाली आहेत.
२. बदली झालेल्या अधिकाऱ्यांच्या नोकरीला पाच वर्षे पूर्ण झाली आहेत.
३. बदली झालेल्या अधिकाऱ्यांच्या नोकरीला दोन वर्षे पूर्ण झाली आहेत.

ग. श्रीमती अबक आधी कोण होत्या?
१. श्रीमती अबक आधी जिल्हाधिकारी होत्या.
२. श्रीमती अबक आधी प्राथमिकच्या शिक्षणाधिकारी होत्या.
३. श्रीमती अबक आधी प्राथमिक शाळेतल्या शिक्षिका होत्या.

घ. श्रीमती अबक यांना आता कोणते पद मिळाले आहे?
१. श्रीमती अबक यांना आता मुख्याध्यापिकेचे पद मिळाले आहे.
२. श्रीमती अबक यांना आता माध्यमिक शिक्षिकेचे पद मिळाले आहे.
३. श्रीमती अबक यांना आता संचालक, जवाहर बालभवन हे पद मिळाले आहे.

च. बदली रद्द करण्यासाठी केलेल्या अर्जाचा परिणाम काय होईल?
१. बदली रद्द होईल.
२. शिस्तभंगाची कारवाई होईल.
३. नोकरीवरून काढून टाकण्यात येईल.

छ. श्रीमती अबक यांना कार्यमुक्त करायची जबाबदारी कोणाची आहे?
१. श्रीमती अबक यांना कार्यमुक्त करायची जबाबदारी शिक्षणाधिकाऱ्यांची आहे.
२. श्रीमती अबक यांना कार्यमुक्त करायची जबाबदारी नियंत्रण अधिकाऱ्यांची आहे.
३. श्रीमती अबक यांना कार्यमुक्त करायची जबाबदारी आयुक्त (शिक्षण), पुणे यांची आहे.

## २७ उतारा वाचू या.

भारताच्या संविधानाच्या ३०९ क्रमांकाच्या अनुच्छेदात नागरी वर्तणुकीचे नियम दिले आहेत. त्यात महिलांशी कशा प्रकारचे वर्तन करू नये हेही सांगितले आहे. त्यातले काही नियम असे आहेत. महिलांशी असभ्यपणे वागू नये, त्यांची छेड काढू नये,. त्यांचा अपमान किंवा विनयभंग करू नये, त्यांना धमक्या देऊ नयेत. इतकेच नव्हे तर नोकरी देण्याची आश्वासनेही विनाकारण देऊ नयेत.

**आदेश क्र. २ मध्येही या प्रकारची वाक्यरचना आहे ती पाहू या.**

उदा० सदर अधिकाऱ्यांनी अनधिकृत रजेवर जाऊ नये.

| |
|---|
| जा + ऊ नये.<br>धातू + ऊ नये - एकवचन<br>धातू + ऊ नयेत - अनेकवचन |

## २८ सराव

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| उशिरा येणे : कर्मचाऱ्यांनी कार्यालयात उशिरा (ये) नये. | कर्मचाऱ्यांनी कार्यालयात उशिरा येऊ नये. |
| बेशिस्तपणे (वाग) | |
| मोबाईलवर (बोल) | |
| सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान (कर) | |
| झेंडावंदन (चुकव) | |

## २९ सराव

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| पायी चालणाऱ्यांनी डाव्या बाजूने चालावे. | पायी चालणाऱ्यांनी डाव्या बाजूने चालू नये. |
| अजयने साडेदहाच्या लोकलने यावे. | अजयने साडेदहाच्या लोकलने येऊ नये. |
| अमृताने आईला जावे. | अमृताने आईला जाऊ नये. |
| परिवहन मंडळाने या मार्गावर जास्त बस सुरू कराव्यात. | परिवहन मंडळाने या मार्गावर जास्त बस सुरू करू नयेत. |
| श्रीमंत लोकांनी लग्नात भरपूर पैसे खर्च करावेत. | श्रीमंत लोकांनी लग्नात भरपूर पैसे खर्च करू नयेत. |
| गावकऱ्यांनी गावात देऊळ बांधावे. | गावकऱ्यांनी गावात देऊळ बांधू नये. |

## ३० सराव.

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| त्याने क्रिकेटमधून निवृत्त होऊ नये. | त्याने क्रिकेटमधून निवृत्त व्हावे. |
| तू साहेबांना इ-मेल पाठवू नयेस. | तू साहेबांना इ-मेल पाठवावीस. |
| संजयने दोन बेडरूमचा फ्लॅट विकू नये. | संजयने दोन बेडरूमचा फ्लॅट विकावा. |
| वंदनाने घरात ए.सी. बसवू नये. | वंदनाने घरात ए.सी. बसवावा. |
| तुम्ही कुंडीत फळझाडं लावू नयेत. | तुम्ही कुंडीत फळझाडं लावावीत. |
| शेतकऱ्यांनी बँकांकडून कर्ज घेऊ नये. | शेतकऱ्यांनी बँकांकडून कर्ज घ्यावे. |

## ३१ अ आणि ब गटातल्या वाक्यांच्या जोड्या जुळवू या आणि अर्थपूर्ण वाक्ये तयार करू या.

| अ | ब |
|---|---|
| क. विद्यार्थ्यांनी राजकारणात | १. करू नयेस. |
| ख. नागरिकांनी रद्द झालेल्या नोटा | २. बोलू नये. |
| ग. प्रेक्षकांनी रस्त्यावर गाड्या | ३. पडू नये. |
| घ. तिने हेल्मेट घातल्याशिवाय | ४. वापरू नयेत. |
| च. कलाकारांनी बेजबाबदारपणे | ५. लावू नयेत. |
| छ. तू विमानतळावर पोचायला उशीर | ६. स्कूटर चालवू नये. |

## ३२ खाली दिलेले वाक्प्रयोग आपण वाचलेल्या दोन्ही आदेशांमध्ये आले आहेत. खालील पर्यायांमधून त्यांचा योग्य अर्थ निवडू या.

क. पदोन्नती नियमित करणे (to regularise promotion)
१. पदोन्नती नियमाला धरून असणे.
२. पदोन्नतीसाठी नियम तयार करणे.
३. आधी तात्पुरती किंवा तदर्थ असलेली पदोन्नती अधिकृतपणे कायदेशीर करणे.
४. स्थायी नोकरी मिळणे.

ख. निर्णयाच्या अधीन राहणे. (subject to)
१. निर्णय वरिष्ठांच्या विचाराधीन असणे.
२. निर्णयाची अंमलबजावणी करणे.

३. निर्णयासाठी दुसऱ्यावर अवलंबून असणे.
४. निर्णयावर पुढील कार्यवाही अवलंबून असणे.

ग. निर्णय प्रलंबित असणे. (to be pending)
१. निर्णय घेता न येणे.
२. निर्णय हेतुपूर्वक उशिरा देणे.
३. निर्णय झालेला नसणे.
४. निर्णय अनेक गोष्टींवर अवलंबून असणे.

घ. पदस्थापना देणे. (to give posting)
१. नोकरीतल्या एखाद्या पदाचा भार स्वीकारण्यासाठी पाठवणे.
२. पदे भरणे.
३. महत्त्वाचे पद मिळणे.
४. पद निर्माण करणे.

off duty – कामावर नसणे
on duty – कामावर असणे / कर्तव्यार्थ
through proper channel – योग्य मार्गाने
short notice – अल्पकालीन सूचना

च. कार्यमुक्त करणे. (to relieve)
१. काम काढून घेणे.
२. काम संपवणे.
३. दडपणाशिवाय (without any pressure) काम करणे.
४. एखाद्याला नवीन नोकरीत रुजू होण्यापूर्वी वरिष्ठांनी आधीच्या कार्यालयातली नोकरी संपल्याचे पत्र देणे.

छ. खातरजमा करणे (to make sure)
१. रक्कम जमा करणे.
२. पाहुणचार करणे.
३. खात्री करून घेणे.
४. खात्रीपूर्वक सांगणे.

## ३३ दृक्श्राव्य फीत पाहू या आणि खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊ या.




## ३४ योग्य पर्याय निवडू या.

क. समीर फोनवर कोणाशी बोलत आहे?
 १. मित्राशी.
 २. बॉसशी.
 ३. आईशी.

ख. समीरला काय हवे आहे?
 १. पूर्ण दिवसाची रजा.
 २. हाफ डे.
 ३. आठ दिवसांची सुट्टी.

## ३५ चूक की बरोबर?

क. समीरला रजा हवी आहे कारण त्याला घरी काम आहे.
ख. समीरची बॉस त्याला फाईल पूर्ण न केल्याबद्दल रागावते.

## ३६ चित्र व वाक्प्रचार पाहू या व वर्गात चर्चा करू या.



कामात काम निघणे

कामाचा फडशा पाडणे

काम हातावेगळं करणे

# ५ एक दिवस कर्मचाऱ्याचा

## (प्रसिद्धिपत्रक)







## नियोजन

**चला, शिकू या :**

- प्रसिद्धिपत्रक वाचणे व समजणे
- धातूला 'णारा' प्रत्यय जोडून तयार होणारे व्यवसायवाचक शब्द आणि विशेषणे वापरता येणे
- दोन उपवाक्यांमधील 'हा' आणि त्याची रूपे वापरता येणे
- धातू + ण्या + त + 'ये' ची भूतकाळाची रूपे + आहे / आहेत ही रचना वापरता येणे
- धातू + ण्या + त येणार आहे / आहेत ही रचना वापरता येणे
- वेळ सांगण्यासाठी 'वाज'ची रूपे आणि काही अपूर्णांक वापरता येणे
- शब्दयोगी पदे (१) : '-विरुद्ध, -बाबत, -अंतर्गत, -तर्फे, -पोटी' वापरता येणे
- शब्दयोगी पदे (२) : '-मधून, -वरून, -कडून, -समोरून, -बाहेरून' वापरता येणे

## १ ओळखा पाहू मी कोण?



क. ..........................................



ख. ..........................................



ग. ..........................................



घ. ..........................................



च. ..........................................

## २ जोड्या जुळवू या.

| अ | ब |
|---|---|
| क. भाजी विकणारा | १. शिक्षिका |
| ख. देशासाठी लढणारा | २. भाजीवाला |
| ग. बागेची काळजी घेणारा | ३. सुतार |
| घ. विद्यार्थ्यांना शिकवणाऱ्या | ४. माळी |
| च. लाकडाच्या वस्तू तयार करणारा | ५. सैनिक |

## ३ तक्ता वाचू या. (Read the table.)

**धातू + णारा**

**कर + णारा**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| करणारा | करणारे |
| करणारी | करणाऱ्या |
| करणारे / रं | करणारी |

**सामान्यरूप : करणाऱ्या**

'धातू + णारा' ची रूपे एखाद्या व्यक्तीचा व्यवसाय सांगण्यासाठी वापरता येतात.

## ४ रिकाम्या जागेत व्यवसायवाचक शब्द भरू या.

**(गवळी, लोहार, गवंडी, घरकामगार)**

उदा. पैसे घेऊन केस कापणारा न्हावी

क. पैसे घेऊन घरकाम करणारी ------------------

ख. लोखंडाच्या वस्तू तयार करणारा ------------------

ग. दूध विकणारा ------------------

घ. दगड, विटा, सिमेंट घेऊन घर बांधणारा ------------------

## ५ रिकाम्या जागेत धातू + णारा ची रूपे वापरून खालील व्यवसाय करणाऱ्यांची कामे लिहू या.

| | | |
|---|---|---|
| उदा. | धनगर | शेळ्या, मेंढ्या सांभाळणारा |
| क. | डॉक्टर | रोग्यांना तपासून औषध ... (दे) |
| ख. | सुतार | लाकडाच्या वस्तू, फर्निचर तयार ... (कर) |
| ग. | चालक | पैसे घेऊन गाडी ... (चालव) |
| घ. | परिचारिका | रोग्यांची सेवा ... (कर) |

## ६ आणखी काही रोजच्या वापरातले व्यवसायवाचक शब्द आहेत ते पाहू या.

| | | | |
|---|---|---|---|
| शिल्पकार | sculptor | अभिनेता / अभिनेत्री | actor |
| चित्रकार | artist | वकील | lawyer |
| रंगारी | painter | व्यवस्थापक | manager |

## ७ काही व्यवसायांसाठी इंग्रजी शब्दच रूढ झालेले आहेत. तसेही काही शब्द पाहू या.

| | | | |
|---|---|---|---|
| प्लंबर | plumber | कॅशियर | cashier |
| इलेक्ट्रिशियन | electrician | फोटोग्राफर | photographer |
| पोलीस | police | | |

क्रियापदाच्या 'धातू + णारा' या रूपाचा विशेषण म्हणूनही वापर होतो.

## ८ जोड्या जुळवू या.

| अ | ब |
|---|---|
| क. गडगडणारे | १. देऊळ |
| ख. भुंकणारा | २. नाडकर्णीबाई |
| ग. हलणारी | ३. मुलगी |
| घ. जेवणाच्या ऑर्डर्स घेणाऱ्या | ४. पाने |
| च. दिसणारे | ५. ढग |
| छ. गजरे विकणारी | ६. कुत्रा |

## ९ हे प्रसिद्धिपत्रक वाचू या.

बेस्ट प्रसिद्धिपत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
कृपया, प्रसिद्धीकरिता सादर

संपादक / वृत्तसंपादक
(हनुमंत गोफणे)
जनता संपर्क अधिकारी
बेस्ट उपक्रम
दूरध्वनी क्र. २२७९९३९५

प्रसिद्धिपत्रक क्र. ६
दिनांक – १३-०६-२०१८

**विना तिकीट प्रवास टाळाः प्रवाशांना आवाहन**

मुंबई, १३ बेस्ट बसगाड्यांमधून विना तिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांविरुद्ध तसेच खरेदी केलेल्या तिकिटाने प्रमाणित केलेल्या अंतरापेक्षा जास्त प्रवास करणाऱ्या प्रवाशांविरुद्ध उघडण्यात आलेल्या विशेष मोहिमे अंतर्गत जानेवारी, २०१८ ते एप्रिल, २०१८ या चार महिन्यात एकूण १०,९७१ प्रवासी आढळले असून त्यांच्याकडून रु. ९.९६,६११ एवढी रक्कम दंडापोटी वसूल करण्यात आली आहे.

विना तिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी प्रवास भाडे अधिक देय प्रवासी भाडे रकमेच्या दहापट भरणा करण्याचे नाकारल्यास, मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ४६०(ह) अन्वये एक महिना पोलीस कोठडी किंवा रु. २००/- पर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा एकत्रितपणे देण्याची तरतूद आहे.

वस्तुतः बसमधून प्रवास करताना योग्य तिकीट खरेदी करणे हे प्रत्येकाला बंधनकारक असून विना तिकीट प्रवास करणे हा सामाजिक गुन्हादेखील आहे. तेव्हा सर्व बसप्रवाशांनी आपले आर्थिक नुकसान आणि मानहानी टाळण्यासाठी योग्य तिकीट अथवा वैध बसपास घेऊन, तिकीट व बसपासवर प्रमाणित केल्याप्रमाणे प्रवास करावा, असे आवाहन बेस्ट उपक्रमातर्फे करण्यात आले आहे.

**शब्दार्थ :**

| नामे | नामे | क्रियापदे | इतर शब्द |
|---|---|---|---|
| ते प्रसिद्धिपत्रक,<br>ती प्रसिद्धिपत्रके / कं<br>press note, -s | तो गुन्हा, ते गुन्हे<br>crime, -s | प्रवास करणे<br>to travel | विनातिकीट<br>without ticket |
| प्रसिद्धी, –<br>publicity | ते नुकसान, –<br>loss, -es | प्रमाणित करणे<br>to certify | प्रमाणित<br>certified |
| तो प्रवास, ते –<br>travel, -s | ती मानहानी, –<br>insult, -s | मोहीम उघडणे<br>to start a campaign | विशेष<br>special |

| | | | |
|---|---|---|---|
| तो प्रवासी, ते –<br>traveller, -s | तो बसपास, ते –<br>buspass, -es | आढळणे<br>to be seen | अंतर्गत<br>included |
| ते आवाहन,<br>ती आवाहने / नं<br>appeal, -s | तो उपक्रम, ते –<br>undertaking, -s | वसूल करणे<br>to collect,<br>to recover | देय<br>payable |
| ते तिकीट,<br>ती तिकिटे / टं<br>ticket, -s | | भरणा करणे<br>to make payment | दहापट<br>ten times |
| ती बसगाडी,<br>त्या बसगाड्या<br>bus, -es | | नाकारणे<br>to refuse | अन्वये<br>according to |
| ते अंतर, ती अंतरे / रं<br>distance, -s | | तरतूद असणे<br>to have provision | एकत्रितपणे<br>collectively |
| ती मोहीम, त्या<br>मोहिमा<br>campaign, -s | | टाळणे<br>to avoid | दोन्ही<br>both |
| ती रक्कम, त्या रकमा<br>amount, -s | | आवाहन करणे<br>to make an appeal | वस्तुतः<br>in fact |
| तो दंड, ते दंड<br>fine, -s | | | योग्य<br>proper |
| ते भाडे / डं, ती भाडी<br>fare, -s | | | सामाजिक<br>social |
| तो भरणा, ते भरणे<br>payment, -s | | | वैध<br>legal |
| ती कोठडी,<br>त्या कोठड्या<br>custody, -s | | | अथवा<br>or |
| ते कलम,<br>ती कलमे / मं<br>section, -s | | | |
| ती शिक्षा, त्या-<br>punishment, -s | | | |

## १० रिकाम्या जागेत कंसातल्या धातूचे योग्य रूप भरू या.

उदा. मुख्याध्यापकांनी चांगलं (बोल) मुलं स्पर्धेसाठी निवडली.
मुख्याध्यापकांनी चांगलं बोलणारी मुलं स्पर्धेसाठी निवडली.

क. मुग्धाने चिंटूसाठी उड्या (मार) ---------- माकड घेतलं.

ख. चौकात घोषणा (दे) ---------- माणसाला पोलिसांनी पकडले.

ग. आमच्याकडे पेपर (टाक) ---------- मुलगा कॉलेजमध्ये शिकतो.

घ. ग्रंथालयात पुस्तकं शेल्फवर (लाव) ---------- मुलगी आजारी आहे.

च. आजकाल मोठ्या शहरांमध्ये रिक्षा (चालव) ---------- मुलीही दिसतात.

## ११ तक्ता वाचू या.

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| जो | जे |
| जी | ज्या |
| जे | जी |

**सामान्यरूप – ज्या**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| तो | ते |
| ती | त्या |
| ते | ती |

**सामान्यरूप – त्या**

## १२ पुढे दिलेल्या वाक्यांमध्ये 'धातू + णारा' ऐवजी जो...तो ची रूपे वापरून वाक्ये पुन्हा लिहू या.

उदा. ट्रेनमध्ये वडा-पाव विकणारा माणूस.
ट्रेनमध्ये जो वडा-पाव विकतो तो माणूस.

क. आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणारे तरुण.

ख. नदीवर पाणी भरणाऱ्या बायका.

ग. घरात शिरून दूध पिणारं / रे मांजर.

घ. विना तिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांविरुद्ध.

च. बसमध्ये वाहकाचे काम करणारी मुलगी.

छ. मैदानावर क्रिकेट खेळणारी मुलं / ले.

## १३ वाचू या.



राजू : सर, कामसू म्हणजे काय?
शिक्षक : कामसू म्हणजे सतत काम करणारा. जो सतत काम करतो तो कामसू.
राजू : अच्छा. आणि जो काम करत नाही तो?
शिक्षक : जो काम करत नाही तो कामचुकार!

## १४ आता खालील वाक्ये पाहू या.

क. बसने किंवा ट्रेनने जाताना तिकीट काढणे हे प्रवाशांचे कर्तव्य आहे.

ख. विनातिकीट प्रवास करणे हा सामाजिक गुन्हा आहे.

ग. सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

## १५ तक्ता वाचू या.

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| हा | हे |
| ही | ह्या |
| हे | ही |

## १६ रिकाम्या जागेत 'हा' चे योग्य रूप भरू या.

उदा. आयकर न भरणे ----------- गुन्हा आहे.
आयकर न भरणे हा गुन्हा आहे.

क. पंढरपूरचा विठोबा ----------- महाराष्ट्राचे दैवत (deity) आहे.

ख. ताजमहाल, कुतुबमिनार ----------- वास्तुकलेचे सर्वोत्कृष्ट नमुने (examples of best architecture) आहेत.

ग. पुणेरी पाट्या ----------- पुण्याचे वैशिष्ट्य (characteristic) आहे.

घ. चांद्रयान २ ----------- भारतीयांसाठी अभिमानाची गोष्ट आहे.

च. गिटार वाजवणे ----------- सुनीलचा छंद आहे.

## १७ पूर्ण वर्तमानकाळ (Present Perfect)

**धातू + ण्या + त + 'ये' ची भूतकाळाची रूपे + आहे / आहेत**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| तृ.पु. | आदेश काढण्यात आला आहे / नाही आहे. | आदेश काढण्यात आले आहेत / नाही आहेत. |
| | अधिसूचना आली आहे / नाही आहे. | अधिसूचना काढण्यात आल्या आहेत / नाही आहेत. |
| | परिपत्रक काढण्यात आलं / ले आहे / नाही आहे. | परिपत्रकं / परिपत्रके आली आहेत / नाही आहेत. |

## १८ खाली दिलेली वर्तमानकाळातली वाक्ये पूर्ण वर्तमानकाळात बदलू या.

उदा॰ प्रवाशांकडून दंडापोटी रक्कम वसूल करण्यात येते.
प्रवाशांकडून दंडापोटी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

क. तीन वर्षांनी प्रवासभाड्यात बदल करण्यात येतो.

ख. जिल्हाधिकाऱ्यांकडून रात्री ध्वनिक्षेपक लावण्याची परवानगी देण्यात येते.

ग. विद्यापीठाकडून वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात येतात.

घ. बेस्टकडून सौजन्य सप्ताह साजरा करण्यात येतो.

च. ह्या मैदानावर हातमागाचे प्रदर्शन भरवण्यात येते.

## १९ आशयाधारित प्रश्न.

१. या प्रसिद्धिपत्रकातून कोणाला आवाहन केले आहे?
क. बसप्रवास करणाऱ्यांना.
ख. बसवर दगडफेक करणाऱ्यांना.
ग. तिकीट काढल्याशिवाय प्रवास करणाऱ्यांना.
घ. मोटारीने प्रवास करणाऱ्यांना.

२. प्रसिद्धिपत्रकात दिलेली रक्कम कशी जमली?
क. राज्यशासनाने दिलेल्या अनुदानातून.
ख. प्रवाशांकडून घेतलेल्या दंडातून.
ग. कार्यक्रम आयोजित करून.
घ. तिकिटांच्या रकमेतून.

३. देय प्रवासी भाडे म्हणजे
क. दिलेले भाडे.
ख. ठरलेले भाडे.
ग. दंडाची रक्कम.
घ. दानाची रक्कम.

४. प्रमाणित केलेले म्हणजे
क. ठरवून नक्की केलेले.
ख.पुरावा देऊन सिद्ध केलेले.
ग. प्रमाणभाषेत लिहिलेले.
घ. मोजलेले.

५. वैध म्हणजे
क. विधीपूर्वक केलेले.
ख. कायदेशीर.
ग. बेकायदेशीर.
घ. विधानसभेत मान्य झालेले.

This is to certify that – असे प्रमाणित करण्यात येत आहे की
This is to inform that – असे कळविण्यात येत आहे की
This is to report that – असे निवेदन आहे की
This is with reference to – च्या संदर्भात हे लिहिण्यात येत आहे की

## २० विजय आणि चित्रामधील संवाद ऐकू या.



## २१ वरील संभाषण ऐकून चूक की बरोबर लिहू या.

क. चित्राला शनिवारी सुट्टी असते.
ख. चित्रा शनिवारी एक वाजता ऑफिसमधून निघते.
ग. विजय नेहमी पाऊण वाजता घरी जातो.
घ. मागच्या शनिवारी विजय अडीचपर्यंत ऑफिसमध्ये होता.

## २२ वेळ सांगू या.

क



ख



ग



घ



१. ह्या घड्याळ्यात दीड वाजला आहे.

२. ह्या घड्याळ्यात सव्वा दोन वाजले आहेत.

३. ह्या घड्याळ्यात सव्वासहा वाजले आहेत.

४. ह्या घड्याळ्यात पावणे सात वाजले आहेत.

## २३ चर्चा करू या. तुमचे काम कसे असते?




९.०० - ऑफिसमध्ये पोचणे
९.०५ - चहा ब्रेक
१०.०० - मेल पाहणे
१०.३० - गप्पा मारणे
११.३० - इंटरनेट सर्फ करणे
१.०० - लंच टाईम
२.३० - ब्लॉग लिहिणे
३.०० - कॉफी ब्रेक
४.४५ - बॉसचे काम करणे
४.५० - बॉसला उद्या काम संपवतो असे सांगणे
५.०० - घरी जाणे



### पण खरं तर...

९.०० - ऑफिसमध्ये पोचणे
९.०५ - कामाची यादी पाहणे
१०.०० - काम सुरू करणे.
१०.३० - कम्प्युटरवर काम करणे
११.३० - फायली नीट तपासणे
१.०० - लंच टाईम
२.३० - महत्त्वाचा पत्रव्यवहार वाचणे
३.०० - मीटिंग घेणे
४.४५ - लोकांना कामाच्या संदर्भात भेटणे
४.५० - मेल पाठवणे
५.०० - कनिष्ठांचे काम तपासणे
६.०० / ७.०० - घरी जाणे

## २४ संभाषण वाचू या आणि प्रश्नांची उत्तरे देऊ या.

वीणा : तू सकाळी किती नंबरच्या बसने ऑफिसला येतेस?
पूर्वा : ६५ नंबरच्या.
वीणा : ती वेळेवर येते का?
पूर्वा : हो. मी नऊची बस घेते.
वीणा : मग घरून किती वाजता निघतेस?
पूर्वा : पावणे नऊ वाजता. मी बरोबर नऊ वाजायला पाच मिनिटं कमी असताना पोचते.
वीणा : आणि नऊ वाजताची बस चुकली तर?
पूर्वा : होतं असं कधीतरी. पण ही बस दर पंधरा मिनिटांनी असते. त्यामुळे सव्वानऊची बस मिळतेच.
वीणा : मग ऑफिसला साडेदहा वाजेपर्यंत पोचतेस ना?
पूर्वा : हो तर! मी दहा वाजून वीस मिनिटांनीच पोचते.
वीणा : मग ठीक आहे. चल. साडेपाच वाजले आहेत. माझी बस येईलच इतक्यात.
पूर्वा : हो ना! माझीसुद्धा बस येईल पावणेसहाला.



## २५ उत्तरे देऊ या.

क. पूर्वा नऊच्या बसने कुठे जाते?
ख. तिला घरून बसस्टॉपपर्यंत पोचायला किती वेळ लागतो?
ग. सव्वानऊनंतर ६५ नंबरची बस किती वाजता येते?
घ. पूर्वा ऑफिसला केव्हा पोचते?
च. वीणाची बस संध्याकाळी किती वाजता असते?

## २६ अधोरेखित शब्दांऐवजी त्याखाली दिलेले शब्द वापरून वाक्ये तयार करू या.

उदा० १२.३० - आता साडेबारा वाजले आहेत.

क. दीड (१.३०) - ------------------------------------.
ख. दोन (२) - ------------------------------------.
ग. सव्वा (१.१५) - ------------------------------------.
घ. पाऊण (१२.४५) - ------------------------------------.
च. अडीच (२.३०) - ------------------------------------.
छ. एक (१) - ------------------------------------.
ज. पावणेतीन (२.४५) - ------------------------------------.
झ. सव्वा चार (४.१५) - ------------------------------------.
ट. साडे पाच (५.३०) - ------------------------------------.

## २७ अ आणि क गटात एका वाक्याचे दोन भाग आहेत. ब गटातला योग्य शब्द निवडून वाक्ये पूर्ण करू या.

| अ | ब | क |
|---|---|---|
| उदा. भारतात आत्ता सकाळचे आठ | वाजले | आहेत |

भारतात आत्ता सकाळचे आठ वाजले आहेत.

| अ | ब | क |
|---|---|---|
| क. माझ्या घड्याळात साडेचार | वाजला | सात मिनिटं कमी आहेत. |
| ख. लखनऊला जाणारी ट्रेन तीन | वाजल्यानंतर | दहा मिनिटांनी सुटेल. |
| ग. वरुण सकाळी दहा | वाजता | उठत नाही. |
| घ. तुम्ही साडेसात | वाजून | मला फोन करा. |
| च. विविधभारतीचे कार्यक्रम रात्री साडेअकरा | वाजायला | संपतात. |
| छ. आत्ता रात्रीचा दीड | वाजल्याशिवाय | आहे. |

## २८ धातू+ण्या+त येणार आहे

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| शासनाकडून | आदेश काढण्यात येणार आहे / नाही आहे. | आदेश काढण्यात येणार आहेत / नाही आहेत. |
| | अधिसूचना काढण्यात येणार आहे / नाही आहे. | अधिसूचना काढण्यात येणार आहेत / नाही आहेत. |
| | परिपत्रक काढण्यात येणार आहे / नाही आहे. | परिपत्रकं / परिपत्रके काढण्यात येणार आहेत / नाही आहेत. |

## २९ खाली दिलेल्या वाक्यांमध्ये 'येणार आहे / आहेत' वापरू या.

उदा. मासिक बसपाससाठी २२ दिवसांचे प्रवासभाडे घेण्यात येते.
मासिक बसपाससाठी २२ दिवसांचे प्रवासभाडे घेण्यात येणार आहे.

क. कंपन्यांसाठी मॅजिक बसपास देण्यात येतात.

ख. शासनातर्फे प्रत्येक गावात वाचनालय सुरू करण्यात येते.

ग. पंढरपूरच्या यात्रेसाठी जादा एस.टी बस सोडण्यात येतात.

घ. ए.सी. बसपाससाठी १००/- रुपये जास्त लावण्यात येतात.

च. शिक्षकांकडून 'काम बंद' आंदोलन करण्यात येतं.

## ३० प्रसिद्धिपत्रक वाचू या.

बेस्ट प्रसिद्धिपत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम

कृपया प्रसिद्धिकरिता सादर
संपादक / वृत्तसंपादक

(हनुमंत गोफणे)
जनता संपर्क अधिकारी
बेस्ट उपक्रम
दूरध्वनी क्र. २२७९९३९५

प्रसिद्धी पत्रक क्र. १
दिनांक – ११-०४-२०१८

**बसप्रवास भाड्याचे पुनरीक्षण**

मुंबई, ११ गुरुवार, दिनांक १२ एप्रिल, २०१८ पासून बेस्ट उपक्रमाच्या प्रवासी बसभाड्याचे पुनरीक्षण अंमलात येत आहे. बेस्ट उपक्रमाच्या सर्वसाधारण बससेवा, मर्यादित बससेवा, जलद बससेवा यावरील ४ कि.मी. पेक्षा जास्त अंतराच्या प्रवासाकरिता प्रवासभाड्यात वाढ करण्यात आलेली आहे. तसेच वातानुकूलित बससेवांवरील संपूर्ण प्रवासभाड्याचे पुनरीक्षण करण्यात आलेले आहे. दिनांक १२ एप्रिल, २०१८ पासून आकारण्यात येणाऱ्या सुधारित प्रवासभाडे सारणीचा तक्ता जोडपत्र अ द्वारे प्रदर्शित करण्यात आलेला आहे.

प्रवासभाड्यांमधील बदलाबाबतची अद्ययावत माहिती पुढीलप्रमाणे आहे.

- भाडे टप्प्यांमध्ये बदल नाही – नवीन प्रवासभाड्यामध्ये विद्यमान भाडेटप्प्यांमध्ये कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत.
- मॅजिक व ठरावीक अंतराच्या मासिक व त्रैमासिक बसपासकरिता विद्यमान पद्धतीप्रमाणेच अनुक्रमे २२ व ६६ दिवसांचे सरासरी प्रवासभाडे आकारण्यात येणार आहे.
- पथकर नाक्यावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून (बसपासधारक) सर्वसाधारण आणि मर्यादित बससेवांवर रु. ५०/- व वातानुकूलित बससेवांवर रु. १००/- प्रतिमहिना अतिरिक्त आकारण्यात येतील.
- ज्येष्ठ नागरिकांकरिता ५०% सवलतीच्या प्रस्तावित योजनेची अंमलबजावणी सुरू होईपर्यंत विद्यमान पद्धतीप्रमाणे वातानुकूलित बससेवा वगळून अन्य सर्व प्रकारच्या मासिक बसपासमध्ये रु ५०/- आणि त्रैमासिक बसपासमध्ये रु. २००/- सवलत देण्यात येईल.

**विद्यार्थी बसपास मूल्य (रुपये) –**

| बसपास | मासिक | त्रैमासिक | सहामाही |
|---|---|---|---|
| इयत्ता ५ वी पर्यंत | २०० | ६०० | १००० |

| | | | |
|---|---|---|---|
| इयत्ता ६ वी ते १० वी पर्यंत | २५० | ७५० | १२५० |
| इयत्ता ११ वी, १२ वी, पदविका अभ्यासक्रम | ३५० | १०५० | १७५० |

विशेष शालेय बसफेऱ्या बसपास मूल्य (रुपये) – (फक्त सहामाही बसपास उपलब्ध)

| बृहन्मुंबई महापालिका शाळा | | खाजगी शाळा | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० कि॰मी॰पर्यंत | १० कि॰मी॰पेक्षा जास्त | महापालिका हद्दीत | | महापालिका हद्दीबाहेर | |
| १८०० | २८०० | १० कि॰मी॰ पर्यंत | १० कि॰मी॰ पेक्षा जास्त | १० कि॰मी॰ पर्यंत | १० कि॰मी॰ पेक्षा जास्त |
| | | २००० | ३४०० | ४००० | ५००० |

- कॉर्पोरेट बसपास (कंपन्यांकरिता) – या योजनेअंतर्गत विद्यमान पद्धतीनुसार सर्व प्रकारच्या बससेवांवर उपलब्ध असलेले 'ठरावीक अंतराचे बसपास' तसेच 'मॅजिक बसपास' कंपन्यांकरिता उपलब्ध करण्यात येतील.
- मोफत व सवलतीच्या प्रवासाची सुविधा – सद्यःस्थितीत उपक्रमाच्या बससेवांवर काही घटकांना मोफत बसप्रवास तसेच काही घटकांना सवलतीच्या बसप्रवासाची सुविधा देण्यात येत असून प्रस्तावित बदलासह त्याचा तपशील पुढीलप्रमाणे राहील.

अ) स्वातंत्र्य सैनिकांना विद्यमान पद्धतीप्रमाणे मोफत प्रवासाची सुविधा कायम राहील.

ब) ४०% व त्यापेक्षा अधिक दिव्यांग व्यक्तींना विद्यमान पद्धतीप्रमाणे मोफत प्रवासाची सुविधा कायम राहील.

क) महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना देखील निवासस्थान आणि विद्यालय दरम्यान मोफत प्रवासाची सुविधा कायम राहील.

- आनंदयात्री बसपास योजना रद्दः- सकाळी ११.०० ते सायंकाळी १७.०० दरम्यान दैनंदिन बसपासमध्ये उपलब्ध केलेली ५०% सवलतीची आनंदयात्री योजना रद्द करण्यात येत आहे.

सर्व प्रवाशांनी प्रवासभाड्यामधील वाढ पुनरीक्षणामुळे झालेल्या बदलांची, बसपास पुनर्मूल्यांकनाची नोंद घेऊन बेस्ट उपक्रमाच्या सार्वजनिक परिवहन सेवेचा लाभ घ्यावा.

**शब्दार्थ :**

| नामे | क्रियापदे | इतर शब्द |
|---|---|---|
| ते पुनरीक्षण, ती पुनरीक्षणे / णं<br>revision, -s | अंमलात येणे<br>to be implemented | मर्यादित<br>limited |
| ती सारणी, त्या सारण्या<br>annexure, -s | वाढ करणे<br>to increase | जलद<br>fast |

| | | |
|---|---|---|
| तो तक्ता, ते तक्ते<br>chart, -s | पुनरीक्षण करणे<br>to revise | वातानुकूलित<br>air conditioned |
| ते जोडपत्र, ती जोडपत्रे / त्रं<br>annexure, -s | प्रदर्शित करणे<br>to show, to display | सुधारित<br>modified |
| ते निवासस्थान,<br>ती निवासस्थाने / नं<br>residence, -s | बदल करणे<br>to change | अद्ययावत<br>up to date |
| तो टप्पा, ते टप्पे<br>stage, -s | आकारणे<br>to charge | विद्यमान<br>existing / present |
| ते उपनगर, ती उपनगरे / रं<br>suburb, -s | सुरू होणे<br>to start | ठरावीक<br>fixed |
| तो नाका, ते नाके<br>post, -s | वगळणे<br>to exclude | मासिक<br>monthly |
| ती सवलत, त्या सवलती<br>concession, -s | सवलत देणे<br>to give concession | त्रैमासिक<br>quarterly |
| ते पुनर्मूल्यांकन,<br>ती पुनर्मूल्यांकने / नं<br>revaluation, -s | रद्द करणे<br>to cancel | प्रति<br>to |
| ती फेरी, त्या फेऱ्या<br>round, -s | नोंद घेणे<br>to note | अतिरिक्त<br>additional |
| ती सुविधा, त्या –<br>facility, -ies | लाभ घेणे<br>to take an advantage | ज्येष्ठ<br>senior |
| तो तपशील, ते –<br>detail, -s | | प्रस्तावित<br>proposed |
| तो सैनिक, ते –<br>soldier, -s | | सहामाही<br>six monthly |
| | | मोफत<br>free |
| | | सार्वजनिक<br>public |

## ३१ सराव.

शिक्षक : उद्याच्या कार्यक्रमात काय काय करण्यात येणार आहे? विद्यार्थ्यांकडून गाणी सादर करण्यात येणार आहेत.

सर्व विद्यार्थी : विद्यार्थ्यांकडून गाणी सादर करण्यात येणार आहेत.

विद्यार्थी १ : गाणी सादर करण्यात येणार आहेत?

विद्यार्थी २ : हो, शिवाय गाण्यांवर नृत्य करण्यात येणार आहे.

सर्व : गाण्यांवर नृत्यही करण्यात येणार आहे.

विद्यार्थिनी १ : नृत्य करण्यात येणार आहे?

विद्यार्थिनी २ : हो, शिवाय सतारही वाजवण्यात येणार आहे.

सर्व : सतारही वाजवण्यात येणार आहे.

विद्यार्थी ३ : सकाळी खेळांच्या स्पर्धा घेण्यात येणार आहेत.

सर्व : खेळांच्या स्पर्धा घेण्यात येणार आहेत.

विद्यार्थी ४ : खेळांच्या स्पर्धा घेण्यात येणार आहेत.
(वरीलप्रमाणे ही क्रियापदे वापरून सराव चालू ठेवणे. सरस्वती प्रार्थना म्हणणे, पाहुण्यांचे स्वागत करणे, पुष्पगुच्छ देणे, भाषण करणे, नाटक सादर करणे, पेढे वाटणे, फोटो काढणे इ...)

## ३२ वाक्ये नकारार्थी बनवू या.

उदा. शाळांकडून परीक्षा घेण्यात येणार आहेत.
शाळांकडून परीक्षा घेण्यात येणार नाही आहेत.

क. जीवनावश्यक वस्तूंची दुकाने उघडण्यात येणार आहेत.

ख. औषधविक्रेत्यांकडून औषधं घरी आणून देण्यात येणार आहेत.

ग. भाजी मार्केट रविवारी चालू ठेवण्यात येणार आहे.

घ. विद्यापीठ ऑनलाईन अभ्यासक्रम सुरू करणार आहे.

च. या उन्हाळ्यात वीजकपात करण्यात येणार आहे.

## ३३ खाली दिलेली वाक्ये धातू + ण्यात येणार आहे / आहेत ही रचना वापरून लिहू या.

उदा. केंद्र सरकारकडून महाराष्ट्राला मदतनिधी देण्यात आला आहे.
केंद्र सरकारकडून महाराष्ट्राला मदतनिधी देण्यात येणार आहे.

क. शासनाकडून खेळाडूंना सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत.

ख. महानगरपालिकेकडून रस्त्यावर झाडं लावण्यात आली आहेत.

ग. विद्यापीठाकडून परदेशी शिक्षणसंस्थांशी करार करण्यात आला आहे.

घ. साहित्य अकादमीकडून साहित्यिकांना पुरस्कार देण्यात आले आहेत.

च. आरोग्यमंत्र्यांकडून रुग्णालयीन सुविधांचे तपशील बातम्यांमध्ये सांगण्यात आले आहेत.

## ३४ पुढील उतारा वाचू या.

पर्यावरण विभागा<u>तर्फे</u> प्लास्टिकमुक्त महाराष्ट्र हे अभियान सुरू आहे. या चळवळी<u>अंतर्गत</u> थर्मोकोल व प्लास्टिक<u>पासून</u> तयार केलेल्या सर्व वस्तूंवर बंदी घालण्यात येणार आहे. पर्यावरण रक्षणा<u>बाबत</u> जनजागृतीही करण्यात येणार आहे. या नियमाच्या अंमलबजावणी<u>साठी</u> प्लास्टिक वापरणाऱ्यां<u>विरुद्ध</u> कडक कारवाई करण्यात येणार आहे. दंडा<u>पोटी</u> पंचवीस हजारां<u>पर्यंत</u> रक्कम वसूल करण्यात येणार आहे.

## ३५ उताऱ्यात अधोरेखित केलेल्या शब्दयोगी पदांपैकी योग्य पदे रिकाम्या जागेत भरू या.

**(-विरुद्ध against, -बाबत regarding, -अंतर्गत under, -तर्फे by, -पोटी for the sake of)**

क. जनधन योजने--------- गरीब माणसांना पैसे मिळतात.

ख. निकालाच्या भीती--------- सोहम रात्रभर जागा होता.

ग. शासना--------- दरवर्षी सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाला पुरस्कार देण्यात येतो.

घ. मोर्चातले लोक टोलवसुली--------- घोषणा देत होते.

च. पेट्रोलच्या दरवाढी--------- सगळीकडे चर्चा सुरू आहे.

## ३६ वाचू या.

**शब्दयोगी पद / प्रत्यय + ऊन (from)**

| | | | |
|---|---|---|---|
| आत / -त | आतून / -तून | मागे | मागून |
| वर | वरून | मध्ये | मधून |
| समोर | समोरून | खाली | खालून |
| बाहेर | बाहेरून | कडे | कडून |
| पुढे | पुढून | | |

## ३७ रिकाम्या जागेत योग्य शब्द भरा.

**(-खालून, -कडून, -मधून, -समोरून, -वरून)**

उदा. विद्यार्थी बसमागून पळत होते.

क. एटीएम्--------- पैसे काढताना काळजी घ्या.

ख. अतुल स्कूटर--------- पडला आणि त्याचा पाय मोडला.

ग. फायरब्रिगेडवाल्यांनी मातीच्या ढिगाऱ्या--------- माणसांना बाहेर काढलं.

घ. हा आदेश पर्यावरण विभागा--------- काढण्यात आला आहे.

च. ही बस विद्यापीठा--------- जाते.

## ३८ आशयाधारित प्रश्न.

क. पुनरीक्षण (revision) म्हणजे
१. पुनर्परीक्षण (re-reviewing)
२. पुनर्प्रक्षेपण (re-telecast)
३. पुनर्तपासणी करून केलेल्या सुधारणा / दुरुस्त्या. (modifications / corrections done after rechecking)
४. पुनर्वसन (rehabilitation)

ख. विद्यमान (present) म्हणजे
१. विद्यार्थ्यांचे
२. सध्याचे
३. विद्याशाखेशी संबंधित
४. सहकार्याने केलेले

प्राप्त करण्यात / मिळवण्यात यावे – may be obtained
ला परवानगी देण्यात यावी – may be permitted
फेटाळण्यात यावे – may be rejected

ग. पथकर (toll) म्हणजे
१. पथ्यकर (good for diet)
२. रस्ता
३. पदपथ
४. रस्त्यावरून ये-जा करताना वाहनांना भरावा लागणारा कर.

घ. प्रत्येक महिन्याला रु. १०० जादा कशासाठी भरावे लागणार आहेत?
१. पथकर नाक्यावरून बसने प्रवास करता यावा म्हणून.
२. पथकर नाक्यावरून वातानुकूलित बसने प्रवास करता यावा म्हणून.
३. ज्येष्ठ नागरीक म्हणून.
४. कंपनीत नोकरी आहे म्हणून.

च. त्रैमासिक बसपासमध्ये किती सवलत मिळणार आहे?
१. रु. २००
२. रु. ५०
३. रु. ६६
४. रु. ३५०

छ. कंपन्यांसाठी 'बेस्ट' कडून कोणती सवलत आहे?
१. ठरावीक अंतराचे व मॅजिक बसपास
२. ठरावीक अंतराचे बसपास
३. मॅजिक बसपास
४. सहामाही बसपास

ज. मोफत प्रवासाची योजना कोणाकोणासाठी आहे?
१. स्वातंत्र्य सैनिक, दिव्यांग व्यक्ती व विद्यार्थी
२. महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांसाठी
३. महिलांसाठी
४. लहान मुलांसाठी

झ. महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांचा 'बेस्ट' ने कसा विचार केला आहे?
१. निवासस्थान ते विद्यालय या अंतरात मोफत प्रवासाची सवलत देऊन.
२. शाळेत जाताना तिकीटभाडे न घेऊन.
३. घरी परत येताना तिकीटभाडे न घेऊन.
४. शहरात कुठेही फिरण्याची सवलत देऊन.

## ३९ वाचू या आणि ऐकू या.

सौ. मोरे : अरे देवा! वीज परत गेली. आज गुरुवार म्हणजे कामाचा बट्ट्याबोळ अगदी.
सौ. शेट्टी : काय गं नीलिमा, काय झालं?



सौ. मोरे : सारिका, हे बघ सगळा डेटा उडाला माझा. हे कम्प्युटरवर काम करायचं म्हणजे मला अगदी वैताग येतो बघ. आता पुन्हा सगळं टाईप करत बसा.
सौ. शेट्टी : नीलिमा, असं कसं म्हणतेस? या कम्प्युटरमुळे आपलं काम किती सोपं झालंय. किती वेळ वाचतो आपला.
सौ. मोरे : मला नाही बाई असं वाटत. त्यापेक्षा हाताने काम केलेलं बरं.
सौ. शेट्टी : नाही नीलिमा. तू कर्मचाऱ्यांसाठी घेतलेल्या त्या कम्प्युटरच्या कार्यशाळेला आली नाहीस ना, म्हणून तुला हे अवघड जातंय. उलट मला तर आता असं वाटतं कम्प्युटर आपला खरा मित्र आहे.
सौ. मोरे : खरं की काय? मग तुझ्या या खऱ्या मित्राला माझा डेटा शोधून द्यायला सांग की!
सौ. शेट्टी : डेटा कुठेही जात नाही. हे बघ, इथे बॅकअप मध्ये असतो तो. त्यामुळे वीज गेली तरी काही अडचण येत नाही. फक्त वेळोवेळी सेव्ह (सुरक्षित) मात्र करून ठेवायचा.
सौ. मोरे : खरंच की! इथेच तर आहे डेटा. ए, पुढच्या वेळी मला नक्की त्या कार्यशाळेला यायचंय बरं का!
सौ. शेट्टी : नक्की! आपण दोघी मिळून जाऊ.

## ४० ऐकू या व चूक की बरोबर ते लिहू या.

क. आज सोमवार असल्यामुळे वीज गेली आहे. ☐
ख. नीलिमाला कम्प्यूटरवर काम करणे आवडत नाही. ☐
ग. सारिका नीलिमाला कामात मदत करते. ☐
घ. फक्त नीलिमा कार्यशाळेला जाणार आहे. ☐

# ६ आज डब्यात काय?

## (जाहिरात)




### चला, शिकू या ...

- जाहिराती वाचून आशय समजून घेणे
- साधित शब्दांमधले मूळ शब्द ओळखणे
- काही समानार्थी शब्द सांगता येणे
- ई प्रत्ययान्त स्थानदर्शक शब्द तयार करणे
- जो - तो ही सर्वनामे व त्यांची रूपे ओळखता येणे
- नाम + क्रियापदांची माहिती करून घेणे
- धातू + आयला  मिळ ही वाक्यरचना वापरता येणे
- धातू + ल्या + स ही रचना करता येणे
- कर्ता + कडून ... धातूची भूतकाळाची रूपे + 'जा' ची रूपे ही वाक्यरचना
- कार्यालयीन वेळेतल्या जेवणाच्या सुट्टीतील कर्मचाऱ्यांचे संवाद समजणे
- सण आणि खाद्यपदार्थ यांच्याबद्दल चर्चा करता येणे

## १ वाचू या.

सुब्बु : अभिनंदन, राणे मॅडम! तुम्ही **आंतरराष्ट्रीय** बुद्धिबळ स्पर्धेसाठी जाताय ना?

राणे : होय, सुब्बु सर.

सुब्बु : वा, छान! तुमचा मुलगा सुद्धा बुद्धिबळ खेळतो ना?

राणे : हो. तोपण छान खेळतो. त्याचीपण उद्या **आंतरशालेय** स्पर्धा आहे.



## २ 'आंतरराष्ट्रीय' हा शब्द कसा तयार झाला ते पाहू या.

आंतर + राष्ट्र + ईय → आंतरराष्ट्रीय = राष्ट्राराष्ट्रांमध्ये

## ३ खाली दिलेले शब्द वापरून अशा प्रकारचे शब्द तयार करू या.

उदा॰ आंतर + देश + ईय = आंतरदेशीय

क. ---------- + जात + ईय = ----------

ख. ---------- + शाळा + ---------- = आंतरशालेय

ग. ---------- + विद्यापीठ + -------- = आंतरविद्यापीठीय

घ. आंतर + धर्म + ---------- = आंतरधर्मीय

च. ---------- + राज्य + ईय = ----------

महाविद्यालय
आंतर + महाविद्यालय + ईन = आंतरमहाविद्यालयीन

## ४ खाली दिलेल्या इंग्रजी शब्दांसाठी मराठी शब्द लिहू या.

उदा॰ International Tiger's day = व्याघ्र दिन

क. Independence day = ----------

ख. Republic day = ----------

ग. Teacher's day = ----------

घ. Women's day = ----------

च. Marathi day = ----------

## ५ खाली दिलेल्या तारखा आणि त्या दिवशी साजरे होणारे दिन वाक्यात वापरून उदाहरणाप्रमाणे वाक्ये तयार करू या.

उदा॰ ४ फेब्रुवारी हा दिवस जागतिक कर्करोग दिन म्हणून साजरा केला जातो.

| | |
|---|---|
| क. ५ जून | जागतिक पर्यावरण दिन |
| ख. २१ जून | जागतिक योग दिन |
| ग. ११ जुलै | जागतिक लोकसंख्या दिन |
| घ. २१ फेब्रुवारी | जागतिक मातृभाषा दिन |
| च. ७ एप्रिल | जागतिक आरोग्य दिन |

## ६ जाहिरात वाचू या.




**शब्दार्थ :**

| नामे | क्रियापदे | इतर शब्द |
|---|---|---|
| ते / तो प्रधानमंत्री, ते / त्या – prime minister, -s | लागवड करणे to cultivate | आंतरराष्ट्रीय international |
| तो / ती मुख्यमंत्री, ते / त्या – chief minister, -s | संगोपन करणे to bring up | सर्वोच्च highest |
| ते निसर्गचक्र nature of cycle | | कोटी crore |
| ते स्थान, ती स्थाने / नं place, -s | | वनेतर other than forest |
| तो अधिवास, ते – residence, -s | | |

| | | |
|---|---|---|
| तो वृक्ष, ते –<br>tree, -s | | |
| ती लागवड, त्या लागवडी<br>cultivation, -s | | |
| ते संगोपन<br>rearing | | |
| ते लक्ष्य, ती लक्ष्ये / लक्ष्यं<br>target, -s | | |

### ७ पुढील वाक्यांमधे काही शब्द अधोरेखित आहेत. वर पाहिलेल्या जाहिरातीत अधोरेखित शब्दांऐवजी त्या अर्थाचे कोणते शब्द वापरले आहेत ते चौकटीत लिहू या.

उदा॰ झाडे लावा. झाडे जगवा. [ वृक्ष ]

क. १९७३ पासून वाघ आपला राष्ट्रीय प्राणी आहे. [ ]

ख. शेताची राखण करण्यासाठी शेतकरी रात्रभर जागे राहतात. [ ]

ग. आम्ही गरम पाण्याचे झरे असलेले ठिकाण पाहायला गेलो. [ ]

घ. पूर्वी आदिवासींचा निवास रानात असे. [ ]

च. घराघरात गॅस हे शासनाचं उद्दिष्ट आहे. [ ]

छ. माणसासारखेच प्राणीही आपल्या पिल्लांना काळजीपूर्वक वाढवतात. [ ]

ज. बालपणीचे दिवस सुखाचे! [ ]

### ८ जाहिरातीतील हे वाक्य वाचू या.

निसर्गचक्राच्या सर्वोच्च स्थानी आहे वाघ!

| |
|---|
| स्थानी (स्थान + ई) = स्थानात / स्थानावर |

**आता अधोरेखित केलेल्या शब्दांच्या जागी 'ई' जोडलेले शब्द लिहू या.**

उदा॰ पुढच्या वर्षात काही नवीन योजना जाहीर होणार आहेत.
पुढच्या वर्षी काही नवीन योजना जाहीर होणार आहेत.

क. काळे सर आता घरात नाहीत.

ख. रिकाम्या जागेत शब्द भरा.

ग. मनात असे ते स्वप्नात दिसे.

घ. सकाळच्या प्रहरात व्यायाम करणे चांगले.

च. राजाने साधूच्या चरणांवर डोके ठेवले.

छ. पाय टाकूनी जळात बसला असला औदुंबर.

## ९ जोड्या जुळवू या.

| | |
|---|---|
| क. तू | १. आज प्रचारसभेला जाऊ या का? |
| ख. तुम्ही | २. एकटा दिल्लीला जातो. |
| ग. आपण | ३. या कंपनीत अर्ज कर. |
| घ. मी | ४. हे पुस्तक घरी नेऊ का? |
| च. आम्ही | ५. हरिप्रसादजींचं बासरीवादन ऐका. |

## १० पुढील संभाषणात रिकाम्या जागेत योग्य सर्वनाम भरू या.

**(आम्ही, तू, मी, आपण, तुम्ही)**

(क)------------ ह्या कार्यक्रमाची जाहिरात वाचलीस का? (ख) मला वाटतं, ----------- पण वृक्षारोपणासाठी जाऊ या.” (ग) ---------- सर्वजण आपापल्या बागेतली रोपं आणू का?” “(घ) ---------- सगळे कशाला रोपं आणता? (च)---------- येताना आणेन.”

## ११ आशयाधारित प्रश्न

क. २९ जुलै हा दिवस कशासाठी महत्त्वाचा आहे?
 १. त्या दिवशी खूप पाऊस पडतो.
 २. त्या दिवशी आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिवस असतो.
 ३. त्या दिवसापासून पावसाळा सुरु होतो.
 ४. त्या दिवशी झाडे लावतात.

ख. अधिवास म्हणजे...
 १. एकापेक्षा अधिक घरे.
 २. आधी येणारा सुगंध.
 ३. राहण्याचे ठिकाण.
 ४. अधिकाऱ्याचे घर.

ग. वाघ कुठे असतात?
 १. जाळीत
 २. पाण्यात
 ३. झाडांवर
 ४. डोंगरावर

घ. शासनाने व्याघ्रदिनाच्या दिवशी झाडे लावायचे आवाहन का केले आहे?
१. झाडे लावल्यामुळे पर्यावरणाचे रक्षण होईल.
२. प्रदूषण कमी होईल.
३. वाघांची संख्या वाढेल.
४. वाघांना राहण्याच्या जागा शिल्लक राहतील.

च. वृक्षांची लागवड म्हणजे...
१. झाडे लावणे
२. झाडांना औषधी रसायन लावणे
३. झाडांची काळजी घेणे
४. वडाची झाडे लावणे

छ. लक्ष्य म्हणजे...
१. एक लाख
२. लक्ष
३. उद्दिष्ट
४. दुर्लक्ष

## १२ तक्ता पाहू या.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| जो | ज्याला | ज्याने | ज्याचा | ज्यात |
| जी | जिला | जिने | जिचा | ज्यात |
| जे | ज्याला | ज्याने | ज्याचा | ज्यात |

जे, ज्या, जी } ज्यांना, ज्यांनी, ज्यांचा, ज्यांत

**'तो' ची रूपे याचप्रमाणे होतील.**

## १३ जोड्या जुळवू या.

| अ | ब |
|---|---|
| क. जो | १. तिने |
| ख. ज्याला | २. त्यात |
| ग. जिला | ३. तिला |
| घ. ज्याने | ४. त्याला |
| च. जिने | ५. तिचा |
| छ. ज्याचा | ६. तो |
| ज. जिचा | ७. त्याने |
| झ. ज्यात | ८. त्याचा |

**१४ तुम्ही लंच टाईम मध्ये काय करता? चित्रांच्या आधारे वर्गात चर्चा करू या.**





- मी झोप काढतो / काढते.
- आम्ही डबा एकत्र खातो.
- मी आणि माझी मैत्रीण भरपूर गप्पा मारतो.
- मी फोनवर बोलतो / बोलते.

**१५ वर्गात एक खेळ खेळू या. वर्गशिक्षक / शिक्षिका विचारतील, जो लंच टाईम मध्ये झोपतो त्याने हात वर करावा. त्या विद्यार्थ्याने हात वर करायचा. जो लंच टाईम मध्ये फिरायला जातो त्याने हात वर करा. वेगवेगळी वाक्ये बनवून हाच खेळ तुम्ही वर्गातल्या इतर विद्यार्थ्यांशीही खेळू शकाल.**

**१६ चित्रे पाहू या. कोणते वाक्य कोणत्या चित्रास योग्य आहे त्यावर वर्गात चर्चा करू या.**





क. जो वाचेल तो वाचेल.
ख. जी शिकेल ती टिकेल.
ग. जे चकाकतं ते सर्व सोनं नसतं.

'जो ... तो', 'जी ... ती', 'जे ... ते' आणि त्यांची वेगवेगळे प्रत्यय लावून तयार होणारी रूपे यांनी दोन वाक्ये जोडता येतात. जो चे रूप त्यापुढे येणाऱ्या वाक्यावर आणि तो चे रूप त्यापुढे येणाऱ्या वाक्यावर अवलंबून असते.

## १७ 'जो' आणि 'तो' ची योग्य रूपे वापरून पुढील वाक्ये पूर्ण करू या.

(जो, जे, जो, तो, जो, ती)

उदा॰ जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारी.

क. ---- पेराल ते उगवते.

ख. ज्याचे करावे बरे ---- म्हणतो माझेच खरे.

ग. ---- कसेल त्याची जमीन.

घ. ---- खातो त्याला खवखवते.

च. जिने इथे फुले वेचली ---- आता गोवऱ्या वेचतेय.

छ. ---- साखरेचे खाणार त्याला देव देणार.

## १८ ह्या जाहिरातीतही असे वाक्य आहे ते पाहू या. आपण या प्रकारच्या पाच घोषणा तयार करायचा प्रयत्न करू या.

मागेल त्याला शेततळे.      जो मागेल त्याला शेततळे.

## १९ जाहिरात (२६ जुलै,२०१९) वाचू या.

**समृद्ध शेती...शाश्वत शेती.**

१ लाख ६१ हजार शेतकऱ्यांना 'मागेल त्याला शेततळे' या योजनेचा लाभ - १ लाख ७३ हजार विहिरी बांधण्यात आल्या – 'गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार' योजनेतून साडेतीन कोटी घ.मी. गाळ काढला. शेतीची सुपीकता वाढली - १ कोटी १८ लाख ४७ हजार शेतकऱ्यांना 'जमीन आरोग्य पत्रिके'चे वाटप - ५ लाख २७ हजार कृषी पंपांना वीज जोडण्या दिल्या. 'प्रधानमंत्री पीक विमा' योजनेतून ९० लाख शेतकऱ्यांना विमा कवच देण्यात आले - ५१ लाख हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित - १ कोटी ३७ लाख शेतकऱ्यांचा 'गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा' उतरविला - आता शेतकऱ्यांच्या कुटुंबालाही योजनेचा लाभ झाला त्यामुळे साडेपाच कोटी नागरिकांना विम्याचे छत्र - राज्यात ३४ हजार कांदाचाळी बांधल्या - शेतकऱ्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी जागतिक बँकेच्या साहाय्याने राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) राबवणार - गटशेतीस प्रोत्साहन आणि अन्न व कृषी प्रक्रिया उद्योगांना चालना - महाॲग्रिटेक प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यातील शेतकरी डिजिटल प्लॅटफॉर्मवर.

- शेती व संलग्न क्षेत्रासाठी पाच वर्षांतील गुंतवणूक - १ लाख १० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक
- कमी पावसातही जलसंधारणाच्या कामांमुळे खरिपाच्या उत्पादनात सातत्याने वाढ
- जलयुक्त शिवार अभियानांतर्गत १८ हजार ६५० गावे जलपरिपूर्ण. डिसेंबर २०१९ अखेर उर्वरित ४ हजार गावे जलपरिपूर्ण होणार.
- २७ लाख सहस्र घनमीटर पाणीसाठा क्षमता निर्माण
- जलसिंचन प्रकल्पांच्या माध्यमातून ३ लाख ८७ हजार हेक्टर अतिरिक्त सिंचन क्षमता ६७ टीएमसी पाणीसाठा निर्माण. १४० सिंचन प्रकल्प पूर्ण

- ८.५६ लाख हेक्टर क्षेत्रावर सूक्ष्म सिंचन संचांची उभारणी. सुमारे ११ लाख शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचवण्यास मदत.
- कृषी यांत्रिकीकरण योजनेत सुमारे ३० हजार ट्रॅक्टर, १२ हजार रोटाव्हेटर, १० हजार पॉवर टिलर्सचे वाटप
- किमान आधारभूत किमती आधारित शासकीय खरेदीसाठी ८३३६ कोटी रुपये
- 'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान' योजनेंतर्गत आतापर्यंत ५१ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ.

**योजनेच्या काही लाभार्थींचे अनुभव**

**जमिनीला संजीवनी**

आमच्या तलावात पाण्याबरोबर गाळही साचत होता. गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार योजने अंतर्गत या तलावातील गाळ आमच्या शेतात टाकला. त्यामुळे रासायनिक खत वापरावे लागले नाही. भेंडी, कापूस, तूर उत्पादनात मोठी वाढ झाली. जिथे गाळ टाकला तेथील उत्पादन भरघोस स्वरूपात पाहावयास मिळतेय.

सुभाष पंडित वाघ,
चौका, जि. औरंगाबाद

**आधार मिळाला**

शेतातली कामं आटोपून येत असताना वाटेतच दुचाकीच्या धडकेत वडिलांचं निधन झालं. आईचं छत्र हरवलेलं... आम्ही पोरके झालो. मात्र मावशीने दिलेला आधार आणि 'शेतकरी अपघात विमा योजनेच्या' रकमेमुळे मायेचं छत्र पुन्हा मिळालं. या योजनेतून मिळालेल्या पैशातून नातेवाईकांचे उसने पैसे परत केले. शिवाय शेवटच्या वर्षात शिकत असलेल्या लहान भावाच्या शिक्षणालाही फायदा झाला.

राजकुमार आणि रोहित नायकल
सांजा, उस्मानाबाद

**पीक विम्याचे छत्र**

मी एकदाही पीक विमा उतरवलेला नव्हता. माझ्या वहिनीने खरीप पिकाचा विमा उतरविण्यासाठी आग्रह धरला. मग तीन एकर पाच गुंठ्यातील कापसाच्या शेताचा विमा उतरविला. लहरी हवामानामुळे उत्पादन घटलं, मात्र विमा उतरविलेला असल्यामुळे निश्चिंत होतो. 'प्रधानमंत्री पीक विमा योजने'तून १९ हजार ४०६ रुपयांची नुकसान भरपाई मिळाली.

गंगाधर सूर्यभान आढाव
गोळेगाव, ता. खुलताबाद

**शब्दार्थ :**

| नामे | क्रियापदे | इतर शब्द |
|---|---|---|
| ती शेती, – farming | विमा उतरवणे to insure | समृद्ध flourishing |

| | | |
|---|---|---|
| ते शेत, ती शेते / तं<br>farm, -s | उंचावणे<br>to heighten | शाश्वत<br>permanent |
| ते तळे / तळं, ती तळी<br>lake, -s | साचणे<br>to accumulate | लाख<br>lakh |
| तो गाळ, –<br>sediment | टाकणे<br>to throw | हजार<br>thousand |
| ते शिवार, ती शिवारे / रं<br>ground around village, -s | घटणे<br>to decrease | संलग्न<br>affiliated, allied |
| ती सुपीकता, –<br>fertility | आटोपणे<br>to finish | लहरी<br>moody |
| ती नुकसान भरपाई,<br>त्या नुकसानभरपाया<br>compensation, -s | निधन होणे<br>to pass away | खरीप<br>kharif |
| ते वाटप, –<br>distribution | हरवणे<br>to lose | सातत्याने<br>continuously |
| तो विमा, ते विमे<br>insurance, -s | पोरके होणे<br>to be orphan | परिपूर्ण<br>complete |
| ते कवच, ती कवचे / चं<br>shield, -s | परत करणे<br>to pay back / return | सूक्ष्म<br>micro |
| तो अपघात, ते –<br>accident, -s | | आधारभूत<br>fundamental |
| ते छत्र, ती छत्रे / त्रं<br>protection (used figuratively, after the parents' death) | | भरघोस<br>luxuriant |
| तो कांदा, ते कांदे<br>onion, -s | | पोरका<br>orphan |
| ती चाळ, त्या चाळी<br>chawl, -s | | उसना<br>borrowed |
| ते उत्पादन, ती उत्पादने / नं<br>product, -s | | एकर<br>acre |
| ती बाजारपेठ, त्या बाजारपेठा<br>market, -s | | |

| |
|---|
| ती प्रक्रिया, त्या –<br>process, -es |
| ती चालना, –<br>impetus |
| ते माध्यम, ती माध्यमे / मं<br>medium, -s |
| ती गुंतवणूक, त्या गुंतवणुकी<br>investment, -s |
| ते जलसंधारण, –<br>water conservation |
| ते जल, –<br>water |
| तो पाणीसाठा, ते पाणीसाठे<br>water storage, -s |
| ते जलसिंचन, –<br>water irrigation |
| तो संच, ते –<br>set, -s |
| ती उभारणी, –<br>erection |
| ती कर्जमाफी, –<br>loan waiving |
| ती संजीवनी, –<br>a plant that restores the dead to life |
| तो तलाव, ते –<br>lake, -s |
| ती दुचाकी, त्या दुचाक्या<br>two-wheeler, -s |
| ती धडक, त्या धडका<br>dash, -es |



| |
|---|
| ती माया, –<br>love |
| ती वहिनी, त्या वहिन्या<br>brother's wife, -wives |
| तो कापूस, –<br>cotton |

## २० जोड्या जुळवू या.

| | |
|---|---|
| क. वाढणे | १. वापर करणे |
| ख. घटणे | २. गुंतवणूक करणे |
| ग. वाटणे | ३. उभारणी करणे |
| घ. उभारणे | ४. वाटप करणे |
| च. वापरणे | ५. वाढ होणे |
| छ. जोडणे | ६. घट होणे |
| ज. गुंतवणे | ७. जोडणी करणे |

## २१ दिलेल्या वाक्यांमध्ये अधोरेखित केलेल्या क्रियापदांऐवजी त्यांच्यापासून तयार झालेले शब्द वापरू या.



उदा. संपूर्ण जगाचे तापमान <u>वाढले</u> आहे.
संपूर्ण जगाच्या तापमानात <u>वाढ</u> झाली आहे.

क. सरपंचांनी शेतकऱ्यांना बी-बियाणे <u>वाटले</u>.
सरपंचांनी शेतकऱ्यांना बी-बियाण्यांचे -------- केले.

ख. तरुण पिढी नवराष्ट्र <u>उभारेल</u>.
तरुण पिढी नवराष्ट्राची --------करेल.

ग. आता शेतकरी सेंद्रिय खत <u>वापरतात</u>.
आता शेतकरी सेंद्रिय खतांचा -------- करतात.

घ. नरेंद्र त्याच्या कारखान्यात यंत्रांचे सुटे भाग <u>जोडतो</u>.
नरेंद्र त्याच्या कारखान्यात यंत्रांच्या सुट्या भागांची -------- करतो.

च. मी कोणत्या योजनेत पैसे <u>गुंतवू?</u>
मी कोणत्या योजनेत पैशांची -------- करू?

## २२ खाली दिलेले शब्द दोन शब्द एकत्र येऊन तयार झाले आहेत. आपण ते शब्द योग्य प्रत्ययाने किंवा शब्दयोगी पदाने जोडू या.

**(ने, चा, चे, चा, च्या, चे, पासून, चा, ची)**

| | | |
|---|---|---|
| उदा. | शेततळे | शेतातले तळे |
| क. | पाणीसाठा | पाण्या...साठा |
| ख. | गाळयुक्त | गाळा... युक्त |
| ग. | पीकविमा | पिकां... विमा |
| घ. | विमाकवच | विम्या...कवच |
| च. | कर्जमाफी | कर्जा...माफी |
| छ. | कांदाचाळी | कांद्या...चाळी |
| ज. | जलसिंचन | जला...सिंचन |
| झ. | सिंचनसंच | सिंचना...संच |
| ट. | गाळमुक्त | गाळा... मुक्त |

## २३ 'मिळ' धातूचा तक्ता वाचू या.

| | वर्तमानकाळ | | भूतकाळ | | भविष्यकाळ | |
|---|---|---|---|---|---|---|
| तृ.पु. | ए.व. | अ.व. | ए.व. | अ.व. | ए.व. | अ.व. |
| पु. | मिळतो | मिळतात | मिळाला | मिळाले | मिळेल | मिळतील |
| स्त्री. | मिळते | मिळतात | मिळाली | मिळाल्या | मिळेल | मिळतील |
| नपुं. | मिळते / तं | मिळतात | मिळाले / लं | मिळाली | मिळेल | मिळतील |

## २४ खालील वाक्यांमध्ये 'मिळ' धातूची रूपे वाक्यांतील काळाप्रमाणे भरू या.

उदा. चित्रपट महोत्सवात वेगवेगळ्या देशांमधले कलाकार पाहायला मिळतात.

क. युरोपातल्या चर्चमध्ये मायकेल अँजेलोची चित्रं पाहायला ------------

ख. महाराष्ट्रातल्या देवळांमध्ये हेमाडपंती शैली पाहायला ------------

ग. कालच्या कार्यक्रमात आम्हाला सैगलची गाणी ऐकायला ------------

घ. सिद्धार्थला मागच्या वर्षी तीन महिने सरकारी दवाखान्यात काम करायला ------------

च. तू परदेशात जा. तिथे तुला अनेक गोष्टी शिकायला ------------

## २५ जरा हसू या.



ATM म्हणजे मराठीत काय माहीत आहे का?
नाही.
ATM म्हणजे **असतील तर मिळतील!!**



## २६ आशयाधारित प्रश्न

क. शेते कशामुळे सुपीक झाली आहेत?
१. पावसामुळे २. गाळामुळे ३. पंप बसवल्यामुळे ४. विमा उतरवल्यामुळे

ख. अपघात विमा योजनेमुळे शेतकऱ्याबरोबरच कोणाला फायदा होणार आहे?
१. गावकऱ्यांना २. महाराष्ट्रीयांना ३. शेतकऱ्याच्या कुटुंबाला ४. जमीनदारांना

ग. उत्पादने बाजारात येण्यासाठी कोणाची मदत मिळणार आहे?
१. केंद्र सरकारची २. जागतिक बँकेची ३. शेजारी राज्यांची ४. कृषिविद्यापीठांची

घ. गावे कोणत्या योजनेमुळे पाण्याने परिपूर्ण होणार आहेत?
१. शेतकी अपघात विमा योजना २. गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार
३. जलयुक्त शिवार अभियान ४. कृषी यांत्रिकीकरण योजना

च. शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळाली याचा अर्थ ....
१. त्यांच्या चुका माफ केल्या. २. शासनाने त्यांना बिनव्याजी कर्ज दिलं.
३. त्यांना कर्ज फेडावं लागलं नाही. ४. त्यांना कर भरावा लागला नाही.

## २७ आता ही जाहिरात वाचू या.

**सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई**

कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) राज्यस्तरीय पदभरती जाहिरात सन २०१९

महाराष्ट्र शासनाने अधीक्षक अभियंता, मुंबई सा.वां.मंडळ, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून प्राधिकृत केल्यानुसार कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या संवर्गाची रिक्त पदे विहित शैक्षणिक अर्हता धारण करत असलेल्या पात्र उमेदवारांमधून भरण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक, महापरीक्षा पोर्टल यांचे मार्फत स्पर्धात्मक परीक्षेसाठी केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागवण्यात येत आहेत. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याची सुविधा www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच, सदर जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या www.mahapwd.com अणि www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**परीक्षेचे वेळापत्रक**

| प्रक्रिया | दिनांक |
|---|---|
| ऑनलाईन अर्ज व शुल्क भरण्याचा कालावधी | दि. ०५-०१-२०१९ (सकाळी १२.०० पासून) ते दि. २५-०१-२०१९ (रात्री १२.०० पर्यंत) |

**परीक्षेच्या वेळापत्रकाचा तपशील महापरीक्षा पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात येईल.**

**समांतर आरक्षणाचा तपशील**

| अ.क्र. | सामाजिक आरक्षण | भरावयाची एकूण पदे | महिला ३० टक्के | खेळाडू ५ टक्के | अनाथ खुल्या प्रवर्गात ०१ टक्का | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | अनुसूचित जाती | ३४ | १० | ०२ | ०० | २२ |
| २. | अनुसूचित जमाती | ११ | ०३ | ०१ | ०० | ०७ |
| ३. | विमुक्त जाती (अ) | ०५ | ०१ | ०० | ०० | ०४ |
| ४. | भटक्या जाती (ब) | ०९ | ०३ | ०० | ०० | ०६ |
| ५. | भटक्या जाती (क) | ०९ | ०३ | ०० | ०० | ०६ |
| ६. | भटक्या जाती (ड) | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ७. | विशेष मागास प्रवर्ग | ०६ | ०२ | ०० | ०० | ०४ |
| ८. | इतर मागास वर्ग | ४७ | १४ | ०२ | ०० | ३१ |
| ९. | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | ६५ | २० | ०३ | ०० | ४२ |
| १०. | खुला | २१९ | ६६ | ११ | ०२ | १४० |
| | **एकूण** | **४०५** | **१२२** | **१९** | **०२** | **२६२** |

वरील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या पदांमध्ये अपंग प्रवर्गाची एकूण १२ पदे पदभरतीकरिता उपलब्ध होत आहेत.

१. ०६ पदे कर्णबधिर (Hearing Handicapped)

२. ०६ पदे अस्थिव्यंगः – ०३ पदे OL (One Leg Affected) व ०३ पदे OA (One Arm Affected)

• शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. बीसीसी २०१८-प्र.क्र.५८१ए-२०१८-१६-ब दिनांक ०५,१२.२०१८ आणि शुद्धिपत्रक दिनांक १२.१२.२०१८ अन्वये पदभरती प्रक्रिया राबविण्याकरिता दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ पर्यंत रिक्त असणारे आणि दिनांक ०२.१२.२०१८ ते ३१.१२.२०१९ (भरती वर्ष -१) पर्यंतची संभाव्य रिक्त पदे विचारार्थ घेण्यात आलेली आहेत. त्यामुळे वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे. त्यानुसार उपलब्ध होणाऱ्या रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार उमेदवारांच्या नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

• तसेच, स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार शासन सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय, मुंबई यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल, याबाबत कोणताही दावा करता येणार नाही. त्याचप्रमाणे दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाकरिता पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच राखीव प्रवर्गातील गुणानुक्रमानुसार पात्र उमेदवारांचा शासनविहित नियमानुसार विचार

केला जाईल. सदरील पदभरती प्रक्रियेसंदर्भात वाद, तक्रारी उद्भवल्यास त्याबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार शासन सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय, मुंबई यांना राहतील.

(वि॰ कि॰ बगरे, अधीक्षक)
नोडल अधिकारी तथा,
अधीक्षक अभियंता,
मुंबई (सा॰बां॰) मंडळ, मुंबईकरिता

**शब्दार्थ :**

| नामे | क्रियापदे | इतर शब्द |
|---|---|---|
| तो अभियंता, ते अभियंते – engineer, -s | प्राधिकृत करणे to authorise | राज्यस्तरीय on state level |
| ते स्थापत्य, ती स्थापत्ये / त्यं architecture, - s | धारण करणे to hold | नोडल nodal |
| ते आरक्षण, ती आरक्षणे / णं reservation, -s | वाद उद्भवणे to have controversy | प्राधिकृत authorised |
| तो सन, ते – year, -s | शक्यता असणे to be possible | पात्र eligible |
| तो अधीक्षक, ते – superintendent, -s | स्थगित करणे to adjourn | स्पर्धात्मक competitive |
| ती अर्हता qualification, - s | दावा करणे to claim | अनाथ orphan |
| ती महापरीक्षा, त्या – general examination, -s | तक्रार उद्भवणे to have complaint | अनुसूचित scheduled |
| ते वेळापत्रक, ती वेळापत्रके / कं timetable, -s | | विमुक्त liberated |
| तो गुणानुक्रम, ते – order of merit | | भटका nomad |
| तो / ती खेळाडू, ते / त्या खेळाडू player, -s | | मागास backward |
| तो प्रवर्ग, ते – category, -ies | | इतर other |
| तो टक्का, ते टक्के percent, -s | | अपंग disable |

| | | |
|---|---|---|
| ती जात, त्या जाती<br>caste, -s | | कर्णबधीर<br>deaf |
| ती जमात, त्या जमाती<br>tribe, -s | | अस्थिव्यंग<br>orthopaedic disability |
| ते शुद्धिपत्रक, ती शुद्धिपत्रके / कं<br>corrigendum, -s | | संभाव्य<br>probable |
| ती पदसंख्या, त्या –<br>number of post, -s | | विचारार्थ<br>for consideration |
| तो दावा, ते दावे<br>claim, -s | | |
| तो वाद, ते –<br>argument, -s | | |

## २८ वरील जाहिरातीतील ही वाक्यरचना पाहू या.

पात्र उमेदवारांचा शासनविहित नियमानुसार विचार केला जाईल.
म्हणजेच
पात्र उमेदवारांचा शासनविहित नियमानुसार विचार करण्यात येईल.

भूतकाळातले क्रियापद + जा धातूची रूपे (वाक्यातील काळानुसार) = धातू + ण्या + त + ये धातूची रूपे (वाक्यातील काळानुसार)
केले जाते / गेले / जाईल = करण्यात येते / आले / येईल

**तक्ता (भविष्यकाळ)**

| तृ.पु. | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| पु. | विचार केला जाईल. | नियम केले जातील. |
| स्त्री. | कारवाई केली जाईल. | तक्रारी केल्या जातील. |
| नपुं. | मार्गदर्शन केले / केलं जाईल. | कामे / मं केली जातील. |

**तक्ता (वर्तमानकाळ)**

| तृ.पु. | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| पु. | विचार केला जातो. | नियम केले जातात |
| स्त्री. | कारवाई केली जाते. | तक्रारी केल्या जातात. |

| | | |
|---|---|---|
| **नपुं॰** | मार्गदर्शन केले / लं जाते / तं. | कामे / मं केली जातात. |

**तक्ता (भूतकाळ)**

| तृ॰पु॰ | ए॰व॰ | अ॰व॰ |
|---|---|---|
| **पु॰** | विचार केला गेला. | नियम केले गेले. |
| **स्त्री॰** | कारवाई केली गेली. | तक्रारी केल्या गेल्या. |
| **नपुं॰** | मार्गदर्शन केले / लं गेले. | कामे / मं केली गेली / लं. |

## २९ आता हे वाक्य पाहू या.

शासन प्लास्टिकबंदी जाहीर करेल.
शासनाकडून प्लास्टिकबंदी जाहीर केली जाईल.
या रचनेत कर्त्याला ‘कडून’ जोडले जाते.

खालील वाक्ये या रचनेप्रमाणे त्या त्या वाक्यातील काळाप्रमाणे बदलू या.

उदा॰ शासन ३३ कोटी झाडे लावेल.
शासनाकडून ३३ कोटी झाडे लावली जातील.

क. शिक्षणमंडळाने परीक्षेची तारीख जाहीर केली.

ख. महानगरपालिका आधारकार्डांसाठी केंद्रे उघडेल.

ग. शिक्षणविभाग फी-माफीचे आदेश काढते.

घ. बांधकामविभाग रिक्त पदांसाठी जाहिरात देईल.

च. हजारो उमेदवार रिकाम्या पदांसाठी अर्ज करतात.

## ३० रिकाम्या जागेत ‘जा’ धातूची रूपे लिहू या.

**(गेला, जातात, जातील, गेली, जातो)**

क. ॲमेझॉनकडून मागच्या दिवाळीत वस्तूंच्या किमतीत मोठी सवलत जाहीर केली ------ होती.

ख. पुढच्या आठवड्यात उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या ------.

ग. जानेवारी महिन्यात राष्ट्रपतींकडून मान्यवर व्यक्तींना पद्म पुरस्कार दिले ------.

घ. दरवर्षी नदीतला गाळ यंत्राच्या साहाय्याने बाहेर काढला ------.

च. काही दिवसांपूर्वी राज्य सरकारकडून परदेशातल्या विद्यापीठाशी करार केला ------.

## ३१ जोड्या जुळवू या.

| अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|
| क. | संस्थे | कडून | नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे सर्वेक्षण | दिले जाणार आहे. |
| ख. | इस्रो | | पंतप्रधानांच्या भाषणाचे थेट प्रसारण | केले जात आहे. |
| ग. | शासना | | विक्रम लँडरशी सतत संपर्क | केले गेले होते. |
| घ. | कलाकारां | | शहरातल्या मजुरांना मोफत जेवण | घेतला गेला आहे. |
| च. | शिक्षणमंत्र्यां | | पूरग्रस्तांसाठी कार्यक्रम सादर | साधला जात होता. |
| छ. | आकाशवाणी | | पेपर रद्द करण्याचा निर्णय | केला जाणार आहे. |

## ३२ वरील जाहिरातीतील हे वाक्य वाचू या आणि वाक्यरचना शिकू या.

सदरील पदभरती प्रक्रियेसंदर्भात वाद, तक्रारी उद्भवल्यास...राहतील.

जर तक्रारी उद्भवल्या तर...

'धातू + ल्या + स' = जर ... तर

## ३३ तक्ता वाचू या. धातू + ल्या + स

बस + ल्या + स = बसल्यास

| | |
|---|---|
| वाढ | वाढ + ल्या + स = वाढल्यास |
| ठर | ठर + ल्या + स = ठरल्यास |
| ये | आ + ल्या + स = आल्यास |
| जा | गे + ल्या + स = गेल्यास |
| हो | झा + ल्या + स = झाल्यास |
| दे | दि + ल्या + स = दिल्यास |
| घे | घेत + ल्या + स = घेतल्यास |
| कर | के + ल्या + स = केल्यास |

## ३४ सराव.

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| रजा मंजूर झाल्यास मी लखनौला जाईन. | जर रजा मंजूर झाली तर मी लखनौला जाईन. |
| पुढच्या आठवड्यात बैठक घेतल्यास मला यायला जमेल. | जर पुढच्या आठवड्यात बैठक घेतली तर मला यायला जमेल. |
| नवीन सरकार आल्यास अनेक चांगले बदल होतील. | जर नवीन सरकार आले तर अनेक चांगले बदल होतील. |
| प्रस्तावाला मान्यता दिल्यास लोक खूष होतील. | जर प्रस्तावाला मान्यता दिली तर लोक खूष होतील. |
| रविवारी दुकानं उघडी असल्यास मी खरेदीला जाईन. | जर रविवारी दुकानं उघडी असली तर मी खरेदीला जाईन. |
| कामात चुका दिसल्यास कंत्राट रद्द होईल. | जर कामात चुका दिसल्या तर कंत्राट रद्द होईल. |

## ३५ पुढील वाक्यांमध्ये जर...तर ऐवजी धातू + ल्या + स ही रचना वापरू या.

उदा॰ जर पाऊस कमी पडला तर पिकांचे नुकसान होते.
पाऊस कमी पडल्यास पिकांचे नुकसान होते.

क. जर इथे नेट मिळाले तर माझे काम होईल.

ख. जर त्यांचा पक्ष बहुमताने आला तर ते सरकार स्थापन करतील.

ग. जर वीज गेली तर कारखान्यातील यंत्रं बंद पडतील.

घ. जर हा सिनेमा करमुक्त केला तर प्रेक्षकांची गर्दी वाढेल.

च. जर मेट्रोची कामे लवकर पूर्ण झाली तर वाहतुकीची कोंडी होणार नाही.

## ३६ आशयाधारित प्रश्न.

**वरील दिलेली सार्वजनिक बांधकाम विभागाची (क्र.२७) ही जाहिरात वाचून खालील प्रश्नांची उत्तरे निवडू या.**

क. ही जाहिरात कोणत्या पदासाठी आहे?

ख. कोणत्या विभागात रिकामे पद आहे?

ग. नोडल अधिकारी म्हणून कोण काम बघणार आहेत?

घ. अर्ज मुलाखतीसाठी करायचे आहेत की परीक्षेसाठी?

च. ह्या पदासाठी कुठले उमेदवार निवडले जाणार आहेत?

छ. ऑनलाईन अर्ज भरायला किती दिवसांचा वेळ दिला आहे?

ज. वेळापत्रक कुठे पहायला मिळेल?

झ. एकूण किती जागा रिकाम्या आहेत?

ट. अपंगांसाठी किती जागा आहेत?

ठ. गरज पडली तर परीक्षाप्रक्रियेत बदल करायचा निर्णय कोण घेणार आहे?

सार्वजनिक बांधकाम विभाग, कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्रातले, अधीक्षक अभियंता, महापरीक्षा पोर्टल, परीक्षेसाठी, बारा, वीस, चारशे पाच, शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई.

## ३७ वाचू या आणि ऐकू या.



पिल्लई मॅडम : चला, काळे मॅडम, लंच टाईम झाला.
काळे मॅडम : हो, चला डबा खायला जाऊ या.
पिल्लई मॅडम : आज तुम्ही डब्यात काय आणलं आहे? मी आज 'शक्करे पोंगल' आणला आहे. आमच्या तमिळ लोकांची खासियत.
काळे मॅडम : अरे वा! या घ्या तिळाच्या वड्या आणि गूळपोळी. हा आमचा आजचा खास पदार्थ. आज महाराष्ट्रात सगळीकडे तिळाचे आणि गुळाचे पदार्थ करतात. तिळगूळ घ्या, गोड गोड बोला.
पिल्लई : यापुढे 'आमचे तिळगूळ सांडू नका, आमच्याशी भांडू नका'. असं म्हणतात नं?
काळे मॅडम : अरे वा! तुम्हाला कोणी सांगितलं?
पिल्लई मॅडम : इथेच ऑफिसमध्ये शिकले. ही तिळाची वडी फारच चविष्ट आहे. मला रेसिपी द्याल का?
काळे मॅडम : हो, देईन की. आणि तुमचा पोंगलही अगदी छान झालाय. मला खूप आवडला. शेख सर, तुमचा डबा कुठे आहे?
शेख सर : अहो, आज मी डबा घरीच विसरलो.
पिल्लई मॅडम : मग आमचा डबा आहे की! हा घ्या आमचा पोंगल. एकदा खाऊन तर बघा.

## ३८ योग्य पर्याय निवडू या.

क. पिल्लई मॅडमची मातृभाषा कोणती आहे?
१. तमिळ
२. मल्याळम

ख. काळे मॅडम कोण आहेत?
१. कानडी २. मराठी

ग. 'तिळगूळ सांडू नका' म्हणजे...
१. तिळगूळ खाली पाडू नका.
२. तिळगूळ टाकून देऊ नका.

घ. तिळगूळ सांडले तर काय होईल असे म्हटले आहे?
१. तिळगूळ खराब होतील.
२. भांडण होईल.

## ३९ चूक की बरोबर?

क. शेख सरांनी डब्यात शीरखुर्मा आणला आहे.
ख. पोंगल हे तमिळ लोकांचे पक्वान्न आहे.
ग. काळे मॅडमनी पिल्लई मॅडमना मराठी शिकवले आहे.
घ. गूळपोळीत गूळ आणि तीळ असतात.

## ४० महाराष्ट्रात वेगवेगळ्या सणांच्या दिवशी वेगवेगळे पदार्थ तयार करतात. पदार्थ आणि सण यांच्या जोड्या जुळवून त्यांची माहिती करून घेऊ या.




| | |
|---|---|
| क. संक्रांत | १. उकडीचे मोदक |
| ख. होळी | २. श्रीखंड |
| ग. नागपंचमी | ३. करंज्या, बेसनाचे लाडू |
| घ. दिवाळी | ४. ओल्या नारळाच्या करंज्या |
| च. गुढीपाडवा | ५. पुरणपोळी |
| छ. गणेश चतुर्थी | ६. गूळपोळी |
| ज. नारळीपौर्णिमा | ७. दिंडं |

## ४१ तुम्हाला भारतातील वेगवेगळ्या प्रांतातले कोणते पदार्थ माहीत आहेत? उदा॰ कर्नाटक – बिशीबिळी हुळे अन्न. वर्गात चर्चा करू या.

# ७ शांतता... काम बंद आहे!

## (अर्धशासकीय पत्र आणि इतर पत्रव्यवहार)



ताण

**चला, शिकू या ...**

- अर्धशासकीय पत्र, स्मरण पत्र आणि इतर पत्रव्यवहार यांतील भाषिक फरक लक्षात घेणे
- धातू + ता या रचनेचा वापर करता येणे
- जर काम झाले असते तर... अशा प्रकारच्या रचनेचा वापर करता येणे
- उशिरात उशिरा, लवकरात लवकर, या पदबंधांचा वापर करता येणे
- 'शक्य तितक्या लवकर' या पदबंधाचा वापर करता येणे
- कामामुळे येणाऱ्या मानसिक ताणाबद्दल चर्चा करणे
- अवयवांच्या नावावरून तयार होणारे काही वाक्प्रचार वापरता येणे
- साधित शब्दांची ओळख (उपसर्ग – 'स', तसेच 'आलय', 'गृह' हे शब्द जोडून तयार होणारे शब्द)
- धातू + ता ये, धातू + ऊ शक या रचनांचा वापर करणे.

## १ तुम्हाला तुमच्या कामाचा ताण येतो का? ताण येतो तेव्हा तुम्ही काय करता? खालील मुद्द्यांच्या आधारे वर्गात चर्चा करू या.

- दोन मिनिटे शांत बसणे
- चहा पिणे / खाणे
- मित्रमैत्रिणींशी फोनवर बोलणे
- गॉसिप करणे
- फोनवर / लॅपटॉपवर निरनिराळे व्हिडिओ पाहणे
- झोप काढणे
- पाय मोकळे करणे
- घड्याळ लावून पाणी पिणे
- अर्धा दिवस रजा टाकून घरी जाणे

## २ वाचू या, ऐकू या आणि करू या.







सरकारी कचेरीतील काम म्हणजे बैठं काम. बैठं काम म्हणजे सतत बसून करावं लागणारं काम. तुम्हाला कधीकधी कामाचा प्रचंड ताण येतो ना? कंटाळा येतो ना? आमच्याकडे त्यावर ‘पाच मिनिटात आराम’ हा रामबाण उपाय आहे.

क. डोळे अलगद मिटून घ्या. पाठ खुर्चीला टेकून बसा. एक मिनीट शांत बसून राहा.
ख. डोळे अलगद उघडा.
ग. उभे राहा. पाय झटका, आधी डावा, मग उजवा.
घ. मान एकदा उजवीकडे वळवा. एकदा डावीकडे वळवा.
च. दोन्ही हात उंचावून नमस्कार करा.
छ. एक दीर्घ श्वास घ्या. मग श्वास सोडा.



कामाचा ताण आला तर वरीलपैकी कोणताही उपाय करा. पाच मिनिटांत आराम!

## ३ योग्य अवयव ओळखू या.


क


ख


ग


घ


च

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. डोकं | २. गुडघा | ३. पोट | ४. कंबर | ५. डोळा |
| १. ______ | २. ______ | ३. ______ | ४. ______ | ५. ____ |

## ४ वाचू या.



क. "तू काल कोणाबरोबर गेली होतीस?"
"तुला काय करायचं आहे? ही माझी वैयक्तिक बाब आहे. तू उगीच **नाक खुपसू** नकोस."

ख. "आई, तुझं कुरियर आलंय."
"अरे, मग उठवलं का नाहीस?"
"तुझा नुकताच **डोळा लागला** होता."

ग. "ऐकलंत का, त्या मेहताबाईंना प्रमोशन मिळालं."
"मेहता बाईंना? त्यांना तर काहीच येत नाही! तरी प्रमोशन? मिळू दे की. तुमच्या का **पोटात दुखतंय**"?

घ. "बघतोच त्याचा हा प्रकल्प कसा पुरा होतो ते!"
"अरे, असे एकमेकांचे **पाय खेचण्यापेक्षा** सगळेजण मिळून काम करू. मग यश आपलंच आहे!"

च. "कालच्या बैठकीत काय झालं?"
"दुसरं काय होणार? प्रकल्पाबद्दल चर्चा झाली. कुलकर्णीसाहेबांनी नेहमीप्रमाणे **हात वर केले** आणि आमच्याकडे **बोट दाखवलं.**"

## ५ जोड्या जुळवू या.

| | |
|---|---|
| क. नाक खुपसणे | १. जबाबदारी दुसऱ्यावर ढकलणे. |
| ख. डोळा लागणे | २. एखाद्याच्या प्रगतीत अडथळे आणणे. |
| ग. पोटात दुखणे | ३. जबाबदारी झटकणे. |
| घ. पाय खेचणे | ४. गरज नसताना दुसऱ्याच्या गोष्टीत लक्ष घालणे. |
| च. हात वर करणे | ५. झोप लागणे. |
| छ. बोट दाखवणे | ६. एखाद्याची चांगली गोष्ट न पाहवणे. |

## ६ अर्धशासकीय पत्र वाचू या.

अर्धशासकीय पत्र क्र. ...
ग्रामविकास विभाग, सचिवालय, मुंबई – ३२
दिनांक ...

...
उपसचिव
महाराष्ट्र शासन.

प्रिय श्री॰ ...

कृपया महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या नियमपुस्तिकेचा मराठीत अनुवाद करण्यासंबंधीचे आपले दिनांक ... चे पत्र क्रमांक ... पाहावे.

आपण निवेदन केलेली परिस्थिती विचारात घेता, सदरहू नियमपुस्तिकेचा अनुवाद उशिरात उशिरा ... पर्यंत या विभागाकडे पाठवण्याची व्यवस्था करावी. ही नियमपुस्तिका शक्य तितक्या लवकर मराठीत प्रसिद्ध व्हावी अशी शासनाची तीव्र इच्छा आहे हे मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो. या नियमपुस्तिकेच्या इंग्रजी आवृत्तीचे मुद्रण चालू असून ... च्या अखेरीस त्याच्या प्रती वितरणासाठी तयार होतील अशी अपेक्षा आहे. वस्तुतः मराठी पुस्तकास मोठ्या प्रमाणात मागणी असल्यामुळे ही आवृत्ती अगोदरच प्रसिद्ध करणे अधिक योग्य झाले असते. परंतु ते शक्य नसल्यामुळे ती आवृत्ती इंग्रजीनंतर ताबडतोब निघावी, अशी अपेक्षा केल्यास वावगे होणार नाही.

म्हणून, आपण परत पाठवलेले साहित्य पुन्हा स्वीकारावे आणि शक्य तितक्या लवकर त्याचा अनुवाद करण्यासंबंधी व्यवस्था करावी, अशी मी आपणास पुन्हा विनंती करीत आहे. ... च्या अखेरपर्यंत अनुवादित साहित्य आपणाकडून मिळेल अशी अपेक्षा आहे.

अनुवादाचे साहित्य मी पुन्हा परत पाठवत आहे.

आपला स्नेहांकित,
(सही)

श्री...
भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य,
सचिवालय, मुंबई.

शब्दार्थ :

| नामे | क्रियापदे | इतर शब्द |
|---|---|---|
| ते पत्र, ती पत्रे / त्रं<br>letter, -s | अनुवाद करणे<br>to translate | अर्धशासकीय<br>demi official |
| ती नियमपुस्तिका, त्या –<br>rules hand book, -s | विचारात घेणे<br>to consider | ग्रामविकास<br>rural development |
| तो अनुवाद, ते –<br>translation, -s | पाठवणे<br>to send | कृपया<br>please |
| ते निवेदन, ती निवेदने / नं<br>statement, -s | व्यवस्था करणे<br>to arrange | उशिरात उशिरा<br>latest by |
| ती परिस्थिती, –<br>circumstance, -s | प्रसिद्ध होणे / करणे<br>to be published / to publish | सदरहू<br>this |
| ती इच्छा, त्या –<br>wish, -es | निदर्शनास आणणे<br>to bring to notice | तीव्र<br>strong |
| ती आवृत्ती, त्या आवृत्त्या<br>edition, -s | तयार होणे<br>to be ready | मुद्रण<br>printing |
| ती प्रत, त्या प्रती<br>copy, -ies | अपेक्षा असणे<br>to have expectation | अखेरीस / अखेरपर्यंत<br>at the end / till the end |
| ते साहित्य, –<br>text, literature | योग्य होणे / असणे<br>to be proper | मोठ्या प्रमाणात<br>on large scale |
| | शक्य नसणे<br>to be impossible | वावगे<br>improper |
| | वावगे होणे<br>to go wrong | शक्य तितक्या लवकर<br>as early as possible |
| | परत पाठवणे<br>to return | अनुवादित<br>translated |
| | स्वीकारणे<br>to accept | स्नेहांकित<br>sincerely |

## ७ या पत्रातील ही वाक्यरचना लक्षात घेऊ या.

आपण निवेदन केलेली परिस्थिती विचारात घेता सदरहू नियमपुस्तिकेचा अनुवाद उशिरात उशिरा ... पर्यंत पाठवण्याची व्यवस्था करावी.

म्हणजेच

जर आपण निवेदन केलेली परिस्थिती विचारात घेतली तर सदरहू ... करावी.

उदा॰ जर मराठी भाषेतले वाङ्मय लक्षात घेतले तर मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला पाहिजे.
मराठी भाषेतले वाङ्मय लक्षात घेता मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला पाहिजे.

धातू + ता = जर ... क्रियापदाचे भूतकाळाचे रूप तर ...

## ८ पुढील वाक्यांमध्ये जर ... तर आणि कंसात दिलेले क्रियापदाचे रूप वापरून वाक्ये पुन्हा लिहू या.

उदा॰ कामात आलेल्या अडचणी पाहता हे काम पूर्ण होईल असे वाटत नाही. (पाहिल्या)
जर कामात आलेल्या अडचणी पाहिल्या तर काम पूर्ण होईल असे वाटत नाही.

क. प्रदर्शनाचे ठिकाण बघता तिथल्या सर्व वस्तू महाग असतील असे वाटते. (बघितले)

ख. तुझे मत ऐकता तुला मुलगा आवडलेला दिसत नाही असे मला वाटते. (ऐकले)

ग. अपघातांची वाढती संख्या लक्षात घेता हेल्मेटची सक्ती केलीच पाहिजे. (घेतली)

घ. हवामानखात्याचे अंदाज वाचता पुढच्या आठवड्यात पुन्हा थंडी पडेल असं दिसतंय. (वाचले)

च. भाज्यांचे वाढलेले दर बघता खायचं काय हा प्रश्न पडतो. (बघितले)

वर दिलेली रचना बहुतेक वेळा औपचारिक मराठीत वापरतात.

## ९ पुढे दिलेल्या वाक्यांशांच्या जोड्या जुळवू या.

| अ | ब |
|---|---|
| क. जर मतदानातला लोकांचा सहभाग लक्षात घेतला | १. तर सामान्य माणसासाठी अनेक योजना आहेत असे दिसते. |
| ख. जर करोना व्हायरसचा वाढता संसर्ग पाहिला | २. तर लवकरच भारतीय संघ सर्वोत्कृष्ट ठरेल हे नक्की. |
| ग. जर क्रिकेट क्षेत्रातली भारताची कामगिरी पाहिली | ३. तर मराठी सिनेमा बदलत आहे असे दिसते. |
| घ. जर यंदाच्या बजेटचे तपशील वाचले | ४. तर लोकांना लोकशाहीचा अर्थ माहीत नाही असे लक्षात येते. |
| च. जर अलीकडचे मराठी चित्रपट बघितले | ५. तर शासनाने कठोर निर्णय घेतले पाहिजेत असे वाटते. |

## १० वरील वाक्ये तयार झाल्यावर त्याच वाक्यांमध्ये जर ... तर ऐवजी धातू + ता ही रचना वापरून वाक्ये पुन्हा लिहू या.

उदा० जर मतदानातला लोकांचा सहभाग लक्षात घेतला तर जनजागृतीची गरज आहे हे लक्षात येते.

मतदानातला लोकांचा सहभाग लक्षात घेता जनजागृतीची गरज आहे हे लक्षात येते.

## ११ आता आणखी एक वाक्यरचना पाहू या.

ही आवृत्ती अगोदरच प्रसिद्ध करणे अधिक योग्य झाले असते.

म्हणजेच

जर ही आवृत्ती अगोदरच प्रसिद्ध केली असती तर अधिक योग्य झाले असते.

जर ... क्रियापदाचे भूतकाळाचे रूप + अस् चे रूप, तर ... क्रियापदाचे भूतकाळाचे रूप + अस् चे रूप

**तक्ता क्र. १ धातू – 'अस'**

| एकवचन | नकारार्थी | अनेकवचन | नकारार्थी |
|---|---|---|---|
| जर मी असतो तर | जर मी नसतो तर | जर आम्ही / आपण असतो तर | जर आम्ही नसतो तर<br>जर आपण नसतो तर |
| जर मी असते तर | जर मी नसते तर | | |
| जर तू असतास तर | जर तू नसतास तर | जर तुम्ही असता तर | जर तुम्ही नसता तर<br>जर तुम्ही नसता तर |
| जर तू असतीस तर | जर तू नसतीस तर | | |
| जर तो असता तर | जर तो नसता तर | जर ते असते तर | जर ते नसते तर |
| जर ती असती तर | जर ती नसती तर | जर त्या असत्या तर | जर त्या नसत्या तर |
| जर ते असते / तं तर | जर ते नसते / तं तर | जर ती असती तर | जर ती नसती तर |

**तक्ता क्र. २ – अकर्मक क्रियापदाचे भूतकाळाचे रूप + अस ची रूपे**

| एकवचन | नकारार्थी | अनेकवचन | नकारार्थी |
|---|---|---|---|
| जर मी गेलो असतो तर | जर मी गेलो नसतो तर | जर आम्ही / आपण गेलो असतो तर | जर आम्ही / आपण गेलो नसतो तर |
| जर मी गेले असते तर | जर मी गेले नसते तर | | |

| | | | |
|---|---|---|---|
| जर तू गेला असतास तर | जर तू गेला नसतास तर | जर तुम्ही गेला असता तर | जर तुम्ही गेला नसता तर |
| जर तू गेली असतीस तर | जर तू गेली नसतीस तर | | |
| जर तो गेला असता तर | जर तो गेला नसता तर | जर ते गेले असते तर | जर ते गेले नसते तर |
| जर ती गेली असती तर | जर ती गेली नसती तर | जर त्या गेल्या असत्या तर | जर त्या गेल्या नसत्या तर |
| जर ते गेले / गेलं असते / तं तर | जर ते गेले / गेलं नसते / तं तर | जर ती गेली असती तर | जर ती गेली नसती तर |

**तक्ता क्र. ३ : सकर्मक क्रियापदाचे भूतकाळाचे रूप + अस ची रूपे.**

| | एकवचन | नकारार्थी | अनेकवचन | नकारार्थी |
|---|---|---|---|---|
| पु. | जर अहवाल प्रसिद्ध केला असता तर | जर अहवाल प्रसिद्ध केला नसता तर | जर अहवाल प्रसिद्ध केले असते तर | जर अहवाल प्रसिद्ध केले नसते तर |
| स्त्री. | जर आवृत्ती प्रसिद्ध केली असती तर | जर आवृत्ती प्रसिद्ध केली नसती तर | जर आवृत्त्या प्रसिद्ध केल्या असत्या तर | जर आवृत्त्या प्रसिद्ध केल्या नसत्या तर |
| नपुं. | जर पुस्तक प्रसिद्ध केले / केलं असते / तं तर | जर पुस्तक प्रसिद्ध केले / केलं नसते / तं तर | जर पुस्तके / कं प्रसिद्ध केली असती तर | जर पुस्तके / कं प्रसिद्ध केली नसती तर |

## १२ पुढील वाक्यांमध्ये रिकाम्या जागेत 'अस' ची रूपे भरू या.

उदा॰ जर आम्ही अर्ज (पु॰) केला ------- तर ही जमीन (स्त्री॰) आम्हाला मिळाली -------
जर आम्ही अर्ज केला असता तर ही जमीन आम्हाला मिळाली असती.

क. मी (पु॰) रोज एक तास चाललो ------- तर तब्येत (स्त्री॰) चांगली राहिली -------

ख. हरी (पु॰) परदेशी गेला ------- तर त्याचे विचार (पु॰अ॰व॰) बदलले -------

ग. कॉलेजच्या दिवसात भरपूर वाचन (नपुं॰) केले ------- तर मी (स्त्री॰) मुलाखतीत प्रश्नांची उत्तरे देऊ शकले-------

घ. तू शिफारसपत्र (नपुं॰) दिले ------- तर मला नोकरी (स्त्री॰) मिळाली -------

च. तुम्ही कार्यक्रमाला आला ------- तर मी तुमची वक्त्यांशी ओळख (स्त्री॰) करून दिली -------

१. जर माझ्याकडे पैसे असते तर मी जगभर प्रवास केला असता.

बहुतेक वेळा 'जर ... तर'चा वापर

२. माझ्याकडे पैसे असते तर मी जगभर प्रवास केला असता.

कधी कधी फक्त 'तर'चा वापर

३. अशीच अमुची आई असती सुंदर रूपवती, आम्हीही सुंदर झालो असतो, वदले छत्रपती.

कधी कधी कवितांमध्ये 'जर ... तर'शिवायही रचना.

## १३ सराव.

शिक्षक : माझ्याकडे पैसे असते तर मी स्कूटर घेतली असती.

सर्व विद्यार्थी : माझ्याकडे पैसे असते तर मी स्कूटर घेतली असती.

विद्यार्थी १ : काय? तुम्ही स्कूटर घेतली असती? मी स्कूटर घेतली नसती, मी बंगला घेतला असता.

सर्व : मी बंगला घेतला असता.

विद्यार्थी २ : काय? तू बंगला घेतला असतास? मी सोनं घेतलं असतं.

सर्व : मी सोनं घेतलं असतं.

विद्यार्थी ३ : मी सोनं घेतलं नसतं, मी कपडे घेतले असते.

सर्व : मी कपडे घेतले असते.

विद्यार्थी ४ : मी कपडे घेतले नसते, मी गाड्या घेतल्या असत्या.

सर्व : मी गाड्या घेतल्या असत्या.

विद्यार्थी ५ : मी गाड्या घेतल्या नसत्या. मी घरं घेतली असती.
(फ्रीज, मोबाईल, पुस्तकं, सायकल, सोफा)

## १४ सराव.

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| अभिजीतने खेळाकडे लक्ष दिलं असतं तर त्याला बँकेत नोकरी मिळाली असती. | अभिजीतने खेळाकडे लक्ष दिलं नसतं तर त्याला बँकेत नोकरी मिळाली नसती |
| तू अभ्यास केला असतास तर मेडिकलला गेला असतास. | तू अभ्यास केला नसतास तर मेडिकलला गेला नसतास. |
| निवडणूक हिवाळ्यात घेतली असती तर जास्त लोकांनी मतदान केलं असतं. | निवडणूक हिवाळ्यात घेतली नसती तर जास्त लोकांनी मतदान केलं नसतं. |

| | |
|---|---|
| यंदा पाऊस कमी पडला असता तर दुष्काळ पडला असता | यंदा पाऊस कमी पडला नसता तर दुष्काळ पडला नसता. |
| मेट्रोचे काम लवकर पूर्ण झाले असते तर लोकांची सोय झाली असती. | मेट्रोचे काम लवकर पूर्ण झाले नसते तर लोकांची सोय झाली नसती. |
| त्याने मित्राला सल्ला विचारला असता तर त्याचे पैसे वाचले असते. | त्याने मित्राला सल्ला विचारला नसता तर त्याचे पैसे वाचले नसते. |

## १५ आता या वाक्यातला हा पदबंध पाहू या.

सदरहू नियमपुस्तिकेचा अनुवाद **उशिरात उशिरा** ... पर्यंत पाठवावा.

सराव. खालील वाक्यांमध्ये योग्य ठिकाणी उशिरात उशिरा वापरू या.

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| उमेदवारांची यादी २ ऑक्टोबरपर्यंत जाहीर झाली पाहिजे. | उमेदवारांची यादी उशिरात उशिरा २ ऑक्टोबरपर्यंत जाहीर झाली पाहिजे. |
| तुम्ही स्टेशनवर साडेबारापर्यंत पोचा नाहीतर गाडी चुकेल. | तुम्ही स्टेशनवर उशिरात उशिरा साडेबारापर्यंत पोचा नाहीतर गाडी चुकेल. |
| तू हे काम परवापर्यंत पूर्ण करून दे. | तू हे काम उशिरात उशिरा परवापर्यंत पूर्ण करून दे. |
| मुलाकडच्यांना रविवारपर्यंत निर्णय कळवायला सांगा. | मुलाकडच्यांना उशिरात उशिरा रविवारपर्यंत निर्णय कळवायला सांगा. |
| मुलाखती जानेवारी अखेरपर्यंत होतील. | मुलाखती उशिरात उशिरा जानेवारी अखेरपर्यंत होतील. |
| मी तुझ्या घरी पाचपर्यंत पोचेन. | मी तुझ्या घरी उशिरात उशिरा पाचपर्यंत पोचेन. |

## १६ लक्षात ठेवू या.

याच प्रकारे ‘लवकरात लवकर’ हा पदबंधही खूपदा वापरला जातो. शिक्षकांनी दोन्हीच्या अर्थच्छटा समजावून सांगाव्यात.

## १७ सराव.

| शिक्षक | विद्यार्थी |
| --- | --- |
| तू माझ्या मदतीला ये. | तू लवकरात लवकर माझ्या मदतीला ये. |
| मी वाहन चालवण्याचा परवाना घेईन. | मी लवकरात लवकर वाहन चालवण्याचा परवाना घेईन. |
| त्यांनी त्रैमासिक सुरू करावं. | त्यांनी लवकरात लवकर त्रैमासिक सुरू करावं. |
| तुम्ही तुमची प्रतिक्रिया लिहून कळवा. | तुम्ही तुमची प्रतिक्रिया लवकरात लवकर लिहून कळवा. |
| आपण त्यांना भेटायला जाऊ या. | आपण त्यांना लवकरात लवकर भेटायला जाऊ या. |
| तिने स्वतःच्या पायांवर उभं राहिलं पाहिजे. | तिने लवकरात लवकर स्वतःच्या पायांवर उभं राहिलं पाहिजे. |

## १८ रिकाम्या जागेत 'लवकरात लवकर' किंवा 'उशिरात उशिरा' यांपैकी योग्य तो पदबंध भरू या.

उदा॰ शासनाने मृत व्यक्तीच्या कुटुंबाला लवकरात लवकर मदत करावी.

१. पुढच्या आठवड्यात पुस्तकाचं प्रकाशन आहे. तुम्ही ------ ------प्रस्तावना लिहून द्यावी.

२. विमानाच्या वेळेच्या दोन तास आधी विमानतळावर यावं लागतं. आपलं विमान चार वाजता आहे. तू घरून ------ ------ एक वाजता नीघ.

३. उमेदवारांनी अर्ज ------ ------ २५ तारखेपर्यंत भरले पाहिजेत. त्यानंतर अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

४. माझा कार्यक्रम दूरदर्शनवर परवा दाखवणार आहेत. आपण आपला टीव्ही ------ ------ दुरुस्त करून घेऊ या.

५. त्याने माझे पैसे ------ ---- रविवारपर्यंत द्यावेत. नाहीतर मी पोलिसांत तक्रार करीन.

## १९ वाचू या.

ही नियमपुस्तिका शक्य तितक्या लवकर मराठीत प्रसिद्ध व्हावी अशी शासनाची इच्छा आहे.
आपण शक्य तितक्या लवकर त्याचा अनुवाद करण्यासंबंधी व्यवस्था करावी.
शक्य तितक्या लवकर = लवकरात लवकर = as soon as possible

## २० आपण खाली दिलेल्या वाक्यांमध्ये 'शक्य तितक्या लवकर' हा पदबंध योग्य जागी भरू या.

उदा० आम्ही दिल्लीहून शक्य तितक्या लवकर परत येऊ.

१. तुम्ही डॉक्टरांकडे जा.
२. तू मेलचं उत्तर दे.
३. आपण हे काम पूर्ण करू या.
४. आम्हाला हे घर बदलायचं आहे.
५. त्याने भारतात परत यावं.

## २१ आशयाधारित प्रश्न.

क. हे पत्र कोणी लिहिले आहे?
१. उपसचिव (deputy secretary) २. भाषा संचालक (director of languages)
३. मुद्रक (printer) ४. अनुवादक (translator)

ख. हे पत्र कोणाला लिहिले आहे?
१. भाषांतरकार (translator) २. भाषा संचालक (director of languages)
३. उपसचिव (deputy secretary) ४. मुख्यमंत्री (chief minister)

ग. या पत्राचा मुख्य विषय कोणता आहे?
१. अनुवाद (translation) २. मुद्रण (printing)
३. वितरण (distribution) ४. ग्रामविकास (rural development)

घ. भाषा संचालनालयाला कशाचा अनुवाद करून हवा आहे?
१. जिल्हा परिषदेची कागदपत्रे. (documents of Jilha Parishad)
२. जिल्हा परिषद आणि नगरपंचायत समित्यांची नियमपुस्तिका. (Rules handbook of Jilha Parishad and Panchayat Samiti)
३. शासनाची कागदपत्रे. (government documents)
४. भाषा संचालनालयाची कागदपत्रे. (documents of language directorate)

च. इंग्रजी आवृत्तीच्या आधी मराठी आवृत्ती प्रसिद्ध व्हायला हवी होती कारण
१. लोकांना इंग्रजी समजत नाही.
२. शासनाचा तसा आदेश होता.
३. लोकांनी जास्तीत जास्त मराठी वापरावे म्हणून.
४. मराठी नियमपुस्तिकेला जास्त मागणी आहे म्हणून.

छ. अनुवाद करायचे साहित्य शासनाकडून भाषा संचालनालयाला दुसऱ्यांदा पाठवले गेले कारण
१. भाषा संचालनालयालाकडून एकदा ते परत आले होते म्हणून.
२. भाषा संचालनालयाकडून ते हरवले होते म्हणून.
३. नागरिकांची तशी इच्छा होती म्हणून.
४. भाषांतर करायला दुसरे कोणी तयार नव्हते म्हणून.

## २२ पत्रव्यवहाराचा आणखी एक नमुना वाचू या.

**पत्रव्यवहार**

**महाराष्ट्र शासन**

शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे – ४११००१.

Web- www.dhepune.gov.in
Email- dhepune@yahoo.co.in
फोन नं. ०२०-२६१२२११९, २६१३०६२७, २६१३०६३९
फॅक्स नं. ०२०-२६१११११५३
क्रमांकः उशिसं-२०१४/शौचलये बांधकाम/प्रशा-१/००१
दिनांक ०१ जानेवारी, २०१४

प्रति,
मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई – ४००००१

विषय – शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या शासकीय व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील शौचालये व स्वच्छतागृहांबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत सविनय कळविण्यात येते की, या संचालनालयाच्या अखत्यारीत येणाऱ्या शासकीय व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील शौचालये व स्वच्छतागृहांबाबतचा सर्वेक्षण अहवाल जागतिक आरोग्य संघटनेकडून या संचालनालयास प्राप्त झालेला आहे.

सदर अहवालाचे अवलोकन करता जागतिक आरोग्य संघटनेने खालील बाबी प्रामुख्याने निर्देशनास आणून दिल्या आहेत.

१. महाराष्ट्र राज्यातील प्रातिनिधिक स्वरूपात जिल्हानिहाय १० महाविद्यालयांस भेट.
२. महाराष्ट्र राज्यातील एकूण ३६० महाविद्यालयांची तपासणी.
३. ३६० पैकी २५० महाविद्यालयांत शौचालयाच्या सुविधेचा अभाव.
४. उर्वरित ११० शौचालये असलेल्या महाविद्यालयांमध्ये ८६ महाविद्यालयांत स्वच्छतेचा अभाव.
५. ११० पैकी ५६ महाविद्यालयांत कर्मचारी व मुला-मुलींकरिता स्वतंत्र शौचालयाच्या सुविधेचा अभाव.
६. तपासणी करण्यात आलेल्या महाविद्यालयांपैकी २५७ महाविद्यालयांमध्ये स्वच्छतागृहांचा अभाव.
७. सर्वच महाविद्यालयांमध्ये अस्वच्छता असण्याची शक्यता.
८. परिणामी महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या आरोग्यावर विपरीत परिणाम.
९. विद्यार्थिनींमध्ये असुरक्षिततेची भावना.
१०. विद्यार्थी अर्ध्यातून महाविद्यालय सोडून जाणे.

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या सर्वेक्षण अहवालाचे अनुषंगाने आपणास सविनय अवगत करण्यात येते की, जागतिक आरोग्य संघटनेकडून प्राप्त झालेला अहवाल हा प्रातिनिधिक स्वरूपाचा आहे. संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये या संचालनालयाच्या अखत्यारीत २८ शासकीय, ११५४ अशासकीय अनुदानित व २१६३ अशासकीय विना अनुदानित अशी एकूण ३३४५ महाविद्यालये कार्यरत आहेत. सर्वेक्षण न झालेल्या महाविद्यालयांमध्येसुद्धा पुरेशा प्रमाणात शौचालये व स्वच्छतागृहे नसण्याची शक्यता

आहे. महाविद्यालयांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींकरिता शौचालये व स्वच्छतागृह नसणे ही बाब पुरोगामी महाराष्ट्राला भूषणावह नाही. या सर्व महाविद्यालयांमध्ये जागतिक आरोग्य संघटनेच्या निकषानुसार विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात मुला-मुलींकरिता स्वतंत्र शौचालये व स्वच्छतागृहांची आवश्यकता आहे. मात्र सद्यस्थितीतील प्रचलित नियमानुसार अशासकीय विना अनुदानित महाविद्यालयांस कोणत्याही स्वरूपाचे अनुदान अनुज्ञेय नसल्याने फक्त शासकीय व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांत शौचालये व स्वच्छतागृहे बांधकामाबाबत कार्यवाही करणे अत्यंत आवश्यक आहे. अशासकीय विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये शौचालये व स्वच्छतागृहे बांधण्याबाबतची सक्ती संबंधित महाविद्यालयाच्या व्यवस्थापक मंडळाला करण्यात येईल.

तरी वरीलप्रमाणे बांधकामाबाबतची शासनस्तरावरून कार्यवाही करणेबाबत विनंती करण्यात येत आहे.

आपला विश्वासार्ह,
सही/-
(अ ब क)
संचालक, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे

सोबतः जागतिक आरोग्य संघटनेचा अहवाल.

**शब्दार्थ :**

| नामे | क्रियापदे | इतर शब्द |
|---|---|---|
| तो अभाव<br>lack | कळवणे<br>to inform | अखत्यारीत<br>in hand |
| ते शौचालय, ती शौचालये / यं<br>lavatory, -ies | प्राप्त होणे<br>to get | स्वतंत्र<br>separate |
| ते स्वच्छतागृह,<br>ती स्वच्छतागृहे / हं<br>toilet, -s | अवलोकन करणे<br>to peruse | सविनय<br>with modesty |
| ती भेट, त्या भेटी<br>visit, -s | सोडून जाणे<br>to leave | जागतिक आरोग्य संघटना<br>WHO |
| ती तपासणी, त्या तपासण्या<br>test, -s | अवगत होणे<br>to get | प्रातिनिधिक<br>representative |
| ते सर्वेक्षण, ती सर्वेक्षणे / णं<br>survey, -s | कार्यरत असणे<br>to be engaged | जिल्हानिहाय<br>per district |
| ती स्वच्छता, –<br>cleanliness | | अर्ध्यातून<br>half way |

| | | |
|---|---|---|
| ती अस्वच्छता, –<br>uncleanliness | | विपरीत<br>reverse |
| ते आरोग्य, –<br>health | | अनुदानित<br>granted |
| ती शक्यता, त्या –<br>possibility, -ies | | विना अनुदानित<br>non granted |
| ती असुरक्षितता, –<br>unsafety | | पुरोगामी<br>forward, progressive |
| तो निकष, ते –<br>criterion, criteria | | भूषणावह<br>creditable |
| ती सक्ती, –<br>compulsion, -s | | प्रचलित<br>prevailing |
| ती सद्यस्थिती, –<br>current situation, -s | | व्यवस्थापक मंडळ<br>managing board |
| ते बांधकाम, ती बांधकामे / मं<br>construction | | |
| तो स्तर, ते –<br>level, -s | | |

## २३ वरील पत्रातला हा शब्द पाहू या.

सविनय = स + विनय (with modesty)

**खाली दिलेल्या शब्दांच्या आधी 'स' लावून असे काही शब्द तयार करू या.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क. | --- | + प्रेम | = --------- | with love |
| ख. | --- | + आदर | = सादर | with respect |
| ग. | --- | + शर्त | = --------- | with condition |
| घ. | --- | + पत्नी | = सपत्नीक | with wife |
| च. | --- | + प्रमाण | = --------- | with proof |

## २४ दिलेल्या शब्दांमधून योग्य विरुद्धार्थी शब्द निवडून त्या त्या शब्दासमोर लिहू या.

**(उपलब्धता, प्रतिगामी, अपुरा, लज्जास्पद, अशासकीय)**

क. पुरेसा (sufficient) X ....................

ख. पुरोगामी (progressive) X ....................

ग. भूषणावह (commendable) X ....................

घ. अभाव (lack of something) X ....................

च. शासकीय (governmental) X ....................

## २५ कंसात दिलेल्या शब्दांवरून तयार झालेले शब्द ह्या पत्रात आहेत. ते शोधून खालील रिकाम्या जागेत भरू या.



दसऱ्याला शाळेचं उद्‌घाटन झालं. शाळेचं (क) बांधकाम (बांधणे) तीन वर्षे चालू होतं. ही शाळा विना (ख) --------- (अनुदान) स्वरूपाची आहे. गावाच्या विकासाची आठवण करून देणारी ती (ग) --------- (प्रतिनिधी) वास्तू आहे. शिक्षणाचे महत्त्व आता (घ) --------- (जग) स्तरावर मान्य झाले आहे. शिक्षणक्षेत्राशी (च)--------- (संबंध) अनेक मान्यवर मंडळी उद्‌घाटनाला उपस्थित होती. शाळेतल्या मुलींना वाटणारी (छ)--------- (असुरक्षित) हा शाळेपुढचा मोठा प्रश्न असेल. मुलींची वैद्यकीय (ज)--------- (तपासणे) ही नियमितपणे होणार आहे. शहरांमधले शिक्षक आठवड्यातून एकदा या शाळेत शिकवायला येण्याची (झ) --------- (शक्य) आहे. मोठ्या विद्यार्थ्यांना (ट) --------- (महाविद्यालय) अभ्यासक्रमांची माहितीही दिली जाणार आहे.

## २६ ह्या पत्रातला ‘संचालनालय’ हा शब्द कसा तयार झाला आहे ते पाहू या.

संचालन + आलय (घर) = संचालनालय

‘आलय’ शब्द जोडलेले अनेक शब्द आपण रोजच्या बोलण्यात वापरतो.

उदा॰ विद्या + आलय = विद्यालय

२७ **असे आणखी काही शब्द पाहू या आणि रिकाम्या जागा भरू या.**

क. --------- + आलय = कार्यालय

ख. भोजन + --------- = भोजनालय

ग. --------- + आलय = वाचनालय

घ. --------- + --------- = ग्रंथालय

च. --------- + --------- = हिमालय

छ. --------- + आलय = संग्रहालय

ज. देव + --------- = देवालय

झ. शौच + --------- = शौचालय

२८ **'गृह' शब्द जोडून तयार झालेले ५ शब्द लिहू या. त्यांचे इंग्रजी अर्थ कंसात दिले आहेत.**

**(बालसुधारगृह, नाट्यगृह, स्नानगृह, चित्रपटगृह, कारागृह)**

उदा॰ सभा + गृह = hall

क. ------- + ------- = ------- (cinema hall)

ख. ------- + ------- = ------- (prison)

ग. ------- + ------- + ------- = ------- (child remand home)

घ. ------- + ------- = ------- (bathroom)

च. ------- + ------- = ------- (drama theatre)

२९ **पुढील संक्षिप्त रूपांच्या योग्य पूर्ण रूपांवर ✓ खूण करू या.**

क. मा. - मामासाहेब, माननीय

ख. ती. - तीर्थरूप, तीर्थक्षेत्र

ग. श्री. - श्रीमती, श्रीयुत

घ. सौ. - सौभाग्यवती, सौंदर्यवती

च. आ. - आनंददायक, आदरणीय

छ. चि. - चिरंतन, चिरंजीव

For signature – सहीसाठी

For record – नोंदीसाठी

For ready reference – तात्काळ संदर्भासाठी

For compliance – पालनार्थ

For proper action – उचित कार्यवाहीसाठी

## ३० आशयाधारित प्रश्न. योग्य पर्यायावर ही ✓ खूण करू या.

क. हे पत्र संचालक / सहसंचालक यांनी लिहिले आहे.

ख. हे पत्र प्रधानसचिवांना / अपर सचिवांना लिहिलेले आहे.

ग. हे पत्र अनुदानाबद्दल / शौचालयांबद्दल लिहिले आहे.

घ. आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार मुलींमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होते कारण मुले त्यांची छेड काढतात / शाळेत मुलामुलींसाठी स्वतंत्र शौचालये नाहीत.

च. अनुदानित / मान्यताप्राप्त शाळांना अनुदान मिळू शकते.

छ. शाळांमध्ये शौचालये बांधण्याची जबाबदारी मुलामुलींच्या पालकांची / महाविद्यालयांच्या व्यवस्थापक मंडळांची आहे.

## ३१ स्मरणपत्र वाचू या.

**महाराष्ट्र शासन**

शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे – ४११००१.

Web- www.dhepune.gov.in Email- dhepune@yahoo.co.in

फोन नं. ०२०-२६१२२११९, २६१३०६२७, २६१३०६३९ फॅक्स नं. ०२०-२६१११११५३

क्रमांकः उशिसं-२०१४/शौचलये बांधकाम/प्रशा-१/१०१ दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१४

**स्मरणपत्र**

प्रति,<br>
सहसंचालक,<br>
उच्च शिक्षण,<br>
१. मुंबई, २. पनवेल, ३. पुणे, ४. कोल्हापूर, ५. सोलापूर,<br>
६. नांदेड, ७. औरंगाबाद, ८. जळगाव, ९. अमरावती, १०. नागपूर

विषय - शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या शासकीय व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील शौचालये व स्वच्छतागृहांबाबत...

संदर्भ - १. क्रमांकः उशिसं/२०१४ शौचालये बांधकाम/प्रशा-१/०५० दि. २ फेब्रु. २०१४.<br>
२. क्रमांक उतंशि/शौचालये बांधकाम/प्र.क्र. २०/ मशि-१ दि. २८ फेब्रु. २०१४.

उपर्युक्त विषयावरील या संचालनालयाचे उक्त संदर्भ क्रमांक १ चे पत्र पाहावे.

प्रस्तुत पत्रान्वये विषयांकित प्रकरणावरील माहिती तातडीने सादर करणेबाबत सूचना देण्यात आलेल्या होत्या. मात्र आजतागायत आपल्या कार्यालयाकडून सदरची माहिती प्राप्त झालेली नाही याची नोंद घ्यावी.

आपल्या कार्यालयाकडून माहिती प्राप्त न झाल्यामुळे विहित वेळेत शासनास सादर करता आली नाही. परिणामी, मा. सहसचिव, महाराष्ट्र शासन यांनी त्यांच्या उक्त क्रमांक २ च्या अशा पत्रान्वये नाराजी व्यक्त केलेली आहे.

यास्तव पुनश्च स्मरणपत्र देण्याची वेळ येणार नाही या दृष्टीने उक्त क्रमांक १ अन्वये मागविण्यात आलेली माहिती समक्ष या संचालनालयास सादर करावी.

सही/ –
(अ ब क)
संचालक, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत,
मा. सहसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना उक्त संदर्भ क्रमांक २ च्या अशा पत्राचे अनुषंगाने माहितीसाठी सविनय सादर.

**शब्दार्थ :**

| नामे | क्रियापदे | इतर शब्द |
|---|---|---|
| ते स्मरणपत्र, ती स्मरणपत्रे / त्रं<br>reminder, -s | सूचना देणे<br>to instruct | प्रस्तुत<br>this |
| तो / ती सहसंचालक, ते / त्या सहसंचालक<br>co-directors, -s | वेळ येणे<br>to be compelled to | विषयांकित<br>of the subject |
| ती नोंद, त्या नोंदी<br>note, -s | | आजतागायत<br>till today |
| ती नाराजी, –<br>indisposition | | उक्त<br>said |
| | | यास्तव<br>for this |
| | | पुनश्च<br>again |
| | | समक्ष<br>face to face |

## ३२ या स्मरणपत्रातील ही वाक्यरचना लक्षात घेऊ या.

कार्यालयाकडून विहित वेळेत माहिती सादर करता आली नाही.
म्हणजेच
कार्यालय विहित वेळेत माहिती सादर करू शकले नाही.

धातू + ता ये (कोणत्याही काळातील रूपे) =
धातू + ऊ शक (कोणत्याही काळातील रूपे)

## ३३ तक्ता क्रमांक १ - भूतकाळ

| एकवचन (होकारार्थी / नकारार्थी) | अनेकवचन (होकारार्थी / नकारार्थी) |
|---|---|
| अहवाल सादर कर + ता आला / आला नाही | अहवाल सादर कर + ता आले / आले नाहीत |
| नस्ती (फाईल) सादर कर + ता आली / आली नाही. | नस्त्या (फायली) सादर कर + ता आल्या / आल्या नाहीत. |
| नाटक सादर कर + ता आले / लं / आले / आलं नाही. | नाटके / कं सादर कर + ता आली / आली नाहीत. |

**तक्ता क्रमांक २ - वर्तमानकाळ**

| एकवचन | | अनेकवचन | |
|---|---|---|---|
| अहवाल लिहि + ता येतो | येत नाही. | अहवाल लिहि + ता येतात | येत नाहीत. |
| टिप्पणी लिहि + ता येते | | टिप्पण्या लिहि + ता येतात | |
| पत्र लिहि + ता येते / तं | | पत्रे / त्रं लिहि + ता येतात | |

**तक्ता क्रमांक ३ - भविष्यकाळ**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| अहवाल / टिप्पणी / पत्र लिहि + ता येईल / येणार नाही. | अहवाल / टिप्पण्या / पत्रे लिहि + ता येतील / येणार नाहीत. |

## ३४ सराव.

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| तरुणींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण घेता येते. | तरुणी स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण घेऊ शकतात. |
| लोकांना रेल्वेचे ऑनलाइन आरक्षण करता येते. | लोक रेल्वेचे ऑनलाइन आरक्षण करू शकतात. |
| तुला या पदासाठी अर्ज करता येईल. | तू या पदासाठी अर्ज करू शकशील. |
| वर्मा आजोबांना शस्त्रक्रियेनंतर आधाराशिवाय चालता येईल. | वर्मा आजोबा शस्त्रक्रियेनंतर आधाराशिवाय चालू शकतील. |
| नागरिकांना एकाच उमेदवाराला मत देता येईल. | नागरीक एकाच उमेदवाराला मत देऊ शकतील. |
| तुम्हाला अर्जित रजा घेता येईल. | तुम्ही अर्जित रजा घेऊ शकाल. |

## ३५ सराव. अधोरेखित शब्दाऐवजी खाली लिहिलेले शब्द वापरून वाक्ये करू या.

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| <u>सुबोधला</u> बंगाली लिपी लिहिता येते. | <u>सुबोधला</u> बंगाली लिपी लिहिता येते. |
| ती | |
| लिमये सर | |
| तू | |
| नाडकर्णी बाई | |
| मुलं | |
| तुम्ही | |

## ३६ सराव. अधोरेखित शब्दाऐवजी खाली लिहिलेले शब्द वापरून वाक्ये करू या.

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| अतुल बंगाली लिहू शकतो. | अतुल बंगाली लिहू शकतो. |
| प्रिया | |
| आम्ही | |
| आजोबा | |
| मुली | |
| त्या | |
| मी | |

## ३७ अ आणि ब गटातल्या वाक्यांशांच्या जोड्या जुळवू या आणि पूर्ण वाक्य तयार करू या.

| अ | ब |
|---|---|
| क. बढती मिळाल्यावर तिला नवं घर | १. करू शकत नाही. |
| ख. वरुण उत्तम | २. चालवू शकते. |
| ग. आजोबांना | ३. म्हणता येतात. |
| घ. आशाताईंना जुनी गाणी | ४. पोहू शकतात. |
| च. मनमीत ट्रॅक्टर | ५. मराठी चांगलं बोलू शकतात. |
| छ. ते विहिरीत | ६. स्वैपाक करू शकतो. |
| ज. विनीता एकटी प्रवास | ७. घेता येईल. |
| झ. अमराठी अधिकारीही | ८. दौऱ्यावर जाता येईल का? |
| ट. नीलिमाला पंधरा दिवस | ९. ऑनलाइन बँकिंग करता येतं. |

## ३८ आशयाधारित प्रश्न. योग्य पर्याय निवडू या.

क. हे पत्र किती शहरांच्या सहसंचालकांना पाठवले आहे? (आठ / दहा)

ख. या पत्राआधी किती पत्रे पाठवली होती? (एक / दोन)

ग. संचालक शासनाला वेळेत माहिती पाठवू शकले नाहीत कारण ... (सहसंचालकांनी पाठवलेले पत्र संचालकांना मिळाले नाही / सहसंचालकांनी संचालकांना माहिती पाठवली नाही.)

घ. या पत्राची प्रत कोणाला पाठवली आहे? (प्रधान सचिवांना / सहसचिवांना)

च. महाविद्यालयातील शौचालये व स्वच्छतागृहे हा विषय कोणाच्या अखत्यारीत येतो? (महाविद्यालयांची व्यवस्थापक मंडळे / शिक्षण संचालनालय)

## ३९ ही चित्रफीत पाहू या.

**बरोबर की चूक? ✓ किंवा X खूण करू या.**

क. ऑफिस सुटायची वेळ झाली आहे.

ख. ह्या कर्मचाऱ्यामुळे कंपनीचे शंभर रुपयांचे नुकसान झाले आहे.

ग. बॉसने पगारातले पन्नास रुपये कापून घेतले आहेत.

घ. ह्या कर्मचाऱ्याने लोकांकडून पैसे उधार घेतले आहेत.



## ४० या चित्रफितीसाठी कोणते शीर्षक योग्य वाटते?

क. कर्मचाऱ्याने दिली हातावर तुरी...

ख. बॉस शेर, कर्मचारी सव्वाशेर...

ग. ...

# ८ बॉस येतो तेव्हा...

## (ज्ञापन आणि निविदा सूचना)



सूचना





### चला, शिकू या ...

- ज्ञापन आणि निविदा सूचना वाचणे आणि समजणे
- धातू + आयचा / आवयाचा ही रचना वापरता येणे
- बॉस कसा आहे हे सांगता येणे
- धातू + आवा लाग ह्या रचनेचा वापर करता येणे
- न धातू + ता ही रचना वापरता येणे
- with या अर्थाने 'ने' प्रत्ययाचा वापर करता येणे
- धातू + ल्या + च्या ही रचना वापरता येणे
- धातू + ण्या + चा या रचनेचा वापर करता येणे
- धातूपासून (material) विशेषणे तयार करता येणे
- साधित शब्दांमधला मूळ शब्द ओळखता येणे

## १ ज्ञापन वाचू या.

क्रमांक...
सामान्य प्रशासन विभाग,
सचिवालय, मुंबई – ४०० ०३२ बीआर.
दिनांक ...

**विषय – लिपिकाच्या पदासाठी निवड**

ज्ञापन,

श्री. / कुमारी / श्रीमती ... यांना कळवण्यात येते की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सल्ल्याने, सचिवालयीन दुय्यम सेवेत बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयात, लिपिकाच्या पदासाठी त्यांची निवड करण्यात आली असून या विभागाने ठेवलेल्या निवड सूचीत त्यांचे नाव दाखल करण्यात आले आहे.

त्यांना असेही कळवण्यात येत आहे की, ..., मुंबई, यांच्या कार्यालयात लिपिकाची एक तात्पुरती जागा भरावयाची आहे. म्हणून त्यांनी ..., मुंबई, यांच्याकडे कामावर रुजू व्हावे. त्यांना आपला प्रवास-खर्च स्वतः करावा लागेल.

त्यांना आणखी असेही कळवण्यात येत आहे की, हे ज्ञापन काढल्याच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत ते / त्या कामावर रुजू झाले / झाल्या नाहीत तर त्यांचे नाव कोणतीही सूचना न देता ह्या विभागाने ठेवलेल्या निवड सूचीतून काढून टाकण्यात येईल.

अपर सचिव, महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग.

**शब्दार्थ :**

| नामे | क्रियापदे | इतर शब्द |
|---|---|---|
| ते ज्ञापन, ती ज्ञापने / नं<br>memorandum, -s | दाखल करणे<br>to file | लोकसेवा आयोग<br>public service commission |
| तो / ती लिपिक, ते / त्या –<br>clerk, -s | जागा भरणे<br>to fill the post | सचिवालयीन<br>secretarial |
| ती जागा, त्या –<br>post, -s | रुजू होणे<br>to join | दुय्यम<br>subordinate |
| तो सल्ला, ते सल्ले<br>advice, -s | काढून टाकणे<br>to remove | तात्पुरता<br>temporary |
| ती सेवा, त्या –<br>service, -s | | |
| तो प्रवास-खर्च, ते –<br>travelling expense, -s | | |

## २ ह्या ज्ञापनातील हे वाक्य पाहू या.

कार्यालयात लिपिकाची एक तात्पुरती जागा भरावयाची आहे.

भर + आवयाचा (भरावयाचा) = भर + आयचा (भरायचा)
धातू + आवयाचा = धातू + आयचा

## ३ सराव. अधोरेखित शब्दाऐवजी खाली दिलेले शब्द पुढील वाक्यात वापरू या.

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| सचिनला जागा भरायची आहे. | सचिनला जागा भरायची आहे. |
| फॉर्म | |
| पैसे | |
| एक निविदा | |
| बिलं | |
| चलन | |

## ४ अधोरेखित शब्दाऐवजी खाली दिलेले शब्द पुढील वाक्यात वापरू या.

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| संचालकांना पत्र लिहायचं आहे. | संचालकांना पत्र लिहायचं आहे. |
| अहवाल | |
| स्मरणपत्रे | |
| सूचना (अ.व.) | |
| टिप्पणी | |
| दोन लेख | |

धातूला आयचा / आवयाचा हे प्रत्यय जोडताना कर्त्याला (नाम / सर्वनाम)
एकवचनात 'ला' आणि अनेकवचनात 'ना' जोडतात.
रेवा + ला = रेवाला, मुलं + ना = मुलांना, विभाताई + ना = विभाताईंना
तू + ला = तुला त्या + ना = त्यांना

**सर्वनामांना 'ला' किंवा 'ना' जोडून होणारी रूपे :**

| | |
|---|---|
| मी - मला | आम्ही - आम्हाला<br>आपण - आपल्याला |
| तू - तुला | तुम्ही - तुम्हाला |
| तो - त्याला<br>ती - तिला<br>ते - त्याला | ते<br>त्या } त्यांना<br>ती |

## ५ अधोरेखित शब्दांऐवजी खाली दिलेले शब्द पुढील वाक्यांशात वापरू या.

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| साहेबांना फोन करायचा आहे. | साहेबांना फोन करायचा आहे. |
| सीमा | |
| श्री॰ पवार | |
| तू | |
| आपण | |
| तो | |
| विजयाताई | |

## ६ खाली दिलेल्या वाक्यांमध्ये धातू + आयचा ही रचना वापरून वाक्ये पुन्हा लिहू या.

उदा॰ आम्ही घर बदलणार आहोत.
आम्हाला घर बदलायचं आहे.

क. वंदना सतार शिकते आहे.

ख. सरोजताई हिंदी पुस्तकं वाचतात.

ग. तू दुसरी नोकरी शोधतो आहेस का?

घ. शर्माजी स्टाफसाठी नव्या खुर्च्या खरेदी करतात.

च. कर्मचारी साहेबांसाठी गाण्यांच्या सीडीज् घेतात.

छ. केंद्र सरकार प्रत्येक जिल्ह्यात वनौषधी विक्रीकेंद्रे सुरू करणार आहे.

## ७ आता हे संभाषण वाचू आणि ऐकू या.



साहेब : अरे सुनील, परवा सर्व अधिकाऱ्यांची बैठक आहे. तू नवीन आहेस, पण विजय रजेवर आहे. त्यामुळे तुलाच बैठकीची जबाबदारी घ्यावी लागेल.

सुनील : हो, साहेब. तुम्ही सांगा, काय काय करावं लागेल?

साहेब : सगळीच तयारी करावी लागेल. सर्वात आधी तर कॉन्फरन्स रूमची साफसफाई करावी लागेल. खुर्च्या लावाव्या लागतील.

सुनील : ते सगळं उद्याच करून ठेवतो साहेब.

साहेब : हो. शिवाय फायली, पेनं आणून ठेवावी लागतील. चहा-कॉफीची व्यवस्था पाहावी लागेल.

सुनील : चहाबरोबर बिस्किटंपण द्यावी लागतील ना साहेब? आणि पाण्याच्या बाटल्या?

साहेब : हो, हो. त्याही आणाव्या लागतील. तू आपल्या कँटीनच्या मॅनेजरला सांग. त्याला माहीत आहे सगळं, शिवाय आपल्याला स्क्रीन लॅपटॉपला जोडून ठेवावा लागेल. हे सगळे अधिकारी आपापलं सादरीकरण पेनड्राइव्हमध्ये घेऊन येतात आणि इथे दाखवतात.

सुनील : हो साहेब. सगळं व्यवस्थित करतो मी.

साहेब : ठीक आहे. पण सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे तुला त्या दिवशी लवकर यावं लागेल.

सुनील : येतो, साहेब. तुम्ही अजिबात काळजी करू नका.

## ८ योग्य पर्याय निवडू या.

क. बैठकीची जबाबदारी सुनीलला का घ्यावी लागणार आहे?
१. विजय रजेवर आहे म्हणून.
२. सुनील नवीन आहे म्हणून.

ख. खुर्च्या लावणे म्हणजे...
१. खुर्च्यांना रंग लावणे.
२. खुर्च्या व्यवस्थित मांडणे.

ग. सुनील फायली व पेनं कोणासाठी आणणार आहे?
१. साहेबांसाठी
२. बैठकीला येणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी.

घ. सुनीलला चहा कॉफीच्या व्यवस्थेत कोण मदत करेल?
१. कँटीनचा मॅनेजर.
२. विजय.

Out of order – नियमबाह्य / नादुरुस्त
Out of date – कालबाह्य
Out of stock – संग्रहात नसलेला
Out of use – वापरात नसलेला

च. स्क्रीन लॅपटॉपला जोडल्यामुळे काय सोय होईल?
   १. आधीच्या बैठकीच्या स्लाईड्स बघता येतील.
   २. अधिकाऱ्यांची पेन ड्राइव्हमधलं सादरीकरण स्क्रीनवर दाखवता येईल.

सुनील + ला खोलीची साफसफाई (स्त्री॰ए॰व॰) कर + आवी लागेल.
सुनीलला खोलीची साफसफाई करावी लागेल.

## ९ सराव. अधोरेखित शब्दाऐवजी खाली दिलेले शब्द वापरून वाक्ये तयार करू या.

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| सुनीलला चहा आणावा लागेल. | सुनीलला चहा आणावा लागेल. |
| ग्लास | |
| पेले | |
| फायली | |
| कॉफी | |
| पाणी | |
| बिस्किटं | |

## १० सराव. अधोरेखित शब्दाऐवजी खाली दिलेले शब्द वापरून वाक्ये तयार करू या.

| |
|---|
| उदा॰ सुनीलला सर्व व्यवस्था बघावी लागली. |
| प्रिया |
| पवारसाहेब |
| आपण |
| मुली |
| पाध्येबाई |
| श्री॰ वाघ |
| तू |
| तुम्ही |
| आम्ही |

## ११ सराव.

शिक्षक : तुम्हाला घरी काय काम करावं लागतं? मला पंखे पुसावे लागतात.

सर्व : आम्हाला पंखे पुसावे लागतात.

विद्यार्थी १ : तुम्हाला पंखे पुसावे लागतात? मला भांडी घासावी लागतात.

सर्व : आम्हाला भांडी घासावी लागतात.

विद्यार्थी २ : तुम्हाला भांडी घासावी लागतात? ...

(फरशी पूस, केर काढ, भाजी आण, भाजी निवड, स्वयंपाक कर, पाणी भर)

## १२ खाली दिलेल्या वाक्यांमध्ये धातू + आवा + लाग ही रचना वापरून वाक्ये पुन्हा लिहू या.

उदा॰ शांता रोज नदीवरून पाणी आणते.
शांताला रोज नदीवरून पाणी आणावं लागतं.

क. गंगाधर नोकरीसाठी रोज पुणे-मुंबई प्रवास करतो.

ख. कुलकर्णीसाहेब कार्यालयात आठ वाजेपर्यंत थांबले.

ग. विद्यार्थी दर आठवड्याला परीक्षा देतील.

घ. मुलं लहान वयातच अनेक विषय शिकतात.

च. सरिता चालत शाळेत जाते.

वरील ज्ञापनातही अशा प्रकारची वाक्यरचना आहे.

उदा॰ त्यांना आपला प्रवासखर्च स्वतः करावा लागेल, म्हणजे

त्यांना कार्यालय किंवा इतर कोणीही प्रवासखर्चाचे पैसे देणार नाही. स्वतःचा खर्च स्वतःच करणे त्यांना बंधनकारक (mandatory) आहे.
जेव्हा एखादी गोष्ट केल्याशिवाय चालत नाही, ती गोष्ट करायची सक्ती असते, तेव्हा ही रचना वापरतात.

## १३ आता हा वाक्यांश पाहू या.

न + धातू + ता
न + दे + ता = न देता
कोणतीही सूचना न देता

## १४ सराव. धातू बदलून वाक्ये तयार करू या.

| |
|---|
| शिक्षक : विनय सकाळी न + बोल + ता निघून गेला. |
| विनय सकाळी न बोलता निघून गेला. |
| खा |
| सांग |
| जेव |
| ऐक |
| कळव |

## १५ सराव. अधोरेखित शब्दाच्या ऐवजी खाली दिलेले शब्द वापरून वाक्य तयार करू या.

| |
|---|
| उदा॰ विनय सकाळी डबा न घेता निघून गेला |
| चहा |
| मोबाईल |
| पैसे |
| पुस्तकं |
| दूध |
| पत्र |
| बॅग |

## १६ सराव. अधोरेखित क्रियापदाच्या ऐवजी खाली दिलेली क्रियापदे वापरून वाक्य बनवू या.

| |
|---|
| उदा॰ विनय सकाळी नाश्ता न कर + ता गेला. |
| पेपर वाच |
| अंघोळ कर |
| लॅपटॉप घे |
| सूचना दे |
| स्वेटर घाल |

## १७ खाली दिलेल्या वाक्यांमध्ये न + धातू + ता ही रचना वापरून दोन वाक्यांचे एक वाक्य करू या.

उदा॰ तिने कोणाचेही ऐकले नाही. ती घरातून निघून गेली.
ती कोणाचेही न ऐकता घरातून निघून गेली.

क. उजवीकडे वळू नकोस. सरळ जा.
ख. जीन पँट धूत नाहीत. ती अनेक दिवस वापरतात.
ग. तो एकही शब्द बोलत नाही. तो शांतपणे जेवतो.
घ. टायपिस्टसाठी थांबू नका. स्वतः पत्रं टाईप करा.
च. तुम्ही पुस्तक वाचले नाही. तुम्ही मत कसं देता?

## १८ वाचू या.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सल्ल्याने त्यांची निवड करण्यात आली आहे.
सल्ला + ने = सल्ल्या (सामान्यरूप) + ने (with advice) = सल्ल्याने

## १९ पुढील रिकाम्या जागा याप्रमाणे भरू या.

क. मदत + ने = ------ (with help)
ख. साहाय्य + ------ = साहाय्याने (with help)
ग. ------ + ने = परवानगीने (with permission)
घ. आज्ञा + ने = ------ (with order)
च. ------ + ने = कृपेने (with favour)

## २० हा वाक्यांश वाचू या.

हे ज्ञापन काढल्याच्या (धातू + ल्या + च्या) तारखेपासून.
म्हणजे
हे ज्ञापन ज्या तारखेला काढले त्या तारखेपासून.

| | | |
|---|---|---|
| | काढ + ल्या + च्या | काढल्याच्या |
| | ठर + ल्या + च्या | ठरल्याच्या |
| | कळ + ल्या + च्या | कळल्याच्या |
| ये | आ + ल्या + च्या | आल्याच्या |
| जा | गे + ल्या + च्या | गेल्याच्या |

| | | |
|---|---|---|
| घे | घेत + ल्या + च्या | घेतल्याच्या |
| दे | दि + ल्या + च्या | दिल्याच्या |
| हो | झा + ल्या + च्या | झाल्याच्या |
| कर | के + ल्या + च्या | केल्याच्या |

## २१ ज्या... त्या वापरून केलेल्या वाक्यात धातू + ल्या + च्या वापरून वाक्य करू या.

उदा॰ ज्या क्षणी त्याला बातमी कळली त्या क्षणापासून तो आनंदाने नाचतो आहे.
बातमी कळल्याच्या क्षणापासून तो आनंदाने नाचतो आहे.

क. ज्या दिवशी नवी जागा घेतली त्या दिवसापासून ते दोघं आनंदात आहेत.

ख. ज्या दिवशी लग्न ठरलं त्या दिवसापासून तिने तयारीला सुरुवात केली आहे.

ग. ज्या दिवशी इंटरनेटचं कनेक्शन घेतलं त्या दिवसापासून तो सगळी कामं ऑनलाईन करतो.

घ. ज्या दिवशी बापूसाहेब गेले त्या दिवसापासून त्यांच्या कुत्र्याने अन्नाला तोंडही लावलेलं नाही.

च. ज्या क्षणी त्याचा मित्र घरात आला त्या क्षणापासून ते दोघे गप्पा मारताहेत.

## २२ आशयाधारित प्रश्न.

**अ गटातले प्रश्न आणि ब गटातली उत्तरे यांच्या जोड्या जुळवू या.**

| अ | ब |
|---|---|
| क. संबंधित व्यक्तीची कोणत्या पदासाठी निवड झाली आहे? | १. कोणीही नाही |
| ख. या पदासाठी तिची निवड करण्याचा सल्ला कोणी दिला होता? | २. नाही |
| ग. ती व्यक्ती आता कायमच्या नोकरीत रुजू होणार आहे का? | ३. सात |
| घ. त्यांना रुजू होण्यासाठी प्रवासखर्च कोण देणार आहे? | ४. लिपिक |
| च. रुजू होण्यासाठी त्यांना किती दिवसांची मुदत दिली आहे? | ५. महाराष्ट्र लोकसेवा आयोग |

## २३ चर्चा करू या. तुमचे बॉस कसे आहेत? खालील वाक्यांसाठी योग्य शब्द लिहू या.

खडूस? सहृदयी?
हुशार? कडक?
नीटनेटके? वक्तशीर?
संतापी? प्रेमळ?



क. आमचे बॉस सगळ्या स्टाफशी खूप छान वागतात. आमच्या अडचणी ते समजून घेतात. आम्हाला मदत करतात. ------------

ख. आमच्या बॉसना ऑफिसमध्ये कोणीही उशिरा आलेलं चालत नाही. ते लगेच लेटमार्क लावतात. ते स्वतः सुद्धा रोज वेळेवर ऑफिसला येतात. ------------

ग. आमच्या बॉसना इथली वस्तू तिथे गेलेली चालत नाही. त्यांचं टेबल त्यांना चकाचक लागतं. सर्वांनी ऑफिसला व्यवस्थित कपडे घालून यावं असा त्यांचा आग्रह असतो. ------------

घ. आमच्या बॉसना छोट्या छोट्या गोष्टींवरून लगेच राग येतो. त्यावरून ते फार ओरडतात. आम्हाला कोणालाच ते फारसे आवडत नाहीत. ------------

## २४ बॉस ऑफिसमध्ये असले की काय काय करावं लागतं? खालील मुद्द्यांच्या आधारे वर्गात चर्चा करू या.

- वेळेत यावं लागतं.
- टेबल स्वच्छ ठेवावं लागतं.
- नस्त्या (फायली) त्यांच्या टेबलावर ठेवाव्या लागतात.
- ...

## २५ थोडं हसू या.




जेव्हा...
१) तुमचे बॉस तुम्हाला जेव्हा रजा / सुट्टी देत नाहीत.
२) विनाकारण रागावतात.
३) ओव्हरटाईम करायला सांगतात.
तेव्हा तुम्ही काय करता?

## २६ चित्रफीत पाहू या आणि सराव सोडवू या.

क. कर्मचारी भरतला काय देतो?
- Joining letter / Dismissal letter

ख. भरत पत्रकार आहे. – हो / नाही.

ग. वृत्तपत्राच्या कार्यालयाचे नाव खबरदार / जबाबदार आहे.

घ. मॅडमचे एम॰ए॰ पर्यंत शिक्षण पूर्ण झाले आहे. – हो / नाही.



## २७ ज्ञापन वाचू या.

**महाराष्ट्र शासन**
क्र. ...
सामान्य प्रशासन विभाग,
सचिवालय, मुंबई – ४०० ०३२

दिनांक - ...

**विषय – विमानचालन सल्लागार, महाराष्ट्र शासन, यांच्याकडून फर्निचरची खरेदी.**

ज्ञापन

विमानचालन सल्लागार, महाराष्ट्र शासन, यांचे वरील विषयासंबंधीचे पत्र क्र. ..., दिनांक ... याच्या संदर्भात, त्यांना असे कळवण्याचा मला आदेश आहे की, एकूण ९३०/- रुपये (नऊशे तीस रुपये) अधिक त्यावरील कर इतक्या किंमतीचे खालील फर्निचर खरेदी करण्यास शासनाने मंजुरी दिली आहेः –

१. ३ लाकडी टेबले (कप्पे व एक खण असलेली)
२. २ लाकडी टेबले (दोन खण असलेली)
३. ६ खुर्च्या (हात असलेल्या)
४. २ रॅक (लहान)

फर्निचरची खरेदी विहित कार्यपद्धतीनुसार करण्यात यावी.

या कारणाकरिता होणारा खर्च ५० - सरकारी बांधकामे – राज्य आस्थापना (आकस्मिक खर्च) (२) शासनाचे विमानचालन सल्लागार' या शीर्षकात खर्च खाती टाकण्यात यावा व चालू वित्तीय वर्षासाठी त्या शीर्षकाखाली मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून तो भागवण्यात यावा.

हे ज्ञापन, वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ..., दिनांक ... यानुसार त्या विभागाच्या सहमतीने काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही
अपर सचिव, महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग.

**शब्दार्थ :**

| नामे | क्रियापदे | इतर शब्द |
|---|---|---|
| ते विमानचालन, – aviation, | खरेदी करणे to purchase | आकस्मिक contingent |
| तो / ती सल्लागार, ते / त्या – adviser, -s | खर्च खाती टाकणे to account in expenditure head | वित्तीय financial |
| तो कर, ते - tax | खर्च भागवणे to meet an expenditure | |

| |
|---|
| ती किंमत, त्या किमती<br>price, -s |
| ते फर्निचर, –<br>furniture |
| ती खरेदी, –<br>purchase, -s |
| तो कप्पा, ते कप्पे<br>drawer, -s |
| तो खण, ते खण<br>drawer, -s |
| ती आस्थापना, त्या आस्थापना<br>establishment. –s |
| ते खाते / तं, ती खाती<br>account, -s |
| ते शीर्षक, ती शीर्षके / कं<br>head, -s |
| ते अनुदान, ती अनुदाने / नं<br>grant, -s |
| ती सहमती, –<br>concurrence |



## २८ आशयाधारित प्रश्न.

**ज्ञापन वाचून योग्य ते शब्द रिकाम्या जागी भरू या.**

क. फर्निचरसाठी खरेदी ------------ ------------ यांना करायची आहे.

ख. खरेदीसाठी ------------ ------------ रुपये ही रक्कम मंजूर झाली आहे.

ग. तेवढ्या रकमेत ------------, ------------ आणि रॅक एवढे फर्निचर येईल.

घ. खरेदीसाठी होणारा खर्च चालू वर्षासाठी मंजूर झालेल्या ------------ होणार आहे.

च. या ज्ञापनासाठी ------------ विभागाने सहमती दिली आहे.

## २९ आता क्रियापदाचे हे रूप पाहू या.

असे <u>कळवण्याचा</u> मला आदेश आहे. म्हणजे असे कळवायचा मला आदेश आहे.

धातू + ण्या + चा = धातू + आयचा उदा. कळवण्याचा

## ३० सराव.

| शिक्षक | विद्यार्थी |
| --- | --- |
| लोकशाहीत नागरिकांना बोलण्याचा (बोल) अधिकार असतो. | लोकशाहीत नागरिकांना बोलण्याचा अधिकार असतो. |
| लोकशाहीत लोकांना मत व्यक्त ------- (कर) अधिकार असतो. | लोकशाहीत लोकांना मत व्यक्त करण्याचा अधिकार असतो. |
| लोकशाहीत लोकांना विचार ------- (मांड) अधिकार असतो. | लोकशाहीत लोकांना विचार मांडण्याचा अधिकार असतो. |
| लोकशाहीत लोकांना माहिती ------- (माग) अधिकार असतो. | लोकशाहीत लोकांना माहिती मागण्याचा अधिकार असतो. |
| लोकशाहीत लोकांना स्पष्टीकरणं ------- (विचार) अधिकार असतो. | लोकशाहीत लोकांना स्पष्टीकरणं विचारण्याचा अधिकार असतो. |
| लोकशाहीत लोकांना व्यवसाय ------- (निवड) अधिकार असतो. | लोकशाहीत लोकांना व्यवसाय निवडण्याचा अधिकार असतो. |

## ३१ सराव. हीच वाक्ये धातू + आयचा वापरून म्हणू या.

| शिक्षक | विद्यार्थी |
| --- | --- |
| लोकशाहीत नागरिकांना बोलण्याचा (बोल) अधिकार असतो. | लोकशाहीत नागरिकांना बोलायचा अधिकार असतो. |
| लोकशाहीत लोकांना मत व्यक्त ------- (कर) अधिकार असतो. | लोकशाहीत लोकांना मत व्यक्त करायचा अधिकार असतो. |
| लोकशाहीत लोकांना विचार ------- (मांड) अधिकार असतो. | लोकशाहीत लोकांना विचार मांडायचा अधिकार असतो. |
| लोकशाहीत लोकांना माहिती ------- (माग) अधिकार असतो. | लोकशाहीत लोकांना माहिती मागायचा अधिकार असतो. |
| लोकशाहीत लोकांना स्पष्टीकरणं ------- (विचार) अधिकार असतो. | लोकशाहीत लोकांना स्पष्टीकरणं विचारायचा अधिकार असतो. |
| लोकशाहीत लोकांना व्यवसाय ------- (निवड) अधिकार असतो. | लोकशाहीत लोकांना व्यवसाय निवडायचा अधिकार असतो. |

## ३२ सराव. अधोरेखित शब्दाऐवजी खाली दिलेले शब्द वापरून वाक्ये तयार करू या.

| उदा॰ नागरिकांना आपले विचार सांगण्याचा अधिकार आहे. |
|---|
| परवानगी |
| आज्ञा |
| आदेश |
| स्वातंत्र्य |
| विनंती |

## ३३ पुढील परिच्छेदात कंसात दिलेल्या धातूचे ण्या + चा जोडून झालेले रूप भरू या.

आता आपल्याला आपली जीवनशैली बदलण्याची (बदल) गरज (स्त्री॰अ॰व॰) आहे. भारताकडे नैसर्गिक व मानवी संसाधने विपुल प्रमाणात आहेत. त्यांचा उपयोग करून सर्व श्रमजीवी लोकांचे पोट ------- (भर) प्रयत्न (पु॰ए॰व॰) केला पाहिजे. सर्वांना पर्यावरणाला अनुकूल असा रोजगार ------- (पुरव) सरकारचे कर्तव्य (नपु॰ए॰व॰) आहे. श्रमिकांनी स्थलांतर करू नये म्हणून त्यांना आपापल्या प्रांतातच शिक्षणसंस्था, आरोग्यकेंद्रे इ॰ ------- (बांध) कामे (नपु॰ए॰व॰) मिळाली पाहिजेत. कृषि, रोजगार, उर्जा अशा सर्वच क्षेत्रांमध्ये सुधारणा ------- (कर) कायदे (पु॰अ॰व॰) करायला हवेत म्हणजे जीवनमान------- (सुधार) अनेक संधी (स्त्री॰अ॰व॰) आपल्याला मिळतील.

## ३४ खाली दिलेल्या शब्दांवरून मूळ शब्द शोधू या.

| | | |
|---|---|---|
| उदा॰ | लाकडी | लाकूड |
| क. | रेशमी | ----------- |
| ख. | लोखंडी | ----------- |
| ग. | लोकरी | ----------- |
| घ. | कागदी | ----------- |
| च. | कापडी | ----------- |
| छ. | पितळी | ----------- |
| ज. | सुती | ----------- |

## ३५ रिकाम्या जागेत योग्य प्रत्यय भरू या.

**(ना, च्या, त, ने, चे)**

क. अर्थसंकल्पामुळे कृषिक्षेत्रा------ मोठी गुंतवणूक होणार आहे.

ख. शासना------ मेट्रो------ काम पूर्ण करण्याचा निर्णय घेतला आहे.

ग. उपनगरातल्या प्रवाशां------ तिकीटदरात सवलत मिळाली पाहिजे.

घ. बंगाल------ उपसागरात असलेले अंदमान हे पर्यटकांचे आवडते ठिकाण आहे.

## ३६ निविदा सूचना (tender notice) वाचू या.

**धुळे दुग्धशाळा प्रकल्प**
**निविदा सूचना**

पुढील बांधकामासाठी अ, ब, क आणि ड या वर्षांच्या मान्यताप्राप्त कंत्राटदारांकडून प्रत्येक बांधकामाकरिता एक स्वतंत्र निविदा याप्रमाणे ... नमुन्यात मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

अनुक्रमांक १ - बांधकामाचे नाव : धुळे येथील धुळे दूध योजनेच्या सीमारेषेवर लोखंडी कोन असलेल्या खांबांसह काटेरी तारेचे कुंपण घालणे. अंदाजित खर्च : रु. ... बयाणा. रक्कम : रु. ... जमानत ठेव रु. ... निविदांची कोरी प्रपत्रे देण्याचा कालावधी : दिनांक ... ते ... निविदा स्वीकारण्याची तारीख : दिनांक ... रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत (प्रमाणवेळ). कोऱ्या निविदापत्रांची किंमत : रु. ... (ना परतावा रक्कम)

अनुक्रमांक २ – बांधकामाचे नाव : धुळे येथील धुळे दुग्धशाळा प्रकल्पाच्या सध्याच्या निर्जंतुकीकरण व दूध प्रापण कक्षांचा विस्तार करण्यासाठी बांधकाम (८०’ X ४०’ व ४०’ X २०’), अंदाजित खर्चः – रु. ... बयाणा रक्कम : रु. ... जमानत ठेव : रु. ... निविदांची कोरी प्रपत्रे देण्याचा कालावधी : दिनांक ... ते ... निविदा स्वीकारण्याची तारीख : दिनांक ... रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत (प्रमाणवेळ). कोऱ्या निविदापत्रांची किंमत : रु. ... (ना परतावा रक्कम)

कोरी निविदापत्रे खाली सही करणाऱ्याच्या कार्यालयातून किंवा उप-अभियंता, दूध योजना बांधकाम उपविभाग चार, आबा रोड, धुळे यांच्या कार्यालयातून मिळू शकतील.

निविदा स्वीकारणे हे खाली सही करण्याऱ्या अधिकाऱ्यावर अवलंबून राहील आणि कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार त्याने आपल्याकडे राखून ठेवला आहे.

कार्यकारी अभियंता
दूध योजना बांधकाम विभाग, दोन
वरळी, मुंबई - १८

**शब्दार्थ :**

| नामे | क्रियापदे | इतर शब्द |
|---|---|---|
| ती दुग्धशाळा, त्या – dairy, dairies | कुंपण घालणे to fence | मान्यताप्राप्त recognised |
| तो कंत्राटदार, ते – contractor, -s | अवलंबून राहणे to depend | मोहोरबंद sealed |
| ती निविदा, त्या - tender, -s | नाकारणे to reject | लोखंडी iron |
| ती तार, त्या तारा wire, -s | राखून ठेवणे to reserve | काटेरी thorny |

| | | |
|---|---|---|
| ते कुंपण, ती कुंपणे / णं<br>fencing | | अंदाजित<br>estimated |
| तो विस्तार, ते –<br>expansion | | बयाणा<br>earnest money |
| ती योजना, त्या –<br>scheme, -s | | जमानत<br>bail money |
| ती सीमारेषा, त्या –<br>boundary line, -s | | कोरा<br>blank |
| तो कोन, ते –<br>corner, -s | | सध्याचा<br>current |
| तो खांब, ते –<br>pillar, -s | | ना परतावा रक्कम<br>non refundable |
| ते निर्जंतुकीकरण, –<br>desensitisation | | |
| ते प्रापण, –<br>procurement | | |
| ते प्रपत्र, ती प्रपत्रे / त्रं<br>form, -s | | |
| तो उप-अभियंता,<br>ते उप-अभियंते<br>deputy engineer, -s | | |
| ते कारण, ती कारणे / णं<br>reason, -s | | |

## ३७ वरील निविदा सूचनेतील ही वाक्यरचना पाहू या.

कोरी निविदापत्रे खाली सही करणाऱ्याच्या कार्यालयातून मिळू शकतील.

म्हणजे

कोरी निविदापत्रे खाली सही करणाऱ्या अधिकाऱ्याच्या कार्यालयातून मिळू शकतील.

करणाऱ्या अधिकाऱ्याच्या = करणाऱ्याच्या
करणाऱ्याच्या - धातू + णारा (सामान्यरूप) + चा

३८ **वरच्या वाक्याप्रमाणे खाली दिलेल्या वाक्यांमध्ये फक्त 'धातू+णारा' ची रूपे वापरून वाक्ये तयार करू या.**

उदा. विमानाने प्रवास <u>करणाऱ्या प्रवाशांनी</u> जास्त सामान बरोबर नेऊ नये.
विमानाने प्रवास <u>करणाऱ्यांनी</u> जास्त सामान बरोबर नेऊ नये.

क. स्कूटर <u>चालवणाऱ्या लोकांनी</u> हेल्मेट वापरावे.

ख. रस्त्यावरून <u>चालणाऱ्या मुलाला</u> पोलिसांनी फूटपाथवरून चालायला सांगितले.

ग. गर्दीत पाकीट <u>मारणाऱ्या माणसाला</u> लोकांनी पकडले.

घ. अफवा <u>पसरवणाऱ्या नागरिकांवर</u> गुन्हा दाखल केला जाईल.

च. कर <u>चुकवणाऱ्या माणसांची</u> नावे आयकर विभागाकडे असतात.

३९ **खाली दिलेले मराठी शब्द आणि त्यांचे इंग्रजी प्रतिशब्द यांच्या जोड्या जुळवू या.**

| अ | ब |
|---|---|
| क. निविदा | १. estimated |
| ख. प्रकल्प | २. earnest money |
| ग. अंदाजित | ३. procurement |
| घ. बयाणा | ४. bail deposit |
| च. जमानत ठेव | ५. tender |
| छ. प्रापण | ६. project |

४० **वरील निविदा सूचनेत आलेल्या खाली दिलेल्या शब्दांच्या योग्य अर्थावर ✓ अशी खूण करू या.**

क. कोरा : नवा ☐ न भरलेला ☐

ख. प्रपत्र : पत्र ☐ फॉर्म ☐

ग. दुग्धशाळा : डेअरी ☐ गोठा ☐

घ. कंत्राटदार : स्थापत्य अभियंता ☐ कंत्राटे घेणारा ☐

च. काटेरी : काटे वापरून जेवणारा ☐ काटे असलेला ☐

४१ **खाली दिलेल्या शब्दांमधले मूळ शब्द सांगू या.**

उदा. दुग्धशाळा ⟶ दुग्ध

क. कंत्राटदार ⟶ -----------

ख. मोहोरबंद → -----------

ग. मान्यताप्राप्त → -----------

घ. निर्जंतुकीकरण → -----------

च. काटेरी → -----------

## ४२ 'दार, बंद, प्राप्त, करण, शाळा' खाली दिलेल्या शब्दांना जोडून नवीन शब्द तयार करू या.

उदा. सोने + री = सोनेरी

क. जागतिक + ----------- = -----------

ख. हवा + ----------- = -----------

ग. पुरस्कार + ----------- = -----------

घ. वेध + ----------- = -----------

च. दुकान + ---------- = -----------

## ४३ आशयाधारित प्रश्न.

**एका शब्दात उत्तरे देऊ या.**

क. या सूचनेत किती निविदा मागवल्या आहेत?

ख. दुग्धशाळा प्रकल्प कोणत्या जिल्ह्यात आहे?

ग. कोरी प्रपत्रे कुठे मिळणार आहेत?

घ. कोरी प्रपत्रे मोफत मिळणार आहेत का?

च. निविदा स्वीकारली नाही तर किती पैसे परत मिळतील?

# अभिनंदन! अभिनंदन!!

## (प्रकटन, पृष्ठांकन आणि प्रमाणपत्र)

९




**चला, शिकू या ...**

- प्रकटन, पृष्ठांकन आणि प्रमाणपत्र वाचता येणे आणि समजणे
- बढतीबद्दल चर्चा करता येणे
- धातूला 'लेला' प्रत्यय जोडून तयार होणाऱ्या विशेषणांचा वापर करता येणे.
- काही शब्दयोगी पदे : -निहाय, -मार्फत, -नुसार (अनुसार) इ.
- धातू + ल्या + चे ही रचना वापरता येणे
- धातू + णे आवश्यक अस ही रचना वापरता येणे
- दिवसां + त, दिवसां + नी मधला फरक लक्षात घेणे
- सामान्यरूप न करण्याची शासकीय पद्धत लक्षात घेणे
- काही साधित शब्द

# अभिनंदन! अभिनंदन!! ९

## १ तुमच्या कार्यालयात कोणाला बढती मिळाली की तुम्ही काय करता? वर्गात चर्चा करू या.




## २ संवाद ऐकू आणि वाचू या. (शिक्षकांनी संवाद आधी ऐकवावा आणि मग विद्यार्थ्यांना वाचायला द्यावा.)



शहा : नमस्कार, काळेसाहेब.

काळे : नमस्कार, शहासाहेब. कसे आहात?

शहा : एकदम ठीक. तुम्ही सांगा, कसे आहात? अरे, हो. तुमचं अभिनंदन! बढती मिळाली ना तुम्हाला!

काळे : हो. कालच पत्र हातात आलं. मेल दोन दिवसांपूर्वीच आली होती.

शहा : वा! आता पार्टी पाहिजे बरं का!

काळे : अवश्य देऊ की पार्टी. तुम्हीपण दौऱ्यावर जाणार आहात ना?.

शहा : हो. उद्या औरंगाबादला जायचं आहे. तिथे ऑडिट आहे.

काळे : बरं, बरं. किती दिवसांचा दौरा?

शहा : चार दिवसांनी परत येणार.

काळे : जमल्यास अजिंठा-वेरूळही पाहून या. फार सुंदर लेणी आहेत.

शहा : हो. वेळ मिळाला तर अवश्य पाहीन. चला, चार दिवसांनी भेटू या. तुमचं पुन्हा एकदा मनापासून अभिनंदन! पार्टीचं मात्र लक्षात ठेवा बरं का!

काळे : हो, नक्की. तुम्ही परत आलात की सहकुटुंब आमच्याकडे जेवायलाच या.

शहा : अरे वा! हे फारच छान होईल. चला, आता निघतो. ऑडिटची तयारी करायची आहे.

काळे : अच्छा.

## ३ चूक की बरोबर? ✓ किंवा X खूण करू या.

क. काळेसाहेबांना बढतीचं पत्र मिळालं आहे.
ख. शहासाहेब अजिंठा वेरूळची लेणी पाहायला औरंगाबादला जाणार आहेत.
ग. दौरा तीन दिवसांचा आहे.
घ. काळेसाहेब शहासाहेबांना जेवायला बोलावणार आहेत.

## ४ बरोबर उत्तर निवडू या.

क. शहासाहेब काळेसाहेबांचं अभिनंदन का करत आहेत?
१. त्यांची बदली झाली आहे म्हणून.
२. त्यांना बढती मिळाली आहे म्हणून.

ख. शहासाहेब काळेसाहेबांकडे काय मागतात?
१. पार्टी.
२. पेढे.

ग. दौऱ्यावर कोण जाणार आहे?
१. शहासाहेब.
२. काळेसाहेब.

घ. शहासाहेब काळेसाहेबांकडे एकटेच जेवायला जाणार आहेत का?
१. हो.
२. नाही.

## ५ हे प्रकटन वाचू या.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४

**प्रकटन**

विषय – माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा मार्च २०१८ चा निकाल

मंडळामार्फत मार्च २०१८ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपद्धतीनुसार जाहीर करण्यात येत आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत मार्च २०१८ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपद्धतीनुसार अधिकृत संकेतस्थळावर शुक्रवार, दि. ०८-०६-२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात येत आहे.

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) मार्च २०१८ परीक्षेस प्रविष्ट झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे विषयनिहाय संपादित केलेले गुण खालील संकेतस्थळांवरून उपलब्ध होतील व सदर माहितीची प्रत (प्रिंट) घेता येईल. मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळाचे पत्ते पुढीलप्रमाणे आहेत.

१. www.mahresult.nic.in
२. www.sscresult.mkcl.org
३. www.maharashtraeducation.com

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा मार्च २०१८ चा निकाल एसएमएस सेवेद्वारे मोबाईल फोनवरून खालील मोबाईल ऑपरेटरद्वारे उपलब्ध होतील.

**Mobile short code**

| Service provider | Mobile operator | Short code to send SMS | SMS format |
|---|---|---|---|
| BSNL | BSNL | 57766 | MHSSC <space> <seat number> and send to Short code 57766 |

www.mahresult.nic.in या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांच्या निकालाबरोबरच वेगवेगळी सांख्यिकी माहिती उपलब्ध होईल.

सदर निकालाबाबतचा अन्य तपशील पुढीलप्रमाणे –

१. ऑनलाईन निकालानंतर लगेचच दुसऱ्या दिवसापासून गुणपडताळणी व छायाप्रतीसाठी अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी आवश्यक त्या अर्जाचा नमुना मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. संकेतस्थळावरील अर्जाची प्रत काढून अर्ज भरता येईल. यासंदर्भात आवश्यकता असल्यास माहितीसाठी संबंधित विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा. गुणपडताळणीसाठी संकेतस्थळावरील गुणपत्रिकेच्या स्वसाक्षांकित प्रतीसह शनिवार, दिनांक ०९-०६-२०१८ ते सोमवार, दिनांक १८-०६-२०१८ पर्यंत विहित शुल्क भरून अर्ज करता येईल व छायाप्रतीसाठी शनिवार, दिनांक ०९-०६-२०१८ ते गुरुवार, दिनांक २८-०६-२०१८ पर्यंत विहित शुल्क भरून अर्ज करता येईल.

२. मार्च २०१८ परीक्षेमधील उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्यांकन करण्यासाठी प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य असून छायाप्रत मिळाल्याच्या दुसऱ्या दिवसापासून त्यापुढील पाच कार्यालयीन कामाच्या दिवसांत पुनर्मूल्यांकनाच्या कार्यपद्धतीचा अवलंब करून विहित नमुन्यात विहित शुल्क भरून संबंधित विभागातील मंडळाकडे विद्यार्थ्यांना अर्ज करणे आवश्यक राहील. ज्या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करावयाचे असेल त्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

३. सर्व विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची संपादणूक सुधारण्यासाठी श्रेणी-गुणसुधार (Class Improvement Scheme) योजनेअंतर्गत पुनःश्च परीक्षेस प्रविष्ट होण्याची संधी सन २००८ पासून उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानुसार मार्च २०१८ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेत सर्व विषयांसह प्रविष्ट होऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लगतच्या दोन परीक्षांमध्ये म्हणजेच जुलै-ऑगस्ट २०१८ व मार्च २०१८ अशा दोनच संधी उपलब्ध राहतील.

(डॉ. अशोक भोसले)
प्र. सचिव, राज्यमंडळ, पुणे, ०४.

**शब्दार्थ :**

| नामे | क्रियापदे | इतर शब्द |
|---|---|---|
| ते प्रकटन, ती प्रकटने / नं<br>disclosure, -s | परीक्षा होणे<br>to conduct an examination | माध्यमिक<br>secondary |
| तो निकाल, ते –<br>result, -s | जाहीर करणे<br>to disclose | अधिकृत<br>official / authorised |
| ती कार्यपद्धती, त्या–<br>procedure, -s | प्रविष्ट होणे<br>to appear | दुपारी<br>in the afternoon |
| तो गुण, ते –<br>mark, -s | संपर्क साधणे<br>to contact | विषयनिहाय<br>subject-wise |
| तो तपशील, ते –<br>detail, -s | अर्ज करणे<br>to apply | संपादित<br>acquired |
| ती गुणपडताळणी, –<br>verification | अर्ज भरणे<br>to fill application form | सांख्यिकी<br>statistical |
| ती छायाप्रत, त्या छायाप्रती<br>photocopy, photocopies | शुल्क भरणे<br>to pay fees | आवश्यकता<br>necessary |
| ती संधी, त्या –<br>opportunity, opportunities | पुनर्मूल्यांकन करणे<br>to revaluate | विभागीय<br>divisional |
| ती उत्तरपत्रिका, त्या –<br>answer paper, -s | उत्तीर्ण होणे<br>to pass | स्वसाक्षांकित<br>self attested |
| तो संपर्क, –<br>contact | उपलब्ध करून देणे<br>to make available | प्रथम<br>first |
| ती गुणपत्रिका, त्या –<br>marksheet, -s | | कार्यालयीन<br>office related |
| ते शुल्क, ती शुल्के / कं<br>fee, -s | | अनिवार्य<br>inevitable |
| तो सुधार, –<br>improvement | | लगतच्या<br>abutting |
| ते पुनर्मूल्यांकन,<br>ती पुनर्मूल्यांकने / नं<br>revaluation, -s | | |

| | | |
|---|---|---|
| ती संपादणूक, त्या संपादणुका<br>achievement, -s | | |
| ती श्रेणी, त्या श्रेण्या<br>class, -s | | |

## ६ खाली दिलेला तक्ता पाहू या.

**सामान्य रूप – वाच + लेल्या**

| ए.व. | | अ.व. | |
|---|---|---|---|
| वाच + लेला | निबंध | वाच + लेले | लेख |
| वाच + लेली | कविता | वाच + लेल्या | बातम्या |
| वाचलेले / लं | पुस्तक | वाचलेली | पत्रे / त्रं |

वाच + लेले पुस्तक = वाचलेले पुस्तक = जे पुस्तक वाचले आहे / होते ते.
धातूला 'लेला' प्रत्यय जोडून तयार झालेले क्रियापदाचे रूप विशेषणाचे काम करते.

वर दिलेल्या प्रकटनातही अशी रूपे वापरली आहेत.

उदा. घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल.
विषयनिहाय संपादित केलेले गुण.
प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांचे गुण.

## ७ सराव.

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| ऐकलेली बातमी | ऐकलेली बातमी |
| कविता | ऐकलेली कविता |
| भाषण | ऐकलेले भाषण |
| बातम्या | ऐकलेल्या बातम्या |
| प्रश्न | ऐकलेले प्रश्न |
| गाणी | ऐकलेली गाणी |
| विधाने | ऐकलेली विधाने |
| सल्ले | ऐकलेले सल्ले |
| प्रश्नोत्तरे | ऐकलेली प्रश्नोत्तरे |

## ८ आता काही धातूंपासून तयार झालेली रूपे पाहू या.

| | | | |
|---|---|---|---|
| बस | बस + लेला = बसलेला | दे | दि + लेला = दिलेला |
| टाक | टाक + लेला = टाकलेला | खा | खाल् + लेला = खाल्लेला |
| ठेव | ठेव + लेला = ठेवलेला | धू | धुत + लेला = धुतलेला |
| ये | आ + लेला = आलेला | घाल | घात + लेला = घातलेला |
| जा | गे + लेला = गेलेला | सांग | सांगित + लेला = सांगितलेला |
| हो | झा + लेला = झालेला | घे | घेत + लेला = घेतलेला |
| मर | मे + लेला = मेलेला | पाह | पाहि + लेला = पाहिलेला |
| कर | के + लेला = केलेला | लिही | लिहि + लेला = लिहिलेला |

## ९ पुढे दिलेल्या वाक्यांशामध्ये जो ... तो ची रूपे वापरू या.

उदा॰ आणलेला चहा - जो चहा आणला तो.
दिलेली देणगी - जी देणगी दिली ती
पाठवलेले पत्र - जे पत्र पाठवले ते.

क. दिलेला निरोप -
ख. घेतलेल्या कार्यशाळा -
ग. झालेली बैठक -
घ. निवडून आलेले नेते -
च. काढलेली परिपत्रके -
छ. छापलेले पुस्तक -

मूळ स्वरूपात – in original
जातीने – in person
व्यवहारात – in practice
सुस्थितीत / नियमानुसार – in order
अंमलात / चालू असलेला – in operation

## १० आता धातू + लेला चे योग्य रूप वापरून वाक्यांश तयार करू या.

उदा॰ जी परीक्षा झाली ती. - झालेली परीक्षा

क. जो मोर्चा काढला तो.
ख. ज्या मुली कार्यक्रमाला आल्या त्या.
ग. जी खरेदी केली ती.
घ. जे कुर्ते विकत घेतले ते.
च. जी मॅच जिंकली ती.
छ. जे दृश्य पाहिले ते.
ज. जी माणसं रस्त्यावर झोपली ती.

## ११ धातू + लेला च्या रूपापुढे योग्य शब्द लिहू या.

उदा. आणलेली – आणलेली भाजी.

क. नेसलेली -----------

ख. खाल्लेल्या -----------

ग. शिवलेले -----------

घ. ठेवलेली -----------

च. विकत घेतलेला -----------

छ. गेलेला -----------

ज. लावलेल्या -----------

झ. तोडलेले -----------

## १२ ही वाक्यरचना पाहू या.

विद्यार्थ्यांनी पाच कार्यालयीन कामाच्या दिवसांत अर्ज केले पाहिजेत.
अर्ज केल्यानंतर पाच दिवसांनी निकाल मिळेल.

पाच दिवसांत = पाच दिवसांच्या आत = पाचवा दिवस पूर्ण होण्याआधी
पाच दिवसांनी = पाच दिवसांनंतर

## १३ खालील वाक्यांमध्ये दिलेल्या शब्दांना त किंवा ने / नी यातला योग्य प्रत्यय जोडून रिकाम्या जागेत भरू या.

उदा. (सेकंद) केदार सहा मिनिटं आणि वीस सेकंदांत चारशे मीटर पोहला.
तीन मिनिटं आणि बारा सेकंदांनी ओव्हन बंद कर.

क. मिनिट
१. मॅगी नुडल्स दोन ----------- तयार होतात.
२. गॅस बंद केल्यावर दोन ----------- पातेल्यावरचं झाकण काढ.

ख. तास
१. एकेका ----------- या गोळ्या घ्या.
२. या औषधाने एका ----------- तुमचा ताप उतरेल.

ग. आठवडा
१. तीन ----------- झाडाला फळं कशी लागतील?
२. तीन ----------- त्याला हॉस्पिटलमधून घरी सोडलं.

घ. महिना
१. एका ----------- तुला तीन वेळा दौऱ्यावर जावं लागलं.
२. एक ----------- तुम्ही पुन्हा मला भेटायला या.

च. वर्ष
१. त्याने दीड ----------- प्रबंध लिहून पूर्ण केला.
२. एकदा गेला की तो दीड ----------- परत येईल.

## १४ खाली दिलेले शब्द कोणत्या दोन शब्दांनी तयार झाले आहेत ते लिहू या.

उदा॰ उत्तरपत्रिका – उत्तर + पत्रिका

क. गुणपडताळणी – --------- + ----------
ख. छायाप्रत – --------- + ----------
ग. गुणपत्रिका – --------- + ----------
घ. मूल्यांकन – --------- + अंकन
च. शालान्त – --------- + ----------
छ. कार्यपद्धती – --------- + ----------

File in play – चालू फाईल
File in question – संबंधित फाईल
File not traceable – फाईल सापडत नाही
Closed file – पूर्ण झालेली फाईल

## १५ पुढे दिलेल्या शब्दांमधला मूळ शब्द ओळखू या.

उदा॰ विभागीय : विभाग

क. संपादकीय – --------------------
ख. पडताळणी - --------------------
ग. माध्यमिक - --------------------
घ. कार्यालयीन - --------------------
च. सांख्यिकी - --------------------

## १६ खाली दिलेल्या वाक्यांमध्ये योग्य शब्दयोगी पदे रिकाम्या जागी भरू या.

**-बरोबर (with), -निहाय (wise), -मार्फत (through), -अंतर्गत (included), -साठी (for), -नुसार (according to)**

क. अर्थसंकल्पा -------- परकीय गुंतवणुकीला प्रोत्साहन दिले जाणार आहे.
ख. राष्ट्रीय भरती मंडळा ------- तरुणांना रोजगार मिळणार आहे.
ग. नव्या योजने ------- आणखी १०० विमानतळ उभारले जाणार आहेत.
घ. लोकसभेच्या निवडणुकां ------- विधानसभेच्याही निवडणुका घ्याव्यात असे काही पक्षांचे मत आहे.
च. केंद्र सरकारकडे राज्य ------- सर्वसामान्यांची स्थिती दाखवणारे पोर्टल असतात.
छ. अर्थसंकल्पात पिण्याच्या स्वच्छ पाण्या ------- तरतूद आहे.

## १७ या अर्थांसाठी वरील प्रकटनात कोणते शब्द वापरले आहेत?

उदा॰ एखादी गोष्ट खरोखरीच आहे हे स्वतः सिद्ध केलेले : स्वसाक्षांकित.

क. मार्क : -------.

ख. फी : -------.

ग. विषयवार : -------.

घ. संख्याशास्त्राप्रमाणे : -------.

च. परीक्षेला बसलेले : -------.

छ. लिहून दिलेले : -------.

ज. झेरॉक्स : -------.

## १८ आशयाधारित प्रश्न. उत्तरांचे योग्य पर्याय निवडू या.

क. शालान्त परीक्षा कितवीत असते?
१. बारावीत २. दहावीत

ख. २०१८ साली निकाल केव्हा जाहीर झाला?
१. ८ तारखेला २. ६ तारखेला.

ग. महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची किती विभागीय मंडळे आहेत?
१. नऊ २. बारा

घ. विद्यार्थ्यांना आपापले गुण कसे कळतात?
१. संकेतस्थळ व मोबाईलवरून २. शाळेतून

च. गुणपडताळणीच्या अर्जासाठी कोणत्या गोष्टी आवश्यक आहेत?
१. गुणपत्रिकेची छायाप्रत २. गुणपत्रिकेची स्वसाक्षांकित प्रत आणि त्यासाठीची फी.

छ. संपादणूक सुधारणे म्हणजे...
१. परीक्षेत उत्तीर्ण होणे. २. पुन्हा परीक्षा देऊन जास्त गुण मिळवणे.

## १९ आता हे प्रकटन वाचू या.

(पुणे महानगरपालिका, अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम)
पुणे महानगरपालिका
अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम
निर्मूलन विभाग

पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये पुणे महानगरपालिकेच्या मिळकतीवर / रस्त्यांवर सुरू असलेले अनधिकृत आठवडे बाजार त्वरित बंद करणेबाबत

**जाहीर प्रकटन**

शासन निर्णय क्र. कृपमं. ०८१६/प्र.क्र.११९/२१ स. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र सासन, दि. १२ ऑगस्ट २०१६ व महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन परिपत्रक

क्र. संकीर्ण – २०१६/प्र.क्र.३५३/ नवि.– २०, मंत्रालय मुंबई दि. २४ ऑगस्ट २०१६ नुसार पुणे महानगरपालिकामधील शेतकरी आठवडे बाजाराबाबत महाराष्ट्र राज्य कृषी पणन महामंडळ यांचेतर्फे शेतकरी बाजार आयोजक यांची नेमणूक करणेबाबत व नियंत्रण ठेवणेबाबत आदेश प्रस्तुत आहेत. मा. व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांनी दि. १८-१२-२०१९ रोजीचे पत्रान्वये पुणे महानगरपालिकेच्या मिळकतींवर / रस्त्यांवर सुरू असलेले अनधिकृत आठवडे बाजारास कोणतीही परवानगी दिली नसल्याचे व सदर जागा पणन मंडळास हस्तांतर झाली नसल्याने या जागेवर आयोजकांची नेमणूक केली नसल्याचे कळविले आहे. तसेच पणन मंडळाने परवानगी दिलेली नाही. अशा आठवडे बाजारावर कारवाई करण्याची संपूर्ण जबाबदारी पुणे महानगरपालिकेची असल्याचे कळविले आहे.

सध्या पुणे महानगरपालिका हद्दीत बहुतांश ठिकाणी अशा प्रकारे अनधिकृतपणे शेतकरी आठवडे बाजार सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा प्रकारच्या अनियंत्रित शेतकरी आठवडे बाजारांमुळे बहुतांश ठिकाणी वाहतूक कोंडी, साफसफाई नसणे, बाजार संपल्यावर कचरा न उचलल्याने अस्वच्छता पसरल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना व स्थानिक रहिवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. तसेच या संदर्भात विविध तक्रारी पुणे महानगरपालिकेकडे प्राप्त झाल्या आहेत.

रीतसर परवानगी घेऊन व योग्यप्रकारे नियोजन करून शेतकरी आठवडे बाजार भरवणेबाबत महानगरपालिकेचे प्रयोजन आहे. त्यामुळे अशा प्रकारे चालू असलेल्या अनधिकृत शेतकरी आठवडे बाजारांवर कारवाई करणे आवश्यक आहे.

तरी या जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये पुणे महानगरपालिकेच्या मिळकतीवर / रस्त्यांवर सुरू असलेले सर्व अनधिकृत शेतकरी आठवडे बाजार या जाहीर प्रकटनाचे दिनांकापासून ७ दिवसाचे आत त्वरित बंद करणे, अन्यथा पुणे महानगरपालिकेतर्फे महानगरपालिकेच्या मिळकतींवर / रस्त्यांवर सुरू असलेल्या अनधिकृत शेतकरी आठवडे बाजारावर निष्कासनाची कारवाई करण्यात येईल व सदर कारवाईदरम्यान साहित्य, फळे, भाजीपाला इत्यादी यांची नासाडी-नुकसान झाल्यास याची संपूर्ण जबाबदारी संबंधित आयोजकाची राहील याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरी –
(माधव जगताप), उप आयुक्त
(अतिक्रमण-अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग)
पुणे महानगरपालिका.

**शब्दार्थ :**

| **नाम** | **क्रियापद** | **इतर शब्द** |
|---|---|---|
| ती महानगरपालिका, त्या – municipality, municipalities | निदर्शनास येणे to come to notice | अनधिकृत unauthorised |
| ते अतिक्रमण, ती अतिक्रमणे / णं encroachment, -s | बंद करणे to close | जाहीर declared |
| ते निर्मूलन, – eradication | नेमणूक करणे to appoint | आठवडे बाजार weekly market |

| | | |
|---|---|---|
| ती हद्द, त्या हद्दी<br>border, -s | नियंत्रण ठेवणे<br>to control | संपूर्ण<br>whole |
| ती मिळकत, त्या मिळकती<br>earning, -s | प्रस्तुत असणे<br>to be relevant | बहुतांश<br>almost |
| तो बाजार, ते –<br>market, -s | परवानगी देणे<br>to give permission | अनियंत्रित<br>uncontrolled |
| ते पणन, –<br>marketing | हस्तांतर होणे<br>to transfer | स्थानिक<br>local |
| तो वस्त्रोद्योग, ते –<br>textile business, -es | नियोजन करणे<br>to do planning | अन्यथा<br>otherwise |
| तो-ती आयोजक, ते त्या –<br>organiser, -s | नासाडी करणे<br>to get rotten | रीतसर<br>formal / regular |
| ती परवानगी, –<br>permission, -s | सहन करणे<br>to tolerate | |
| ती कोंडी, –<br>deadlock | प्राप्त होणे<br>to get | |
| ते मंडळ, ती मंडळे / ळं<br>board, -s | | |
| ती जबाबदारी, त्या जबाबदाऱ्या<br>responsibility, responsibilities | | |
| ती साफसफाई, –<br>cleaning | | |
| तो कचरा, –<br>garbage | | |
| तो / ती रहिवासी, ते / त्या –<br>resident, -s | | |
| ते नियोजन, –<br>planning | | |
| तो दिनांक, ते –<br>date, -s | | |

| | | |
|---|---|---|
| ते निष्कासन, – expulsion | | |
| तो भाजीपाला, – vegetable, -s | | |
| ती नासाडी, – destruction | | |
| ते नुकसान, – damage | | |

## २० वर दिलेल्या प्रकटनातील ही वाक्ये पाहू या.

- रस्त्यांवर सुरू असलेल्या आठवडे बाजारास कोणतीही परवानगी **दिली नसल्याचे** कळवले आहे.

  म्हणजेच

  रस्त्यांवर सुरू असलेल्या आठवडे बाजारास कोणतीही परवानगी **दिली नाही** हे कळवले आहे.
- आठवडे बाजारावर कारवाई करण्याची संपूर्ण जबाबदारी पुणे महानगरपालिकेची **असल्याचे** कळवले आहे.

  म्हणजेच

  आठवडे बाजारावर कारवाई करण्याची संपूर्ण जबाबदारी पुणे महानगरपालिकेची **आहे** हे कळवले आहे.

## २१ सराव.

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| सुनंदाने काम झाल्याचे कळवले. | सुनंदाने काम झाल्याचे कळवले. |
| केल्याचे | सुनंदाने काम केल्याचे कळवले. |
| संपल्याचे | सुनंदाने काम संपल्याचे कळवले. |
| दिल्याचे | सुनंदाने काम दिल्याचे कळवले. |
| संपवल्याचे | सुनंदाने काम संपवल्याचे कळवले. |
| बिघडल्याचे | सुनंदाने काम बिघडल्याचे कळवले. |
| आवडल्याचे | सुनंदाने काम आवडल्याचे कळवले. |

## २२ सराव.

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| वरुणने अभ्यास झाल्याचे सांगितले. | वरुणने अभ्यास झाल्याचे सांगितले. |
| काम | वरुणने काम झाल्याचे सांगितले. |
| स्वैपाक | वरुणने स्वैपाक झाल्याचे सांगितले |
| मुलगी | वरुणने मुलगी झाल्याचे सांगितले |
| लग्न | वरुणने लग्न झाल्याचे सांगितले |
| निर्णय | वरुणने निर्णय झाल्याचे सांगितले |

## २३ सराव.

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| आम्हाला सचिवांनी अधिसूचना काढल्याचे कळले. | आम्हाला सचिवांनी अधिसूचना काढल्याचे कळले. |
| आदेश | आम्हाला सचिवांनी आदेश काढल्याचे कळले. |
| शासन निर्णय | आम्हाला सचिवांनी शासन निर्णय काढल्याचे कळले. |
| परिपत्रक | आम्हाला सचिवांनी परिपत्रक काढल्याचे कळले. |
| प्रसिद्धिपत्रक | आम्हाला सचिवांनी प्रसिद्धिपत्रक काढल्याचे कळले. |
| जाहिराती | आम्हाला सचिवांनी जाहिराती काढल्याचे कळले. |
| तिकीट | आम्हाला सचिवांनी तिकीट काढल्याचे कळले. |
| फोटो | आम्हाला सचिवांनी फोटो काढल्याचे कळले. |

## २४ ह्या दोन प्रकारच्या वाक्यांमधला फरक लक्षात घेऊ या.

| | |
|---|---|
| वरुणने काकांनी निरोप दिल्याचे सांगितले. | वरुणने काकांनी निरोप दिला हे सांगितले. |
| वरुणने काकांनी बातमी दिल्याचे सांगितले. | वरुणने काकांनी बातमी दिली हे सांगितले. |
| वरुणने काकांनी मत दिल्याचे सांगितले. | वरुणने काकांनी मत दिले हे सांगितले. |

## २५ खाली दिलेल्या वाक्यांमध्ये 'हे' वापरू या.

उदा० प्राचीने आम्हाला आपले लग्न ठरल्याचे सांगितले.
प्राचीने आम्हाला आपले लग्न ठरले हे सांगितले.

क. संयोजकांनी कार्यक्रमाची तारीख ठरल्याचे कळवले.
ख. सदानंदरावांनी ते स्वतः मुंबईला येणार असल्याचे कळवले.
ग. विद्याताईंनी सईचा साखरपुडा झाल्याचे सांगितले.
घ. एजंटने तिकिटे शिल्लक नसल्याचे सांगितले.
च. संजयने सहलीची जागा बदलल्याचे कळवले.
छ. साहेबांनी विनायकला त्याची बदली केल्याचे सांगितले.

## २६ वरील प्रकटनात आलेली ही वाक्यरचना लक्षात घेऊ या.

आठवडे बाजारांवर कारवाई करणे आवश्यक आहे. = आठवडे बाजारांवर कारवाई केली पाहिजे.
It is necessary to take action on weekly markets. = Action must be taken on weekly markets.

## २७ सराव.

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| नागरिकांनी मिळकतीवर कर भरणे आवश्यक आहे. | नागरिकांनी मिळकतीवर कर भरणे आवश्यक आहे. |
| नागरिकांनी मतदान करणे आवश्यक आहे. | नागरिकांनी मतदान करणे आवश्यक आहे. |
| नागरिकांनी राष्ट्रगीतासाठी उभे राहणे आवश्यक आहे. | नागरिकांनी राष्ट्रगीतासाठी उभे राहणे आवश्यक आहे. |
| नागरिकांनी स्वच्छता राखणे आवश्यक आहे. | नागरिकांनी स्वच्छता राखणे आवश्यक आहे. |
| नागरिकांनी सर्व जातीधर्मांचा आदर करणे आवश्यक आहे. | नागरिकांनी सर्व जातीधर्मांचा आदर करणे आवश्यक आहे. |

## २८ सराव.

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| नागरिकांनी कर भरणे आवश्यक आहे. | नागरिकांनी कर भरणे आवश्यक आहे. |
| नागरिकांनी कर भरला पाहिजे. | नागरिकांनी कर भरला पाहिजे. |

| | |
|---|---|
| नागरिकांनी मतदान करणे आवश्यक आहे. | नागरिकांनी मतदान करणे आवश्यक आहे. |
| नागरिकांनी मतदान केले पाहिजे. | नागरिकांनी मतदान केले पाहिजे. |
| नागरिकांनी स्वच्छता राखणे आवश्यक आहे. | नागरिकांनी स्वच्छता राखणे आवश्यक आहे.. |
| नागरिकांनी स्वच्छता राखली पाहिजे | नागरिकांनी स्वच्छता राखली पाहिजे |
| नागरिकांनी सर्व धर्मांचा आदर करणे आवश्यक आहे. | नागरिकांनी सर्व धर्मांचा आदर करणे आवश्यक आहे. |
| नागरिकांनी सर्व धर्मांचा आदर केला पाहिजे. | नागरिकांनी सर्व धर्मांचा आदर केला पाहिजे. |
| नागरिकांनी पाणी जपून वापरणे आवश्यक आहे. | नागरिकांनी पाणी जपून वापरणे आवश्यक आहे. |
| नागरिकांनी पाणी जपून वापरले पाहिजे. | नागरिकांनी पाणी जपून वापरले पाहिजे. |

## २९ दिलेल्या वाक्यांमध्ये ‘धातू + णे + आवश्यक’ अस’ ही वाक्यरचना वापरू या.

उदा॰ पावसाळ्यात पिण्याचे पाणी उकळले पाहिजे. पावसाळ्यात पिण्याचे पाणी उकळणे आवश्यक आहे.

क. आता प्रत्येकाने कॉम्प्युटरवर काम केले पाहिजे.
ख. नागरिकांनी आधारकार्ड जवळ ठेवले पाहिजे.
ग. परदेशात फिरताना आपण पासपोर्ट सांभाळला पाहिजे.
घ. विद्यार्थ्यांनी भरपूर वाचन केले पाहिजे.
च. उमेदवारांची निवड गुणवत्तेनुसार झाली पाहिजे.

## ३० अ, ब आणि क गटातल्या वाक्यांशाच्या जोड्या जुळवून वाक्ये तयार करू या.

| | अ | ब | क |
|---|---|---|---|
| क. | प्रत्येकाने एकेक झाड | येणे | आवश्यक आहे. |
| ख. | भाजीवाल्यांनी भाजीचा कचरा | लिहिणे | |
| ग. | मुलांनी रोज वृत्तपत्र | पाळणे | |
| घ. | दुकानदारांनी दुकानावरच्या पाट्या मराठीत | असणे | |
| च. | महाराष्ट्रात राहणाऱ्यांनी मराठी | उचलणे | |
| छ. | मुलांना मराठी | लावणे | |
| ज. | वाहनचालकांनी सिग्नल | वाचणे | |
| झ. | वाहन चालवायचा परवाना चालकाजवळ | बोलणे | |

## ३१ अनौपचारिक / नेहमीची मराठीची रूपे लिहू या.

| | | |
|---|---|---|
| उदा. | करणेबाबत | करण्याबाबत |
| क. | रोजीचे पत्रान्वये | -------------- |
| ख. | सुरू असलेले अनधिकृत आठवडे बाजारास | -------------- |
| ग. | भरविणेबाबत | -------------- |
| घ. | प्रकटनाचे दिनांकापासून | -------------- |
| च. | सात दिवसाचे आत | -------------- |

## ३२ अधोरेखित शब्दापासून तयार होणारा शब्द त्यापुढच्या रिकाम्या जागेत भरू या.

उदा. या वर्षीच्या सामन्यांची जबाबदारी कोण घेणार?
सामने झाले नाहीत तर त्याला व्यवस्थापन जबाबदार नाही.

क. सरकार किती वर्षे प्रभारी अधिकारी नेमणार? कायमस्वरूपी ---------- केव्हा होणार?

ख. चर्चासत्राचे आयोजन सोपे नाही. ---------- च सगळी कामे करत असतो.

ग. प्रवीणला आता चांगले पैसे मिळतात. आता तो ---------- करही भरतो.

घ. कोणत्याही स्थानी बदली झाली तरी ---------- भाषा शिकावीच लागते.

च. बंदमुळे सगळी फुलं नासली. मालाची भरपूर ---------- झाली.

## ३३ खालील शब्दांच्या योग्य अर्थापुढे अशी ✓ खूण करू या.

क. आठवडे बाजार - १. आठवड्यातून एकदा भरणारा बाजार
२. आठवडे गावात भरणारा बाजार

ख. वाहतूक कोंडी - १. सर्व वाहनांना एका मोठ्या मैदानात कोंडणे
२. वाहनांची गर्दी झाल्यामुळे वाहनांना पुढे जाता न येणे.

ग. प्रयोजन - १. आयोजन
२. हेतू

घ. नासाडी - १. खराब होऊन नाश होणे
२. साडी घेऊ न शकणे

च. हस्तांतर - १. हातात हात घेणे
२. एखादी गोष्ट दुसऱ्याच्या नावावर लिहून देणे

छ. निष्कासन - १. हाकलून देणे
२. बसायला आसन देणे.

## ३४ खाली दिलेल्या शब्दांचे समानार्थी शब्द निवडू या.

**(शेती, अनुमती, व्यापार, लगेच, सप्ताह, स्वच्छता, कापड)**

क. आठवडा - ----------  ख. वस्त्र - ----------  ग. परवानगी - ----------

घ. पणन - ----------  च. त्वरित - ----------  छ. कृषी - ----------

ज. सफाई - ----------

## ३५ विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या जुळवू या.

| अ | ब |
|---|---|
| क. परवानगी | १. फायदा |
| ख. अधिकृत | २. अस्वच्छता |
| ग. स्वच्छता | ३. गुप्त |
| घ. नुकसान | ४. बंदी |
| च. जाहीर | ५. अनधिकृत |

## ३६ खालील क्रियापदे निवडून दिलेली वाक्ये पूर्ण करू या.

**(देणार नाहीत, सहन केला, सुरू आहेत, नोंद घेतली, आले आहे, बंद करतात)**

उदा॰ ते रात्री उशिरा दुकान बंद करतात.

क. मंत्र्यांनी पोलिसांच्या तक्रारीची -------- --------.

ख. प्रमिलाताईंनी नोकरीसाठी खूप त्रास -------- --------.

ग. तुम्ही रोज उशिरा येता असे माझ्या निदर्शनास -------- --------.

घ. मुलीच्या आंतरजातीय विवाहाला ते परवानगी -------- --------.

च. जयश्रीचे योगासनांचे वर्ग अजून -------- -------- का?

## ३७ आशयाधारित प्रश्न.

**प्रश्न आणि उत्तरे यांच्या योग्य जोड्या जुळवू या.**

| | |
|---|---|
| क. आठवडे बाजार कुठे सुरू आहे? | १. कृषि पणन मंडळाची. |
| ख. कृषिपणन मंडळाने अजूनपर्यंत आयोजकांची नेमणूक का केली नाही? | २. शेतकरी भाजीपाल्याचा कचरा उचलत नाहीत म्हणून. |
| ग. नागरिक महानगरपालिकेकडे कोणती तक्रार करतात? | ३. भाजीपाला, फळं इ.ची नासाडी होईल. |
| घ. बाजारात स्वच्छता का नसते? | ४. पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत. |
| च. आठवडे बाजारावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी कोणाची आहे? | ५. बाजाराची जागा अजून कृषि पणन मंडळाची नाही म्हणून. |
| छ. अनधिकृत आठवडे बाजार हलवले नाहीत तर काय परिणाम होईल? | ६. बाजारातल्या अस्वच्छतेची व वाहतूककोंडीच्या त्रासाची. |

## ३८ पृष्ठांकन वाचू या.

पृष्ठांकन

क्रमांक ...
सामान्य प्रशासन विभाग
दिनांक ...

विषय – ग्रामीण ध्वनिक्षेपक उपविभाग
विभागाद्वारे सामूहिक रेडिओ तयार करणे

ज्ञापन

अभियंता ग्रामीण ध्वनिक्षेपण, उपविभाग, मुंबई, यांना शासन निर्णय क्र. ... दिनांक ... च्या संदर्भात असे कळवण्याचा मला आदेश आहे की, विधानसभेने मान्यता दिलेली आणि शासकीय पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्र. ... यानुसार त्याजकडे सोपविलेली ... रु.ची पूरक मागणीची रक्कम, ही शासकीय ज्ञापन, वित्त विभाग, क्र. ... यानुसार आकस्मिकता निधीतून मंजूर करण्यात आलेल्या आगाऊ रकमेची भरपाई करण्यासाठी व चालू वर्षाच्या राहिलेल्या कालावधीतील खर्चाची तरतूद करण्यासाठी दिलेली आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(सही)
अपर सचिव, महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग

पृष्ठांकन
प्रभारी अभियंता
ग्रामीण ध्वनिक्षेपण उपविभाग,
इरोस चित्रपटगृहाची इमारत, मुंबई – १
यांस,

माहितीसाठी प्रत रवाना –
१. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई वित्त विभाग

**शब्दार्थ :**

| नामे | क्रियापदे | इतर शब्द |
|---|---|---|
| ते पृष्ठांकन, ती पृष्ठांकने<br>endorsement, -s | सोपवणे<br>to hand over | ग्रामीण<br>rural |
| ते ध्वनिक्षेपण, –<br>broadcasting | मंजूर करणे<br>to approve | चालू<br>current |

| | | |
|---|---|---|
| ती विधानसभा, त्या –<br>legislative assembly | भरपाई करणे<br>to compensate | आगाऊ<br>advance |
| ती आकस्मिकता, –<br>contingency | तरतूद करणे<br>to make provision | |
| तो निधी, ते –<br>fund, -s | | |
| ते वर्ष, ती वर्षे / र्षं<br>year, -s | | |
| तो खर्च, ते –<br>expense, -s | | |

## ३९ रिकाम्या जागेत धातू + लेला ची योग्य रूपे भरू या.

उदा० पाच वर्षांपूर्वी नरेशने मुदत ठेवीत (fixed deposit) ठेवलेली (ठेव) रक्कम आज उपयोगी पडली.

क. तुला ---------- (सोपव) कामं तू वेळेत पूर्ण केलीस.

ख. शासनाने मंजूर ---------- (कर) निधी अजून आशाला मिळाला नाही.

ग. शिक्षणमंत्र्यांनी ---------- (राह) सगळ्या परीक्षा रद्द केल्या.

घ. तुमच्या संस्थेने ---------- (दे) कार्यक्रमाचं आमंत्रण मी स्वीकारणार आहे.

च. त्यांनी ---------- (पाठव) दोन्ही अहवाल आत्ताच मिळाले.

## ४० खाली दिलेल्या मराठी शब्दांपुढे योग्य इंग्रजी प्रतिशब्द लिहू या.

(compensation, contingency, finance department, payment, under secretary, provision, broadcasting, advance, accountant general)

क. आगाऊ - ----------- ख. तरतूद - ----------- ग. महालेखापाल - -----------

घ. ध्वनिक्षेपण - ----------- च. अधिदान - ----------- छ. आकस्मिकता - -----------

ज. भरपाई - ----------- झ. अपर सचिव - ----------- ट. वित्तविभाग - -----------

## ४१ रिकाम्या जागेत 'चा' प्रत्ययाची योग्य रूपे भरू या.

पर्यटकांच्या दृष्टीने उन्हाळा आणि हिवाळा हे सर्वात महत्त्वा-- हंगाम आहेत. जंगल सफारी ही पर्यटना-- शाखा अलीकडे वेगाने विकसित होत आहे. वास्तविक, जंगलातील तापमान उन्हाळ्यात चाळीस अंशा-- पुढे असते. पण यावेळी या क्षेत्रात कोट्यावधी रुपयां-- उलाढाल होते. वन विभागाला लाखो रुपयां-- महसूल मिळतो. दुसरी उत्पन्ना-- साधने नसल्याने पर्यटकांच्या सहलींवर गाईड, जीपचालक आणि स्थानिक रहिवाशां-- पोट अवलंबून असते.

## ४२ आशयाधारित प्रश्न.

**एका वाक्यात उत्तरे देऊ या.**

क. पृष्ठांकन कोणत्या विभागाने पाठवले आहे?

ख. पत्राखाली कोणाची सही आहे?

ग. ध्वनिक्षेपण विभागाला काय तयार करायचं आहे?

घ. पत्रातून कोणाला आदेश दिला आहे?

च. दिलेली रक्कम कोणत्या वर्षातल्या खर्चासाठी वापरली जाणार आहे?

## ४३ प्रमाणपत्र वाचू या.

**महाराष्ट्र शासन**

अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

(वैध मापनशास्त्र यंत्रणा)

शासकीय कुटीर क्र. ७, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई – ४०००२१

उत्पादक / आवेष्टक / आयातदार नोंदणी प्रमाणपत्र

[वैध मापनशास्त्र (आवेष्टित वस्तू) नियम, २०११ च्या नियम २७ नुसार]

दिनांक. ...

अ.क्र. ...

आपण दिनांक ... रोजी या कार्यालयास केलेला अर्ज व त्या अनुषंगाने सादर केलेली कागदपत्रे यास अनुसरून असे प्रमाणित करण्यात येते की वैध मापनशास्त्र अधिनियम, २००९ व वैध मापनशास्त्र (आवेष्टित वस्तू) नियम, २०११ मधील तरतुदींचे पालन करण्याच्या अटीस अधीन राहून ... यांची या कार्यालयात उत्पादक / आवेष्टक / आयातदार म्हणून नोंदणी करण्यात आली असून त्यांचा नोंदणीक्रमांक वैमाशा/... आहे आणि त्याची विधिग्राह्यता ... पर्यंत असेल.

सदरचे प्रमाणपत्र हे ... नमुन्याकरिताच वैध राहील व याप्रमाणेच पुढे नोंदणी आवश्यक असल्यास प्रत्येक वर्षी नवीन अर्ज करावा लागेल.

उत्पादन / आवेष्टन / आयात करण्याचे ठिकाण

...

...

...

नियंत्रक वैधमापन शास्त्र

महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**शब्दार्थ :**

| नामे | क्रियापदे | इतर शब्द |
|---|---|---|
| तो / ती उत्पादक, ते / त्या – producer, -s | विधिग्राह्यता असणे to have validity | अनुसरून following |
| तो / ती आवेष्टक, ते / त्या – packer, -s | वैध राहणे to be valid | |
| तो / ती आयातदार, ते / त्या – importer | | |
| ते मापनशास्त्र, – measuring science | | |
| ती विधिग्राह्यता validation / validity | | |
| ते उत्पादन, ती उत्पादने / नं production, -s | | |
| ते आवेष्टन, ती आवेष्टने / नं packaging | | |
| ती आयात, त्या आयाती import | | |
| तो नियंत्रक, ते controller | | |



**४४ खाली एका शब्दापासून तयार झालेल्या काही शब्दांचे गट दिले आहेत. काही शब्दांचे इंग्रजी प्रतिशब्द दिले आहेत. त्या शब्दाशी संबंधित इतर शब्दांना इंग्रजी प्रतिशब्द द्यायचा प्रयत्न करू या.**

| क. | ख. |
|---|---|
| उत्पादन - production | आवेष्टन – packing |
| उत्पादक - ................................ | आवेष्टक – ................................ |
| उत्पादकता - productivity | आवेष्टित वस्तू – ................................ |
| उत्पादन खर्च - ................................ | आवेष्टन कागद – packing paper............ |
| उत्पादित वस्तू - ................................ | आवेष्टित करणे - ................................ |

| ग. | घ. |
|---|---|
| आयात – importation<br>आयातक / आयातदार – .......................<br>आयात वस्तू – imported good<br>आयात शुल्क - ................................<br>आयात करणे - ................................ | आश्वासन – assurance / warranty<br>आश्वासक – ................................<br>आश्वासित – ................................<br>आश्वस्त – warantee<br>आश्वासन देणे - ................................ |

| च. |
|---|
| मापणी / मापन – ................................<br>मापक - meter<br>मापे – measures<br>मापारी - ................................<br>मापणे - ................................ |

## ४५ खाली दिलेल्या शब्दांचे योग्य विरुद्धार्थी शब्द निवडू या.

**(अनावश्यक, निर्यातदार, अप्रमाणित, अवैध, विधिअग्राह्यता)**

क. वैध X --------------------

ख. आयातदार X --------------------

ग. प्रमाणित X --------------------

घ. विधिग्राह्यता X --------------------

च. आवश्यक X --------------------

## ४६ दिलेल्या शब्दांचा खाली दिलेल्या वाक्यांमध्ये उपयोग करू या.

**(प्रमाणित, वैध, सादर, आवश्यक, अधीन, पालन)**

उदा॰ कुटुंबातल्या प्रत्येकाच्या जन्ममृत्यूची नोंदणी केली जाते.

क. नागरिकांनी कायद्याचे --------- करणे --------- असते.

ख. आधारकार्डाची झेरॉक्स प्रत स्वतःची स्वतःला --------- करता येते.

ग. लग्न लावणाऱ्या भटजींनी भरून दिलेला फॉर्म महानगरपालिकेत --------- करावा लागतो.

घ. मोबाईलवर येणारा ओटीपी (one time password) हा फक्त काही मिनिटे --------- राहतो.

च. नियंत्रकांना नियमातील तरतुदींचे पालन करण्याच्या अटींना --------- राहून उत्पादक म्हणून नोंदणी करावी लागली.

## ४७ आशयाधारित प्रश्न.

**एका वाक्यात उत्तरे देऊ या.**

क. वैध मापनशास्त्र यंत्रणा कोणत्या विभागाच्या अंतर्गत काम करते?

ख. प्रमाणपत्रासाठी कोणी कोणी अर्ज केले आहेत?

ग. अर्जाबरोबर त्यांना आणखी काय सादर करावे लागले आहे?

घ. प्रमाणपत्रानुसार अर्जदारांची कोणत्या कामासाठी नोंदणी झाली आहे?

च. हे प्रमाणपत्र किती वर्षांसाठी वैध आहे?

## ४८ ही चित्रफीत पाहू या.

क. चौगुल्यांच्या बॉसने कोणता संकल्प केला आहे?
१. अजिबात चिडायचं नाही.
२. अजिबात उशिरा यायचं नाही.

ख. चौगुले किती तारखेपासून ऑफिसला येत नाहीयेत?
१. ३१ डिसेंबर
२. ३० डिसेंबर



ग. चौगुले त्यांच्या काकांबद्दल काय सांगतात?
१. काका हरवले होते.
२. काका सुट्टीला बाहेरगावी गेले होते.

घ. चौगुल्यांना काय हवं आहे?
१. सुट्टी.
२. प्रमोशन.

# आता फक्त आराम! १०

## (कार्यालयीन टिप्पणी आणि अर्ज)




**चला, शिकू या ...**

- कार्यालयीन टिप्पणी वाचणे आणि समजणे
- अर्ज भरता येणे
- ‘म्हणून’ चे वेगवेगळे अर्थ आणि वापर समजून घेणे
- औपचारिक आणि अनौपचारिक मराठीतला फरक समजून घेणे
- शासकीय मराठीत वापरल्या जाणाऱ्या काही क्रियापदांची उजळणी करणे
- निवृत्तीशी संबंधित शब्दांची माहिती करून घेणे
- निवृत्तीविषयी चर्चा करता येणे

# आता फक्त आराम! १०

**१ खालील मुद्द्यांच्या आणि चित्रांच्या आधारे वर्गात चर्चा करू या. निवृत्तीनंतर तुम्ही काय करणार आहात?**

- मी तर बाबा मनसोक्त आराम करणार!
- मी कुटुंबीयांबरोबर वेळ घालवणार.
- मी एखादी नवीन भाषा शिकणार.
- मी रोज उशिरा उठणार.
- मी बागकाम करणार.
- मी एखादं वाद्य शिकणार.










**२ खालीलपैकी कोणते शब्द निवृत्तीशी संबंधित आहेत त्यांच्याभोवती गोल करू या.**

निवृत्तिवेतन (pension)

बढती, दौरा, भविष्य निर्वाह निधी (Provident fund), निरोप समारंभ, कर्तव्यार्थ रजा (on duty leave) कार्यक्रम, रजा, उपदान (gratuity), सर्व्हिस बुक (सेवा पुस्तक), थकबाकी, पगार, नैमित्तिक रजा, बदली

## ३ संवाद ऐकू आणि वाचू या. (शिक्षकांनी आधी संवाद ऐकवावा मग विद्यार्थ्यांना वाचायला द्यावा.)




व्यक्ती : नमस्कार. महसूल विभागाचं ऑफिस हेच आहे नं?
संपत : होय, हेच आहे.
व्यक्ती : मला जरा...
संपत : तुम्ही जरा बाहेर थांबा. इथे आत येऊ नका.
व्यक्ती : अहो पण...
संपत : सांगितलं ना, बाहेर थांबा. इथे आजपासून नवीन साहेब येणार आहेत. जरा गडबड आहे.
व्यक्ती : अच्छा, नवीन साहेब?
संपत : होय. आज ते मानकरसाहेब रिटायर होताहेत नं, त्यांच्या जागी.
व्यक्ती : मानकर साहेब उपसंचालक होते नं?
संपत : होय तर! मोठे ऑफिसर होते. अगदी देवमाणूस!
व्यक्ती : पण मग त्यांच्या जागी कोण नवीन साहेब येणार आहेत?
संपत : आहेत कोणीतरी शेट्टीसाहेब. पण तुम्ही का आत येताय? सांगितलं ना जरा बाहेर थांबा म्हणून.
व्यक्ती : बरं बरं. मी बाहेरच थांबतो. फक्त ते नवीन साहेब आले की त्यांना सांगा मी भेटायला आलो होतो म्हणून.
संपत : सांगेन, सांगेन.
व्यक्ती : धन्यवाद, येतो मी.
संपत : अहो, पण तुमचं नाव सांगा नं...
व्यक्ती : माझं नाव? कमलाकर शेट्टी, ऑफिसर, महसूल विभाग.
संपत : ऑ! तुम्हीच का ते शेट्टीसाहेब?!!!

## ४ योग्य पर्याय निवडू या.

क. हे कोणत्या विभागाचे ऑफिस आहे?
 १. महसूल विभाग  २. आयकर विभाग

ख. ऑफिसात नवीन साहेब का येणार आहेत?
 १. मानकरसाहेब निवृत्त होणार आहेत म्हणून.
 २. मानकरसाहेबांची बदली झाली आहे म्हणून.

ग. मानकरसाहेब कोणत्या पदावरून निवृत्त होणार आहेत?
 १. सहसंचालक  २. उपसंचालक

## ५ चूक की बरोबर?

क. नवीन साहेब दोन दिवसांनी रुजू होणार आहेत.
ख. संपतचं मानकरसाहेबांबद्दल फार चांगलं मत आहे.
ग. कमलाकर शेट्टी म्हणजेच नवीन साहेब आहेत.

## ६ टिप्पणी वाचू या.

महसूल शाखा – आर.
दिनांक ...

**विषय - प्रतीक्षाधीन कालावधी नियमित करून मिळणेबाबत.**

निवासी नायब तहसीलदार
मा. विभागीय आयुक्त यांचेकडे सविनय सादर
जिल्हाधिकारी सांगली यांचेकडील पत्र दिनांक २०.०२.२०१७ रोजीच्या अर्जांचे कृपया अवलोकन होणेस विनंती आहे.

२. जिल्हाधिकारी सांगली यांनी ... नायब तहसीलदार, तहसीलदार कार्यालय, कडेगाव, जि. सांगली यांचा दि. ०१.०९.२०१६ ते दि. २६.०९.२०१६ हा कालावधी प्रतीक्षाधीन कालावधी म्हणून नियमित करणेबाबत विनंती केली आहे.

३. शासनाचे महसूल व वन विभागाकडील आदेश दि. २०.०८.२०१६ अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत विशेष अधिकारी, म.ग्रा.रो.ह.यो. म्हणून पुणे विभागातील नायब तहसीलदार संवर्गातील ०४ पदे दि. ३१.०८.२०१६ पासून निरसित झाली आहेत.

४. त्या अनुषंगाने कार्यालयाकडील आदेश दि. १७.०९.२०१६ अन्वये श्री॰ ... यांना सांगली जिल्ह्यात नियुक्ती देण्यात आली. श्री. ... यांना सदरचा आदेश दि॰ २३.०९.२०१६ रोजी प्राप्त झाला. जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी त्यांचेकडील दि॰ २३.०९.२०१६ रोजीच्या आदेशान्वये श्री. ... नायब तहसीलदार, करवीर, जि. कोल्हापूर यांना बदलीच्या ठिकाणी नियुक्त होणेसाठी कार्यमुक्त केले.

५. श्री॰ ... हे दि॰ १७.१०.२०१६ रोजी जिल्हाधिकारी सांगली येथे हजर झाले. जिल्हाधिकारी सांगली यांनी त्यांचेकडील आदेश दि॰ १८.१०.२०१६ अन्वये श्री॰ ... यांनी निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कडेगांव, जि. सांगली या पदावर पदस्थापना दिली. श्री॰ ... हे दि. १८.१०.२०१६ पासून निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कडेगाव, जि. सांगली कार्यरत आहेत. जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी दि. २३.०९.२०१६ रोजीच्या आदेशान्वये श्री॰ ... यांना कार्यमुक्त केले असल्याने दि. ०१.०९.२०१६ ते दि. २६.०९.२०१६ या कालावधीत श्री॰ ... हे नियुक्तीच्या प्रतीक्षेत होते असे जिल्हाधिकारी सांगली यांनी त्यांचे अहवालात नमूद केले आहे.

६. वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन व सर्वसाधारण शर्ती) १९८१ मधील नियम ९(१४) (एफ) मधील तरतुदीनुसार श्री॰ ... यांना दि. ०१.०९.२०१६ ते दि. २६.०९.२०१६ या कालावधीमधील एकूण २६ दिवस सक्तीचा प्रतीक्षाधीन कालावधी हा कर्तव्यकाळ म्हणून शासनस्तरावर नियमबद्ध करणेस हरकत नाही असा प्रस्ताव शासनास सादर करावा असे मत आहे.

आदेशार्थ सादर.
लिपिक
अ॰का॰
ना॰त॰ (आस्थापना)

**शब्दार्थ:**

| नाम | क्रियापदे | इतर शब्द |
|---|---|---|
| ते अवलोकन, – ती अवलोकने<br>perusal / view | नियमित करणे<br>to regulate | आदेशार्थ<br>for the order |
| ती विनंती, त्या विनंत्या<br>request, -s | अवलोकन करणे<br>to peruse | नायब<br>deputy |
| तो महसूल, ते –<br>revenue, -s | विनंती करणे<br>to request | प्रतीक्षाधीन<br>waiting |
| ती प्रतीक्षा, –<br>waiting | निरसित होणे<br>to be repealed | नियमित<br>regular |
| तो कर्तव्यकाळ, –<br>duty period | नियुक्ती देणे<br>to give an appointment | निवासी<br>resident |
| ते वेतन, ती वेतने / नं<br>salary, -ies | प्राप्त होणे<br>to attain / obtain | निरसित<br>repealed |
| ती हरकत, त्या हरकती<br>objection, -s | नियुक्त होणे<br>to be appointed | रोजी<br>on that day |
| | कार्यमुक्त करणे<br>to relieve | |
| | हजर होणे<br>to be present | |
| | प्रतीक्षेत असणे<br>to await | |
| | नमूद करणे<br>to mention | |
| | नियमबध्द करणे<br>to fit in the rule | |
| | हरकत नसणे<br>not to have objection | |

## ७ टिप्पणीतील ही वाक्यरचना पाहू या.

हा कालावधी प्रतीक्षाधीन कालावधी म्हणून नियमित करणेबाबत विनंती आहे.
प्रतीक्षाधीन कालावधी हा कर्तव्यकाळ म्हणून शासनस्तरावर नियमबद्ध करणेस हरकत नाही.

म्हणून = as a / an

## ८ सराव.

म्हणून = as a / an

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| ही रजा अर्जित रजा म्हणून मान्य करावी. | ही रजा अर्जित रजा म्हणून मान्य करावी. |
| त्यांनी ५ वर्षे मुख्यमंत्री म्हणून काम पाहिले. | त्यांनी ५ वर्षे मुख्यमंत्री म्हणून काम पाहिले. |
| करोना संसर्ग ही राज्यावरील आपत्ती म्हणून घोषित केली आहे. | करोना संसर्ग ही राज्यावरील आपत्ती म्हणून घोषित केली आहे. |
| नरवणे यांनी लष्करप्रमुख म्हणून कार्यभार स्वीकारला आहे. | नरवणे यांनी लष्करप्रमुख म्हणून कार्यभार स्वीकारला आहे. |
| त्यांचा आदर्श शिक्षक म्हणून राज्यसरकारकडून सत्कार करण्यात आला. | त्यांचा आदर्श शिक्षक म्हणून राज्यसरकारकडून सत्कार करण्यात आला. |

## ९ सराव.

म्हणून = after saying

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| कविता म्हणून तो खाली बसला. | कविता म्हणून तो खाली बसला. |
| श्लोक म्हणून सर्वांनी जेवायला सुरुवात केली. | श्लोक म्हणून सर्वांनी जेवायला सुरुवात केली. |
| शेवटी एक शेर म्हणून त्यांनी आपले भाषण संपवले. | शेवटी एक शेर म्हणून त्यांनी आपले भाषण संपवले. |
| इतकं म्हणून ती गाढ झोपली. | इतकं म्हणून ती गाढ झोपली. |
| मी उद्या कामाला येणार नाही असे म्हणून बाईंनी फोन खाली ठेवला. | मी उद्या कामाला येणार नाही असे म्हणून बाईंनी फोन खाली ठेवला. |

## १० सराव.

म्हणून = therefore / so

| शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|
| रिक्षांचा संप होता म्हणून शिरीष काल आला नाही. | रिक्षांचा संप होता म्हणून शिरीष काल आला नाही. |

| | |
|---|---|
| त्यांना पुरस्कार मिळाला नाही म्हणून ते नाराज आहेत. | त्यांना पुरस्कार मिळाला नाही म्हणून ते नाराज आहेत. |
| वीज गेली म्हणून कम्प्युटर बंद पडले. | वीज गेली म्हणून कम्प्युटर बंद पडले. |
| तुम्ही मदत केलीत म्हणून मी आज माझ्या पायावर उभी आहे. | तुम्ही मदत केलीत म्हणून मी आज माझ्या पायावर उभी आहे. |
| आंदोलन केले म्हणून पोलिसांनी विद्यार्थ्यांना तुरुंगात टाकले. | आंदोलन केले म्हणून पोलिसांनी विद्यार्थ्यांना तुरुंगात टाकले. |

## ११ वर दिलेल्या तीनही प्रकारच्या वाक्यांमधला 'म्हणून' चा अर्थ लक्षात घेऊ या आणि खालील वाक्यांच्या पुढे योग्य क्रमांक लिहू या.

**(१ - as a / an, २ - after saying, ३ – therefore / so)**

उदा० टाळेबंदी सुरू आहे म्हणून वृत्तपत्रे येत नाहीत. – ३

क. तिला मैत्रिणींना भेटायचं आहे, म्हणून ती मुंबईत आणखी एक दिवस राहणार आहे.

ख. सुगरण म्हणून आसावरीताई नातेवाइकांमध्ये प्रसिद्ध होत्या.

ग. विमानाचं तिकीट खूप महाग आहे म्हणून ते ट्रेनने प्रवास करणार आहेत.

घ. दोन वाक्ये म्हणून त्याने रडायला सुरुवात केली.

च. ते प्रशासक म्हणून योग्य आहेत.

छ. 'हे राम' म्हणून गांधीजींनी प्राण सोडले.

## १२ खाली दिलेल्या तीनही गटातील वाक्यांशांच्या जोड्या जुळवू या.

| | अ | ब | क |
|---|---|---|---|
| क. | मोबाईल बंद पडला | म्हणून | कार्यक्रमाला सुरुवात केली. |
| ख. | विशूला आजोबांची काठी | | प्रस्ताव मागे घेतला. |
| ग. | मुलांनी स्वागतगीत | | ओळखली जाते. |
| घ. | गोदावरी नदी दक्षिणेकडची गंगा | | घोषित केले आहे. |
| च. | आता वाघाला भारताचा राष्ट्रीय प्राणी | | ओळखतात. |
| छ. | नागरिकांनी विरोध केला | | ती सकाळपासून बेचैन आहे. |

## १३ खाली दिलेल्या शब्दांसाठी रोजच्या मराठीतले पर्याय देऊ या.

उदा॰ मिळणेबाबत मिळण्याबाबत.

क. यांचेकडे --------------------

ख. यांचेकडील --------------------

ग. होणेस --------------------

घ. होणेसाठी --------------------

च. करणेबाबत --------------------

पसंतीक्रम – order of preference
प्राधान्यक्रम – order of priority
ज्येष्ठताक्रम – order of seniority

## १४ खाली दिलेले प्रशासकीय वाक्प्रयोगांचे योग्य अर्थ लिहू या.

**(उल्लेख करणे, जबाबदारीतून मोकळे करणे, नेमणे, पाहिले जाणे, नियमात बसवणे, रद्द होणे)**

क. अवलोकन होणे --------------------

ख. निरसित होणे --------------------

ग. नियमबद्ध करणे --------------------

घ. नमूद करणे --------------------

च. कार्यमुक्त करणे --------------------

छ. पदस्थापना देणे --------------------

## १५ हे वाक्प्रयोग वरील टिप्पणीमधे मध्ये आलेले आहेत. टिप्पणी पुन्हा एकदा वाचू या आणि ते वाक्प्रयोग अधोरेखित करू या.

## १६ खाली दिलेल्या शब्दांचा या टिप्पणीत केलेला वापर पाहू या आणि स्वतंत्र वाक्यात उपयोग करू या.

उदा॰ प्रतीक्षाधीन : awaiting period.

जिल्हाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांना दहा दिवसांचा कालावधी प्रतिक्षाधीन कालावधी समजावा अशी विनंती केली.

क. नियुक्ती – appointment ख. कर्तव्यकाळ – duty period

ग. सक्तीचा – compulsory घ. संवर्ग – cadre

## १७ आशयाधारित प्रश्न.
## पर्यायांतून योग्य उत्तर निवडू या.

क. या टिप्पण्या कशाबद्दल आहेत?
१. प्रतीक्षाधीन कालावधी नियमित करून घेण्याबद्दल.
२. कार्यमुक्त करण्याबद्दल.

ख. पुणे विभागातील नायब तहसीलदारांना सांगली जिल्ह्यात का नियुक्त केले?
१. सांगली जिल्ह्यात नायब तहसीलदारांची जागा रिकामी होती.
२. पुणे विभागातील नायब तहसीलदारांची पदे रद्द झाली होती.

ग. कोल्हापूरच्या नायब तहसीलदाराची बदली कोल्हापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी कुठे केली?
१. सांगलीला
२. पुण्याला

घ. पुण्याच्या नायब तहसीलदारांना सांगलीच्या कोणत्या तालुक्यात पद मिळाले?
१. करवीर
२. कडेगाव

च. नायब तहसीलदारांना नियुक्तीसाठी किती दिवस प्रतीक्षा करावी लागली?
१. २६
२. १७

## १८ वरील टिप्पणीतील चौथ्या क्रमांकाचा परिच्छेद दैनंदिन व्यवहारातील मराठीत लिहू या.

## १९ आता ही टिप्पणी वाचू या.

महसूल शाखा
दिनांक ...

**विषय – विभागीय चौकशी सुरू करणेबाबत**

श्री. ..., तत्का. ... तहसीलदार
सध्या ...
मा. सादर

२. जिल्हाधिकारी ... यांनी त्यांचेकडील पत्र दि. ... अन्वये मा. राज्य माहिती आयुक्त नाशिक खंडपीठ यांचेकडील दि. १५-०३-२०१३ रोजीच्या आदेशामध्ये दिलेल्या निर्देशानुसार ... तत्का. ... तहसीलदार... सध्या तहसीलदार, ... यांचे विरुद्ध नियम १० नुसार विभागीय चौकशी करणेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. प्रकरणाची वस्तुस्थिती थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.
श्री. ... हे तहसीलदार ... पदावर दि. १२-८-२००८ ते दि. १३-३-२०१२ या कालावधीत कार्यरत होते. सदर पदावर कार्यरत असताना दि. १-६-२०१० रोजी श्री. ... यांनी केलेल्या माहितीच्या अधिकारातील अर्ज, सदर अधिनियमातील कलम ६(३) अन्वये ५ दिवसात जन माहिती अधिकारी, जागतिक बँक प्रकल्प, पुणे अहमदनगर, राष्ट्रीय महामार्ग क्र. ६० नवीन प्रशासकीय इमारत पुणे यांचेकडे हस्तांतरण केला नाही म्हणून त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस राज्य माहिती आयुक्त नाशिक खंडपीठ यांनी केली आहे.
३. उक्त निर्णयाच्या अनुषंगाने, जिल्हाधिकारी... यांनी श्री. ... यांच्या विरुद्ध नियम १० अन्वये विभागीय चौकशी प्रस्तावित केली आहे. दोषारोपपत्रामध्ये अवलोकन करता, दोषारोपपत्रामध्ये

केलेली अनियमितता व ज्या नियमांचा भंग झाला आहे ते नमूद करणे आवश्यक आहे. तथापि जिल्हाधिकारी पुणे यांनी मा. राज्य माहिती आयुक्त यांनी त्यांच्या निर्णयामध्ये जे भाष्य केले आहे तेच दोषारोपात नमूद करून, शेवटी चुकीचा नियम नमूद केलेला आहे, त्यामुळे दोषारोपपत्रात सुधारणा होणे आवश्यक आहे असे इकडील मत आहे. मान्य असल्यास जिल्हाधिकारी ... यांचेकडून सुधारित दोषारोपपत्र अथवा या कार्यालयाकडून तयार करावेत याबाबत आदेश होणेस विनंती आहे.

लिपिक
अ॰का॰
ना॰त॰ (अस्थापन)

**शब्दार्थ :**

| नाम | क्रियापदे | इतर शब्द |
|---|---|---|
| ती चौकशी, त्या चौकश्या<br>inquiry, -ies | निर्देश देणे<br>to indicate | थोडक्यात<br>in short |
| ते खंडपीठ, ती खंडपीठे / ठं<br>bench, -es | हस्तांतरण करणे<br>to transfer | माहितीचा अधिकार<br>right to information |
| तो निर्देश, ते निर्देश<br>indication, -s | प्रस्तावित करणे<br>to propose | जागतिक<br>world |
| तो भंग,<br>breach, es | नियमांचा भंग होणे<br>to be violated (rules etc.) | प्रशासकीय<br>administrative |
| ते भाष्य, ती भाष्ये / ष्यं<br>comment, -s | भाष्य करणे<br>to comment | चुकीचा<br>wrong |
| तो मत, ती मते / तं<br>opinion, -s | मत असणे<br>to have an opinion | इकडील<br>of here |
| ती बँक, त्या बँका<br>bank, -s | आदेश होणे<br>to get an order | सुधारित<br>modified |
| ते हस्तांतर, ती हस्तांतरणे / णं<br>transfer, -s | सुधारणा होणे<br>to be amended | |
| ते दोषारोपपत्र, ती दोषारोपपत्रे / त्रं<br>charge sheet, -s | | |
| ती अनियमितता<br>irregularity | | |

## २० या टिप्पण्यांमधले प्रशासकीय वाक्प्रयोग आणि त्यांचे इंग्रजी अर्थ यांच्या जोड्या जुळवू या.

| अ | ब |
|---|---|
| क. चौकशी करणे | १. to propose |
| ख. कार्यरत असणे | २. to recommend |
| ग. हस्तांतरण करणे | ३. to comment |
| घ. शिफारस करणे | ४. to be working |
| च. प्रस्तावित करणे | ५. to transfer |
| छ. भाष्य करणे | ६. to inquire |

## २१ वर दिलेल्या टिप्पणीतले शब्द रिकाम्या जागी भरू या.

**(शिफारस, दोषारोपपत्र, शिस्तभंग, चौकशी, हस्तांतरण)**

क. शिक्षिकेवर झालेल्या अन्यायाची ------------- करण्यासाठी शासनाने समिती नेमली आहे.

ख. माहिती अधिकार वापरून केलेला अर्ज पाच दिवसांच्या आत जनमाहिती अधिकारी यांच्याकडे ------------- केला पाहिजे.

ग. जिल्हाधिकाऱ्यांनी तहसीलदारांविरुद्ध ------------- सादर केले आहे.

घ. जिल्हाधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार तहसीलदारांकडून ------------- झाला आहे.

च. खंडपीठाने शिस्तभंगाच्या कारवाईची ------------- केली आहे.

## २२ आशयाधारित प्रश्न. उत्तरांचे योग्य पर्याय निवडू या.

क. खंडपीठाने कोणाविरुद्ध चौकशी करण्याचा आदेश दिला आहे?
१. तहसीलदार     २. जिल्हाधिकारी

ख. तहसीलदारांनी माहिती अधिकारातील अर्ज कोणाकडे पाठवायला हवा होता?
१. जिल्हाधिकारी     २. जन माहिती अधिकारी

ग. दोषारोपपत्र कोणी सादर केले होते?
१. जिल्हाधिकारी     २. नाशिक खंडपीठ

घ. दोषारोपपत्रात सुधारणा का व्हायला पाहिजे?
१. राज्य माहिती आयुक्त यांनी त्यावर चुकीचा निर्णय दिला आहे.
२. जिल्हाधिकाऱ्यांनी त्यात चुकीचा नियम नमूद दिला आहे.

च. दोषारोपपत्र सुधारण्याची जबाबदारी कोणाची आहे?
१. जिल्हाधिकाऱ्यांची     २. राज्य माहिती अधिकाऱ्यांची.

## २३ संवाद ऐकू या. (शिक्षकांनी आधी संवाद ऐकवावा आणि मग विद्यार्थ्यांना वाचायला द्यावा.)



काणे : अरे, वा! आज ऑफिस अगदी छान सजवलंय. काय विशेष आहे आज?

डिसूझा : अहो, काणे, आज मानकरसाहेब निवृत्त होणार आहेत ना!

काणे : अरे, खरंच की! मी विसरलोच होतो. मानकर साहेबांचा आज ऑफिसमधला शेवटचा दिवस. अहो डिसूझा, तुम्हाला माहीत आहे का, कितव्या वर्षी ते नोकरीला लागले?

डिसूझा : पंचविसाव्या वर्षी.

काणे : अच्छा. म्हणजे तब्बल पस्तीस वर्षं नोकरी केली त्यांनी!

डिसूझा : मग काय तर! आणि पस्तीस वर्षांत चार वेळा बढती मिळाली त्यांना. त्यांच्या कामाचं सगळे जण कायम कौतुक करतात.

काणे : वा, छान. निवृत्तीनंतर जरा आराम करतील. घरी कोण कोण आहे त्यांच्या?

डिसूझा : एक मुलगी आहे पण तिचं लग्न झालं आहे. ते आणि त्यांची बायको, दोघंच आहेत आता फक्त.

काणे : अरे, वा! छान. चला आपणही त्यांच्या निरोप समारंभाला जाऊ या. बाय द वे, कार्यक्रमात त्यांच्याबद्दल बोलणार असेल ना कोणीतरी?

डिसूझा : हो, बोलणार आहेत की!

काणे : कोण?

डिसूझा : तुम्हीच. नेहमीप्रमाणे. दुसरं आहेच कोण?!!

काणे : ऑ?!!

## २४ ऐकू या व चूक की बरोबर ते लिहू या.

क. काणे निवृत्त होणार आहेत. ☐

ख. मानकरांची चार वेळा बदली झाली. ☐

ग. मानकरांनी पस्तीस वर्षं नोकरी केली. ☐

घ. डिसूझांना एक मुलगी आहे. ☐

च. आज काणे भाषण करणार आहेत. ☐

## २५ खाली दिलेल्या वाक्प्रचारांच्या अर्थाचे योग्य पर्याय निवडू या.

| | | | |
|---|---|---|---|
| क. | निवृत्त होणे : | १. to retire | २. to join |
| ख. | बढती : | १. promotion | २. transfer |
| ग. | कौतुक करणे : | १. to criticize | २. to admire |
| घ. | निवांत : | १. relaxed | २. healthy |
| च. | निरोप समारंभ : | १. welcome | २. send-off |

**२६ तुम्ही शासकीय नोकरीतून निवृत्त होत आहात. त्या निमित्ताने तुम्हाला पाच मिनिटांचे भाषण करायचे आहे. तुम्ही काय बोलाल? खालील मुद्दे वापरून छोटेसे भाषण तयार करू या.**

- किती वर्षं नोकरी केली?
- इतर कर्मचाऱ्यांशी संबंध कसे होते?
- काही विशेष अनुभव आले का?
- ऑफिसमधले वातावरण कसे होते?

**२७ अर्जाचा नमुना वाचू या.**

**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**अर्जाचा नमुना**

अर्जदाराने त्याचे अलीकडे काढलेले पारपत्र आकाराचे छायाचित्र चिकटवून त्यावर स्वाक्षरी करावी. २.५ से.मी. x ३ सें.मी.

पदाचे नाव – चिकित्सालयीन मानसशास्त्रज्ञ
प्रति,
अधिष्ठाता
रा. ए. स्मा रुग्णालय

बृहन्मुंबई मनपाच्या वर नमूद केलेल्या पदाकरिता २५-६-२०१८ रोजीच्या दिनांकाच्या जाहिरातीनुसार मी खाली सही करणार विनंती अर्ज सादर करीत आहे.

(आवश्यक ठिकाणी ✓ बरोबरची खूण करावी)

१. अ) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) मराठीत - ........................................................
ब) वडिलांचे / पतीचे संपूर्ण नाव - ..........................................
क) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिलांकरिता) - ................................................

२. संपूर्ण पत्ता (पिनकोड सह (पत्रव्यवहाराचा)) - ................................................

३. लिंग – पुरुष - ☐ स्त्री - ☐

४. जात - ................. पोटजात - ............... प्रवर्ग – अज / विजा (अ) / खुला

५. जात वैधता प्रमाणपत्र आहे का? - होय / नाही

६. उमेदवार उन्नत व प्रगत गटात मोडत आहे का? होय / नाही

७. महिला उमेदवार महिला आरक्षणांतर्गत भरतीसाठी राहू इच्छित आहे का? होय / नाही

८. जन्मदिनांक - दिनांक .... महिना.... वर्ष .....

९. दिनांक १-०७-२०१८ रोजी असलेले वय - ......... वर्षे ........महिने ....... दिवस

**१०. शैक्षणिक अर्हता**

| पदव्युत्तर पदवी | विद्यापीठाचे नाव | गुणांचा तपशील | | | शालांत परीक्षेतील गुण | | उमेदवार किती प्रयत्नांत परीक्षा उत्तीर्ण झाला |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त | पैकी | टक्केवारी | मराठी | इंग्रजी | |
| | | | | | | | |

| अनुभव | संस्था / रुग्णालयाचे नाव | दिनांक ... पासून ते दिनांक ... पर्यंत | एकूण ... वर्षं ... महिने ... दिवस |
|---|---|---|---|
| १. | | | |

१०. संगणकविषयक ज्ञान – MS-CIT किंवा शासनाने विहित केलेल्या संगणकविषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र आहे का? होय / नाही.

११. सेवायोजन कार्यालयाचे नवीनतम नोंदणीपत्र असल्यास त्याचा क्रमांक व दिनांक - ...

१२. अ) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का? होय / नाही
ब) शिक्षा झाली असल्यास त्याचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी.

१३. उमेदवाराविरुद्ध पोलीस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित वा प्रस्तावित आहे का? असल्यास तपशील द्यावा.

१४. अ) उमेदवार सध्या नोकरी करत आहे किंवा नाही? असल्यास त्याबाबतचा तपशील...
ब) नोकरी करत असल्यास त्याबाबतचा तपशील देऊन सध्याच्या नियोक्त्याचे ना-हरकत प्रमाणपत्र जोडावे.

१५. स्थानिक पोलिस ठाण्याचा संपूर्ण पत्ता - ...

मी या अन्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास तसेच उपरोक्त दिलेल्या माहितीच्या आधारे नियुक्ती झालेली असल्यास सेवेतून कमी केल्यास त्याबाबत माझी काही तक्रार राहणार नाही. अर्जाद्वारे दिलेली माहिती खोटी आढळल्यास वृहन्मुंबई महानगरपालिका माझ्याविरुद्ध कारवाई करू शकते याची मला जाणीव आहे.

दिनांक - ............. आपला / आपली विश्वासू

ठिकाण - ............

(अर्जदाराची सही व नाव)

**शब्दार्थ :**

| नाम | नाम | नाम | क्रियापदे | इतर शब्द |
|---|---|---|---|---|
| ती पोटजात,<br>त्या पोटजाती<br>sub caste, -s | ते लिंग,<br>ती लिंगे / गं<br>gender, -s | ते नोंदणीपत्र,<br>ती नोंदणीपत्रे / त्रं<br>registration letter, -s | छायाचित्रे काढणे<br>to take a photo | अलीकडे<br>recently |
| ती स्त्री,<br>त्या स्त्रिया<br>woman, women | तो पुरुष, ते –<br>man, men | ती शिक्षा, त्या –<br>punishment, -s | चिकटवणे<br>to stick | सोबत<br>alongwith |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ते पारपत्र,<br>ती पारपत्रे / त्रं<br>passport, -s | ते आरक्षण,<br>ती आरक्षणे / णं<br>reservation, -s | तो नियोक्ता,<br>तो नियोक्ते<br>employer, -s | खूण करणे<br>to mark | छायांकित<br>photocopy |
| तो आकार, ते –<br>shape, -s | ती भरती,<br>recruitment,<br>-s | ते ठाणे / णं,<br>ती ठाणी<br>station, -s | जोडणे<br>to attach | उन्नत व प्रगत<br>sublime and<br>advanced |
| ते छायाचित्र,<br>ती छायाचित्रे / त्रं<br>photo, -s | ते आडनाव,<br>ती आडनावे / वं<br>surname, -s | ती तक्रार,<br>त्या तक्रारी<br>complaint, -s | एखाद्या गटात<br>मोडणे<br>to be part of<br>the group | पद्व्युत्तर<br>post<br>graduate |
| तो अधिष्ठाता,<br>ते अधिष्ठाते<br>din, -s | ते वडील, –<br>father, -s | ती उमेदवारी,<br>त्या उमेदवाऱ्या<br>candidature, -s | उत्तीर्ण होणे<br>to pass | पैकी<br>out of |
| ते रुग्णालय,<br>ती रुग्णालये / यं<br>hospital, -s | ती वैधता, –<br>legality | ती जाणीव,<br>त्या जाणिवा<br>realisation, -s | विहित करणे<br>to prescribe | टक्केवारी<br>percentage |
| ती खूण,<br>त्या खुणा<br>mark, -s | ते प्रमाणपत्र,<br>ती प्रमाणपत्रे / त्रं<br>certificate, -s | तो पती, ते –<br>husband, -s | शिक्षा होणे<br>to be punished | नवीनतम<br>newest |
| ते नाव,<br>ती नावे / वं<br>name, -s | तो उमेदवार,<br>ते –<br>candidate, -s | तो जन्मदिनांक,<br>ते –<br>birthdate, -s | तपशील देणे<br>to give details | प्रलंबित<br>pending |
| ते वय,<br>ती वये / यं<br>age, -s | तो भ्रमणध्वनी,<br>ते –<br>mobile, -s | तो अनुभव, ते –<br>experience, -s | जाहीर करणे<br>to declare | ना हरकत<br>no<br>objection |
| तो दूरध्वनी,<br>ते –<br>telephone, -s | ती पदवी, त्या<br>पदव्या<br>degree, -s | तो पत्रव्यवहार,<br>ते –<br>correspondence,<br>-s | फेटाळणे<br>to reject | जाणीवपूर्वक<br>consciously |
| ती पदवी,<br>त्या पदव्या<br>degree, -s | तो क्रमांक, ते –<br>number, -s | तो कोड, ते –<br>code, -s | कमी करणे<br>to dispense<br>with | विश्वासपूर्वक<br>confidently |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | जाणीव असणे to have realisation | प्रतिज्ञापूर्वक avowedly |
| | | | | खरा real |
| | | | | खोटा false |

## २८ खालील इंग्रजी शब्दांसाठी वरील अर्जात कोणते मराठी शब्द आले आहेत ते शोधू या.

क. passport

ख. clinical

ग. psychology

घ. dean

च. caste validity certificate

छ. sublime and advanced

ज. women reservation

झ. percentage

ट. employment exchange

ठ. punishment

## २९ आशयाधारित प्रश्न

क. हा अर्ज कोणत्या पदासाठी आहे?
१. वैद्यकीय अधिकारी
२. चिकित्सालयीन मानसशास्त्रज्ञ

ख. अर्ज कोणाकडे पाठवायचा आहे?
१. रुग्णालयाचे अधिष्ठाता
२. आरोग्यमंत्री

ग. सही करणार म्हणजे
१. मी सही करणार आहे.
२. सही करणारी व्यक्ती.

ताबडतोब उत्तर द्यावे – please reply forthwith.
हे अत्यंत तातडीचे समजावे – please treat it as most urgent.
वर उल्लेख केलेले – above mentioned.
उपरोक्त – above said.
वर नमूद केलेले – above noted.

घ. अर्ज फेटाळणे म्हणजे
१. अर्ज नाकारणे
२. अर्ज परत पाठवणे

च. गटात मोडणे म्हणजे
१. उमेदवार एक गट सोडून दुसऱ्या गटात जाणे
२. उमेदवार गटात असणे

छ. कमी करणे म्हणजे
१. नोकरीवरून काढून टाकणे
२. कमी पगार देणे

## ३० आणखी एका अर्जाचा नमुना वाचू या.

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**अपंग समावेशित शिक्षण (प्राथमिक / माध्यमिक स्तर)**
**लेखनिक / वाचक नोंदणी अर्ज**

अर्जदार / लेखनिक / वाचकाचे नाव - ------------------------------------------------

पत्ता - ------------------------------------------------------------

वय - ------------------------- शिक्षण - -------------------------

भ्रमणध्वनी - ------------------------- इ-मेल - -------------------------

------------------------- भाषा ------------------------- दूरध्वनी - -------------------------

शाळा संकेतांक - (U-DISE) -------------------------

लेखनिक / वाचक म्हणून काम करण्याचा कालावधी ------------- पासून ते ------------- पर्यंत

**संमती-पत्र**

मी -------------- रा. -------------- दिव्यांग विद्यार्थ्याचे नाव -------------- दिव्यांग प्रकार -------------- विद्यार्थ्याच्या शाळेचे नाव -------------- यु-डायस क्र. -------------- यासाठी लेखनिक / वाचक म्हणून परीक्षेच्या / अध्ययन प्रक्रियेदरम्यान दिनांक ------- ते दिनांक ------- पर्यंत साहाय्य करण्यास तयार आहे. तरी माझी उपर्युक्त उल्लेखित माहिती खरी असून संबंधित विद्यार्थ्याची मौखिक उत्तरे ऐकून त्याच्या संकल्पनात्मक प्रतिक्रिया लिखित स्वरूपात लेखनिक / वाचक म्हणून परीक्षेदरम्यान उत्तरपत्रिकेत लिहीन व अध्ययन / अध्यापन प्रक्रियेत वाचन करेन. सदरील काम करण्यास माझी स्वखुशीने संमती आहे.

स्वाक्षरी/–
(लेखनिक / वाचकाचे नाव)

शब्दार्थ :

| नाम | क्रियापदे | इतर शब्द |
| --- | --- | --- |
| ते परिशिष्ट, ती परिशिष्टे / ष्टं<br>appendix, - appendices | खरा असणे<br>to be true | अपंग<br>crippled |
| तो / ती लेखनिक, ते / त्या –<br>writer, -s | संमती असणे<br>to agree | समावेशित<br>incorporated |
| तो / ती वाचक, ते / त्या वाचक<br>reader, -s | | पासून<br>from |
| ते उत्तर, ती उत्तरे / रं<br>answer, -s | | पर्यंत<br>up to |
| ती प्रतिक्रिया, त्या –<br>reaction, -s | | दिव्यांग<br>specially abled |
| ती संमती, –<br>permission, -s | | उल्लेखित<br>mentioned |
| तो प्रकार, ते –<br>type, -s | | मौखिक<br>oral |
| ते अध्ययन, ती अध्ययने / नं<br>learning, -s | | संकल्पनात्मक<br>conceptual |
| ते अध्यापन, –<br>teaching | | लिखित<br>written |
| ती स्वखुशी, –<br>willingly | | |

## ३१ जोड्या जुळवू या.

| | |
| --- | --- |
| क. प्रथम | १. उल्लेखित |
| ख. मध्यम | २. लेखनिक |
| ग. लेखन | ३. संबंधित |
| घ. मुख | ४. प्राथमिक |
| च. उल्लेख | ५. माध्यमिक |
| छ. संबंध | ६. मौखिक |

## ३२ आशयाधारित प्रश्न.

क. अर्जदाराने कोणत्या विभागाला अर्ज करायचा आहे?
ख. अर्जदाराची कोणत्या पदासाठी नोंदणी होणार आहे?
ग. अर्जदाराने कोणासाठी लेखनाचे / वाचनाचे काम करायचे आहे?
घ. दिव्यांग विद्यार्थी लेखनिकाला उत्तर कसे सांगेल?
च. भ्रमणध्वनी आणि दूरध्वनी साठी रोजच्या वापरातील शब्द कोणते?

## ३३ अर्ज भरू या.

(अर्जाची किंमत – दोन रुपये)

क्रमांक - xxxxxxxx

शिधावाटप क्षेत्र / गाव ---------- विभाग / तालुका ---------- परिमंडळ / जिल्हा. ----------

नवीन पुरवठापत्रिकेसाठी / शिधापत्रिकेसाठी अर्ज (कुटुंबप्रमुखाने भरावा)

ताकीद – १. पुरवठापत्रिका / शिधापत्रिका मिळण्यासाठी खोटी माहिती देणे हा दखलपात्र गुन्हा असून, खोटी माहिती देणाऱ्यांविरुद्ध फौजदारी कारवाई केली जाईल.

२. अर्जात दिलेली कोणतीही माहिती बरोबर नसल्याचे आढळून आल्यास पुरवठा / शिधापत्रिका रद्द करण्यात येईल व नागरी पुरवठ्याचे कोणतेही लाभ मिळणार नाहीत.

३. संपूर्ण तपशील नमुन्यानुसार न दिल्यास अर्ज स्वीकारला जाणार नाही.

एक – अर्जदाराचे संपूर्ण नाव (आडनावाने सुरुवात करावी) ------------------------------

वय - -------------------- नागरिकत्व - --------------------

पूर्ण निवासी पत्ता - ----------------------------------------------------------------------

दोन –

अर्जदार व अर्जदाराव्यतिरिक्त कुटुंबातील घटक म्हणून अर्जदाराकडे सामान्यतः राहणाऱ्या व्यक्तींची नावे (घरातील नोकर वगळून)

| नाव | अर्जदाराशी नाते | वय | नागरिकत्व | व्यवसाय व वार्षिक उत्पन्न | आधारकार्ड क्रमांक | बँक खाते क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

तीन – इतर माहिती (ही माहिती भरताना कुटुंबप्रमुखासह कुटुंबातील सर्व व्यक्तीसंबधाने भरावी)

१. कुटुंबातील सर्व व्यक्तींचे सर्व मार्गाने मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न.

२. कुटुंबातील सर्व व्यक्तींकडून भरला जाणारा एकूण व्यवसाय कर (प्रोफेशनल टॅक्स) आयकर / विक्रीकर (विक्रीकर क्रमांक ----------------)

३. भ्रमणध्वनी क्रमांक - ----------------

४. घरगुती स्वयंपाकाचा गॅस आहे काय? होय / नाही

गॅस ग्राहक क्रमांक - ---------------- गॅस वितरकाचे नाव व पत्ता - ----------------

५. पुरवठापत्रिकेवर / शिधापत्रिकेवर अन्नधान्य मिळवण्याचा हक्क स्वेच्छेने सोडू इच्छिता काय? होय / नाही.

चार – नवीन पुरवठा / शिधापत्रिका मिळवण्यासाठी निवासासंबंधीचा पुरावा म्हणून खालीलपैकी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी.

१. घरभाडे पावती

२. नजीकच्या महिन्यातील वीजबिल

३. निवासाचा इतर कोणताही दाखला किंवा पुरावा.

पाच - मी असे जाहीर करतो की, उपरोक्त दोन / तीन / चार मध्ये दिलेल्या माहितीत कोणत्याही प्रकारचा बदल झाल्यास मी ती बाब तात्काळ पुरवठापत्रिका / शिधापत्रिका वितरित करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देईन.

सहा - मी असेही जाहीर करतो की, माझ्याजवळ अनुक्रमांक .......... कोडक्रमांक ........... असलेली .......... एकांकासाठी मंजूर केलेली पुरवठापत्रिका / शिधापत्रिका आहे / होती.

सात - मी प्रस्तुत अर्जात नमूद केलेल्या मजकुरासंबंधी आणि ज्या पुरवठा / शिधापत्रिकेसाठी अर्ज केलेला आहे त्या पुरवठा / शिधापत्रिकेसंबंधी चौकशी करण्याची परवानगी देईन. अशी पुरवठा / शिधापत्रिका ही सरकारी मालमत्ता आहे याची मला जाणीव आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडून / नियंत्रकांकडून किंवा त्यांनी अधिकार दिलेल्या अधिकाऱ्यांकडून तिची मागणी करण्यात येईल तेव्हा मी ती त्यांच्या स्वाधीन करीन.

दिनांक - ........... पडताळले व बरोबर आढळले अर्जदाराची स्वाक्षरी

निरीक्षक अर्जदाराचा ठसा

## ३४ खालील वाक्प्रचारांवर वर्गात चर्चा करू या.



कामात काम काढणे

नन्नाचा पाढा वाचणे

काम तडीस नेणे

# परीक्षा ११

तोंडी चाचणी



लेखी चाचणी

# लेखी चाचणी
(१०० गुण)

**प्र.१. पुढील उताऱ्यात 'चा' प्रत्ययाची रूपे भरा.** (५)

राज्य सरकार आता नद्यां-- शुद्धीकरणा-- कामे हातात घेणार आहे. नदीपात्रातील गाळ काढून नद्यां-- स्वच्छता करणे आणि प्रदूषण रोखणे ही कामे मुख्यत्वे करून या प्रकल्पा-- भाग असतील. याबरोबरच नद्यांना येऊन मिळणाऱ्या नाल्यां-- शुद्धीकरणही करण्यात येणार आहे. यासाठी अनेक कोटीं-- खर्च अपेक्षित आहे. या प्रकल्पा-- निविदा लवकरच मागवण्यात येणार आहेत, तसेच या कामासाठी एका परकीय एजन्सी-- मदत घेण्यात येणार आहे. शुद्धीकरणानंतर नद्यां-- पाणी पुन्हा अशुद्ध होऊ नये यासाठी विविध स्वरूपा-- उपाययोजनाही सरकार करणार आहे.

**प्र.२. कंसात दिलेल्या धातूंना योग्य प्रत्यय जोडून रिकाम्या जागेत भरा.** (५)

'तांबट' म्हणजे तांब्याच्या वस्तू व भांडी तयार ----- (कर) कारागीर. तांब्याच्या वस्तू ----- (दिस) आकर्षक असतात. त्यात ----- (ठेव) पाण्यातही अनेक औषधी गुण असतात. या कारागिरांनी तांब्याच्या भांड्यांना नवे रूप ----- (दे) ती लोकप्रिय झाली आहेत. या कलेचे प्रशिक्षण ----- (घे) परदेशी विद्यार्थीही येतात.

**प्र.३. रिकाम्या जागी शब्दयोगी पदे (नुसार, साठी, द्वारे, मार्फत, बाबत, वर, कडे, सह, निहाय, अंतर्गत) भरून रेडिओवर सांगण्यासाठी बातमी तयार करू या.** (५)

राज्यातील सातबाराचे सर्व उतारे ऑनलाइन करण्याच्या योजने ------ सातबाराचे जिल्हा आणि तालुका--- सर्व उतारे संकेतस्थळा---- उपलब्ध आहेत. 'आपले सरकार' या सेवाॲप---- सही आणि शिक्क्या ------ हे उतारे संबंधितांना दिले जातात. परंतु या उताऱ्यांच्या नकलां---- गैरप्रकार होऊ लागल्याचे आढळले आहे. जिल्हाधिकाऱ्यां---- अनेक तक्रारी आल्यामुळे हे गैरप्रकार रोखण्यासाठी शासनानं या प्रकारांविरुद्ध आदेश काढला आहे. या आदेशा---- आपले सरकार सेवा केंद्रा---- दिला जाणारा सातबाराचा उतारा आता निरुपयोगी ठरला आहे. आता पुन्हा या उताऱ्यां---- तलाठ्यांकडेच जावे लागणार आहे.

**प्र.४. खाली आठवड्याचे राशीभविष्य दिले आहे. ते 'भूतकाळ+जा' ही वाक्यरचना वापरून लिहा.** (५)

उदा. तुम्ही नातेवाइकांशी संपर्क साधाल.
तुमच्याकडून नातेवाइकांशी संपर्क साधला जाईल.

१. वरिष्ठ अधिकारी कामाबाबत योग्य सल्ला देईल.
२. मित्र आर्थिक मदत मागेल.
३. प्रिय व्यक्ती तुम्हाला फोन करेल.
४. कर्मचारी नियम पाळतील.
५. तुम्ही घरातल्या वृद्धांची काळजी घ्याल.

**प्र.५. जलसंपदा विभागाचे कार्यकारी अधिकारी जिल्हाधिकाऱ्यांना पावसाळ्याची तयारी कशी करतात हे सांगत आहेत. ही वाक्ये 'धातू+ण्यात+ये' या रचनेत बदला. (५)**

उदा॰ धरणनिहाय समन्वय अधिकारी नेमतात.
धरणनिहाय समन्वय अधिकारी नेमण्यात येतात.

१. नदीपात्रालगतच्या धोक्याच्या ठिकाणांचा अभ्यास करतात.
२. नदीपात्रातली अतिक्रमणे काढतात.
३. धरणाच्या बांधकामाची तपासणी करतात.
४. धरणांची गळती थांबवतात.
५. धरणांच्या ठिकाणी सीसीटीव्ही लावतात.

**प्र.६. गटातल्या वेगळ्या शब्दाभोवती वर्तुळ करा. (५)**

१. कायदा, नियम, विनिमय, अधिनियम, कलम
२. अधिसूचना, विधेयक, आदेश, परिपत्रक, ज्ञापन
३. अधिकारी, कर्मचारी, अधीक्षक, लिपिक, ग्राहक
४. पुनर्वसन, पुनरीक्षण, पुनर्जन्म, पुनर्मूल्यांकन, पुनर्मुद्रण
५. पदनाम, पदोन्नती, बदली, पदस्थापना, पदावनती

**प्र.७. रिकाम्या जागेत नकारार्थी शब्द भरा. (५)**

१. अनुभवी व्यक्तीचा सल्ला ---- घेता व्यवसायाला सुरुवात करू -----.
२. मुग्धाने मे महिन्यात रजा घेतली ----- तर आता तिला रजा मिळाली असती.
३. ते कधीही जागेत पैसे गुंतवणार -----.
४. कर्मचाऱ्यांनी नियमांचे उल्लंघन करू -----.

**प्र.८. कंसातल्या सूचनांप्रमाणे काळ बदला. (५)**

१. केंद्र सरकार आदिवासी संशोधन केंद्र उघडणार आहे. (पूर्ण वर्तमानकाळ करा.)
२. राज्यशासनाने प्रत्येक तालुक्यातल्या पावसाची नोंद ठेवली. (चालू वर्तमानकाळ करा.)
३. अधिवेशनात विरोधी पक्षाने आपली मते मांडली. (सामान्य वर्तमानकाळ करा.)
४. दूध व्यावसायिकांनी दरवाढीविरुद्ध मोर्चा काढला. (सामान्य भविष्यकाळ करा.)
५. परिचारिका रात्रंदिवस रुग्णांची सेवा करतात. (सामान्य भूतकाळ करा.)

**प्र.९. 'ब' गटातले क्रियापदाचे रूप निवडून वाक्ये पूर्ण करा. (५)**

| | अ | ब | क |
|---|---|---|---|
| १. | अरुणने तिखट भाजी | फाडून | |
| २. | विजूने सिनेमाला जाण्याआधी सगळी कामं | देऊन | टाकली. |
| ३. | मी गरम कॉफी | खाऊन | |
| ४. | त्याने सगळी जुनी पत्रं | करून | |
| ५. | रेवाने आपली आवडती साडी सीमाला | पिऊन | |

**प्र.१०. पुढील शब्द त्यांच्या लिंगानुसार पु, स्त्री, नपुं अशा वेगवेगळ्या रकान्यात भरा. (१०)**

अहवाल, गुंतवणूक, अंमलबजावणी, निधी, दौरा, अधिसूचना, प्रसिद्धीपत्रक, वस्तू, खाते, बैठक, तरतूद, निवेदन, सल्ला, निविदा, शेतकरी, व्यक्ती, शिफारस, कर्तव्य, खड्डा, दुकान

**प्र.११. कंसातल्या धातूंची योग्य रूपे रिकाम्या जागी भरा. सूचनांप्रमाणे वाक्ये बदला.** **(१५)**

१. परप्रांतातल्या अधिकाऱ्यांना स्थानिक भाषा -------- (शीक +आयचा) आहे.
२. ड्राइव्ह-इन सिनेमे बंद थिएटरऐवजी खुल्या जागेत -------- (बघ+ आवा) लागतात.
३. उद्या कदाचित माझ्या जुन्या मित्राचा फोन -------- शकेल. (ये+ऊ)
४. आपल्याला उमंग ॲपवर रोज हवामानाची स्थिती आणि पुढचे अंदाज सहा भाषांमध्ये -------- मिळतात. (ऐक+आयला)
५. सरकारकडे पुरेसा निधी नसल्यामुळे कर्मचाऱ्यांचा सेवाकर -------- आहे. (वाढ+णार)
६. दरवर्षी एसटी महामंडळाला आंब्यांच्या पेट्या एसटीतून -------- येतात. (पाठव+ता)
७. प्रेक्षकांपर्यंत -------साठी (पोच) चित्रपट निर्मात्यांनी ओटीटी हा नवा मार्ग -------- (शोध) काढला आहे.
८. आजकाल जुनी गाडी -------- (विक) -------- (इच्छि) लोक Olx वर जाहिरात देतात.
९. वाहतुकीचा नियम -------- स (मोड) पोलीस पाचशे रुपये दंड करतात.
१०. पाणीसाठा -------शिवाय (पाह) धरणातलं पाणी -------- (सोड) नका.
११. तीन -------- (वाज) पासून पाच -------- (वाज) पर्यंत मी बसस्टॉपवर थांबले होते.

**प्र.१२. अधोरेखित शब्द लक्षात घेऊन प्रश्न तयार करा.** **(५)**

१. पोलिसांनी गाडी थांबवून <u>चालकाची</u> चौकशी केली.
२. परदेशी प्रवाशांसाठी <u>मुख्यमंत्र्यांनी</u> मार्गदर्शक सूचना जारी केल्या.
३. पुणे विमानतळावरून झालेले आजच्या दिवसातले हे <u>सतरावे</u> उड्डाण आहे.
४. अधिवेशनात <u>शैक्षणिक धोरण, चक्रीवादळाची शक्यता, दुष्काळ</u> ह्या विषयांवर चर्चा होणार आहे.
५. अमेय <u>लहानपणापासून</u> नाटकांत कामं करायचा.

**प्र.१३. जोड्या जुळवा.** **(१०)**

| | |
|---|---|
| 1. as per request | क. मी उपकृत राहीन. |
| 2. optional holiday | ख. कार्यालयाने काळजीपूर्वक नोंद घ्यावी. |
| 3. on receipt of | ग. ताबडतोब उत्तर पाठवावे. |
| 4. I shall be obliged | घ. हे अत्यंत तातडीचे समजावे. |
| 5. office to note carefully | च. विनंतीनुसार |
| 6. please reply forthwith | छ. -च्या अधीन |
| 7. please treat it as most urgent | ज. वैकल्पिक सुट्टी |
| 8. subject to | झ. नंतरची कारवाई / कार्यवाही |
| 9. subsequent action | ट. मिळाल्यावर |
| 10. through proper channel | ठ. योग्य मार्गाने |

**प्र.१४. खाली दिलेल्या शब्दांपासून तयार होणारे शब्द रिकाम्या जागेत भरा.** **(५)**
(सर्वत्र, मिळणे, नेमणे, तपासणे, नासणे)
१. वैद्यकीय -------- करून घेतल्याशिवाय सरकारी नोकरीत रुजू होता येत नाही.
२. निवडणुकीपूर्वी उमेदवारांना आपली व कुटुंबाची -------- जाहीर करावी लागते.
३. भारतात -------- निवडणुका दर पाच वर्षांनी होतात.
४. मालवाहतूकदारांच्या संपामुळे शेतमालाची प्रचंड -------- झाली.
५. परदेशात राजदूत म्हणून -------- करून केंद्र सरकारने त्यांचा गौरव केला.

**प्र. १५. मराठीत शासकीय पत्रव्यवहारात वापरल्या जाणाऱ्या रूपांपुढे अनौपचारिक मराठीतली रूपे लिहा.** **(५)**
१. देणेबाबत ----------------
२. भरावयाचा ----------------
३. लिहिण्यास ----------------
४. सदर ----------------
५. करीत आहे ----------------
६. मागील ----------------
७. चालविण्याची ----------------
८. त्याजकडे ----------------
९. मिळण्याकरिता ----------------
१०. होण्याचा ----------------

**प्र. १६. खाली दिलेला उतारा वाचा आणि प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(५)**

मौजे आजदे, ता. कल्याण जि. ठाणे
येथील प्राथमिक आरोग्य केंद्र,
मौजे नारिवली ता. मुरबाड येथे स्थलांतर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०१८-प्र,क्र. ३६९-आरोग्य ३अ
१० वा मजला, जी. टी. रुग्णालय आवार,
मंत्रालय, मुंबई – ४०० ००१
दिनांक – २ नोव्हेंबर, २०१८

वाचा-
आरोग्य सेवा संचालनालय यांचे पत्र क्रमांकः संआसे/कक्ष-७अ/टे७/प्र.आ.केंद्र/ स्थलांतर/आजदे/नारिवली/ठाणे-२५४५-४९/२०१८, दिनांक २४.०५.२०१८

**प्रस्तावना -**

मौजे आजदे, ता. कल्याण. जि. ठाणे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे कार्यक्षेत्र कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आल्यामुळे मौजे आजदे ता. कल्याण, जि. ठाणे येथील प्राथमिक आरोग्य केंद्र स्थलांतरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय -**

मौजे आजदे, ता. कल्याण, जि. ठाणे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आल्यामुळे त्या ठिकाणचे प्राथमिक आरोग्य केंद्र मौजे नारिवली, ता. मुरबाड, जि. ठाणे येथे स्थलांतरित करण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती -**

१. स्थलांतरित ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित होऊ शकेल याकरिता संबंधित ग्रामपंचायतीने मोफत जागा उपलब्ध करून देणे अनिवार्य असेल.

२. स्थलांतरित ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित होऊ शकेल अशी इमारतीची तात्पुरती व्यवस्था व कर्मचारी निवासाची व्यवस्था असणे आवश्यक राहील. ज्यायोगे या जागेत बाह्यरुग्ण सेवा, स्त्रीरुग्ण तपासणीसाठी स्वतंत्र व्यवस्था, प्रसूतीसाठी व्यवस्था, कर्मचारी बसण्याची व्यवस्था असणे आवश्यक आहे.

३. प्राथमिक आरोग्य केंद्र तात्पुरत्या स्वरूपात सुरू होईपर्यंत सदर प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा इतर प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी उपलब्ध करून घ्याव्यात.

४. २४ तास पाणी व लाईटची व्यवस्था, स्वच्छतागृहाची व्यवस्था इत्यादी सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे.

५. सदर आरोग्य उपकेंद्राच्या बांधकामासाठी जिल्हा नियोजन व विकास मंडळाने त्यांच्या जिल्हा योजनेतून तरतूद उपलब्ध करून घेणे आवश्यक आहे.

सदर शासन-निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८१०३१११७४८३७२०१७ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(रा. शा. कौरते)
अपर सचिव, महाराष्ट्र शासन

**क. योग्य पर्याय निवडा.** **(१.५)**

१. प्राथमिक आरोग्य केंद्र कुठे आहे?
   अ. ठाणे जिल्ह्यात    ब. डोंबिवलीत

२. प्राथमिक आरोग्य केंद्राचे स्थलांतर कशासाठी केले गेले आहे?
   अ. आधीच्या ठिकाणी खूप गैरसोयी होत्या म्हणून.
   ब. आरोग्य केंद्राचे कार्यक्षेत्र दुसऱ्या महानगरपालिकेमध्ये समाविष्ट केले गेले म्हणून.

३. नवीन ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी जागा कोणी दिली?
   अ. आरोग्य सेवा संचालनालयाने.    ब. ग्रामपंचायतीने.

**ख. गाळलेल्या जागा भरा.** **(२)**

१. प्राथमिक आरोग्य केंद्र मौ. --------------- येथे स्थलांतरित केले आहे.

२. आरोग्य केंद्रात स्त्री रुग्णांच्या --------- साठी व --------- साठी स्वतंत्र व्यवस्था आहे.

३. या आरोग्य केंद्रात २४ तास वीज व --------- असेल.

**ग. चूक की बरोबर ते लिहा.** **(१.५)**

१. या आरोग्य केंद्राच्या बांधकामाचा खर्च ग्रामपंचायत करणार आहे.

२. स्थलांतरित केलेले आरोग्य केंद्र सुरू होईपर्यंत त्यातले अधिकारी व कर्मचारी दुसऱ्या आरोग्य केंद्रात काम करतील.

३. शासनाने हा निर्णय परिपत्रक पाठवून कळवला आहे.

# तोंडी चाचणी

५० गुण

**प्र.१. पुढील मुद्दे लक्षात घेऊन वर्गात स्वतःबद्दल सांगा.** **(१०)**

१. नाव

२. विभागाचे / कार्यालयाचे / कंपनीचे नाव

३. पद

४. विभागात / कार्यालयात / कंपनीत किती वर्षं काम करताहात?

५. मातृभाषा

६. मूळ प्रांत कोणता?

**प्र.२. खालीलपैकी एका विषयावर जोडीदाराशी संभाषण करा.** **(१०)**

१. तुम्ही गावाचे सरपंच आहात. गावासाठी, पाण्याचा टँकर मागवण्यासाठी जवळच्या जिल्ह्याच्या नगरपालिका अधिकाऱ्याशी संभाषण करा.

२. तुम्ही गावातले सामाजिक कार्यकर्ते आहात. सौर ऊर्जेवर चालणाऱ्या साधनांची आवश्यकता इतर गावकऱ्यांना पटवून देण्यासाठी गावकऱ्यांशी बोला .

३. तुम्ही अमराठी अधिकारी आहात. पण वेळेअभावी तुम्ही मराठीच्या वर्गांना येऊ शकत नाही. मराठी शिकवणाऱ्या शिक्षकांशी ऑनलाइन अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत बोला.

४. तुम्हाला नको असलेल्या ठिकाणी तुमची बदली झाली आहे. बदली दुसऱ्या ठिकाणी करण्याची विनंती तुमच्या साहेबांना करा..

५. तुम्ही कार्यालयाचे प्रमुख आहात. कार्यालयासाठी एक जनरेटर देण्यासंबंधी वरिष्ठांशी चर्चा करा.

**प्र.३. वर्णन करा.** **(१०)**

१. माझं कुटुंब

२. माझा प्रांत

३. माझं गाव / शहर

४. माझं घर

५. आतापर्यंतच्या नोकरीत झालेली बढती / बदली

**प्र.४. पुढील बातमी मोठ्याने वाचा.** **(१०)**

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वर्तमानपत्रातल्या ताज्या बातम्या मोठ्याने वाचायला देणे.

**प्र.५. खालील छोटी छोटी निवेदने ऐका व प्रश्नांची उत्तरे द्या.** **(१०)**

**निवेदन १. चूक की बरोबर सांगा.** **(३)**

१. वीजपुरवठा खंडित होतो म्हणजे वीजपुरवठा बंद पडतो.
२. वितळतार नियंत्रण कक्ष आठवड्यातून पाच दिवस उघडा असतो.
३. वितळतार म्हणजे फ्यूज.

**निवेदन २. योग्य पर्याय निवडा.** **(२)**

१. वीजजोडणीच्या कार्यपद्धतीत बदल का केला आहे?
   अ. वीजग्राहकांना ताबडतोब वीजजोडणी मिळावी म्हणून.
   ब. आधीच्या कार्यपद्धतीबद्दल अनेक तक्रारी होत्या म्हणून.
२. आता वीजजोडणी किती दिवसात होते?
   अ. सहा.   ब. एक

**निवेदन ३. चूक की बरोबर सांगा.** **(२)**

१. अर्जदाराच्या जागेची पाहणी पर्यवेक्षक करतात.
२. अर्जदाराच्या जागेत किंवा जवळच्या वीजसेवेत काही त्रुटी असल्या तर अर्जदाराचा अर्ज रद्द होतो.

**निवेदन ४. योग्य पर्याय निवडा.** **(३)**

१. वीजमापक पावसापासून सुरक्षित कसे ठेवायचे?
   अ. सिमेंटची केबिन बांधून
   ब. वीजमापक प्लॅस्टिकने झाकून
२. वीजमापक केबिनमध्ये पाणी गळायला लागले किंवा पाणी शिरले तर काय केलं पाहिजे?
   अ. इलेक्ट्रिशियनला फोन केला पाहिजे.
   ब. विजेचा मुख्य स्वीच बंद केला पाहिजे.
३. हातमोजे व रबरी बूट घातल्यामुळे काय होईल?
   अ. शॉक बसणार नाही
   ब. हात व पाय भिजणार नाहीत.

# उत्तरे

## पाठ १ अधिसूचना

७. क. ती मराठी बातम्या वाचेल. ख. तुम्ही लोकांशी मराठीत बोलाल नं?
ग. तुमच्या बदल्या नागपूरला होतील. घ. तो माझ्याऐवजी दौऱ्यावर जाईल का?
च. आभाराचं भाषण तू करणार नाहीस. छ. त्या कामाच्या वेळी मोबाईल वापरणार नाहीत.

९. क. चूक ख. बरोबर ग. चूक घ. बरोबर

१०. क. २ ख. १ ग. २ घ. २

१४. क. आम्ही ख. तू ग. मी घ. तुम्ही च. त्या

१५. क. २ ख. ३ ग. ३ घ. ३ च. २

१६. क. वैज्ञानिक ख. नैतिक ग. सार्वजनिक घ. आर्थिक च. सामाजिक

१७. क. ३ ख. ४ ग. १ घ. ५ च. २

१९. क. करायला ख. द्यायला ग. दाखवायला घ. लिहायला च. काढायला

२१. क. ४ ख. १ ग. ५ घ. २ च. ३

२२. वाचून, करून, काढून, पाठवून, करून

२३. क. खाऊन बघणे ख. दाखवून टाकणे ग. रडून दाखवणे घ. येऊन जाणे
च. चाखून पाहणे छ. देऊन टाकणे

२४. क. बरोबर ख. बरोबर ग. चूक घ. चूक च. बरोबर

२८. क. संपून गेले ख. देऊन टाकली ग. करून ठेवली घ. भरून काढलं
च. वाचून पाहिला

३१. क. साखर ख. पांढरीशुभ्र ग. संकेतस्थळावरून घ. १२ जुलैपर्यंत
च. NCDEX Spot Exchange Ltd. कडे

३२. क. अर्जदार ख. राखणदार ग. दुकानदार घ. कंत्राटदार च. कारखानदार
छ. जमीनदार

३५. क. करू ख. नोंदवू ग. बोलू घ. राहू च. म्हणू

३७. क. ७ ख. ५ ग. ६ घ. १ च. २ छ. ३ ज. ४

## पाठ २ शासन निर्णय

३. क. २ ख. ४ ग. ३ घ. १ च. ८ छ. ७ ज. ५ झ. ६

६. क. २ ख. १ ग. २ घ. २ च. २ छ. १

९. क. राज्यपालांच्या ख. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसायविकास व मत्स्यव्यवसाय
ग. २०१९ घ. स्थलांतरण च. संकेतस्थळावर

१०. क. मौ. बदनापूर ख. मौजे ग. जिल्हापरिषद अमरावती सर्वसाधारण सभा
घ. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती
च. पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रातील शेतकरी / पशुपालक यांच्याकडील पशुधनास
छ. गोपालकांच्या उत्पन्नात वाढ करण्याकरता तसे त्यांच्या पशुधनास उत्तम पशुवैद्यकीय सेवा मिळण्याकरता.

११. क. दुभत्या ख. स्थलांतर ग. पशुपालक घ. कायमस्वरूपी च. ग्रामस्थ
छ. पशुधन झ. सर्वानुमते ट. मंजुरी
१२. क. मान्य ख. मागणे ग. ग्राम घ. स्थळ च. संरक्षण
१९. क. ४ ख. ५ ग. १ घ. २ च. ३
२०. क. रेल्वेकडून काही मार्गांवर खासगी एक्स्प्रेस चालवण्यात येत आहे.
ख. विरोधी पक्षाकडून उमेदवारांची नावे जाहीर करण्यात येत आहेत.
ग. पालकमंत्र्यांकडून मेट्रोच्या कामावर लक्ष ठेवण्यात येत आहे.
घ. प्रशासनाकडून टोलनाके बंद करायचा निर्णय घेण्यात येत आहे.
च. आरटीओ ऑफिसकडून जुन्या गाड्यांच्या मालकांना नोटीस पाठवण्यात येत आहे.
२२. क. ४ ख. ६ ग. ७ घ. २ च. ८ छ. १ ज. ५ झ. ३
२३. क. २ ख. १ ग. १ घ. १ च. २ छ. १ ज. १ झ. २ ट. २ ठ. २
२८. क. लवकर उठल्याने तिला वर्गात झोप येत होती.
ख. बदलीचा आदेश आल्याने रोहन नाराज होता.
ग. रजा मंजूर झाल्यामुळे उषा खूष दिसत होती.
घ. थंडीत आईस्क्रीम खाल्ल्यामुळे प्रियाताईंना खोकला झाला.
च. दिवसभर एका जागेवर बसल्याने त्याची पाठ दुखत होती.
३२. क. करावी ख. करावा ग. कराव्यात घ. करावा च. करावे
३३. क. द्यावीत ख. द्यावे ग. द्यावी घ. द्यावी च. द्यावे छ. द्यावा ज. द्यावा

## पाठ ३ परिपत्रक

२. क. एक ख. दोन ग. सात घ. चार च. दोन
९. क. एक तास ख. होतो. ग. डबा उशिरा मिळाला. घ. अर्ध्या तासाचे
च. एक तास
१३. क. शिक्षणमंडळाने ख. महानगरपालिकेने ग. अधिकाऱ्यांनी घ. कारखानदारांनी
च. बँकेने
१४. क. नी ख. नी ग. ने घ. ने च. नी
१५. क. २ ख. २ ग. १ घ. १ च. २ छ. १ ज. २
१८. क. ५ ख. ४ ग. ६ घ. २ च. १ छ. ३
१९. क. हाताखालचे ख. डॉक्टरांवरची ग. परदेशातले घ. माझ्याकडची
च. देशापुढच्या
२०. क. ३ ख. ५ ग. २ घ. १ च. ४
२१. क. कनिष्ठ ख. अवघड ग. अपुरी घ. दुर्लभ
२२. क. २ ख. २ ग. ३
२४. १. सायकल २. लोकल ट्रेन ३. स्कूटर ४. टॅक्सी ५. रिक्षा ६. बस
२६. क. चूक ख. बरोबर ग. चूक
२९. क. सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा गुजरातमध्ये आहे.
ख. लोकमान्य टिळक यांनी शेवटपर्यंत देशहिताचा विचार केला.
ग. मनोहर पर्रीकर, सुषमा स्वराज आणि अरुण जेटली यांच्या निधनाने देशाचे खूप नुकसान झाले.

घ. अमिताभ बच्चन आणि जया बच्चन यांना अनेक पुरस्कार मिळाले.
च. कलाकार कार्यक्रमात ग्रेस, शांताबाई आणि आरती प्रभू यांच्या कविता वाचणार आहेत.

३०. क. महाराष्ट्र फाउंडेशन वसंत आबाजी डहाकेंना पुरस्कार देणार आहे.
ख. पुणे विद्यापीठाला सावित्रीबाई फुलेंचे नाव दिले गेले.
ग. लता मंगेशकर आणि आशा भोसलेंनी सर्व भारतीय भाषांमध्ये गाणी गायली आहेत.
घ. १२ जानेवारीला स्वामी विवेकानंदांची जयंती असते.
च. जे.आर.डी टाटा, नारायण मूर्ती आणि अझीम प्रेमजींना आंतरराष्ट्रीय उद्योगात विश्वात मानाचे स्थान आहे.

३१. क. ५ ख. ६ ग. ७ घ. १ च. २ छ. ४ ज. ३
३२. क. करण्याबाबत ख. करून ग. केल्यानंतर घ. करावी च. करण्यात
३४. क. त्या ख. ती ग. तो घ. ते च. त्या
३५. क. पुष्पहार ख. निर्गमित करणे ग. प्रतिमा घ. जयंती च. थोर व्यक्ती

## पाठ ४ आदेश

५. क. कडक ख. उकाडा ग. मुसळधार घ. दुष्काळ च. गुलाबी छ. किमान
६. क. उन्हाळा, फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, मे ख. पावसाळा, जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर
ग. हिवाळा, ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी
७. क. हिवाळा ख. उन्हाळा ग. पावसाळा
१२. क. ६ ख. ३ ग. २ घ. ४ च. ९ छ. ५ ज. १० झ. ७ ट. ८ ठ. १
१३. क. उपग्रह ख. उपनदी ग. उपसमिती घ. उपविभाग च. उपनगरे छ. उपनियम
१४. क. उत्तम ख. उत्कृष्ट ग. श्रेष्ठ घ. संमत च. मान्य
१५. क. ३ ख. ५ ग. ६ घ. १ च. ४ छ. २ (अनेक उत्तरे शक्य)
१९. क. केल्यानंतर ख. ऐकल्यानंतर ग. लागल्यानंतर घ. दिल्यानंतर च. आल्यानंतर
२०. क. मुळे ख. वर ग. शिवाय घ. पासून च. बरोबर
२१. क. चूक ख. बरोबर ग. बरोबर घ. चूक च. बरोबर छ. चूक
२४. क. देशपांडे बदली करण्याबाबत साहेबांशी बोलणार आहेत.
ख. लाडक्या अभिनेत्याला पाहण्यासाठी लोकांनी गर्दी केली होती.
ग. पारपत्राची मुदत संपण्यापूर्वी वाढवून घेतली पाहिजे.
घ. शिक्षण सोडण्याशिवाय त्याच्याकडे दुसरा उपाय नव्हता.
च. सिगारेट ओढल्यामुळे कॅन्सर होऊ शकतो.
२५. क. नियम – अधिनियम ख. बदली – बदल ग. पूर्वी – पूर्व
घ. पदस्थापना – पदोन्नती च. निवेदन – आवेदन छ. सदर - सादर
२६. क. ३ ख. १ ग. २ घ. ३ च. २ छ. ३
३१. क. ३ ख. ४ ग. ५ घ. ६ च. २ छ. १
३२. क. ३ ख. ४ ग. ३ घ. १ च. ४ छ. ३
३४. क. १ ख. २
३५. क. चूक ख. बरोबर

## पाठ ५ प्रसिद्धिपत्रक

१. क. शेतकरी ख. शिंपी ग. कुंभार घ. कोळीण च. दुकानदार
२. क. २ ख. ५ ग. ४ घ. १ च. ३
४. क. घरकामगार ख. लोहार ग. गवळी घ. गवंडी
५. क. देणारे ख. करणारा ग. चालवणारा घ. करणारी
८. क. ५ ख. ६ ग. ४ घ. २ च. १ छ. ३
१०. क. मारणारं ख. देणाऱ्या ग. टाकणारा घ. लावणारी च. चालवणाऱ्या
१२. क. आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये जे काम करतात ते तरूण
ख. नदीवर ज्या पाणी भरतात त्या बायका
ग. घरात शिरून जे दूध पितं ते मांजर
घ. बसमध्ये जी वाहकाचे काम करते ती मुलगी
च. जी ट्रॅक्टर चालवते ती मुलगी
छ. मैदानावर जी क्रिकेट खेळतात ती मुलं
१६. क. हे ख. हे ग. हे घ. ही च. हा
१८. क. तीन वर्षांनी प्रवासभाड्यात बदल करण्यात आला आहे.
ख. जिल्हाधिकाऱ्यांकडून रात्री ध्वनिक्षेपक लावण्याची परवानगी देण्यात आली आहे.
ग. विद्यापीठाकडून वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात आल्या आहेत.
घ. बेस्टकडून सौजन्य सप्ताह साजरा करण्यात आला आहे.
च. ह्या मैदानावर हातमागाचे प्रदर्शन भरवण्यात आले आहे.
१९. १. ग २. ख ३. ख ४. क ५. ख
२१. क. चूक ख. चूक ग. चूक घ. बरोबर
२२. क. १ ख. २ ग. ३ घ. ४
२५. क. ऑफिसला ख. १० मिनिटं ग. साडेनऊ घ. १०.२० च. साडे पाच
२६. क. आता दीड वाजला आहे.
ख. आता दोन वाजले आहेत.
ग. आता सव्वा वाजला आहे.
घ. आता पाऊण वाजला आहे.
च. आता अडीच वाजले आहेत.
छ. आता एक वाजला आहे.
ज. आता पावणे तीन वाजले आहेत.
झ. आता सव्वा चार वाजले आहेत.
ट. आता साडेपाच वाजले आहेत.
२७. क. माझ्या घड्याळ्यात साडेचार वाजायला सात मिनिटं कमी आहेत.
ख. ट्रेन तीन वाजून दहा मिनिटांनी सुटेल.
ग. वरुण सकाळी दहा वाजल्याशिवाय उठत नाही.
घ. तुम्ही साडेसात वाजता मला फोन करा.
च. विविधभारतीचे कार्यक्रम रात्री साडेअकरा वाजल्यानंतर संपतात.
छ. आत्ता रात्रीचा दीड वाजला आहे.
२९. क. कंपन्यांसाठी मॅजिक बसपास देण्यात येणार आहेत.
ख. शासनातर्फे प्रत्येक गावात वाचनालय सुरू करण्यात येणार आहे.

ग. पंढरपूरच्या यात्रेसाठी ज्यादा एस.टी बस सोडण्यात येणार आहेत.
घ. ए.सी. बसपाससाठी १००/- रुपये जास्त लावण्यात येणार आहेत.
च. शिक्षकांकडून 'काम बंद' आंदोलन करण्यात येणार आहे.

३२. क. जीवनावश्यक वस्तूंची दुकाने उघडण्यात येणार नाही आहेत.
ख. औषधविक्रेत्यांकडून औषधं घरी आणून देण्यात येणार नाही आहेत.
ग. भाजी मार्केट रविवारी चालू ठेवण्यात येणार नाही आहे.
घ. विद्यापीठ ऑनलाईन अभ्यासक्रम सुरू करणार नाही आहे.
च. या उन्हाळ्यात वीजकपात करण्यात येणार नाही आहे.

३३. क. शासनाकडून खेळाडूंना सवलती जाहीर करण्यात येणार आहेत.
ख. महानगरपालिकेकडून रस्त्यावर झाडं लावण्यात येणार आहेत.
ग. विद्यापीठाकडून परदेशी शिक्षणसंस्थांशी करार करण्यात येणार आहे.
घ. साहित्य अकादमीकडून साहित्यिकांना पुरस्कार देण्यात येणार आहेत.
च. आरोग्यमंत्र्यांकडून रूग्णालयीन सुविधांचे तपशील बातम्यांमध्ये सांगण्यात येणार आहेत.

३५. क. अंतर्गत ख. पोटी ग. तर्फे घ. विरुद्ध च. बाबत

३७. क. मधून ख. वरून ग. खालून घ. कडून च. समोरून

३८. क. ३ ख. २ ग. ४ घ. २ च. १ छ. १ ज. १ झ. १

४०. क. चूक ख. बरोबर ग. बरोबर घ. चूक

## पाठ ६ जाहिरात

३. क. आंतर + जात + ईय = आंतरजातीय
ख. आंतर + शाळा + ईय = आंतरशालेय
ग. आंतर + विद्यापीठ + ईय = आंतरविद्यापीठीय
घ. आंतर + धर्म + ईय = आंतरधर्मीय
च. आंतर+ राज्य + ईय = आंतरराज्यीय

४. क. स्वातंत्र्यदिन
ख. प्रजासत्ताकदिन
ग. शिक्षकदिन
घ. महिलादिन
च. मराठीदिन

५. क. ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो.
ख. २१ जून हा दिवस जागतिक योग दिन म्हणून साजरा केला जातो.
ग. ११ जुलै हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो.
घ. २१ फेब्रुवारी हा दिवस जागतिक मातृभाषा दिन म्हणून साजरा केला जातो.
च. ७ एप्रिल हा दिवस जागतिक आरोग्य दिन म्हणून साजरा केला जातो.

७. क. व्याघ्र ख. रक्षण ग. स्थान घ. अधिवास च. लक्ष्य छ. संगोपन
ज. दिन

८. क. घरी ख. जागी ग. मनी, स्वप्नी घ. प्रहरी च. चरणी छ. जळी

९. क. ३ ख. ५ ग. १ घ. २ च. ४

१०. क. तू ख. आपण ग. आम्ही घ. तुम्ही च. मी

११. क. २ ख. ३ ग. १ घ. ४ च. १ छ. ३
१३. क. ६ ख. ४ ग. ३ घ. ७ च. १ छ. ८ ज. ५ झ. २
१७. क. जे ख. तो ग. जो घ. जो च. ती छ. जो
२०. क. ५ ख. ६ ग. ४ घ. ३ च. १ छ. ७ ज. २
२१. क. वाटप ख. उभारणी ग. वापर घ. जोडणी च. गुंतवणूक
२२. क. चा ख. ने ग. चा घ. चे च. ची छ. च्या ज. चे
झ. चा ट. पासून
२४. क. मिळतात ख. मिळते. ग. मिळाली घ. मिळालं च. मिळतील
२६. क. २ ख. ३ ग. २ घ. ३ च. ३
२९. क. शिक्षणमंडळाकडून परीक्षेची तारीख जाहीर केली गेली.
ख. महानगरपालिकेकडून आधारकार्डांसाठी केंद्रे उघडली जातील.
ग. शिक्षणविभागाकडून फी-माफीचे आदेश काढले जातात.
घ. बांधकामविभागाकडून रिक्त पदांसाठी जाहिरात दिली जाईल.
च. हजारो उमेदवारांकडून ह्या पदासाठी अर्ज भरले जातील.
३०. क. गेली ख. जातील ग. जातात घ. जातो च. गेला
३१. क. संस्थेकडून नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे सर्वेक्षण केले जात आहे.
ख. इस्रोकडून विक्रम लँडरशी सतत संपर्क साधला जात होता.
ग. शासनाकडून शहरातल्या मजुरांना मोफत जेवण दिले जाणार आहे.
घ. कलाकारांकडून पूरग्रस्तांसाठी कार्यक्रम सादर केला जाणार आहे.
च. शिक्षणमंत्र्यांकडून पेपर रद्द करण्याचा निर्णय घेतला गेला आहे.
छ. आकाशवाणीकडून पंतप्रधानांच्या भाषणाचे थेट प्रसारण केले गेले होते.
३५. क. इथे नेट मिळाल्यास माझे काम होईल.
ख. त्यांचा पक्ष बहुमताने आल्यास ते सरकार स्थापन करतील.
ग. वीज गेल्यास कारखान्यातील यंत्रं बंद पडतील.
घ. हा सिनेमा करमुक्त केल्यास प्रेक्षकांची गर्दी वाढेल.
च. मेट्रोची कामे लवकर पूर्ण झाल्यास वाहतुकीची कोंडी होणार नाही.
३६. क. कनिष्ठ अभियंता ख. सार्वजनिक बांधकाम विभाग ग. अधीक्षक अभियंता
घ. परीक्षेसाठी च. महाराष्ट्रातले छ. वीस ज. महापरीक्षा पोर्टल
झ. चारशे पाच ट. बारा ठ. शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
३८. क. १ ख. २ ग. १ घ. २
३९. क. चूक ख. बरोबर ग. चूक घ. बरोबर
४०. क. ६ ख. ५ ग. ७ घ. ३ च. २ छ. १ ज. ४

## पाठ ७ अर्धशासकीय पत्र आणि इतर पत्रव्यवहार

३. क. पोट ख. गुढगा ग. पाठ घ. डोळा च. डोकं
५. क. ४ ख. ५ ग. ६ घ. २ च. ३ छ. १
८. क. जर प्रदर्शनाचे ठिकाण बघितले तर तिथल्या सर्व वस्तू महाग असतील असे वाटते.
ख. जर तुझे मत ऐकले तर तुला मुलगा आवडलेला दिसत नाही असे मला वाटते.
ग. अपघातांची वाढती संख्या लक्षात घेतली तर हेल्मेटची सक्ती केलीच पाहिजे.

घ. हवामानखात्याचे अंदाज वाचले तर पुढच्या आठवड्यात पुन्हा थंडी पडेल असं दिसतंय.
च. भाज्यांचे वाढलेले दर बघितले तर खायचं काय हा प्रश्न पडतो.

९. क. ४ ख. ५ ग. २ घ. १ च. ३

१२. क. असतो...असती ख. असता...असते ग. असते...असते घ. असतेस...असती च. असता...असती

१८. १. लवकरात लवकर २. उशिरात उशिरा ३. उशिरात उशिरा ४. लवकरात लवकर ५. उशिरात उशिरा

२०. १. तुम्ही शक्य तितक्या लवकर डॉक्टरांकडे जा.
२. तू शक्य तितक्या लवकर मेलचं उत्तर दे.
३. आपण शक्य तितक्या लवकर हे काम पूर्ण करू या.
४. आम्हाला शक्य तितक्या लवकर हे घर बदलायचं आहे.
५. त्याने शक्य तितक्या लवकर भारतात परत यावं.

२१. क. १ ख. २ ग. १ घ. २ च. ४ छ. १

२३. क. स + प्रेम = सप्रेम ख. स + आदर = सादर ग. स + शर्त = सशर्त घ. स + पत्नी = सपत्नीक च. स + प्रमाण = सप्रमाण

२४. क. अपुरा ख. प्रतिगामी ग. लज्जास्पद घ. उपलब्धता च. अशासकीय

२५. क. बांधकाम ख. अनुदानित ग. प्रातिनिधिक घ. जागतिक च. संबंधित छ. असुरक्षितता ज. तपासणी झ. शक्यता ट. महाविद्यालयीन

२७. क. कार्य ख. आलय ग. वाचन घ. ग्रंथ + आलय च. हिम + आलय छ. संग्रह ज. आलय झ. आलय

२८. क. चित्रपट + गृह = चित्रपटगृह (cinema hall)
ख. कारा + गृह = कारागृह (prison)
ग. बाल + सुधार + गृह = बालसुधारगृह (child remand home)
घ. स्नान + गृह = स्नानगृह (bathroom)
च. नाट्य + गृह = नाट्यगृह (drama theatre)

२९. क. माननीय ख. तीर्थरूप ग. श्रीयुत घ. सौभाग्यवती च. आदरणीय छ. चिरंजीव

३०. क. संचालक ख. प्रधान सचिवांना ग. शौचालयांबद्दल घ. शाळेत मुलामुलींसाठी स्वतंत्र शौचालये नाहीत. च. अनुदानित छ. महाविद्यालयाच्या व्यवस्थापक मंडळाची

३७. क. ७ ख. ६ ग. ९ घ. ३ च. २ छ. ४ ज. १ झ. ५ ट. ८

३८. क. दहा ख. दोन ग. सहसंचालकांनी संचालकांना माहिती पाठवली नाही. घ. सहसचिवांना च. शिक्षण संचालनालय

३९. क. बरोबर ख. चूक ग. चूक घ. बरोबर

## पाठ ८

६. क. वंदनाला सतार शिकायची आहे.
ख. सरोजताईंना हिंदी पुस्तकं वाचायची आहेत.
ग. तुला दुसरी नोकरी शोधायची आहे का?
घ. शर्माजींना स्टाफसाठी नव्या खुर्च्या खरेदी करायच्या आहेत.

च. कर्मचाऱ्यांना साहेबांसाठी गाण्यांच्या सीडीज् घ्यायच्या आहेत.
छ. केंद्र सरकारला प्रत्येक जिल्ह्यात वनौषधी विक्रीकेंद्रे सुरू करायची आहेत.

८. क. १ ख. २ ग. २ घ.१ च. २

१२. क. गंगाधरला नोकरीसाठी रोज पुणे-मुंबई प्रवास करावा लागतो.
ख. कुलकर्णीसाहेबांना कार्यालयात आठ वाजेपर्यंत थांबावं लागलं.
ग. विद्यार्थ्यांना दर आठवड्याला परीक्षा द्यावी लागेल.
घ. मुलांना लहान वयातच वेगवेगळे प्रकल्प करून द्यावे लागतील.
च. सरिताला शाळेत अनेक विषय शिकावे लागतात.

१७. क. उजवीकडे न वळता सरळ जा.
ख. जीन पँट न धुता अनेक दिवस वापरतात.
ग. तो एकही शब्द न बोलता शांतपणे जेवतो.
घ. टायपिस्टसाठी न थांबता स्वतः पत्रं टाईप करा.
च. तुम्ही पुस्तक न वाचता मत कसं देता?

१९. क. मदतीने ख. ने ग. परवानगी घ. आज्ञेने च. कृपा

२१. क. नवी जागा घेतल्याच्या दिवसापासून ती दोघं आनंदात आहेत.
ख. लग्न ठरल्याच्या दिवसापासून तिने तयारीला सुरुवात केली आहे.
ग. इंटरनेटचं कनेक्शन घेतल्याच्या दिवसापासून तो सगळी कामं ऑनलाईन करतो.
घ. बापूसाहेब गेल्याच्या दिवसापासून त्यांच्या कुत्र्याने अन्नाला तोंडही लावलेलं नाही.
च. मित्र घरात आल्याच्या क्षणापासून ते दोघे गप्पा मारताहेत.

२२. क. ४ ख. ५ ग. २ घ. १ च. ३

२३. क. प्रेमळ / सहृदयी ख. वक्तशीर ग. कडक घ. संतापी

२६. क. Dismissal letter ख. हो ग. खबरदार घ. हो

२८. क. विमानचलन सल्लागार ख. नऊशे तीस रुपये + कर ग. टेबले, खुर्च्या
घ. अनुदानातून च. वित्त

३३. भरण्याचा, पुरवण्याचे, बांधण्याची, करण्याचे, सुधारण्याच्या

३४. क. रेशीम ख. लोखंड ग. लोकर घ. कागद च. कापड छ. पितळ
ज. सूत

३५. क. त ख. ने, चे ग. ना घ. च्या

३८. क. स्कूटर <u>चालवणाऱ्यांनी</u> हेल्मेट वापरावे.
ख. रस्त्यावरून <u>चालणाऱ्याला</u> पोलिसांनी फूटपाथवरून चालायला सांगितले.
ग. गर्दीत पाकीट <u>मारणाऱ्याला</u> लोकांनी पकडले.
घ. अफवा <u>पसरवणाऱ्यांवर</u> गुन्हा दाखल केला जाईल.
च. कर <u>चुकवणाऱ्यांची</u> नावे आयकर विभागाकडे असतात.

३९. क. ५ ख. ६ ग. १ घ. २ च. ४ छ. ३

४०. क. न भरलेला ख. फॉर्म ग. डेअरी घ. कंत्राटे घेणारा च. काटे असलेला

४१. क. कंत्राट ख. मोहोर ग. मान्यता घ. निर्जंतुक च. काटा

४२. क. करण, जागतिकीकरण ख. बंद, हवाबंद ग. पुरस्कार, प्राप्त घ. शाळा, वेधशाळा
च. दार, दुकानदार

४३. क. २ ख. धुळे ग. कार्यकारी अभियंता किंवा उपअभियंता यांच्या कार्यालयातून
घ. नाही च. पैसे परत मिळणार नाहीत.

## पाठ ९ प्रकटन

३. क. बरोबर ख. चूक ग. चूक घ. बरोबर

४. क. २ ख. १ ग. १ घ. २

९. क. जो निरोप दिला तो. ख. या कार्यशाळा घेतल्या त्या. ग. जी बैठक झाली ती.
घ. जे नेते निवडून आले ते. च. जी परिपत्रके काढली ती. छ. जे पुस्तक छापले ते.

१०. क. काढलेला मोर्चा. ख. कार्यक्रमाला आलेल्या मुली. ग. केलेली खरेदी.
घ. विकत घेतलेले कुर्ते. च. जिंकलेली मॅच. छ. पाहिलेले दृश्य.
ज. रस्त्यावर झोपलेली माणसं.

१३. क. १. मिनिटात २. मिनिटांनी
ख. १. तासानी २. तासात
ग. १. आठवड्यात २. आठवड्यांनी
घ. १. महिन्यांत २. महिन्याने
च. १. वर्षात २. वर्षांनी

१४. क. गुण + पडताळणी ख. छाया + प्रत ग. गुण + पत्रिका घ. मूल्य
च. शाला + अंत छ. कार्य + पद्धती

१५. क. संपादक ख. पडताळणे ग. मध्यम घ. कार्यालय च. संख्या

१६. क. नुसार ख. मार्फत ग. अंतर्गत घ. बरोबर च. निहाय छ. साठी

१७. क. गुण ख. शुल्क ग. विषयनिहाय घ. सांख्यिकी च. प्रविष्ट
छ. विहित ज. छायाप्रत

१८. क. २ ख. १ ग. १ घ. १ च. २ छ. २

२५. क. संयोजकांनी कार्यक्रमाची तारीख ठरली हे कळवले.
ख. सदानंदरावांनी ते स्वतः मुंबईला येणार आहेत हे कळवले.
ग. विद्याताईंनी सईचा साखरपुडा झाला हे सांगितले.
घ. एजंटने तिकिटे शिल्लक नाहीत हे सांगितले.
च. संजयने सहलीची जागा बदलली हे कळवले.
छ. साहेबांनी विनायकला त्याची बदली केली हे सांगितले.

२९. क. प्रत्येकाने कम्प्युटरवर काम करणे आवश्यक आहे.
ख. नागरिकांनी आधारकार्ड जवळ ठेवणे आवश्यक आहे.
ग. परदेशात फिरताना आपण पासपोर्ट सांभाळणे आवश्यक आहे.
घ. विद्यार्थ्यांनी भरपूर वाचन करणे आवश्यक आहे.
च. उमेदवारांची निवड गुणवत्तेनुसार होणे आवश्यक आहे.

३०. क. प्रत्येकाने एकेक झाड लावणे आवश्यक आहे.
ख. भाजीवाल्यांनी भाजीचा कचरा उचलणे आवश्यक आहे.
ग. मुलांनी रोज वृत्तपत्र वाचणे आवश्यक आहे.
घ. दुकानदारांनी दुकानावरच्या पाट्या मराठीत लिहिणे आवश्यक आहे.
च. महाराष्ट्रात राहणाऱ्यांनी मराठी बोलणे आवश्यक आहे.
छ. मुलांना मराठी येणे आवश्यक आहे.
ज. वाहनचालकांनी सिग्नल पाळणे आवश्यक आहे.
झ. वाहन चालवायचा परवाना चालकाजवळ असणे आवश्यक आहे.

३१. क. रोजीच्या पत्रान्वये   ख. सुरू असलेल्या अनधिकृत आठवडे बाजाराला
ग. भरवण्याबाबत   घ. प्रकटनाच्या   च. सात दिवसांच्या आत

३२. क. नेमणूक   ख. आयोजक   ग. मिळकत   घ. स्थानिक   च. नासाडी

३३. क. १   ख. २   ग. २   घ. १   च. २   छ. १

३४. क. सप्ताह   ख. कापड   ग. अनुमती   घ. व्यापार   च. लगेच   छ. शेती
ज. स्वच्छता

३५. क. ४   ख. ५   ग. २   घ. १   च. ३

३६. क. नोंद घेतली   ख. सहन केला   ग. आले आहे   घ. देणार नाहीत
च. सुरू आहेत

३७. क. ४   ख. ५   ग. ६   घ. २   च. १   छ. ३

३९. क. सोपवलेली   ख. केलेला   ग. राहिलेल्या   घ. दिलेल्या   च. पाठवलेले

४०. क. advance   ख. provision   ग. accountant general   घ. broadcasting
च. payment   छ. contingency   ज. compensation   झ. under secretary
ट. finance department

४१. चे, ची, च्या, ची, चा, ची, चे

४२. क. सामान्य प्रशासन विभाग   ख. अपर सचिव   ग. सामूहिक रेडियो
घ. अभियंता ग्रामीण ध्वनिक्षेपण उपविभाग   च. चालू वर्षातल्या

४४. क. producer, production cost, product   ख. packer, packed commodity, to pack
ग. importer, import duty, to import   घ. assurer, assured, to assure
च. measurement, measurer, to measure

४५. क. अवैध   ख. निर्यातदार   ग. अप्रमाणित   घ. विधीअग्राह्यता   च. अनावश्यक

४६. क. पालन, आवश्यक   ख. प्रमाणित   ग. सादर   घ. वैध   च. अधीन

४७. क. अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
ख. उत्पादक, आवेष्टक आणि आयातदार
ग. संबंधित कागदपत्रे
घ. उत्पादक, आवेष्टक किंवा आयातदार या कामासाठी
च. एका वर्षासाठी

४८. क. १   ख. २   ग. १   घ. २

## पाठ १० कार्यालयीन टिप्पणी

२. निवृत्तिवेतन, भविष्य निर्वाह निधी, निरोप समारंभ, कार्यक्रम, उपदान, सर्व्हिस बुक, थकबाकी

४. क. १   ख. १   ग. २

५. क. चूक   ख. बरोबर   ग. बरोबर

११. क. ३   ख. १   ग. ३   घ. २   च. १   छ. २

१२. क. मोबाईल बंद पडला म्हणून ती सकाळपासून बेचैन आहे.
ख. विशूला आजोबांची काठी म्हणून ओळखतात.
ग. मुलांनी स्वागतगीत म्हणून कार्यक्रमाला सुरुवात केली.
घ. गोदावरी नदी दक्षिणेकडची गंगा म्हणून ओळखली जाते.

च. आता वाघाला भारताचा राष्ट्रीय प्राणी म्हणून घोषित केले आहे.
छ. नागरिकांनी विरोध केला म्हणून प्रस्ताव मागे घेतला.

१३. क. यांच्याकडे ख. यांच्याकडील ग. होण्यास घ. होण्यासाठी च. करण्याबाबत

१४. क. पाहिले जाणे ख. रद्द होणे ग. नियमात बसवणे घ. उल्लेख करणे
च. जबाबदारीतून मोकळे करणे छ. नेमणे

१७. क. १ ख. २ ग. १ घ. २ च. १

२०. क. ६ ख. ४ ग. ५ घ. २ च. १ छ. ३

२१. क. चौकशी ख. हस्तांतरण ग. दोषारोपपत्र घ. शिस्तभंग च. शिफारस

२२. क. १ ख. २ ग. १ घ. २ च. १

२४. क. चूक ख. बरोबर ग. चूक घ. चूक च. बरोबर

२५. क. १ ख. १ ग. २ घ. १ च. २

२८. क. पारपत्र ख. चिकित्सालयीन ग. मानसशास्त्र घ. अधिष्ठाता
च. जातवैधता प्रमाणपत्र छ. उन्नत व प्रगत ज. महिला आरक्षण
झ. टक्केवारी ट. सेवायोजना कार्यालय ठ. शिक्षा

२९. क. २ ख. १ ग. २ घ. १ च. २ छ. १

३१. क. ४ ख. ५ ग. २ घ. ६ च. १ छ. ३

३२. क. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग ख. लेखनिक / वाचक
ग. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी घ. तोंडी च. मोबाईल आणि फोन

# व्याकरण उजळणी

## पाठ एक / ओळख

**भाग १**

मानस : नमस्कार, मी आत येऊ का?
अदिती : नमस्कार. ये नं. मी अदिती. मी झुम्बा शिक्षिका आहे. आज आपल्या क्लासचा पहिला दिवस. आपण एकमेकांची ओळख करून घेऊ या.
मानस : तुम्हीपण सगळे आत या नं. मॅडम, मी मानस. मी आर्किटेक्ट आहे. हा किशोर. हा इंजिनियर आहे. आणि तो वरुण.
अदिती : वरुण, तूपण इंजिनियर आहेस का?
वरुण : नाही, मी इंजिनियर नाही. मी शाळेत पी.टी. शिक्षक आहे.
अदिती : अरे वा! किशोर, ती मुलगी कोण आहे? तीपण तुमच्या ग्रुपमध्ये आहे नं?
किशोर : हो. ती अंजू. ती फिजिओथेरपिस्ट आहे. आणि ही नयना. ही पत्रकार आहे.
अदिती : वा, वा! छान आहे तुमचा ग्रुप. आता आपण झुम्बा करायला सुरुवात करू या.

**शब्दार्थ :**

| नाम | | |
|---|---|---|
| तो | ती | |
| तो दिवस, ते –<br>day, -s | ती ओळख, त्या ओळखी<br>introduction, -s | ती मुलगी, त्या मुली<br>girl, -s |
| तो शिक्षक, ते –<br>teacher, -s | ती शिक्षिका, त्या –<br>female teacher, -s | ती सुरुवात, त्या सुरुवाती<br>start, -s |
| तो / ती पत्रकार, ते / त्या –<br>journalist, -s | ती शाळा, त्या –<br>school, -s | |

| क्रियापदे | इतर शब्द | |
|---|---|---|
| येणे<br>to come | आत<br>in | मध्ये<br>in |
| ओळख करून घेणे<br>to get introduced | पहिला<br>first | कोण<br>who |
| करणे<br>to do | एकमेकांची<br>of each other | छान<br>nice |
| सुरुवात करणे<br>to begin | पण<br>also | आपण सुरुवात करू या<br>let us start |

## व्याकरण :

### परवानगीसाठी प्रश्न

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| धातू | | + | ऊ | + | का ? | |
| मी | ये | + | ऊ | + | का ? = येऊ का? | |
| आम्ही (काम) | कर् | + | ऊ | + | का? = करू का? | |

### Let us + Verb या अर्थाची मराठी वाक्यरचना

| | | | |
|---|---|---|---|
| आपण | धातू | + ऊ + या | |
| आपण पुस्तक | वाच् + ऊ + या | = | वाचू या. |
| आपण काम | कर् + ऊ + या | = | करू या. |

• The verb 'आहे' (to be) is used for denoting existence or referring to a particular statement or to an individual or an object etc.

१. हा बातमीदार आहे. २. ही अंजू आहे.

The **negative form** of 'आहे' is 'नाही'.

१. हा बातमीदार नाही. २. ही अंजू नाही.

• The **interrogative** 'कोण' is used to seek the identity (name), gender, profession, nationality, state or language identity, religion etc. of a person.

### प्रश्न आणि उत्तरे

| | |
|---|---|
| हा / तो / ही / ती कोण आहे? | हा / तो / ही / ती व्यक्तीचे लिंग आहे.<br>हा / तो / ही / ती मुलगा / मुलगी / पुरुष / बाई आहे. |
| हा / तो / ही / ती कोण आहे? | हा / तो / ही / ती व्यक्तीचे नाव आहे.<br>हा / तो / ही / ती मानस / अदिती आहे. |
| नाव कोण आहे? | नाव व्यवसायवाचक नाम आहे.<br>मानस / अदिती पत्रकार / शिक्षिका आहे. |

• The **interrogative** 'का' **or interrogative particle** 'नं' / 'ना' when used at the end of the sentence seeks information or confirmation. The answer is normally either हो or नाही. It may be added to a simple statement.

| प्रश्न आणि होकारार्थी उत्तर | प्रश्न आणि नकारार्थी उत्तर |
|---|---|
| हा / ही / तो / ती पत्रकार आहे का / नं / ना? | हा / ही / तो / ती पत्रकार आहे का / नं / ना?<br>नाही. हा / ही / तो / ती पत्रकार नाही. |
| हो, हा / ही / तो / ती पत्रकार आहे. | नाही, हा / ही / तो / ती पत्रकार नाही. |

**भाग २**

नाडकर्णी : या, या, घोषबाबू.
घोष : नाडकर्णीसाहेब, मराठीचा वर्ग आत्ताच आहे नं?
नाडकर्णी : हो, हो. आपण सुरुवात करू या आता. मी तुमची सर्वांशी ओळख करून देतो. हे घोषबाबू. हे रेल्वेत झोनल मॅनेजर आहेत. घोषबाबू, हे श्री. सदानंद नायर. हे कॅनरा बॅंकेत मॅनेजर आहेत.
घोष : नमस्कार. नाडकर्णीसाहेब, ते कोण आहेत?
नाडकर्णी : ते नरेंद्र शर्मा आहेत. ते इथले रीजनल डायरेक्टर आहेत.
घोष : तुम्ही उत्तर भारतीय आहात ना ?
शर्मा : नाही, मी नेपाळी आहे.
नाडकर्णी : ह्या श्रीमती निर्मला सक्सेना.
घोष : नमस्कार. तुम्ही काय करता?
सक्सेना : मी इथे उपजिल्हाधिकारी आहे.
घोष : अरे, वा ! नाडकर्णी, त्या कोण आहेत?
नाडकर्णी : त्या गोस्वामीबाई. त्या विद्यापीठात मानसशास्त्र विभागाच्या प्रमुख आहेत.
घोष : नमस्कार, गोस्वामीबाई.
गोस्वामी : नमस्कार. नाडकर्णीसाहेब, आता आपण सुरुवात करू या का?
नाडकर्णी : हो. चला.

**शब्दार्थ :**

| नामे | | |
|---|---|---|
| तो | | ते |
| तो वर्ग, ते –<br>class, -es | तो विभाग, ते –<br>department, -s | ते विद्यापीठ,<br>ती विद्यापीठे / ठं<br>university |
| तो / ती उपजिल्हाधिकारी, ते / त्या –<br>deputy collector, -s | तो / ती प्रमुख, ते / त्या<br>head, -s | ते मानसशास्त्र<br>psychology |

| क्रियापदे | इतर शब्द | | |
|---|---|---|---|
| ओळख करून देणे<br>to introduce | आता<br>now | इथले<br>of this place | श्री (श्रीयुत)<br>mister |
| सुरुवात करणे<br>to start | सर्व<br>all | उत्तर भारतीय<br>north indian | तुम्ही काय करता?<br>what do you do? |

**व्याकरण :**

- The **interrogative** कोण is used with regular plural and honorific plural as well.

| हे / ते कोण आहेत? | ह्या / त्या कोण आहेत? |
|---|---|
| हे / ते सदानंद आणि नरेंद्र आहेत. | ह्या / त्या निर्मला आणि अंजू आहेत. |
| हे / ते नरेंद्रराव / सदानंदराव आहेत. | ह्या / त्या निर्मलाताई / अंजूताई आहेत. |
| हे / ते नायरसाहेब आहेत. | ह्या / त्या सक्सेनाबाई आहेत. |
| हे / ते श्री॰ सदानंद नायर आहेत. | ह्या / त्या सौ॰ / श्रीमती निर्मला सक्सेना आहेत. |

| नावे कोण आहेत? | Name / s कोण आहेत? |
|---|---|
| घोषबाबू आणि नायरसाहेब मॅनेजर आहेत. | सुनीताबाई आणि अंजूताई शिक्षिका आहेत. |
| नायर साहेब मॅनेजर आहेत. | श्रीमती निर्मला सक्सेना उपजिल्हाधिकारी आहेत. |

- The **negative** form of आहेत is नाहीत.

शर्मासाहेब मॅनेजर नाहीत. निर्मलाताई शिक्षिका नाहीत.

- The **interrogative** का and **interrogative particle** नं / ना can also be used with अनेकवचन / honorific अनेकवचन.

हे / ते / ह्या / त्या पत्रकार आहेत का / नं / ना?

| होकारार्थी उत्तर | नकारार्थी उत्तर |
|---|---|
| हो. हे / ते / ह्या / त्या पत्रकार आहेत. | नाही. हे / ते / ह्या / त्या पत्रकार नाहीत. |

## पाठ दोन / खेळ

**भाग १**

शिक्षक : आज आपण एक खेळ खेळू या. हे काही फोटो आहेत. तुम्ही हे फोटो पाहा आणि त्यातल्या वस्तूंची मराठी नावं सांगा. सचिन, तू सांग, हे काय आहे?

सचिन : सर, हा एक दिवाणखाना आहे. ते दोन सोफे आहेत. शेजारी फोन आणि कागद आहेत.

शिक्षक : बरोबर. अमित, आता तू सांग.

अमित : सर, पुढे टीपॉय आहे. तो लॅपटॉप आहे.

कल्पना : मी सांगू का सर? तो टी.व्ही. आहे आणि तो पुतळा आहे.

भारती : समोर एक मुलगापण आहे. त्याच्याकडे चेंडू आहे.

अमित : हो. हे पंखे आणि दिवे आहेत.

शिक्षक : हो, यात फक्त 'आ'कारान्त नामांचं अनेकवचन होतं.

**शब्दार्थ :**

| नामे | | | | |
|---|---|---|---|---|
| तो | | | ती | ते |
| तो खेळ, ते –<br>game, -s | तो मुलगा,<br>ती मुलं<br>boy, -s | तो पुतळा,<br>ते पुतळे<br>statue, -s | ती वस्तू, त्या –<br>thing, -s | ते नाव,<br>ती नावे / वं<br>name, -s |
| तो दिवाणखाना,<br>ते दिवाणखाने<br>hall, -s | तो चेंडू, ते –<br>ball, -s | तो दिवा, ते दिवे<br>light, -s | | |
| तो सोफा,<br>ते सोफे<br>sofa, -s | तो पंखा,<br>ते पंखे<br>fan, -s | तो कागद, ते –<br>paper, -s | | |

| क्रियापदे | | इतर शब्द | | |
|---|---|---|---|---|
| खेळणे<br>to play | सांगणे<br>to tell | काही<br>some | समोर<br>across | पुढे<br>in front of |
| पाहणे<br>to see | | त्यातल्या<br>from them | त्याच्याकडे<br>he has | शेजारी<br>next to, besides |

**व्याकरण :**

There are three genders in Marathi viz. पुल्लिंग, स्त्रीलिंग, नपुंसकलिंग. They are purely grammatical genders which are arbitrary. One has to memorise the gender of a noun or to identify it with the help of a variable demonstrative adjective which accompanies it. (हा, ती, ह्या...)

Marathi nouns show a difference between एकवचन and अनेकवचन. Classifying these nouns according to their genders and endings, helps us to understand the rules of change of एकवचन into अनेकवचन.

**प्रश्न आणि उत्तरे**

| | हे / ते | काय | आहे? |
|---|---|---|---|
| पुल्लिंग एकवचन | हा / तो | पंखा | आहे. |
| अनेकवचन | हे / ते | पंखे | आहेत. |
| स्त्रीलिंग एकवचन | ही / ती | खोली | आहे. |
| अनेकवचन | ह्या / त्या | खोल्या | आहेत. |
| नपुंसकलिंग एकवचन | हे / ते | कपाट | आहे. |
| अनेकवचन | ही / ती | कपाटे / टं | आहेत. |

**पुल्लिंगी नामे**

| | |
|---|---|
| अंत्यस्वर | एकवचन ~ अनेकवचन |
| व्यंजनान्त | कागद ~ कागद |
| आकारान्त | पंखा ~ पंखे |
| ईकारान्त | पक्षी ~ पक्षी |
| ऊकारान्त | खड्डू ~ खड्डू |
| ओकारान्त | फोटो ~ फोटो |

खालील शब्दांचे अनेकवचन वरील तत्त्यातल्या नियमांप्रमाणे होत नाही.

**पुल्लिंगी नामे**

| | |
|---|---|
| व्यंजनान्त | तो माणूस ~ ती माणसे / सं |
| आकारान्त | तो चहा ~ तो चहा<br>तो बादशहा ~ ते बादशहा<br>तो काका / मामा / आजोबा ~ ते काका / मामा / आजोबा<br>तो मुलगा ~ ती मुले / लं |

**भाग २**

शिक्षक : आज आपण हा दुसरा फोटो पाहू या. कल्पना, आज तू सुरुवात कर.

कल्पना : ही एक खोली आहे. ती भिंत आहे. शेजारी पलंग आहे. वर गादी आहे. ह्या चादरी आणि उश्या आहेत.

भारती : आता मी सांगते, ती खिडकी आहे. ते पडदे आहेत.
सचिन : भारती, तू थांब. मी सांगतो. तो आरसा आहे. शेजारी ब्रश, कंगवे, बाटल्या आणि पावडरीचा डबा आहे. तिथे लिपस्टिकपण आहे. ह्या माळा आणि पिना आहेत.
अमित : तो कपड्यांचा स्टँड आहे. ते हँगर आहेत. त्या साड्या आणि ते ड्रेस आहेत.
शिक्षक : बरोबर. कल्पना, ते काय आहे?
कल्पना : ही एक पर्स आहे. भोवती अनेक वस्तू आहेत. त्या रंगीत पेन्सिली आणि खडू आहेत. हे रुमाल आहेत. खाली नोटा आहेत.
शिक्षक : बरोबर. स्त्रीलिंगी एकवचनी नामांबरोबर ही / ती वापरतात आणि अनेकवचनी नामांबरोबर ह्या / त्या वापरतात.

**शब्दार्थ :**

| नाम | | | |
|---|---|---|---|
| तो | | ती | |
| तो पलंग, ते –<br>cot, -s | तो पडदा, ते पडदे<br>curtain, -s | ती खोली,<br>त्या खोल्या<br>room, -s | ती खिडकी,<br>त्या खिडक्या<br>window, -s |
| तो आरसा, ते आरसे<br>mirror, -s | तो डबा, ते डबे<br>tin, -s | ती भिंत, त्या भिंती<br>wall, -s | ती बाटली,<br>त्या बाटल्या<br>bottle, -s |
| तो कंगवा, ते कंगवे<br>comb, -s | तो कपडा, ते कपडे<br>cloth, -s | ती गादी, त्या गाद्या<br>mattress, -es | ती पावडर,<br>त्या पावडरी<br>powder, -s |
| तो रुमाल, ते –<br>handkerchief, -s | तो खडू, ते –<br>chalk, -s | ती चादर, त्या चादरी<br>bedsheet, -s | ती माळ, त्या माळा<br>necklace, -s |
| | | ती उशी, त्या उश्या<br>pillow, -s | ती पीन, त्या पिना<br>pin, -s |
| | | ती नोट, त्या नोटा<br>note, -s | ती साडी, त्या साड्या<br>saree, -s |

| क्रियापदे | इतर शब्द | | | |
|---|---|---|---|---|
| थांबणे<br>to stop | दुसरा<br>second | रंगीत<br>colourful | भोवती<br>around | बरोबर<br>correct |
| वापरणे<br>to use | आज<br>today | खाली<br>under | अनेक<br>many | एकवचनी – एकवचन<br>singular, -s |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | वर<br>on / above | स्त्रीलिंगी – स्त्रीलिंग<br>feminine | नेहमी<br>always | |

**स्त्रीलिंगी नामे**

| अंत्यस्वर | एकवचन अनेकवचन |
|---|---|
| व्यंजनान्त | १) माळ ~ माळा<br>२) भिंत ~ भिंती |
| आकारान्त | रिक्षा - रिक्षा |
| ईकारान्त | टोपली ~ टोपल्या<br>सुई – सुया |
| ऊकारान्त | १) वस्तू ~ वस्तू<br>२) जाऊ ~ जावा<br>३) जळू (leech) ~ जळवा |
| ओकारान्त | बायको ~ बायका |

खालील शब्दांचे अनेकवचन वरील तक्त्यातल्या नियमांप्रमाणे होत नाही.

| व्यंजनान्त | ईकारान्त |
|---|---|
| ती म्हैस ~ त्या म्हशी<br>ती तारीख ~ त्या तारखा<br>ती बस / पर्स / नर्स ~<br>त्या बस / बसेस / पर्स / पर्सेस /<br>नर्स / नर्सेस<br>ती पँट ~ त्या पँट / पँट्स | १. ती व्यक्ती / पत्नी / विद्यार्थिनी /<br>अभिनेत्री / मूर्ती ~<br>त्या व्यक्ती / पत्नी / विद्यार्थिनी / अभिनेत्री /<br>मूर्ती<br>२. ती मुलगी ~ त्या मुली<br>३. ती स्त्री / बी ~ त्या स्त्रिया / बिया |

*बाई या शब्दाचे अनेकवचन 'बाया' आणि 'बायका' असे दोन्ही प्रकारे होते. प्रमाण भाषेमधे बहुतेक वेळा 'बायका' असे अनेकवचन वापरतात. त्याचप्रमाणे बायको (wife) या ओकारान्त शब्दाचे अनेकवचनही 'बायका' असे होते.

**भाग ३**

सचिन : सर, आज तिसरा फोटो नं?
शिक्षक : हो. चल, आज तूच सुरुवात कर.
सचिन : हे स्वैपाकघर आहे. हा ओटा आहे. हा गॅस आहे. वर पातेलं आहे.
कल्पना : ते शेल्फ आहे. ती ताटं आणि भांडी आहेत. इकडे वाट्या,चमचे आणि पेले आहेत. हे कपाट आहे. ते कप आणि त्या बश्या आहेत.

अमीत : तो फ्रीज आहे. ही फळं आणि ह्या भाज्या आहेत. आत दूध, लिंबं आणि अंडीसुद्धा आहेत.
भारती : तो माठ आहे. ते पाणी आहे.
शिक्षक : बरोबर आहे. नपुंसकलिंगी एकवचनी नामांबरोबर हे / ते आणि अनेकवचनी नामांबरोबर ही / ती येतात.

**शब्दार्थ :**

| नाम | | | | |
|---|---|---|---|---|
| तो | ती | ते | | |
| तो ओटा, ते ओटे<br>kitchen<br>platform -s | ती वाटी,<br>त्या वाट्या<br>bowl, -s | ते स्वैपाकघर,<br>ती स्वैपाकघरे / रं<br>kitchen, -s | ते पातेले / लं,<br>ती पातेली<br>utensil, -s | ते भांडे / डं,<br>ती भांडी<br>vessel, -s |

| इतर शब्द | | |
|---|---|---|
| तिसरा<br>third | सुद्धा<br>also | नपुंसकलिंगी<br>neuter |

**नपुंसकलिंगी नामे**

| अंत्यस्वर | एकवचन अनेकवचन |
|---|---|
| व्यंजनान्त | कपाट ~ कपाटं / टे |
| एकारान्त | अंडं ~ अंडे |
| ईकारान्त | पाणी ~ पाणी |
| ऊकारान्त | लिंबू ~ लिंबे / लिंबं |

खालील शब्दांचे अनेकवचन वरील तक्त्यातल्या नियमांप्रमाणे होत नाही.

| | |
|---|---|
| व्यंजनान्त ऊकारान्त | देऊळ ~ देवळे / ळं<br>कुलूप ~ कुलपे / पं<br>कणीस ~ कणसे / सं |
| ऊ ending | गळू (boil) ~ गळवे / वं |

## पाठ तीन / आमची मुंबई

**भाग १**

शिक्षक : आज आपण मुंबईवर एक माहितीपट पाहू या आणि वर्णन करू या. ही वेगवेगळी प्रेक्षणीय ठिकाणं आहेत. संजय, तू सांगतोस का?

संजय : हो. तो अरबी समुद्र आहे. समुद्रात बोटी आहेत. ते कोळी आहेत. कोळ्यांकडे जाळी आहेत. समुद्रकिनाऱ्यावर खूप माणसं आहेत. तिथे पुष्कळ पक्षीसुद्धा आहेत. पक्ष्यांपुढे दाणे आहेत.

शिक्षक : शरद, आता तू वर्णन कर.

शरद : पुढे फोर्ट भागात, महात्मा गांधी रस्त्यावर जहांगीर कलादालन, एल्फिन्स्टन महाविद्यालय, हायकोर्ट, मुंबई विद्यापीठ इ. इमारती आहेत.

संजय : सर, फोर्ट भागात स्टुडिओ नाही का?

शिक्षक : नाही. वांद्रे, अंधेरी, गोरेगाव या भागात स्टुडिओ आहेत.

संजय : स्टुडिओत सिनेमांचं चित्रीकरण करतात नं?

शिक्षक : हो.

**शब्दार्थ :**

| नामे | | |
|---|---|---|
| तो | ती | ते |
| तो माहितीपट, ते –<br>documentary, -ies | ती बोट, त्या बोटी<br>boat, -s | ते ठिकाण, ती ठिकाणे / णं<br>place, -s |
| तो समुद्र, ते –<br>sea, -s | ती इमारत, त्या इमारती<br>building, -s | ते जाळे / ळं, ती जाळी<br>net, -s |
| तो कोळी, ते –<br>fisherman, fishermen | | ते कलादालन, ती कलादालने / नं<br>art gallery, -ies |
| तो समुद्रकिनारा, ते समुद्रकिनारे<br>beach, -es | | ते महाविद्यालय, ती महाविद्यालये / यं<br>college, -s |
| तो माणूस, ती माणसे / सं<br>human being, -s | | ते चित्रीकरण, ती चित्रीकरणे / णं<br>shooting, -s |
| तो पक्षी, ते –<br>bird, -s | | |
| तो दाणा, ते दाणे<br>foodgrain, -s | | |
| तो रस्ता, ते रस्ते<br>road, -s | | |
| तो सिनेमा, ते सिनेमे<br>movie, -s | | |

| क्रियापदे | इतर शब्द |
|---|---|
| वर्णन करणे<br>to describe | तिथे<br>there |
| चित्रीकरण करणे<br>to shoot | पुढे<br>in front of |

**व्याकरण :**

This lesson introduces सामान्यरूप i.e. the oblique form (OF) of nouns in Marathi. सरळरूप i.e.the straight form (SF) of a noun undergoes a certain change, when followed by शब्दयोगी पद, i.e. a postposition (PP) or प्रत्यय, i.e.a suffix indicating location, relation, connection, possession etc. सामान्यरूप of a noun depends on the gender and the ending of a noun. In case of certain nouns SF and OF are identical in their phonetic shape. The OF of अनेकवचन forms of nouns are different from those OF of एकवचन forms of nouns.

In this lesson, the **interrogative word** 'कुठे' **(where**) is introduced which asks the location of an object.

**प्रश्न आणि उत्तर**

नामाचे (एकवचन / अनेकवचन) सरळरूप कुठे आहे / आहेत?

नामाचे (एकवचन / अनेकवचन) सरळरूप नामाचे सामान्यरूप + शब्दयोगी पद / प्रत्यय आहे / आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| प्रश्न | बोट | कुठे | आहे? |
| उत्तर | बोट | समुद्रात | आहे. |
| प्रश्न | चित्रपटगृह | कुठे | आहे? |
| उत्तर | चित्रपटगृह | बँकेशेजारी | आहे. |
| प्रश्न | मासे | कुठे | आहेत? |
| उत्तर | मासे | मत्स्यालयात | आहेत. |

**सामान्यरूपांचे तक्ते**
**पुल्लिंगी नामे**

| अंत्यवर्ण | सरळरूप एकवचन | सरळरूप अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|---|
| व्यंजनान्त | १) पूल<br>२) पाऊस<br>३) डॉक्टर<br>४) रविवार<br>५) फोन | पूल<br>-<br>डॉक्टर<br>रविवार<br>फोन | पुला-<br>पावसा-<br>डॉक्टर-<br>रविवार-<br>फोन- | पुलां-<br>-<br>डॉक्टरां-<br>रविवारां-<br>फोन- |
| आकारान्त | १) रस्ता<br>२) मासा<br>३) मामा<br>४) चहा<br>५) नकाशा<br>६) मुलगा | रस्ते<br>मासे<br>मामा<br>-<br>नकाशे<br>मुलं | रस्त्या-<br>माशा-<br>मामा-<br>चहा-<br>नकाशा-<br>मुला- | रस्त्यां-<br>माशां-<br>मामां-<br>-<br>नकाशां-<br>मुलां- |
| ईकारान्त | १) कोळी<br>२) सेनापती<br>३) शिपाई<br>४) टी.व्ही. | कोळी<br>सेनापती<br>शिपाई<br>टी.व्ही. | कोळ्या-<br>सेनापती-<br>शिपाया-<br>टी.व्ही.- | कोळ्यां-<br>सेनापतीं-<br>शिपायां-<br>टी.व्हीं.- |
| ऊकारान्त | १) खडू<br>२) भाऊ | खडू<br>भाऊ | खडू-<br>भावा- | खडूं-<br>भावां- |
| ओकारान्त | १) फोटो | फोटो | फोटो- | फोटों- |

**तक्त्यातल्या शब्दांप्रमाणे सामान्यरूपे होणारे आणखी काही शब्द.**
**पुल्लिंगी नामे**

पूल - समुद्र, उड्डाणपूल, माहितीपट, फलाट, भाग, बूट, वाहनतळ, तास, संगणक, बाजार, चित्रपट, तलाव.
फोन - मॉल, प्रिंटर,मोबाईल, प्लॅटफॉर्म.
रस्ता - समुद्रकिनारा, कपडा, पुतळा, डबेवाला, डबा, दवाखाना, कारखाना, बटाटा, कांदा, चष्मा, पंखा, डोळा.
मासा - आरसा, ससा, खिसा, पैसा, डोसा.
मामा - काका, आजोबा, बादशहा.
कोळी - पक्षी, शेतकरी, व्यापारी, भिकारी, धोबी,
सेनापती - राष्ट्रपती, पती, गणपती, कवी.
टी.व्ही. - ए. सी.
शिपाई - हलवाई, जावई.
खडू - साधू, चेंडू, काजू, पेरू, चिकू, खाऊ.
भाऊ - लाडू, नातू
फोटो - रेडिओ, स्टो, टोमॅटो, स्टुडिओ.

**भाग २**

शिक्षक : आता पुढची दोन दृश्यं.

रेवती : मी वर्णन करते सर. हे छत्रपती शिवाजी टर्मिनस स्टेशन आहे. इथे अनेक फलाट (प्लॅटफॉर्म) आहेत. त्या फलाटावर एक गाडी आहे. गाडीत खूप गर्दी आहे.

अनुराधा : त्या बघा कोळणी. कोळणींकडे, टोपल्यांमध्ये मासळी आहे.

शरद : स्टेशनसमोर मुंबई महानगरपालिका आहे. महानगरपालिकेसमोर आझाद मैदान आहे.

रेवती : आता मी सांगते, सर. ही राणीची बाग आहे. बागेत प्राणिसंग्रहालय आहे. ती रिझर्व्ह बँकेची इमारत आहे. बँकेशेजारी मराठामंदिर चित्रपटगृह आहे.

अनुराधा : ती उंच इमारत बघा. त्या इमारतीतसुद्धा चित्रपटगृह आणि मॉल आहे.

रेवती : ती गिरगाव चौपाटी. चौपाटीवर लोकमान्य टिळकांचा पुतळा आहे.

शिक्षक : आता थांबू या. उद्या आणखी काही जागा पाहू या.

**शब्दार्थ :**

| नामे | | | |
|---|---|---|---|
| **तो** | **ती** | | **ते** |
| तो फलाट, ते – platform, -s | ती गाडी, त्या गाड्या train, -s | ती महानगरपालिका, त्या – municipality, -ies | ते दृश्य, ती दृश्ये / श्यं scene, -s |
| | ती कोळीण, त्या कोळणी fisherwoman, fisherwomen | ती बाग, त्या बागा garden, -s | ते मैदान, ती मैदाने / नं ground, -s |
| | ती गर्दी - crowd | ती चौपाटी, त्या चौपाट्या chowpatty, -s | ते प्राणिसंग्रहालय, ती प्राणिसंग्रहालये / यं zoo, -s |
| | ती टोपली, त्या टोपल्या basket, -s | ती जागा, त्या- place, -s | ते चित्रपटगृह, ती चित्रपटगृहे / हं cinema-theatre, -s |
| | ती मासळी fish | | |

| क्रियापदे | इतर शब्द | | |
|---|---|---|---|
| बघणे to see | पुढची next | आता now | उंच tall |
| | अनेक many | उद्या tomorrow | आणखी more |

**स्त्रीलिंगी नामे**

| अंत्यवर्ण | सरळरूप एकवचन | सरळरूप अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|---|
| व्यंजनान्त | १) बाग<br>२) चप्पल<br>३) इमारत<br>४) फाईल<br>५) कोळीण<br>६) म्हैस<br>७) निवडणूक<br>८) बस | बागा<br>चपला<br>इमारती<br>फायली<br>कोळणी<br>म्हशी<br>निवडणुका<br>बस | बागे-<br>चपले-<br>इमारती-<br>फायली-<br>कोळणी-<br>म्हशी-<br>निवडणुकी-<br>बस- | बागां-<br>चपलां-<br>इमारतीं-<br>फायलीं-<br>कोळणीं-<br>म्हशीं-<br>निवडणुकीं-<br>बस- |
| आकारान्त | शाळा | शाळा | शाळे- | शाळां- |
| ईकारान्त | १) टोपली<br>२) मूर्ती<br>३) मुलगी<br>४) स्त्री | टोपल्या<br>मूर्ती<br>मुली<br>स्त्रिया | टोपली-<br>मूर्ती-<br>मुली-<br>स्त्री- | टोपल्यां-<br>मूर्तीं-<br>मुलीं-<br>स्त्रियां- |
| ऊकारान्त | १) वस्तू<br>२) जाऊ | वस्तू<br>जावा | वस्तू-<br>जावे- | वस्तूं-<br>जावां- |
| ओकारान्त | बायको | बायका | बायको- | बायकां- |

**तक्त्यातल्या शब्दांप्रमाणे सामान्यरूपे होणारे आणखी काही शब्द.**
**स्त्रीलिंगी नामे**

बाग - बँक, काच, माळ, मान, बॅग, पीन, वाट, जीभ.
इमारत - भिंत, गाय, विहीर, पेन्सिल, मोटार, सायकल, जमीन, चूल, चादर, पाठ, बोट, मशीद, बैठक.
बस - पर्स, नर्स, डिश.
कोळीण - मोलकरीण.
निवडणूक - मिरवणूक, चूक, बंदूक.
शाळा - महानगरपालिका, संस्था, घटना, संघटना, सेवा, परिचारिका, रुग्णवाहिका.
टोपली - खोली, खिडकी, नदी, भाजी,चौपाटी, टपरी, बाटली, झोपडी, झोपडपट्टी, गाडी, टेकडी.
माशी - उशी, बशी.
मूर्ती - विद्यार्थिनी, पत्नी, संधी.
स्त्री - बी, सुई, चटई, बाई, मुंबई, आई, मंडई.
वस्तू - वधू, बाजू.
ऊ - सासू, पिसू.

**भाग ३**

संजय : सर, मुंबई शहराभोवती समुद्र आहे हे वाक्य बरोबर आहे का?
शिक्षक : हो. अगदी बरोबर. आता हे दृश्य पाहा. ग्रॅन्टरोड स्टेशनबाहेर पूल आहे. पुलाजवळ पुष्कळ दुकानं आहेत.
शरद : दुकानांमध्ये सर्व वस्तू आहेत.
रेवती : वस्तूंमध्ये बूट, चपला, खेळणी, गॉगल्स आणि माळा, बांगड्या, पिनाही आहेत.
संजय : चर्नीरोड स्टेशनजवळ मत्स्यालय आहे. मत्स्यालयात, पाण्यात रंगीबेरंगी मासे आहेत.
शरद : सर, मुंबईत किती देवळं आहेत?
शिक्षक : भरपूर. प्रत्येक गल्लीत देऊळ आहे. महालक्ष्मी, बाबुलनाथ आणि सिद्धिविनायक ही देवळं प्रसिद्ध आहेत. हे बघा, हे सिद्धिविनायक मंदिर.
संजय : बाप रे! देवळात किती गर्दी आहे!
रेवती : सर, मुंबईजवळ घारापुरीची लेणीसुद्धा आहेत ना?
शिक्षक : ही बघा लेणी. लेण्यांमध्ये शंकराच्या मूर्ती आहेत.
सर्वजण : सर, हा माहितीपट खूप छान आणि उपयोगी आहे.

| नामे | | | |
|---|---|---|---|
| तो | ती | ते | |
| तो मासा, ते मासे<br>fish, -es | ती चप्पल, त्या चपला<br>chappal, -s | ते शहर, ती शहरे / रं<br>city, -ies | ते देऊळ, ती देवळे / ळं<br>temple, -s |
| तो पूल, ते –<br>bridge, -s | ती बांगडी,<br>त्या बांगड्या<br>bangle, -s | ते वाक्य,<br>ती वाक्ये / क्यं<br>sentence, -s | ते मंदिर, ती मंदिरे / रं<br>temple, -s |
| तो बूट, ते –<br>shoe, -s | ती गल्ली, त्या गल्ल्या<br>lane, -s | ते खेळणे / णं,<br>ती खेळणी<br>toy, -s | ते लेणे / लेणं, ती लेणी<br>sculptures in a cave, -s |
| | ती मूर्ती, त्या –<br>idol, -s | ते मत्स्यालय,<br>ती मत्स्यालये / यं<br>acquaria, -um | |

| इतर शब्द | | | |
|---|---|---|---|
| पुष्कळ<br>many | किती<br>how many | प्रत्येक<br>each | जवळ<br>near |
| रंगीबेरंगी<br>colourful | भरपूर<br>many | बाप रे<br>oh my God! | उपयोगी<br>useful |

**नपुंसकलिंगी नामे**

| अंत्यवर्ण | सरळरूप एकवचन | सरळरूप अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|---|
| व्यंजनान्त | १) शहर<br>२) कुलूप<br>३) देऊळ<br>४) कणीस<br>५) स्टेशन<br>६) चर्च | शहरे / रं<br>कुलपे / पं<br>देवळे / ळं<br>कणसे / सं<br>स्टेशने<br>चर्च | शहरा-<br>कुलपा-<br>देवळा-<br>कणसा-<br>स्टेशना-<br>चर्च- | शहरां-<br>कुलपां-<br>देवळां-<br>कणसां-<br>स्टेशनां-<br>चर्च- |
| ए / अकारान्त | जाळे / ळं | जाळी | जाळ्या- | जाळ्यां- |
| ईकारान्त | पाणी | - | पाण्या- | - |
| ऊकारान्त | १) पाखरू<br>२) गळू | पाखरे / रं<br>गळवे / वं | पाखरा-<br>गळवा- | पाखरां-<br>गळवा- |

**तक्त्यातल्या शब्दांप्रमाणे सामान्यरूपे होणारे आणखी काही शब्द.**
**नपुंसकलिंग**

शहर - घर, दुकान, कार्यालय, गाव, मत्स्यालय, ठिकाण, हॉटेल, कॉलेज, उद्यान, महाविद्यालय, मैदान, पटांगण, कलादालन, भवन, जेवण, चित्रपट, प्राणिसंग्रहालय, दृश्य,पेन, टेबल, झाड, रुग्णालय, मंदिर, नाटक.
स्टेशन - ऑफिस, थिएटर
जाळे/ळं - तळे/ळं, लेणे/णं, केळे/ळं, वांगे/गं, खेळणे/णं, खोके/कं, मोसंबे/बं, डोके/कं, अंडे/डं.
पाणी - दही, लोणी.
पाखरू - वासरू, लिंबू, पिल्लू, कोकरू, शिंगरू.

## पाठ चार / काय, कसं काय?

**भाग १**

लेखा : अगं इंदू, कशी आहेस?
इंदू : मी बरी आहे. तू कशी आहेस? तुझं बदलीचं नवं गाव कसं आहे? खूप लहान आहे का?
लेखा : माझं गाव खूप सुंदर आहे. ते तालुक्याचं गाव आहे म्हणून मोठं आहे. स्वच्छही आहे.
इंदू : ते दुष्काळी भागात आहे ना?
लेखा : हो. पण गावाजवळ धरण आहे. धरणाच्या पाण्यामुळे आजूबाजूची शेतं हिरवीगार आहेत. तिथली माती काळी आहे त्यामुळे पीक भरपूर आहे. ताज्या भाज्या आहेत. हवासुद्धा चांगली आहे.
इंदू : गावात हॉस्पिटल आहे का?
लेखा : हो, शासकीय रुग्णालय आहे. सगळी अद्ययावत उपकरणं आहेत रुग्णालयात. डॉक्टरही चांगले आहेत.

इंदू : अरे वा!
लेखा : गावात एक शंभर वर्षं जुनं ग्रंथालय आहे. ग्रंथालयात अनेक दुर्मिळ पुस्तकं आहेत.
इंदू : मीसुद्धा माझी बदली तिथे करून घेऊ का?
लेखा : अवश्य घे.

**शब्दार्थ :**

| नामे | | | |
|---|---|---|---|
| तो | ती | ते | |
| तो तालुका, ते तालुके<br>taluka, -s | ती माती<br>soil | ते धरण, ती धरणे / णं<br>dam, -s | ते वर्ष, ती वर्षे / र्षं<br>year, -s |
| | ती हवा<br>climate | ते शेत, ती शेते / तं<br>field, -s | ते ग्रंथालय,<br>ती ग्रंथालये / यं<br>library, -ies |
| | ती बदली, त्या बदल्या<br>transfer, -s | ते पीक, ती पिके / कं<br>crop, -s | ते पुस्तक,<br>ती पुस्तके / कं<br>book, -s |
| | | ते हॉस्पिटल,<br>ती हॉस्पिटले / लं<br>hospital, -s | ते गाव,<br>ती गावे / वं<br>village, -s |
| | | ते रुग्णालय,<br>ती रुग्णालये / यं<br>hospital, -s | ते उपकरण,<br>ती उपकरणे / णं<br>equipment, -s |

| क्रियापदे | इतर शब्द | | | |
|---|---|---|---|---|
| करून घेणे<br>to get something done | कशी<br>how | भरपूर<br>in plenty | आजूबाजूचा<br>nearby | स्वच्छ<br>clean |
| | बरा<br>okay | ताजा<br>fresh | हिरवागार<br>dark green | शंभर<br>hundred |
| | नवा<br>new | चांगला<br>good | तिथली<br>of there | जुना<br>old |
| | लहान<br>small | शासकीय<br>government | दुर्मिळ<br>rare | दुष्काळी<br>pertaining to famine |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सुंदर<br>beautiful | सगळा<br>all | अवश्य<br>sure | |
| | मोठा<br>big | अद्ययावत<br>updated | काळा<br>black | |

**व्याकरण :**

In this lesson variable (बदलणारी) and invariable (न बदलणारी) adjectives are introduced. Variable adjectives vary according to number and gender of the nouns they modify and hence have six forms. Invariable adjectives remain unchanged.

The **interrogative word** 'कसा' is asked to obtain an adjective as an answer, which also has six forms according to the gender and number of the noun.

**प्रश्न आणि उत्तरे**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| पुल्लिंग प्रश्न | हा दवाखाना कसा आहे? | हे दवाखाने कसे आहेत? |
| उत्तर | हा दवाखाना मोठा आहे. | हे दवाखाने मोठे आहेत. |
| (स्त्रीलिंग) प्रश्न | ती इमारत कशी आहे? | त्या इमारती कशा आहेत? |
| उत्तर | ती इमारत मोठी आहे. | त्या इमारती मोठया आहेत. |
| (नपुंसकलिंग) प्रश्न | हे घर कसे / सं आहे? | ही घरे / रं कशी आहेत? |
| उत्तर | हे घर मोठे / ठं आहे. | ही घरे / रं मोठी आहेत. |

If the noun is in सामान्यरूप, the variable adjective is also in सामान्यरूप. सामान्यरूप of an adjective is common to all the nouns of any gender and both the numbers and it is identical with स्त्रीलिंगी अनेकवचन form of noun, i.e 'ह्या'.

उदा॰ नव्या इमारतीत लाकडी टेबलं आहेत.

Invariable adjectives generally end with a consonant (व्यंजन) ई or ऊ.

**व्यंजनान्त**

| | |
|---|---|
| एकवचन | लहान कारखाना / खोली / घर |
| अनेकवचन | लहान कारखाने / खोल्या / घरे / रं |

**ईकारान्त**

| | |
|---|---|
| एकवचन | लाकडी पुतळा / गाडी / टेबल |

| | |
|---|---|
| अनेकवचन | लाकडी पुतळे / गाड्या / टेबले / लं |

ऊकारान्त

| | |
|---|---|
| एकवचन | कडू भोपळा / काकडी / कार्ले / लं |
| अनेकवचन | कडू भोपळे / काकड्या / कार्ली |

Invariable adjectives remain unchanged even if the noun modifying it, is in सामान्यरूप.

उदा॰ **लहान** कारखान्यात जास्त कामगार नसतात.
लोक **लाकडी** पुतळ्याला नमस्कार करून आत जातात.
**कडू** कार्ल्यांची भाजी चवदार होते.

**भाग २**

इंदू : अगं लेखा, कशी आहेस? तुझे आईवडील तुझ्याकडेच आहेत का? तुझा भाऊ कुठे आहे?
लेखा : माझा भाऊ मुंबईत आहे. आईबाबा आत्ता त्याच्याकडे आहेत.
इंदू : कसा आहे तो? त्याचा व्यवसाय जोरात चालू आहे ना?
लेखा : तो मजेत आहे. त्याचा व्यवसायही जोरात चालू आहे.
इंदू : आणि त्याची बायको? तिची नोकरी अजून चालू आहे का?
लेखा : हो. तिची नोकरी चालू आहे. तिचं ऑफिस आता चर्चगेटला आहे. तू चार दिवस माझ्याकडे राहायला ये, आपण खूप गप्पा मारू या. मी आता जरा घाईत आहे.
इंदू : हो. चल, माझीही मीटिंग आहे आत्ता.

**शब्दार्थ :**

| नामे | | |
|---|---|---|
| तो | | ती |
| तो भाऊ, ते –<br>brother, -s | तो दिवस, ते –<br>day, -s | ती आई, त्या आया<br>mother, -s |
| तो व्यवसाय, ते –<br>business, -es | | ती बायको, त्या बायका<br>wife, wives |
| तो दिवस, ते –<br>day, -s | | ती नोकरी, त्या नोकऱ्या<br>job, -s |

| क्रियापदे | | इतर शब्द | | |
|---|---|---|---|---|
| चालू असणे<br>to be continued | गप्पा मारणे<br>to chat | आत्ता<br>now | राहायला<br>for stay | मजेत<br>happy |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| राहणे<br>to stay | घाईत असणे<br>to be in a hurry | जोरात<br>in full speed | बाकीचे<br>remaining | अजून<br>still |

The important suffix 'चा' also formulates adjectives from names, nouns and pronouns. They are also variable adjectives. Like other variable adjectives, it has six forms (according to the number and gender) + one oblique form.

Nouns and pronouns undergo oblique change before 'चा' प्रत्यय. Some pronouns take झा or ला suffix instead of चा to form adjective.

| A) नाव + चा | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| पुल्लिंग | राधा + चा चष्मा | राधा + चे चष्मे |
| स्त्रीलिंग | हेमंत + ची चप्पल | हेमंत + च्या चपला |
| नपुंसकलिंग | प्रिया + चे / चं पुस्तक | प्रिया + ची पुस्तके / कं |

| B) नाम + चा | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| पुल्लिंग | विद्यार्थ्या + चा डबा | विद्यार्थ्या + चे डबे |
| स्त्रीलिंग | घरा + ची खिडकी | घरा + च्या खिडक्या |
| नपुंसकलिंग | बहिणीचे / चं घर | बहिणीची घरे / रं |

| C) एकवचनी सर्वनामे | | |
|---|---|---|
| सर्वनाम | एकवचन | अनेकवचन |
| मी | माझा | माझे |
| | माझी | माझ्या |
| | माझे / झं | माझी |
| तू | तुझा | तुझे |
| | तुझी | तुझ्या |
| | तुझे / झं | तुझी |
| तो | त्याचा | त्याचे |
| | त्याची | त्याच्या |

| | | |
|---|---|---|
| | त्याचे / चं | त्याचा |
| ती | तिचा | तिचे |
| | तिची | तिच्या |
| | तिचे / चं | तिची |
| ते | त्याचा | त्याचे |
| | त्याची | त्याचा |
| | त्याचे / चं | त्याची |

**भाग ३**

लेखा : जयराम, मला दाखव नं फोटो. हे तुमचं ऑफिस आहे का?

जयराम : हो. आमचं ऑफिस लहान आहे. ही बघ आमची खोली. माझी आणि माझ्या सहकाऱ्याची. छोटीच आहे. ही टेबलं सागवानी लाकडाची आहेत.

लेखा : वा! हे कोणाचे फोटो आहेत?

जयराम : हे आमच्या संचालकांचे आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे फोटो आहेत. ही बघ संचालकांची आणि त्यांच्या पी.ए. ची खोली.

लेखा : किती छान आहे खोली ! सगळ्या अत्याधुनिक सोयी आहेत.

जयराम : त्यांचे भाऊ इंटिरियर डिझायनर आहेत. ही सगळी त्यांची रचना आहे. आपला वर्गमित्र विवेक त्यांच्या ऑफिसात आहे. तो आर्किटेक्ट आहे ना.

लेखा : दुनिया गोल आहे. आपल्या इतर मित्र-मैत्रिणी कुठे आहेत?

जयराम : माहीत नाही. आपण त्यांना फेसबुकवर शोधू या का?

लेखा : हो हो. चल. लॅपटॉप आण तुझा.

**शब्दार्थ :**

| नामे | | |
|---|---|---|
| **तो** | **ती** | **ते** |
| तो / ती कर्मचारी, ते / त्या – employee, -s | ती सोय, त्या सोयी facility, -ies | ते लाकूड, ती लाकडे / डं wood, -s |
| तो / ती संचालक, ते / त्या – director, -s | ती दुनिया world | |
| तो / ती अधिकारी, ते / त्या – officer, -s | ती मैत्रीण, त्या मैत्रिणी friend (female), -s | |
| तो वर्गमित्र, ते – classmate, -s | ती रचना, त्या – design, -s | |

| | | |
|---|---|---|
| तो / ती सहकारी, ते / त्या – colleague, -s | | |

| क्रियापदे | इतर शब्द | | | |
|---|---|---|---|---|
| दाखवणे<br>to show | छोटा<br>small | वरिष्ठ<br>senior | किती<br>how many | इतर<br>other |
| शोधणे<br>to search | सागवानी<br>of teak (wood) | छान<br>nice | गोल<br>round | |
| आणणे<br>to bring | कोणाचा<br>whose | अत्याधुनिक<br>ultramodern | चाळीस<br>forty | |

सर्वनाम + चा

अनेकवचनी सर्वनामे

| सर्वनाम | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| आम्ही | आमचा | आमचे |
| | आमची | आमच्या |
| | आमचे / चं | आमची |
| आपण | आपला | आपले |
| | आपली | आपल्या |
| | आपले / लं | आपली |
| तुम्ही | तुमचा | तुमचे |
| | तुमची | तुमच्या |
| | तुमचे / चं | तुमची |
| ते<br>त्या<br>ती } | त्यांचा<br>त्यांची<br>त्यांचे / चं | त्यांचे<br>त्यांच्या<br>त्यांची |

If the noun is in सामान्यरूप, the possessive adjective modifying that noun is also in सामान्यरूप. उदा॰ तुझ्या घराशेजारी पोस्ट ऑफिस आहे.

The **interrogative word** used to obtain possessive adjective is कोणाचा, which also has six forms and an oblique form.

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| पुल्लिंग | कोणाचा | कोणाचे |
| स्त्रीलिंग | कोणाची | कोणाच्या |
| नपुंसकलिंग | कोणाचे / चं | कोणाची |
| सामान्यरूप | कोणाच्या | |

## पाठ पाच / मतदानाची तयारी

**भाग १**

जिल्हाधिकारी : सुनील, जरा अजयला बोलव.
सुनिल : हो साहेब.
अजय : साहेब, आत येऊ का?
जिल्हाधिकारी : ये अजय. तू हा आदेश टाईप कर. आधी नीट वाच. चुका करू नकोस.
अजय : आदेश कोणाला पाठवू, साहेब?
जिल्हाधिकारी : आपल्या जिल्ह्यातल्या सर्व शासकीय कार्यालयांच्या प्रमुखांना पाठव. थांब. जाऊ नकोस. शुक्रवारी ११ वाजता मतदानाच्या तयारीसाठी एक बैठक आहे. तू सर्व तहसीलदारांना फोन कर आणि बैठकीची वेळ सांग. मेल पाठवू नकोस. आता वेळ कमी आहे.
अजय : हो. साहेब

**शब्दार्थ :**

| नामे | | | |
|---|---|---|---|
| तो | | ती | ते |
| तो / ती जिल्हाधिकारी, ते / त्या – collector, -s | तो / ती प्रमुख, ते / त्या – head, -s | ती चूक, त्या चुका mistake, -s | ते मतदान voting |
| तो आदेश, ते – order, -s | तो वेळ time | ती तयारी preparation, -s | |
| तो जिल्हा, ते जिल्हे district, -s | तो / ती उपजिल्हाधिकारी, ते / त्या – deputy collector, -s | ती बैठक, त्या बैठका meeting, -s | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ती वेळ, त्या वेळा<br>timing, -s | |

| क्रियापदे | | इतर शब्द | |
|---|---|---|---|
| बोलवणे<br>to call | पाठवणे<br>to send | जरा<br>please | कोणाला<br>to whom |
| वाचणे<br>to read | जाणे<br>to go | आधी<br>first | शुक्रवारी<br>on friday |
| चूक करणे<br>to make a mistake | | | |

**व्याकरण :**

The permissions, orders, suggestions etc are in आज्ञार्थ i.e. if the verb is in imperative form, then the subject should be in second person for obvious reasons. The imperative form itself is the root of the verb i.e.धातू

तू + धातू.    तू पुस्तक वाच.

वाच is the root of the verb and imperative form as well.

**There are 2 types of verbs:**

स्वरान्त and व्यंजनान्त. स्वरान्त verbs again in turn are of 5 types i.e. ending with आ, ई, ऊ, ए and ओ

**व्यंजनान्त धातू**

| | |
|---|---|
| वाच - to read | ऐक - to listen |
| कर - to do | बस - to sit |
| बोलव - to call | सांग - to tell |
| पाठव - to send | बोल - to speak |
| बघ - to see | आण - to bring |

**स्वरान्त धातू**

| आकारान्त | ईकारान्त | ऊकारान्त | एकारान्त | ओकारान्त |
|---|---|---|---|---|
| जा - to go | लिही - to write | धू - to wash | ये - to come | हो - to become |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| खा - to eat | पी - to drink | | दे - to give | |
| | | | घे - to take | |
| | | | ने - to take away | |

Imperative form of the verb does not vary according to genders, but it does vary for number.

**व्यंजनान्त धातू**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| तू + धातू | तुम्ही धातू + आ |
| तू वाच. | तुम्ही वाचा. |
| तू तयारी कर. | तुम्ही तयारी करा. |

**स्वरान्त धातू**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| तू + धातू | तुम्ही धातू + आ |
| तू जा | तुम्ही जा + आ = जा |
| तू खा | तुम्ही खा + आ = खा |

| एकवचन |
|---|
| तू + धातू |
| तू + लिही |
| तू + पी |
| तू + धू |
| तू + ये |
| तू + घे |
| तू + दे |
| तू ने |
| तू हो |

The negative imperative is constructed thus

| होकारार्थी | नकारार्थी |
|---|---|
| तू पुस्तक वाच. | तू पुस्तक वाच + ऊ + नकोस. |

भाग २

(जिल्हाधिकारी, उप-जिल्हाधिकारी आणि तहसीलदारांची बैठक चालू आहे)

जिल्हाधिकारी : कदम, तुम्ही मुद्दे लिहून घ्या आणि नंतर कार्यवृत्त तयार करा. आज आपली बैठक मतदानाच्या तयारीसाठी आहे. १५ तारखेला मतदान आहे. तुम्ही आपापल्या तालुक्यात राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण आयोजित करा.

एक तहसीलदार : सर, प्रत्येक बूथवर एक निवडणूक अधिकारी नेमू का?

उपजिल्हाधिकारी : हो. प्रशिक्षित, राजपत्रित अधिकाऱ्यांना नेमा. सर्वांना मतदानयंत्राची माहिती सांगा.

दुसरा तहसीलदार : लिपिकांना आणि शिपायांनाही प्रशिक्षण देऊ नं?

जिल्हाधिकारी : हो. पण त्यांना अधिकाऱ्यांबरोबर प्रशिक्षणासाठी बोलवू नका.

उपजिल्हाधिकारी : मतदानाच्या एक दिवस आधी सर्वांना मतदानकेंद्राच्या ठिकाणी घेऊन जा. त्यांना सार्वजनिक वाहनांनी नेऊ नका. त्यांच्या राहण्याची आणि जेवणाचीही व्यवस्था करा.

जिल्हाधिकारी : वीज आणि पाण्याची व्यवस्थाही बघा. त्या दिवशी सुट्टी जाहीर करा. आपण सर्वजण जबाबदारीने मतदान पार पाडू या.

सर्व तहसीलदार : हो साहेब. तुम्ही अजिबात काळजी करू नका.

शब्दार्थ :

| नामे | | |
|---|---|---|
| तो | ती | ते |
| तो मुद्दा, ते मुद्दे<br>point, -s | ती निवडणूक, त्या निवडणुका<br>election, -s | ते कार्यवृत्त, ती कार्यवृत्ते / त्तं<br>minute, -s |
| तो / ती लिपिक, ते / त्या –<br>clerk, -s | ती माहिती<br>information | ते प्रशिक्षण, ती प्रशिक्षणे / णं,<br>training, -s |
| तो शिपाई, ते -<br>peon, -s | ती व्यवस्था, त्या –<br>arrangement, -s | ते मतदानयंत्र,<br>ती मतदानयंत्रे / त्रं<br>voting machine, -s |
| | ती वीज<br>electricity | ते वाहन, ती वाहने / नं<br>vehicle, -s |

| | | |
|---|---|---|
| | ती सुट्टी, त्या सुट्ट्या<br>holiday, -s | ते जेवण, ती जेवणे / णं<br>meal, -s |
| | ती जबाबदारी,<br>त्या जबाबदाऱ्या<br>responsibility, -ies | |
| | ती काळजी, त्या काळज्या<br>worry, -ies | |
| | ती तारीख, त्या तारखा<br>date, -s | |

| क्रियापदे | | | इतर शब्द | |
|---|---|---|---|---|
| लिहून घेणे<br>to take down | नेणे<br>to take away | देणे<br>to give | नंतर<br>after | बरोबर<br>with |
| तयार करणे<br>to prepare | व्यवस्था कर / बघणे<br>to make arrangements | घेऊन जाणे<br>to take along | साठी<br>for | आधी<br>before |
| आयोजित करणे<br>to arrange, to conduct | जाहीर करणे<br>to declare | काळजी करणे<br>to worry | आपापल्या<br>individual | जबाबदारीने<br>responsibly |
| नेमणे<br>to appoint | पार पाडणे<br>to carry out | | प्रत्येक<br>each | अजिबात<br>not at all |

| Other vowel ending verbs undergo some changes before आ |
|---|
| अनेकवचन |
| तुम्ही changed root form + आ |
| तुम्ही लिह् + आ = लिहा |
| तुम्ही प्य + आ = प्या |
| तुम्ही धुव + आ = धुवा |
| तुम्ही य + आ = या |
| तुम्ही घ्य + आ = घ्या |

| |
|---|
| तुम्ही द्य + आ = द्या |
| तुम्ही न्य + आ = न्या |
| तुम्ही व्ह + आ = व्हा |
| The negative imperative is constructed thus |

| होकारार्थी | नकारार्थी |
|---|---|
| तुम्ही पुस्तक वाचा. | तुम्ही पुस्तक वाच+ऊ + नका. |

## पाठ सहावा / तू सध्या काय करतेस?

संजय : रेवती, इकडे कुठे? इथे मुंबई विद्यापीठात काय करते आहेस? इथे तू मराठी शिकवतेस का?

रेवती : अरे, किती प्रश्न विचारतो आहेस? मी पुण्याला राहते. मी मराठी शिकवते. पण मी सध्या नोकरी करत नाही. मी घरात राहून माझं काम करते. भरपूर वाचन करते. सध्या इथे अमराठी अधिकाऱ्यांना मराठी शिकवते आहे. पण तू इथे काय करतो आहेस? तुम्ही कल्याणला राहता नं?

संजय : हो, आम्ही कल्याणमध्येच राहतो. मी मंत्रालयात नोकरी करतो. त्यामुळे रोज चर्चगेटला येतो.

रेवती : मग विद्यापीठात काय करतो आहेस?

संजय : अग, कधीकधी आमच्या साहेबांबरोबर येतो.

रेवती : तुझे साहेब म्हणजे...

संजय : उपसचिव. मी त्यांचा स्वीय साहाय्यक आहे.

रेवती : अरे वा! म्हणजे मोठ्ठा माणूस आहेस तू!

संजय : नाही गं. पद मोठं आहे. पण, जबाबदाऱ्याही पुष्कळ आहेत. मी कधीच रात्री नऊच्या आधी घरी जाऊ शकत नाही कारण साहेब लवकर घरी जात नाहीत. मी रजाही घेऊ शकत नाही.

रेवती : कडक आहेत का तुझे साहेब?

संजय : नाही नाही. पण शिस्तप्रिय आहेत. ते कार्यालयात लवकर येतात आणि उशिरापर्यंत काम करू शकतात. संध्याकाळी त्यांच्या टेबलावर एकही फाईल शिल्लक राहत नाही.

रेवती : आणि चित्रा? तुम्ही दोघंही नोकरी करता नं?

संजय : हो. ती इंडियन एक्सप्रेस वृत्तसमूहात काम करते. सध्या ती एका प्रकल्पात काम करते आहे. अगं, तुझ्याकडे अभयचा फोन, पत्ता आहे का?

रेवती : तो बंगलोरला एका आय.टी. कंपनीत काम करतो. सध्या तोही एम्.बी.ए. करतो आहे.

संजय : छान. आपण सगळेच वर्गमित्र आपापल्या क्षेत्रात पुढे जातो आहोत.

शब्दार्थ :

| नाम | | |
|---|---|---|
| तो | ती | ते |
| तो प्रश्न, ते -<br>question, -s | ती बायको, त्या बायका<br>wife, wives | ते विद्यापीठ, ती विद्यापीठे / ठं<br>university, -s |
| तो / ती उपसचिव, ते / त्या -<br>deputy secretary, -s | | ते पद, ती पदे<br>post, -s |
| तो / ती साहाय्यक, ते / त्या -<br>personal assistant, -s | | ते क्षेत्र, ती क्षेत्रे / त्रं<br>field, -s |
| तो वृत्त समूह, ते -<br>papers, -s | | ते मंत्रालय, ती मंत्रालये / यं<br>mantralaya |
| तो प्रकल्प, ते -<br>project, -s | | |
| तो पत्ता, ते पत्ते<br>address, -es | | |

| क्रियापदे | इतर शब्द | | |
|---|---|---|---|
| शिकवणे<br>to teach | उशिरा<br>late | रोज<br>everyday | लवकर<br>early |
| नोकरी करणे<br>to do a job | कधीकधी<br>sometimes | शिस्तप्रिय<br>disciplined | अमराठी<br>non-marathi |
| वाचन करणे<br>to read | कारण<br>because | सध्या<br>nowadays | स्वीय<br>personal |

व्याकरण :

Simple present tense and present continuous tense are introduced in this lesson.

• Simple present tense is basically used for describing the activities in which people are currently / regularly engaged. 'त' is the present tense marker which is added to the root form and then the suffixes indicating number, gender and persons are added to it. Thus, the full conjugation of the root of 'बस' is

| | |
|---|---|
| मी बसतो / बसते | आम्ही<br>आपण } बसतो |

| | |
|---|---|
| तू बसतोस / बसतेस | तुम्ही<br>आपण } बसता |
| तो बसतो | ते<br>त्या<br>ती } बसतात |
| ती बसते | |
| ते बसते / तं | |

Plural forms (अनेकवचन) in this conjugation do not show any gender distinction. Formation of negation in Simple Present Tense is

**root** (धातू) + त  नाही / नाहीस / नाहीत.

Negative verb forms for Simple Present Tense -

**Forms of Negation (नकारार्थी) :**

| | |
|---|---|
| मी बसत नाही. | आम्ही<br>आपण } बसत नाही. |
| तू बसत नाहीस. | तुम्ही / आपण बसत नाही. |
| तो / ती / ते बसत नाही. | ते / त्या / ती बसत नाहीत. |

A) Simple present tense is used also to express a request, but then it is always used with a second person.

उदा॰ तू हे पुस्तक टेबलावर ठेवतोस का? (Will you please keep this book on the table?)

In this case, it always ends with 'का' (yes-no type question)

B) Simple present tense is used also to define or express the meaning of an object.

उदा॰ चिकू हे तपकिरी रंगाचं एक फळ असतं. (Chickoo is a brown colored fruit.)

C) It is used also as a narrative present tense i.e. for story telling / narrating an event in a book or a movie etc.

• In this lesson along with simple present tense, the construction धातू + ऊ शक is also introduced. शक means 'can'.

उदा॰ तो बंगाली बोल + ऊ शकतो.    तो बंगाली बोलू शकतो.

(He can speak Bengali.)

The forms of root शक in present tense are the same as other verb roots.

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी बंगाली बोलू शकतो / शकते. | आम्ही / आपण बंगाली बोलू शकतो. |
| तू बंगाली बोलू शकतोस / शकतेस. | तुम्ही / आपण बंगाली बोलू शकता. |
| तो / ती / ते बंगाली बोलू शकतो / ते / ते / तं. | ते / त्या / ती बंगाली बोलू शकतात. |

• Present continuous tense describes the continuous / ongoing actions at a particular point of time. The tense is formed by adding the forms of 'आहे' to the forms of simple present tense.

उदा॰ ती एका प्रकल्पात काम करते आहे.

The full conjugation of present continuous tense of root वाच (to read) is as follows.

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी पुस्तक वाचतो / वाचते आहे. | आम्ही / आपण } पुस्तक वाचतो आहोत. |
| तू पुस्तक वाचतो / वाचते आहेस. | तुम्ही / आपण पुस्तक वाचताहात. |
| तो पुस्तक वाचतो आहे. | ते / त्या / ती } पुस्तक वाचताहेत. |
| ती पुस्तक वाचते आहे. | |
| ते पुस्तक वाचते / वाचतं आहे. | |

*Here the second person marker स in वाचतोस and वाचतेस is dropped.

In formal language, the forms of आहे are added to धातू + अत. There is no gender distinction.

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी पुस्तक वाचत आहे. | आम्ही / आपण } पुस्तक वाचत आहोत. |
| तू पुस्तक वाचत आहेस. | तुम्ही / आपण पुस्तक वाचत आहात. |

| | |
|---|---|
| तो पुस्तक वाचत आहे. | ते<br>त्या } पुस्तक वाचत आहेत.<br>ती |
| ती पुस्तक वाचत आहे. | |
| ते पुस्तक वाचत आहे. | |

In colloquial speech, the form आहे is replaced by य.

उदा. मी पुस्तक वाचत आहे.
मी पुस्तक वाचतोय.

The negative forms of continuous present tense are formed by adding आहे forms to the negative forms of Simple Present tense.

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी पुस्तक वाचत नाही आहे. | आम्ही<br>आपण } पुस्तक वाचत नाही आहोत. |
| तू पुस्तक वाचत नाही आहेस. | तुम्ही / आपण पुस्तक वाचत नाही आहात. |
| तो पुस्तक वाचत नाही आहे. | ते<br>त्या } पुस्तक वाचत नाही आहेत.<br>ती |
| ती पुस्तक वाचत नाही आहे. | |
| ते पुस्तक वाचत नाही आहे. | |

## पाठ सात / मी मराठी - माझी भाषा मराठी

शंतनू : गायत्री, ईला, तुम्हाला 'पुणे फेस्टिवल'च्या उद्‌घाटनाचे पास हवे आहेत का?

ईला : हो, हो. आम्हाला तो कार्यक्रम बघायचा आहे. गायत्री, चल, पुणे फेस्टिवलच्या इतर कार्यक्रमांचंही वेळापत्रक बघू या.

शंतनू : पण तुम्हाला मराठी येतं का?

गायत्री : अरे, आमची मातृभाषा तमिळ आहे, पण आम्ही मराठी शिकतो आहोत नं. आम्हाला आता चांगलं मराठी बोलता येतं. मी रोज मराठी पेपर वाचते. बातम्या ऐकते. मला बातम्या समजतात. मराठी भाषा थोडी अवघड आहे, पण मला आवडते.

ईला : मी टी.व्ही. वर मराठी मालिकासुद्धा बघते. मला ते संवाद कळतात.

शंतनू : अरे वा! मग तुला मराठी व्याकरणाचं पुस्तक हवं आहे का?

गायत्री : नको. मला एक चांगला मराठी शब्दकोश हवा आहे.

ईला : मला मराठी गाण्यांच्या सीडी पाहिजेत. मराठी गाणी मला खूप आवडतात.

गायत्री : मला नाट्यसंगीत ऐकायचं आहे. मराठ्यांचा इतिहास वाचायचा आहे. मराठी पदार्थ शिकायचे आहेत.

शंतनू : तुला मराठी पदार्थ आवडतात का?

ईला : तिला पुरणपोळी आणि मसालेभात अतिशय आवडतो.
गायत्री : आणि ईलाला साबुदाण्याची खिचडी आणि पोहे करता येतात.
ईला : आम्हाला दोघींनाही मराठी संस्कृती आवडते. इथली माणसं, त्यांचा स्वभाव आवडतो.
ईला : मला हे शहर खूप आवडतं.
शंतनू : छान. मला तर वाटतं, तुम्ही मराठीच आहात.
ईला, गायत्री : हो, आम्ही मराठीच आहोत.

**शब्दार्थ :**

| नाम | | |
|---|---|---|
| **तो** | **ती** | **ते** |
| तो कार्यक्रम, ते-<br>programme, -s | ती मातृभाषा, त्या-<br>mother tongue, -s | ते उद्घाटन, ती उद्घाटने / नं<br>opening, -s |
| तो पास, ते-<br>pass, -s | ती बातमी, त्या बातम्या<br>news | ते गाणे / णं, ती गाणी<br>song, -s |
| तो संवाद, ते -<br>dialogue, -s | ती मालिका, त्या-<br>serial, -s | ते व्याकरण, ती व्याकरणे / णं<br>grammar, -s |
| तो शब्दकोश, ते-<br>dictionary, -ies | ती सीडी, त्या-<br>cd, cds | ते वेळापत्रक, ती वेळापत्रके / कं<br>time table, -s |
| तो इतिहास, ते-<br>history, -ies | ती संस्कृती, त्या -<br>culture, s | |
| तो पदार्थ, ते-<br>food item, -s | | |
| तो स्वभाव, ते -<br>nature, s | | |

| क्रियापदे | | इतर शब्द |
|---|---|---|
| हवा असणे / पाहिजे असणे<br>to want | कळणे<br>to understand | अवघड<br>difficult |
| बघणे<br>to see | येणे<br>to know | नेहमी<br>always |
| शिकणे<br>to learn | समजणे<br>to understand | थोडा<br>little |

| | | |
|---|---|---|
| ऐकणे<br>to hear / to listen | आवडणे<br>to like | चल<br>come on |
| | | इतर<br>other |

**व्याकरण :**

In this lesson, some sentence structures are introduced which are unique in Marathi and many other Indian languages. In those sentence structures, the subject of the sentence is actually an experiencer through which the action indicated by the verb is experienced. Hence it is always inflected and takes the suffix 'ला' and 'ना' in एकवचन and अनेकवचन respectively.

The verb agrees with the object in gender and number.

- A sentence construction with the root 'आवड' (to like) and other roots (from the same category)

  उदा॰ रोहनला मराठी भाषा आवडते.

  [Noun + ला  मराठी भाषा (Noun – F)  आवड (R) + ते (suffix, simple present 3rd person, स्त्रीलिंगी एकवचन]

  उदा॰ मुलांना क्रिकेट आवडते / तं.

  [Noun pl + ना)  Noun Neu  आवड (Root) + ते / तं (suffix – Simple present, 3rd person, नपुंसकलिंगी एकवचन]

  Like nouns, pronouns also take 'ला' or 'ना' suffix depending on the number.

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी - मला | आम्ही – आम्हाला<br>आपण – आपल्याला |
| तू - तुला | तुम्ही  तुम्हाला<br>आपण - आपल्याला |
| तो - त्याला | ते<br>त्या } त्यांना<br>ती |
| ती - तिला | |
| ते - त्याला | |

Usually, all nouns and pronouns can be seen in place of objects and the verb forms change according to their gender and number.

List of some verbroots in this group.

| | |
|---|---|
| हवा अस | to want |
| पाहिजे अस | to want |
| ये | to know |
| मिळ | to get |
| समज / कळ | to understand |
| दिस | to be seen |
| भेट | to meet |
| आठव | to remember |
| वाट | to feel |
| हो (आनंद) | to be happy |

पाहिजे does not change according to the gender of the object.
उदा. रोहनला डोसा / इडली / श्रीखंड पाहिजे.

But it changes according to the number of the object.
उदा. रोहनला डोसे / इडल्या / भजी पाहिजेत.

- There are no different rules for making negative constructions for this group of verbs. They are formed in the same way as in simple present tense.

  उदा. रोहनला डोसा आवड + त नाही.

  The negative of पाहिजे or हवा is different from other verbs.

  It is 'नको' in एकवचन and 'नकोत' in अनेकवचन.

  उदा. रोहनला डोसा नको. रोहनला इडल्या नकोत.

- 'हवा' can be used by itself or along with 'आहे'. The verb forms change like variable adjectives.

| | |
|---|---|
| रोहनला डोसा हवा (आहे). | डोसे हवे आहेत / हवेत. |
| रोहनला इडली हवी (आहे). | इडल्या हव्या आहेत / हव्यात. |
| रोहनला श्रीखंड हवे / वं (आहे). | भाजी हवी आहेत / हवीत. |

• One more construction, in which the subject takes 'ला' or 'ना' suffix is धातू + आयचा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Noun / Pronoun / Proper noun | + ला / ना | Object | धातू | + आयचा (six forms of 'चा' according to gender and number) | आहे / त. |

This construction indicates the intention / wish / prospective action / the work to be done etc.

| | |
|---|---|
| आम्हाला तो कार्यक्रम बघायचा (बघ + आयचा) आहे. | We want to see that programme. |
| मला नाट्यसंगीत ऐकायचं (ऐक + आयचं) आहे. | I want to listen to Natya Sangeet. |
| तिला मराठी पदार्थ शिकायचे (शीक + आयचे) आहेत. | She wants to learn Marathi cuisine. |

If there is no direct object in the sentence, the 'आयचा' form is in नपुंसकलिंगी एकवचन. e.g. मला दिल्लीला जायचे / जायचं आहे.

While making negative sentence, 'नाही' will be used either in place of 'आहे' or before 'आहे'.

उदा॰ मला कार्यक्रम बघायचा नाही (आहे).

• In धातू + ता  ये construction also, subject takes 'ला' or 'ना' suffix and the forms of root 'ये' vary according to the gender and number of the object. This construction means one is able to do a particular thing.

उदा॰ विजयला स्कूटर चालवता येते.

विजय + ला  स्कूटर (Noun fem)  चालव + ता (धातू + ता)  ये + ते

(Suffix, simple present, third person fem sg.)

• Vijay is able to drive a scooter.

उदा॰ विद्यार्थ्यांना स्वैपाक करता येतो.

विद्यार्थी (Noun mas. pl. OF) + ना  स्वैपाक (Noun mas)  कर + ता (धातू + ता)  ये + तो.

(suffix, Simple present, third person mas sg.)

• Students are able to cook.

## पाठ आठ / आहे आणि अस

मंजू : अरे गंगाधरन, तुझी बदली कुठे झाली आहे?
गंगाधरन : नागपूरला.
मंजू : अरे वा! नागपूर खूप सुंदर शहर आहे. ती महाराष्ट्राची उपराजधानी आहे. महाराष्ट्राचं हिवाळी अधिवेशन तिथे असतं.
गंगाधरन : हो. शिवाय ते विदर्भाचं व्यापारी केंद्र आहे. तिथली संत्री प्रसिद्ध आहेत. तिथली हळदीरामची संत्र्याची बर्फी तर अप्रतिम असते. नागपूरच्या आसपास रामटेक, ताडोबाचं अभयारण्य, नागझरी तलाव अशी अनेक प्रेक्षणीय ठिकाणं आहेत. पण उन्हाळ्यात तापमान खूप असतं. पारा चव्वेचाळीसच्या खाली कधीही येत नाही. लोक उन्हाळ्यात टोपीत कांदा ठेवून फिरत असतात.
मंजू : अरे, किती माहिती आहे तुला नागपूरची!
गंगाधरन : माझा एक मित्र तिथे असतो. तो नेहमी वर्णन करत असतो. मंजू, तुझी बदली कुठे झाली आहे?
मंजू : सोलापूरला. तिथेही उन्हाळा कडक असतो. थंडीही कडाक्याची असते. ते शहर अस्वच्छ आहे. पण चादरींसाठी प्रसिद्ध आहे. तिथल्या चादरी टिकाऊ असतात. तो माल संपूर्ण भारतात विक्रीसाठी जात असतो. दीपकचीही बदली झाली आहे ना?
विनय : हो. औरंगाबादला. ते ऐतिहासिक शहर आहे. अजिंठा-वेरुळची लेणी पहायला परदेशातूनही पर्यटक येत असतात.
मंजू : हो. पण हवामान सोलापूर, नागपूरसारखंच विषम असतं. कडक उन्हाळा आणि कडक हिवाळा.
विनय : मी मात्र पुण्यातच असेन. पुणे महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी आहे.
मंजू, गंगाधरन : अरे, वा! मजा आहे तुझी!

**शब्दार्थ :**

| नाम | | |
|---|---|---|
| **तो** | **ती** | **ते** |
| तो उन्हाळा, ते उन्हाळे<br>summer | ती थंडी,<br>cold | ते अधिवेशन, ती अधिवेशने / नं<br>session, s |
| तो माल, –<br>goods | ती राजधानी, त्या राजधान्या<br>capital, -s | ते व्यापारी केंद्र,<br>ती व्यापारी केंद्रे / द्रं<br>business centre, -s |
| तो परदेश, ते-<br>foreign country, -ies | ती चादर, त्या चादरी<br>bedsheet, -s | ते तापमान, ती तापमाने / नं<br>temperature, -s |
| तो / ती पर्यटक, ते / त्या –<br>tourist, s | ती विक्री,<br>sale | ते डोक / कं, ती डोकी<br>head, -s |

| | | |
|---|---|---|
| तो मित्र, ते-<br>friend, -s | ती माहिती, –<br>information | ते हवामान,<br>climate |
| तो कांदा, ते कांदे<br>onion | ती टोपी, त्या टोप्या<br>cap | |
| तो हिवाळा, ते –<br>winter | | |

| क्रियापदे | इतर शब्द | | | |
|---|---|---|---|---|
| फिरणे<br>to roam | हिवाळी<br>winter | अजून<br>still | दुसरी<br>second | चव्वेचाळीस<br>forty-four |
| | अप्रतिम<br>excellent | टिकाऊ<br>durable | कडाक्याची<br>extreme | विषम<br>odd |
| | सुखद<br>pleasant | ऐतिहासिक<br>historical | सांस्कृतिक<br>cultural | कडक<br>extreme |

व्याकरण : The root 'अस' (meaning 'to be') when used in present tense shows two forms असतो and आहे, but their usages are different.

१. 'आहे' is used to refer to a particular thing or state or condition of the present / current situation.

उदा॰ नागपूर खूप सुंदर शहर आहे.

२. 'अस' is used to refer to a thing / situation which is universal, general. It normally has the same qualities / state at all the time, in all the situations.

उदा॰ सोलापूरच्या चादरी टिकाऊ असतात.

३. 'नाही' and 'नसतो' are the negative forms of 'आहे' and 'असतो' respectively.

उदा॰ क) आमचं गाव फार मोठं नाही.

ख) सोमवारी हे दुकान उघडं नसतं.

Conjugation of the root 'अस' follows the same rule in the present tense, as all other roots.

| सर्वनाम | होकारार्थी | नकारार्थी | होकारार्थी | नकारार्थी |
|---|---|---|---|---|
| मी | असतो / असते | नसतो / नसते | आम्ही<br>आपण } असतो | नसतो. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| तू | असतोस / असतेस | नसतोस / नसतेस | तुम्ही / आपण असता | नसता. |
| तो | असतो | नसतो | ते, त्या, ती } असतात | नसतात. |
| ती | असते | नसते | | |
| ते | असते / तं | नसते / तं | | |

४. The forms of 'अस' when used with some place name, in case of a person it means to stay or to be at a particular place.

उदा॰ तो दिल्लीला असतो.
He stays in Delhi.
ती दिवसभर घरातच असते.
She is at home for the whole day.
ते ग्रंथालयात नसतात.
Normally, he is not (present) in the library.

५. **Habitual Present Tense**

In this lesson construction धातू + अत the forms of अस is also introduced.

उदा॰ अंजली (Noun 3rd person Fem. sg.) दिवसभर काम करत असते.
(कर + अत + असते.)
(R + अत + असते.)

उदा॰ शेतकरी (Noun 3rd person Mas.sg.) शेतात कष्ट करत असतो.
(कर + अत + असतो.)
(धातू + अत + असतो.)

This construction is used to tell specifically about habitual actions (the actions which take place regularly.)

उदा॰ अजिंठा-वेरूळला परदेशातून पर्यटक येत असतात.

The conjugation of the root अस is the same as that of Present tense.
Habitual Present Tense of the root कर.

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी काम करत असतो / काम करत असते. | आम्ही, आपण } काम करत असतो. |
| तू काम करत असतोस. / काम करत असतेस. | तुम्ही / आपण काम करत असता. |

| | | |
|---|---|---|
| तो काम करत असतो. | ते<br>त्या<br>ती } | काम करत असतात. |
| ती काम करत असते. | | |
| ते काम करत असते / तं. | | |

The negative sentences are formed by using 'नस' in place of 'अस'.

This construction does not express only habitual actions. When some actions are performed regularly, but at a particular point of time and convey continuity, then also this construction can be used.

उदा० मी घरी जातो तेव्हा आई स्वैपाक करत असते.

## पाठ नऊ / ला आणि चा

सर : आज लक्ष्मी दिसत नाही आहे.
सुनीता : आज तिच्या भावाच्या दवाखान्याचं उद्घाटन आहे.
सर : तिचा भाऊ डॉक्टर आहे का? तिला किती भाऊ आहेत?
सुनीता : लक्ष्मीला दोन भाऊ आहेत. लक्ष्मीचा एक भाऊ डॉक्टर आहे आणि एक भाऊ मर्चंट नेव्हीत आहे.
इलियस : सर, लक्ष्मीला आणि लक्ष्मीचा यात काय फरक आहे?
सर : सांगतो. दीपक, तुला किती भाऊ आहेत?
दीपक : सर, मला भाऊ नाही. मला फक्त एक बहीण आहे. ती लंडनला असते.
सर : इलियस, ही वाक्यं बघ. एखाद्या व्यक्तीला भाऊ, बहिणी, आई, वडील इ. नातेवाईक आहेत किंवा नाहीत हे सांगताना व्यक्तीच्या नावाला किंवा तो / ती / ते / त्या या सर्वनामांना 'ला' किंवा 'ना' प्रत्यय जोडतात.
सुनीता : आणि त्या नातेवाइकांबद्दल इतर माहिती सांगायला 'चा' प्रत्ययाची रूपं जोडतात. उदा. काळेसाहेबांना आई नाही. काळेसाहेबांचे वडील नव्वद वर्षांचे आहेत.
जावेद : सर, मराठीत ही वाक्यरचना माणसाला, प्राण्याला किंवा पक्ष्याला एखादा अवयव आहे हे सांगायलाही वापरतात नं?
सर : हो. तूच उदाहरण दे आता.
जावेद : हत्तीला सोंड असते. मोराला पिसारा असतो.
सर : बरोबर.
इलियस : मग सोंड आणि पिसाऱ्याबद्दल जास्त माहिती सांगताना 'हत्तीची सोंड लांब असते'. 'मोराचा पिसारा निळा असतो' अशी वाक्यं होतात का?
सर : हो आणि ही वाक्यरचना वस्तूला किंवा वास्तूला एखादा विशिष्ट भाग आहे हे सांगायलासुद्धा वापरतात.
सुनीता : म्हणजे असंच ना? - ह्या घराला तीन खिडक्या आहेत.

दीपक : आणि ह्या घराच्या खिडक्या मोठ्या आहेत.
सर : अगदी बरोबर. घड्याळाला काटे असतात, झाडाला पानं असतात, पाण्याला रंग नसतो, माणसाला पंख नसतात. या वाक्यरचनाही याच प्रकारच्या आहेत. आपण आता 'ला' किंवा 'चा' वापरून वाक्यं तयार करू या.
सर्वजण : हो. सर.

**शब्दार्थ :**

| नाम | | |
|---|---|---|
| **तो** | **ती** | **ते** |
| तो दवाखाना, ते दवाखाने<br>dispensary, -s | ती सोंड, त्या सोंडा<br>trunk, -s | ते झाड, ती झाडे / डं<br>tree, -s |
| तो मोर, ते -<br>peacock, -s | ती बहीण, त्या बहिणी<br>sister, -s | ते रूप, ती रूपे / पं<br>form, -s |
| तो पिसारा, ते पिसारे<br>plumage, -s | ती वास्तू, त्या –<br>structure, -s | ते उदाहरण, ती उदाहरणे / णं<br>example, -s |
| तो भाऊ, ते -<br>brother, -s | ती व्यक्ती, त्या –<br>person, -s | ते पान, ती पाने / नं<br>leaf, leaves |
| तो अवयव, ते –<br>body-part, -s | ती आई, त्या आया<br>mother, -s | |
| तो हत्ती, ते –<br>elephant, -s | ती खिडकी, त्या खिडक्या<br>window, -s | |
| तो पंख, ते-<br>feather, -s | | |

| क्रियापदे | | इतर शब्द | |
|---|---|---|---|
| फरक असणे<br>to differ | वापरणे<br>to use | आज<br>today | म्हणजे<br>means |
| जोडणे<br>to join | तयार करणे<br>to make | जास्त<br>more | या प्रकारच्या<br>of this type |
| उदाहरण देणे<br>to give an example | | विशिष्ट<br>particular | |

**व्याकरण :**

१. This lesson introduces the sentence constructions – proper noun / noun / pronoun + ला / ना noun आहे / अस्.

उदा॰ दीपक + ला एक बहीण आहे.
हत्ती + ला सोंड असते.

It conveys the English meaning 'to have'.

| | |
|---|---|
| उदा॰ क) Relation | लक्ष्मी + ला दोन भाऊ आहेत.<br>Lakshmi has two brothers |
| ख) Body part | पक्ष्या + ला चोच असते.<br>A bird has a beak. |
| ग) Part of the whole | ह्या खोली + ला दोन दारं आहेत.<br>This room has two doors. |

२. Negative of आहे is नाही and असतो is नसतो.

३. Some common usages in Marathi which show the same construction are -
क) रोहन + ला चष्मा नाही.
ख) सुजाता + ला भरपूर मैत्रिणी आहेत.
ग) मला आज अजिबात वेळ नाही.
घ) त्यांना या आठवड्यात पुष्कळ कामं आहेत.

४. As shown in the previous lessons, pronouns with ला / and ना suffix in एकवचन and अनेकवचन respectively, exhibit the forms as मला, आम्हाला, तुला, त्यांना etc.

५. When some more information is to be given about the proper name / noun / pronoun, the forms of 'चा' suffix (depending on the gender and number of the following noun) are used.

| | |
|---|---|
| उदा॰ लक्ष्मीला एक भाऊ आहे. | लक्ष्मीचा भाऊ डॉक्टर आहे. |
| हत्तीला सोंड असते. | हत्तीची सोंड लांब असते. |

## पाठ दहा / गप्पा

**भाग १**

सुधीर : प्रशांत, उद्यापासून मी ऑफिसला स्कूटरने येणार आहे. तू माझ्याबरोबर येशील का?
प्रशांत : चालेल. मी येईन तुझ्याबरोबर. आपण पेट्रोलचा खर्च वाटून घेऊ.
सुधीर : आज ३० डिसेंबर आहे. परवा नवं वर्ष सुरू होणार. तू नव्या वर्षाचा काय संकल्प करणार आहेस?
प्रशांत : मला गिटार खूप आवडते. मी ह्या वर्षी गिटार शिकणार आहे.
सुधीर : मलाही आवडेल एखादं वाद्य शिकायला. पण मी वाद्य शिकणार नाही. मी आणि माझा मित्र आम्ही सकाळी धावायला जाऊ. ह्या वर्षी काहीही करून मी वजन कमी करणार आहे.
प्रशांत : तुम्ही सगळे यावर्षी भूतानला जाणार आहात ना? तुम्ही फेब्रुवारीत जाल ना?
सुधीर : आमचं नक्की नाही. आम्ही कदाचित जाऊ किंवा जाणार नाही.
प्रशांत : आपण दरवर्षी संकल्प करतो पण पूर्ण करत नाही. आपण असा संकल्प करू, की आम्ही आता संकल्प करणार नाही. चल आता घरी.

**शब्दार्थ :**

| नाम | | |
|---|---|---|
| **तो** | **ती** | **ते** |
| तो खर्च, ते –<br>expense, -s | ती स्कूटर, त्या –<br>scooter, -s | ते वाद्य, ती वाद्ये / द्यं<br>instrument, -s |
| तो संकल्प, ते –<br>resolution, -s | | ते वजन, ती वजने / नं<br>weight, -s |

| क्रियापद | | इतर शब्द | |
|---|---|---|---|
| वाटून घेणे<br>to share | धावणे<br>to run | उद्यापासून<br>from tomorrow | कदाचित<br>perhaps |
| सुरू होणे<br>to start | कमी करणे<br>to reduce | सकाळी<br>in the morning | दरवर्षी<br>every year |
| संकल्प करणे<br>to make a resolution | नक्की नसणे<br>not to be definite | काहीही करून<br>any how | |
| शिकणे<br>to learn | पूर्ण करणे<br>to complete | यावर्षी<br>this year | |

**भाग २**

मुक्ता : आज नेहा दिसत नाही. ती डबा खाणार नाही का?
राधा : नाही. आज समीर येणार आहे. मग ती दोघं बाहेर जेवायला जातील.
मुक्ता : पुढच्या महिन्यात त्यांचं लग्न असेल नं?
राधा : नाही. त्याला त्याची कंपनी सहा महिन्यांसाठी जर्मनीला पाठवणार आहे. इतकी चांगली संधी तो का सोडेल? आता त्यांचं लग्न पुढच्या वर्षी होईल.
मुक्ता : चांगलं आहे. नेहाला तयारीला भरपूर वेळ मिळेल. तुला एक breaking news माहीत आहे का?
राधा : कोणती?
मुक्ता : परेरासाहेबांची बदली होणार आहे आणि त्यांच्या जागी एक मॅडम येणार आहेत.
राधा : परेरासाहेब कुठे जाणार आहेत?
मुक्ता : कदाचित हेडऑफिसला जातील.
राधा : नव्या मॅडमचं नाव काय? कडक आहेत का त्या?
मुक्ता : नाव माहीत नाही. पण वयाने मोठ्या आहेत म्हणजे कडक असतीलच.
राधा : चल, दोन वाजले. मला बरीच पत्रं टाइप करायची आहेत.
मुक्ता : आज आपण थोडं लवकर निघू. हवामानखात्याचा अंदाज आहे. आज मुसळधार पाऊस पडणार आहे.
राधा : आकाशात एकही ढग नाही. आज अजिबात पाऊस पडणार नाही आहे. पाच वाजता भेटू.

**शब्दार्थ :**

| नाम | | |
|---|---|---|
| तो | ती | ते |
| तो अंदाज, ते –<br>prediction, -s | ती संधी, त्या –<br>opportunity, -ies | ते लग्न, ती लग्ने / ग्नं<br>marriage, -s |
| तो पाऊस<br>rain, -s | | ते वय, ती वये / यं<br>age, -s |
| तो ढग, ते –<br>cloud, -s | | ते हवामानखाते / तं, ती हवामानखाती<br>meteorological department, -s |
| | | ते आकाश<br>sky |

| क्रियापदे | | इतर शब्द | | |
|---|---|---|---|---|
| दिसणे<br>to be seen | पाऊस पडणे<br>to rain | पुढच्या<br>next | थोडं<br>little | बरीच<br>many |
| सोडणे<br>to leave | भेटणे<br>to meet | जागी<br>in place | लवकर<br>early | अजिबात<br>not at all |
| मिळणे<br>to get | माहीत असणे<br>to know | कडक<br>strict | मुसळधार<br>heavy | |

**व्याकरण :**

Simple future tense is introduced in this lesson. These are the suffixes added to the root of the verb for this tense.

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी -ईन / -एन | आम्ही / आपण –ऊ |
| तू -शील | तुम्ही / आपण -आल |
| तो<br>ती<br>ते } -ईल / -एल | ते<br>त्या<br>ती } -तील |

In the 1st and 3rd person एकवचन, ईन / ईल suffixes are added to vowel ending roots and एन / एल suffixes are added to consonant ending roots, but this distinction is not strictly maintained in colloquial speech.

**धातू – जा (vowel ending)**

| एकवचन | | अनेकवचन | |
|---|---|---|---|
| मी | जाईन | आम्ही / आपण | जाऊ |
| तू | जाशील | तुम्ही / आपण | जाल |
| तो<br>ती<br>ते | जाईल | ते<br>त्या<br>ती | जातील |

**धातू – कर (consonant ending)**

| एकवचन | | अनेकवचन | |
|---|---|---|---|
| मी | करेन | आम्ही / आपण | करू |
| तू | करशील | तुम्ही / आपण | कराल |
| तो<br>ती<br>ते | करेल | ते<br>त्या<br>ती | करतील |

No gender distinction is seen in future tense.

- Some vowel ending roots show changes before adding the द्वि॰पु॰ अनेकवचन suffix 'आल'

  ये – याल

  दे – द्याल

  घे – घ्याल

  ने – न्याल

  पी – प्याल

  लिही – लिहाल

  धू – धुवाल

In case of the roots 'धू' and 'पी', while adding future suffixes, the long vowel ऊ and ई change into short vowel i.e. उ and इ.

उदा॰ मी पिईन, आम्ही पिऊ, तो धुईल, तू धुशील

The root 'धू' has these peculiar forms for प्र.पु अनेकवचन. धुऊ.

Even for the I[st] एकवचन धुईन / धुवीन both these alternative forms are used.

The negative forms of Simple Future Tense.

**धातू – जा**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी जा+णार नाही. | आम्ही / आपण जा+णार नाही. |
| तू जा+णार नाहीस. | तुम्ही / आपण जा+णार नाही. |
| तो<br>ती<br>ते } जा+णार नाही. | ते<br>त्या<br>ती } जा+णार नाहीत. |

**धातू - कर**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी कर+णार नाही. | आम्ही / आपण कर+णार नाही. |
| तू कर+णार नाहीस. | तुम्ही / आपण कर+णार नाही. |
| तो<br>ती<br>ते } कर+णार नाही. | ते<br>त्या<br>ती } कर+णार नाहीत. |

In the same lesson, one more sentence construction with 'णार' suffix which indicates the definiteness of a statement / event in the future, is also introduced. In this construction, the root takes the suffix 'णार' and then the form of 'आहे'. The meaning of this construction is conveyed in English by 'going to do a particular action', which itself suggests an action in future.

**धातू + णार आहे**

**धातू – कर**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी कर+णार आहे. | आम्ही / आपण कर+णार आहोत. |
| तू कर+णार आहेस. | तुम्ही / आपण कर+णार आहात. |
| तो<br>ती<br>ते } कर+णार आहे. | ते<br>त्या<br>ती } कर+णार आहेत. |

- Many times 'आहे' at the end is dropped to insist the certainty. Sometimes 'च' is also added after 'णार' suffix.

उदा॰ तो पहिला येणार.
(He is going to stand first)
तो पहिला येणारच.
(He is definitely going to stand first)

- Negative forms of धातू+ णार आहे construction

It is formed by adding the forms of 'आहे' after the negative forms of simple future.

**धातू – कर**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी कर+णार नाही आहे. | आम्ही / आपण कर+णार नाही आहोत. |
| तू कर+णार नाही आहेस. | तुम्ही / आपण कर+णार नाही आहात. |
| तो<br>ती<br>ते } कर+णार नाही आहे. | ते<br>त्या<br>ती } कर+णार नाही आहेत. |

This construction also does not show gender difference.

## पाठ अकरा / सहल

नंदन : काय वरुण, सुट्टी कशी गेली?
वरुण : दोन दिवस सुट्टी होती. मी आणि माझे दोन मित्र सहलीला गेलो. आमच्या बायका आणि मुलंपण होती बरोबर.
नंदन : तुम्ही राहिलात कुठे?
वरुण : गेस्ट हाऊसमध्ये राहिलो. इथून पहाटे निघालो. दुपारी पोचलो. मग जेवलो आणि फिरायला बाहेर पडलो. अचानक वातावरण बदललं. वारा सुटला. आकाशात ढग जमले आणि पाऊस सुरू झाला.
नंदन : अरे वा! म्हणजे वर्षासहलच झाली उन्हाळ्यात.
वरुण : हो नं. त्या दिवशी भरपूर पाऊस पडला.
नंदन : तू पावसात भिजलास की नाही?
वरुण : हो. मनसोक्त भिजलो. गेस्ट हाऊससमोर पोहण्याचा तलावपण होता. माझे मित्र तलावात पोहले. मुलंपण पाण्यात उतरली. मी फक्त काठावर बसलो. बायकापण पोहल्या नाहीत. त्या बैलगाडीतून फिरायला गेल्या.
नंदन : तुम्ही दुसऱ्या दिवशी परत आलात का?
वरुण : हो. आम्ही रात्री उशिरा घरी पोचलो. तू मुंबईतच होतास का दोन दिवस?
नंदन : नाही. मी घरी गेलो. आमची शेती आहे तिथे. आई-वडीलही गावालाच असतात.
वरुण : ह्या वर्षी खूप पाऊस झाला नं?

नंदन : हो, धान्यही भरपूर पिकलं. पण मागची दोन वर्षं फार वाईट गेली. आमच्या भागात अजिबात पाऊस झाला नाही. भयंकर दुष्काळ पडला. पिकं जळाली. विहिरी आटल्या. नद्यांना पाणी नव्हतं. चारा नव्हता म्हणून जनावरं मेली. खूप नुकसान झालं.

वरुण : बरं झालं, तू घरी गेलास.

नंदन : हं. आता आजपासून पुन्हा ऑफीस. चल, कामाला लागू या.

**शब्दार्थ :**

| नाम | | |
|---|---|---|
| **तो** | **ती** | **ते** |
| तो तलाव, ते -<br>lake / tank, -s / -s | ती सुट्टी, त्या सुट्टया<br>holiday, -s | ते वातावरण<br>atmosphere |
| तो उन्हाळा, ते उन्हाळे<br>summer, -s | ती सहल, त्या सहली<br>trip, -s | ते आकाश<br>sky |
| तो चारा<br>fodder | ती शेती<br>farm | ते वर्ष, ती वर्षे / र्षं<br>years, -s |
| तो काठ, ते -<br>bank, -s | ती वर्षासहल, त्या वर्षासहली<br>trip in rainy season, -s | ते पीक, ती पिके / कं<br>crop, -s |
| तो बाजार, ते -<br>market, -s | ती नदी, त्या नद्या<br>river, -s | ते नुकसान<br>loss |
| तो दुष्काळ, -ते<br>drought, -s | ती बैलगाडी, त्या बैलगाड्या<br>bullock cart, -s | ते जनावर, ती जनावरे / रं<br>animal, -s |
| | ती विहीर, त्या विहिरी<br>well, -s | ते धान्य, ती धान्ये / न्यं<br>grain, -s |

| क्रियापदे | | | इतर शब्द | |
|---|---|---|---|---|
| राहणे<br>to stay | पोचणे<br>to reach | निघणे<br>to start | तिघे<br>three | मनसोक्त<br>full-fledgedly |
| जेवणे<br>to have meal | सुरू होणे<br>to start | बाहेर पडणे<br>to go out | पहाटे<br>early morning | पुन्हा<br>again |
| जमणे<br>to gather | भिजणे<br>to get wet | उतरणे<br>to enter | बरोबर<br>with | दुपारी<br>in the afternoon |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पोहणे<br>to swim | उतरणे<br>to enter (in water) | कामाला लागणे<br>to start work | अचानक<br>suddenly | अजिबात<br>not at all |
| जळणे<br>to be burnt | पाऊस होणे<br>to rain | वारा सुटणे<br>to start blowing (wind) | | |
| जाणे<br>to go | परत येणे<br>to return | | | |

**व्याकरण :**

- In this lesson, past tense of intransitive verbs is introduced. Here, the verb agrees with the gender and number of the subject. Such sentences do not have objects.

The past tense marker in Marathi is 'ल'. It is added to the root of the verb and then person, gender, number, markers are added to it. Hence the structure of the verb is – धातू + ल + Gender + Number + Person marker.

**धातू- ऊठ - होकारार्थी**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी उठलो / उठले. | आम्ही / आपण उठलो. |
| तू उठलास / उठलीस. | तुम्ही / आपण उठलात. |
| तो उठला. | ते उठले. |
| ती उठली. | त्या उठल्या. |
| ते उठले / उठलं. | ती उठली. |

- Negative forms of Past tense are obtained by adding the forms of 'नाही' after the past tense form.
  उदा॰ मी उठलो नाही. तू उठली नाहीस. आपण उठलो नाही. ते उठले नाहीत.

While making negative, the second person marker of the main verb, 'स' in एकवचन and 'त' in अनेकवचन, are shifted and added to 'नाही'.

- Some roots change before the marker 'ल'. That changed root is called a base. In most of the cases, the base form is identical with the root form, but in some cases there is partial or complete modification in the root form.

The list of such roots is as follows.

| Root | Base | Meaning | Sentence | Meaning |
|---|---|---|---|---|
| ये | आ | to come | तो आला. | He came. |
| जा | गे | to go | तो गेला. | He went. |
| मर | मे | to die | माणसं मेली. | People died. |
| पळ | पळा | to run | चोर पळाला. | The thief ran away. |
| राह | राहि | to stay | आम्ही हॉटेलात राहिलो. | We stayed in the hotel. |
| उड | उडा | to fly | पक्षी उडाला. | The bird flew. |
| हो | झा | to become | तो डॉक्टर झाला. | He became a doctor. |
| आहे | हो | to be | तो काल घरी होता. | Yesterday he was home. |
| नीघ | निघा | to start | मुलं निघाली. | Children started. |
| म्हण | म्हणा | to say | शिक्षक म्हणाले, "मुलांनो गोष्ट ऐका". | The teacher said,"children, listen to a story". |

**हो ~ झा    होकारार्थी**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी झालो / झाले. | आम्ही / आपण झालो. |
| तू झालास / झालीस. | तुम्ही / आपण झालात. |
| तो झाला. | ते झाले. |
| ती झाली. | त्या झाल्या. |
| ते झाले / झालं. | ती झाली. |

- The verb 'आहे' 'to be' has the past tense 'हो' and it takes the tense marker 'त'. The present tense of the verb हो 'to become' and the past tense of the verb आहे 'to be' should be distinguished in their use.

They are given below.

**भूतकाळ**

**धातू आहे ~ हो 'to be'**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी होतो / होते | आम्ही / आपण होतो. |
| तू होतास / होतीस. | तुम्ही / आपण होतात. |
| तो होता. | ते होते. |
| ती होती. | त्या होत्या. |
| ते होते / तं. | ती होती. |

1. The negation form of आहे is नाही and its past negative base is नव्ह. Its full conjugation is as follows.

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी नव्हतो / नव्हते. | आम्ही / आपण नव्हतो. |
| तू नव्हतास / नव्हतीस | तुम्ही / आपण नव्हतात. |
| तो नव्हता. | ते नव्हते. |
| ती नव्हती. | त्या नव्हत्या. |
| ते नव्हते / नव्हतं. | ती नव्हती. |

## पाठ बारा / कोणी कोणी काय काय केलं?

**भाग १**

सुजय : अपर्णा, तू तिरुपतीला कधी जाणार आहेस?
अपर्णा : पुढच्या महिन्यात.
सुजय : तू रिझर्वेशन केलंस का?
अपर्णा : नाही, मी स्वतः रिझर्वेशन केलं नाही. मी एका ट्रॅव्हल कंपनीच्या टूरमध्ये आमची नावं नोंदवली.
सुजय : तुला ह्या टूरची माहिती कोणी सांगितली?
अपर्णा : मी वर्तमानपत्रात जाहिरात वाचली. फोनवर चौकशी केली. नंतर आम्ही मैत्रिणींनी एकमेकींना फोन केले आणि सहलीचा बेत ठरवला.
सुजय : तुम्ही अगदी योग्य निर्णय घेतलात. मी स्वतःच आमची तिकिटं काढली, पण त्यासाठी मी पाच तास रांगेत उभा होतो. तुम्ही पैसे कधी भरलेत?
अपर्णा : लगेच. आम्ही तिकिटांचे सगळे पैसे भरले. त्यामुळे आता आम्ही तिरुपतीला नक्की जाणार.
सुजय : छान. भरपूर मजा करा.

**शब्दार्थ :**

| नामे | | | | |
|---|---|---|---|---|
| तो | | ती | ते | |
| तो बेत, ते – plan, -s | तो महिना, ते महिने month, -s | ती जाहिरात, त्या जाहिराती advertisement, -s | ते वर्तमानपत्र, ती वर्तमानपत्रे / त्रं newspaper, -s | |
| तो निर्णय, ते – decision, -s | तो पैसा, ते पैसे money | ती चौकशी, त्या चौकश्या enquiry, -ies | ते तिकीट, ती तिकिटे / टं ticket, -s | |
| तो तास, ते – hour, -s | | ती रांग, त्या रांगा queue, -s | | |

| क्रियापदे | | इतर शब्द | |
|---|---|---|---|
| नोंदवणे to register | पैसे भरणे to pay | कधी when | योग्य proper |
| ठरवणे to decide / to fix | मजा करणे to enjoy | कोणी who | स्वतः self |
| निर्णय घेणे to take a decision | | एकमेकींना to each other | नक्की definitely |

**व्याकरण :**

- In this lesson, the past tense of transitive verbs is introduced. Zero suffix is added to subject of 1st and 2nd person in both singular (एकवचन) and plural (अनेकवचन).

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी तक्ता आणला / तक्ते आणले. | आम्ही / आपण तक्ता आणला / तक्ते आणले. |
| मी वही आणली / वह्या आणल्या. | आम्ही / आपण वही आणली / वह्या आणल्या. |
| मी पुस्तक आणले / लं – पुस्तके / कं आणली. | आम्ही / आपण पुस्तक आणले / लं – पुस्तके / कं आणली. |
| तू तक्ता आणलास – तू तक्ते आणलेस. | तुम्ही तक्ता आणलात – तक्ते आणलेत. |
| तू वही आणलीस – वह्या आणल्यास. | तुम्ही वही आणलीत – वह्या आणल्यात. |
| तू पुस्तक आणले / लंस – पुस्तके / कं आणलीस. | तुम्ही पुस्तक आणलेत / लंत – पुस्तके / कं आणलीत. |

- It shows the verb forms change according to the number and gender of the object. The second person एकवचन verb form takes 'स' suffix and अनेकवचन verb form takes 'त' suffix.

**भाग २**

चव्हाण : कशी झाली कालची मीटिंग?
मधुरा : नेहमीप्रमाणे. महेशने आणि सौरभने वर्गणी गोळा करायचा प्रस्ताव सर्वांसमोर ठेवला.
चव्हाण : सर्वांनी तो मान्य केला का?
मधुरा : नाही. केतकीने तो मान्य केला नाही. तिने खूप प्रश्न विचारले. इतरांनीही आपापली मतं मांडली.
चव्हाण : देशमुखबाई काय म्हणाल्या?
मधुरा : त्यांनी काही चांगल्या सूचना केल्या. सिन्हांनी स्वतःचं मत सांगितलं नाही पण त्यांनी विरोधही केला नाही.
चव्हाण : सगळ्यांनी किती वर्गणी ठरवली?
मधुरा : दीडशे रुपये. मग सौरभने नोटीस काढली. त्याने तो कागद सर्वांपुढे फिरवला.
चव्हाण : सर्वांनी सह्या केल्या का?
मधुरा : हो. महेशने कार्यक्रमाची जबाबदारी देशमुखबाईंवर टाकली. अर्थात तो आणि सौरभ, दोघेही त्यांना मदत करणार आहेत.
चव्हाण : काल कोणी कोणी पैसे दिले?
मधुरा : केतकीने आणि तिच्या मैत्रिणींनी दिले नाहीत. बाकी सगळ्यांनी दिले.
चव्हाण : चला. मीही आज पैसे भरून टाकतो.

**शब्दार्थ :**

| नामे | | |
|---|---|---|
| **तो** | **ती** | **ते** |
| तो प्रस्ताव, ते –<br>proposal, -s | ती सही, त्या सह्या<br>signature, -s | ते मत, ती मते / तं<br>opinion, -s |
| तो विरोध, ते –<br>oppose, -s | ती जबाबदारी, त्या जबाबदाऱ्या<br>responsibility, -ies | |
| | ती वर्गणी, त्या वर्गण्या<br>contribution, -s | |

| क्रियापदे | | | इतर शब्द |
|---|---|---|---|
| गोळा करणे<br>to collect | विरोध करणे<br>to oppose | मत मांडणे<br>to give opinion | कालची<br>yesterday's |
| ठेवणे<br>to put | नोटीस काढणे<br>to issue a notice | सूचना देणे<br>to give instruction | आपापली<br>our own |
| मान्य करणे<br>to accept | फिरवणे<br>to circulate | जबाबदारी टाकणे<br>to give responsibility | दोघेही<br>both |

| | | | |
|---|---|---|---|
| विचारणे<br>to ask | सही करणे<br>to sign | भरून टाकणे<br>to pay off | बाकी<br>remaining |

**व्याकरण :**

- Regarding this tense, one thing has to be remembered that the subject in third person एकवचन takes ने or नं suffix. (In the spoken form, sometimes people say नी in place of ने / नं). In अनेकवचन it takes नी suffix. It is the object that governs the verb.

**धातू - आण (सकर्मक)**

<table>
<tr><th></th><th>एकवचन</th><th></th><th>अनेकवचन</th></tr>
<tr><td>तो</td><td>त्याने तक्ता आणला – तक्ते आणले.<br>त्याने वही आणली – वह्या आणल्या.<br>त्याने पुस्तक आणले / लं – पुस्तके / कं आणली.</td><td>ते</td><td rowspan="3">त्यांनी तक्ता आणला – तक्ते आणले.<br>त्यांनी वही आणली – वह्या आणल्या.<br>त्यांनी पुस्तक आणले / लं – पुस्तके / कं आणली.</td></tr>
<tr><td>ती</td><td>तिने तक्ता आणला – तक्ते आणले.<br>तिने वही आणली – वह्या आणल्या.<br>तिने पुस्तक आणले / लं – पुस्तके / कं आणली.</td><td>त्या</td></tr>
<tr><td>ते</td><td>त्याने तक्ता आणला – तक्ते आणले.<br>त्याने वही आणली – वह्या आणल्या.<br>त्याने पुस्तक आणले / लं – पुस्तके / कं आणली.</td><td>ती</td></tr>
</table>

- Like some intransitive verbs, some transitive roots also change their forms before the past tense marker 'ल'. Such roots are :

| Root | Base | Meaning | Sentence |
|---|---|---|---|
| खा | खाल् | to eat | चिंटूने भाजी खाल्ली. |
| दे | दि | to give | रोहनने ईशानला डायरी दिली. |
| कर | के | to do | विजयाने अभ्यास केला. |
| पाह | पाहि | to see | त्यांनी सिनेमा पाहिला. |
| वाह | वाहि | to offer | कमलाने गणपतीला फुलं वाहिली. |
| म्हण | म्हट | to say | त्याने गाणं म्हटलं. |
| धू | धुत | to wash | तिने कपडे धुतले. |
| घे | घेत | to take | तू छत्री घेतलीस. |

| | | | |
|---|---|---|---|
| घाल | घात | to put on | अदितीने स्वेटर घातला. |
| बघ | बघित | to see | आमदारांनी घरं बघितली. |
| सांग | सांगित | to tell | आजोबांनी गोष्ट सांगितली. |
| माग | मागित | to demand | तुम्ही पैसे मागितलेत. |

- In spoken form, sometimes, 'नं' suffix is used with the third person subject in place of ने. Thus ने and नं are two alternative forms which are similar in meaning and function.

  उदा॰ त्याने काम केलं. / त्यानं काम केलं.

- Negation of transitive verb sentences is similar to that of intransitive verb sentences.

  उदा॰ त्याने काम केलं.
  त्याने काम केलं नाही.
  तू गाणं म्हटलंस.
  तू गाणं म्हटलं नाहीस.
  तुम्ही मला पैसे दिलेत.
  तुम्ही मला पैसे दिले नाहीत.

- The second person अनेकवचन suffix 'त' is sometimes dropped in spoken form.

  उदा॰ तुम्ही मला पैसे दिलेत.
  तुम्ही मला पैसे दिले.

- In past tense, the subject of the verbs in 'आवड' group (मिळ, दिस, समज, ये etc.) also get inflected and takes ला and ना suffixes in एकवचन and अनेकवचन respectively.

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मला / तुला / तिला / त्यांना सिनेमा आवडला. | मला / तुला / तिला / त्यांना सिनेमे आवडले. |
| मला / तुला / तिला / त्यांना गोष्ट आवडली. | मला / तुला / तिला / त्यांना गोष्टी आवडल्या. |
| मला / तुला / तिला / त्यांना गाणे / णं आवडले / लं. | मला / तुला / तिला / त्यांना गाणी आवडली. |

- There are certain transitive verbs, which do not require a direct object, but they have an indirect object marked with ला or ना. In such cases, the verb is always in neuter एकवचन.

  उदा॰ मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्याला बोलावलं.
  पोलिसांनी चोरांना पकडलं.

## पाठ तेरा / झालं आहे - झालं होतं

**भाग १**

| | |
|---|---|
| सुबोध | : वा! फ्लॅट छान सजवला आहे तुम्ही. वसुधा सांगत होती, की तुमचं घर खूप सुंदर आहे. |
| अंजू | : अरे, गेले पंधरा दिवस आम्ही दोघं फक्त घर लावत होतो. |
| सुबोध | : तू जुन्या घराची वास्तुशांत केली होतीस का? |
| अंजू | : हो. केली होती. तू आला होतास ना संध्याकाळी. आम्ही जेवणाचा कार्यक्रम ठेवला होता. आपल्या मित्र-मैत्रिणींना मी बोलावलं होतं. |
| सुबोध | : हो, मला आठवतं आहे. आम्ही सगळे एकत्र आलो होतो. |
| अंजू | : तुम्ही सर्वांनी मिळून आम्हाला फूडप्रोसेसर दिला होता. |
| सुबोध | : आज मी तुमच्या नवीन घरासाठी वेगळी भेट आणली आहे. हे बघ, भिंतीवर लावायला म्युरल घेतलं आहे. |
| अंजू, अनय | : केवढं मोठं आहे! |
| सुबोध | : थांब, निखिलचा फोन आहे (फोनवर) अरे, तुम्ही अजून कसे आला नाही आहात? घरून निघाला आहात ना? |
| निखिल (फोनवर) | : आम्ही सायनपर्यंत आलो आहोत. अर्ध्या तासात पोचू. |
| सुबोध | : बरं. |

**शब्दार्थ :**

| नामे | |
|---|---|
| तो | ती |
| तो कार्यक्रम, ते –<br>function, -s | ती वास्तुशांत, – त्या वास्तुशांती<br>housewarming |
| | ती संध्याकाळ, त्या संध्याकाळी<br>evening, -s |
| | ती भेट, त्या भेटी<br>gift, -s |

| क्रियापदे | | इतर शब्द | |
|---|---|---|---|
| सजवणे<br>to decorate | आठवणे<br>to remember | गेले<br>past | घरून<br>from home |
| घर लावणे<br>to arrange the things in a house | आणणे<br>to bring | एकत्र<br>together | अर्धा<br>half |

| | | | |
|---|---|---|---|
| कार्यक्रम ठेवणे<br>to organise a function | पोचणे<br>to reach | मिळून<br>jointly | वेगळी<br>different |
| भिंतीवर लावणे<br>to hang | | | |

**भाग २**

अतुल : विजय, मागच्या आठवड्यात कोकणात चक्रीवादळ झालं होतं. तू त्यावेळी कोकणात होतास नं?

विजय : नाही. मी मुंबईत होतो. या चक्रीवादळाने संपूर्ण कोकणपट्टी उद्ध्वस्त केली आहे.

अतुल : हो. टीव्हीवर वादळाची दृश्यं दाखवत होते. माझा भाचा म्हणत होता की अजून लोकांचं जीवन सुरळीत झालं नाही आहे.

विजय : कसं होईल? लोकांची घरं पडली आहेत. घरांचे पत्रे, कौलं उडून गेली आहेत. झाडं कोसळली आहेत. झाडांमुळे रस्ते बंद झाले आहेत.

अतुल : वीजपुरवठाही खंडित झाला आहे. पण वेधशाळेने दोन दिवस आधी इशारा दिला होता नं?

विजय : हो. २००९ मध्येही फयान नावाचं वादळ आलं होतं तेव्हा शेकडो बोटी समुद्रात अडकल्या होत्या. पण त्यावेळी इतकं नुकसान झालं नव्हतं. यावेळी मात्र वॉट्सॲपवरून जे मेसेज येत होते त्यावरून कळत होतं की वादळाचा वेग किती प्रचंड आहे.

अतुल : आता कोकण प्रांत पूर्वीसारखा व्हायला खूप वर्षं लागतील.

विजय : हो नं.

**शब्दार्थ :**

| नामे | | | |
|---|---|---|---|
| तो | | ती | ते |
| तो आठवडा,<br>ते आठवडे<br>week, -s | तो इशारा, ते इशारे<br>warning, -s | ती वेधशाळा, त्या-<br>observatory | ते चक्रीवादळ,<br>ती चक्रीवादळे / ळं<br>storm, -s |
| तो भाचा, ते भाचे<br>nephew, -s | तो वेग<br>speed | | ते जीवन, –<br>life, lives |
| तो वीजपुरवठा<br>electricity supply | तो पत्रा, ते पत्रे<br>roof sheet, -s | | ते कौल, ती कौले / लं<br>roof-tile, -s |
| | | | ते नुकसान<br>loss |

| क्रियापदे | | इतर शब्द | |
|---|---|---|---|
| उद्ध्वस्त करणे<br>to destroy | इशारा देणे<br>to give warning | मागच्या<br>last | नावाचं<br>namely |
| उडून जाणे<br>to be flown | अडकणे<br>to be stuck | त्यावेळी<br>at that time | शेकडो<br>hundreds |
| कोसळणे<br>to collapse | नुकसान होणे<br>to have loss | संपूर्ण<br>whole | प्रचंड<br>huge |
| खंडित होणे<br>to be stopped | वर्षं लागणे<br>to take many years | सुरळीत<br>smooth | इतकं<br>this much |
| कळणे<br>to know | | पूर्वीसारखा<br>like before | त्यावरून<br>according to that |
| | | | ह्यावेळी<br>at this time |

**व्याकरण :**

- In this lesson, the construction of present perfect tense is introduced. This construction is used to denote that the action is recently completed. It is formed by adding forms of आहे to the sentence of simple past in case of intransitive and transitive verbs as well.

उदा॰ स्वैपाक झाला आहे.
सरिताने भाजी आणली आहे.

**धातू - ये (अकर्मक)**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी घरी आलो आहे / आले आहे. | आम्ही / आपण घरी आलो आहोत. |
| तू घरी आला आहेस / आली आहेस. | तुम्ही / आपण घरी आला आहात. |
| तो घरी आला आहे. | ते घरी आले आहेत. |
| ती घरी आली आहे. | त्या घरी आल्या आहेत. |
| ते घरी आले / आलं आहे. | ती घरी आली आहेत. |

**धातू - आण (सकर्मक)**

<table>
<tr><th></th><th>एकवचन</th><th></th><th>अनेकवचन</th></tr>
<tr><td>मी</td><td>तक्ता आणला आहे – तक्ते आणले आहेत.<br>वही आणली आहे – वह्या आणल्या आहेत.<br>पुस्तक आणले / लं आहे – पुस्तके / कं आणली आहेत.</td><td>आम्ही / आपण</td><td rowspan="2">तक्ता आणला आहे – तक्ते आणले आहेत.<br>वही आणली आहे – वह्या आणल्या आहेत.<br>पुस्तक आणले / लं आहे – पुस्तके / कं आणली आहेत.</td></tr>
<tr><td>तू</td><td>तक्ता आणला आहेस / तक्ते आणले आहेस.<br>वही आणली आहेस – वह्या आणल्या आहेस.<br>पुस्तक आणले / लं आहेस – पुस्तके / कं आणली आहेस.</td><td>तुम्ही / आपण</td></tr>
</table>

<table>
<tr><th></th><th>एकवचन</th><th></th><th>अनेकवचन</th></tr>
<tr><td>तो</td><td>त्याने तक्ता आणला आहे. – तक्ते आणले आहेत.<br>त्याने वही आणली आहे – वह्या आणल्या आहेत.<br>त्याने पुस्तक आणले / लं आहे. – पुस्तके / कं आणली आहेत.</td><td>ते</td><td rowspan="3">त्यांनी तक्ता आणला आहे. – तक्ते आणले आहेत.<br>त्यांनी वही आणली आहे. – वह्या आणल्या आहेत.<br>त्यांनी पुस्तक आणले / लं आहे. – पुस्तके / कं आणली आहेत.</td></tr>
<tr><td>ती</td><td>तिने तक्ता आणला आहे. – तक्ते आणले आहेत.<br>तिने वही आणली आहे. – वह्या आणल्या आहेत.<br>तिने पुस्तक आणले / लं आहे. – पुस्तके / कं आणली आहेत.</td><td>त्या</td></tr>
<tr><td>ते</td><td>त्याने तक्ता आणला आहे. – तक्ता आणले आहेत.<br>त्याने वही आणली आहे. – वह्या आणल्या आहेत.<br>त्याने पुस्तक आणले / लं आहे. – पुस्तके / कं आणली आहेत.</td><td>ती</td></tr>
</table>

Negation of present perfect tense is formed by adding आहे after the negative sentence in simple past tense.

उदा॰ तो घरी आला नाही आहे.
त्यांनी बातमी वाचली नाही आहे.
तिने पैसे पाठवले नाही आहेत.

- तो ऑफिसात आला होता is a perfect past tense construction which is used when the action / happening in the past has already taken place long back. It is formed by adding the forms of होता to the sentences of simple past in case of both intransitive and transitive verbs.

**धातू - ये (अकर्मक)**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी घरी आलो होतो. / आले होते. | आम्ही / आपण घरी आलो होतो. |
| तू घरी आला होतास. / आली होतीस. | तुम्ही / आपण घरी आला होतात. |
| तो घरी आला होता. | ते घरी आले होते. |
| ती घरी आली होती. | त्या घरी आल्या होत्या. |
| ते घरी आले / आलं होते / तं. | ती घरी आली होती. |

**धातू - आण (सकर्मक)**

<table>
<tr><th></th><th>एकवचन</th><th></th><th>अनेकवचन</th></tr>
<tr><td>मी</td><td>तक्ता आणला होता / तक्ते आणले होते.<br>वही आणली होती / वह्या आणल्या होत्या.<br>पुस्तक आणले / लं होते / होतं / पुस्तके / कं आणली होती.</td><td>आम्ही / आपण</td><td rowspan="2">तक्ता आणला होता / तक्ते आणले होते.<br>वही आणली होती / वह्या आणल्या होत्या.<br>पुस्तक आणले / लं होते / होतं / पुस्तके / कं आणली होती.</td></tr>
<tr><td>तू</td><td>तक्ता आणला होतास / तक्ते आणले होतेस.<br>वही आणली आहेस – वह्या आणल्या होत्यास.<br>पुस्तक आणले होतेस / आणलं होतंस – पुस्तके / कं आणली होतीस.</td><td>तुम्ही / आपण</td></tr>
<tr><th></th><th>एकवचन</th><th></th><th>अनेकवचन</th></tr>
<tr><td>तो</td><td>त्याने तक्ता आणला होता. – तक्ते आणले होते..<br>त्याने वही आणली होती. – वह्या आणल्या होत्या.<br>त्याने पुस्तक आणले / लं होते / होतं. – पुस्तके / कं आणली होती.</td><td>ते</td><td rowspan="3">त्यांनी तक्ता आणला होता. / तक्ते आणले होते.<br>त्यांनी वही आणली होती. / वह्या आणल्या होत्या.<br>त्यांनी पुस्तक आणले / लं होते / होतं. / पुस्तके / कं आणली होती.</td></tr>
<tr><td>ती</td><td>तिने तक्ता आणला होता. / तक्ते आणले होते.<br>तिने वही आणली होती. / वह्या आणल्या होत्या.<br>तिने पुस्तक आणले / लं होते / होतं. / पुस्तके / कं आणली होती.</td><td>त्या</td></tr>
<tr><td>ते</td><td>त्याने तक्ता आणला होता. – तक्ता आणले होते.<br>त्याने वही आणली होती. – वह्या आणल्या होत्या.<br>त्याने पुस्तक आणले / लं होते / होतं. – पुस्तके / कं आणली होती.</td><td>ती</td></tr>
</table>

- Negative form of this construction is obtained by using नव्हता in place of होता.

| Affirmative | Negative |
|---|---|
| तो घरी आला होता. | तो घरी आला नव्हता. |
| त्यांनी बातमी वाचली होती. | त्यांनी बातमी वाचली नव्हती. |
| तिने पैसे पाठवले होते. | तिने पैसे पाठवले नव्हते. |

- The construction for past continuous is R (of the main verb) + त + forms of होता. The forms of होता agree with the gender, number and person of the subject in case of both intransitive and transitive verbs.

**धातू- जा (अकर्मक)**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी घरी जात होतो / जात होते. | आम्ही / आपण घरी जात होतो. |
| तू घरी जात होतास / जात होतीस. | तुम्ही / आपण घरी जात होतात. |
| तो घरी जात होता. | ते घरी जात होते. |
| ती घरी जात होती. | त्या घरी जात होत्या. |
| ते घरी जात होते / होतं. | ती घरी जात होती. |

**धातू - वाच (सकर्मक)**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी पुस्तक वाचत होतो / वाचत होते. | आम्ही / आपण पुस्तक वाचत होतो. |
| तू पुस्तक वाचत होतास / वाचत होतीस. | तुम्ही / आपण पुस्तक वाचत होतात. |
| तो पुस्तक वाचत होता. | ते पुस्तक वाचत होते. |
| ती पुस्तक वाचत होती. | त्या पुस्तक वाचत होत्या. |
| ते पुस्तक वाचत होते / होतं. | ती पुस्तक वाचत होती. |

- Negation of the construction is formed by replacing forms of होता by forms of नव्हता.

| Affirmative | Negative |
|---|---|
| मी स्वैपाक करत होते. | मी स्वैपाक करत नव्हते. |
| तू फोनवर बोलत होतास. | तू फोनवर बोलत नव्हतास. |
| मुली कविता म्हणत होत्या. | मुली कविता म्हणत नव्हत्या. |

**COMMUNICATIVE MARATHI FOR GOVERNMENT OFFICIALS**

- Marathi text cum workbook for non-native government officials
- Special focus on vocabulary related to their profession
- A comprehensive glossary with translation in English
- An integrated communicative approach
- For classroom study as well as for self learners
- For adult learners
- Language skills: Listening, understanding, speaking, reading, writing Marathi

## The set contains:

1. Textbook with grammar, vocabulary, text types, exercises and glossary
2. Link for audio and audio-visual learning material
   https://mu.ac.in/officialmarathi

**Visit us:** www.rmvs.marathi.gov.in


शीलवृत्तफला विद्या

मुंबई विद्यापीठ
UNIVERSITY OF MUMBAI

अ आ इ ई उ ऊ ए ऐ ओ औ अं अः क ख ग घ ङ च छ ज झ ञ ट ठ ड ढ ण त थ द ध न प फ ब भ म य र ल व श ष स ह ळ क्ष ज्ञ ™

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
RAJYA MARATHI VIKAS SANSTHA, MUMBAI

9 789354 075209

**Price:** Rs. 500